


# चांदवडची शिदोरी

## स्त्रियांचा प्रश्न

शरद जोशी

# चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न

शरद जोशी

संपादन : प्राचार्य सुरेशचंद्र म्हात्रे

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, आंबेठाण-४१०५०१
ता. खेड, जि. पुणे.

मुद्रक
लक्ष्मी आर्ट प्रिंटर्स, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
सरदार

प्रथमावृत्ती
२ ऑक्टोबर २०१०
रावेरी, महिला मेळावा
**मूल्य रु. १५०/-**

# प्रकाशकाचे मनोगत

चांदवड येथील महिला अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शरद जोशी यांनी लिहिलेली 'चांदवडची शिदोरी' ही पुस्तिका विशेष महत्त्वाची ठरली. शरद जोशी यांनी लिहिलेल्या स्त्री प्रश्नांवरील इतर लेखांचे संकलन केल्यानंतर त्या सगळ्या संकलनाला 'चांदवडची शिदोरी' हेच नाव ठेवले आहे. 'चांदवड अधिवेशन' महिला चळवळीचा महत्त्वाचा टप्पा आहे.

माजी आमदार सौ. सरोजताई काशीकर यांनी स्त्रियांच्या वतीने शरद जोशींपोटी कृतज्ञता म्हणून या संग्रहाला प्रस्तावना दिली, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार!

'मुक्ताईने केले ज्ञानेशा शहाणे' हा शरद जोशी यांचा लेख प्रस्तावनेसारखा सुरुवातीला वापरला आहे. प्राचार्य सुरेशचंद्र म्हात्रे यांनी हे सर्व लिखाण एकत्रित करून दिले. शरद जोशींच्या लिखाणाची सगळी उस्तवार गेली २५-३० वर्षे ते करत आलेले आहेत. या त्यांच्या निष्ठेबद्दल काय बोलणार?


रावेरी येथे होत असलेल्या महिला मेळाव्याच्या निमित्ताने शरद जोशी यांचे 'स्त्री-प्रश्नांबाबतचे लिखाण' एकत्र करून वाचकांच्या हाती देताना प्रकाशक म्हणून समाधानाची भावना आमच्या मनामध्ये आहे. शरद जोशी अमृतमहोत्सवी वर्षात हे लिखाण प्रसिद्ध करताना विशेष आनंद आहे.

**श्रीकांत उमरीकर**
औरंगाबाद



# □ अनुक्रमणिका □


| | | |
|---|---|---|
| ■ | शेतकरी स्त्रियांच्या वतीने चार शब्द – सौ. सरोज काशीकर | ७ |
| ■ | मुक्ताईने केले ज्ञानेशा शहाणे | १३ |
| एक | चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न | ३७ |
| दोन | अमरावतीची आयुधे | ७७ |
| तीन | शेतकरी महिला आघाडी : महिला आरक्षणासंबंधी व वारसाहक्कासंबंधी भूमिका | ९० |
| चार | लक्ष्मीमुक्ती : मंगल सावकाराचे देणे | ९५ |
| पाच | दळभद्री चिंधी (म.शासनाचे महिला धोरण) | १०४ |
| सहा | बेजिंग परिषद : अर्थ आणि इशारा | ११६ |
| सात | १९९७ च्या अधिवेनांपुढील कामगिरी | १३७ |
| आठ | चांदवड जाहिरनामा व शपथ | १५२ |
| नऊ | स्त्रियांच्या प्रश्नांची फुटपट्टी | १५६ |



# शेतकरी महिलांच्या वतीने चार शब्द

शेतकरी महिला आघाडीच्या वेगवेगळ्याा सखोल मांडणीचे एका पुस्तकात रूपांतर म्हणजे समस्त महिला प्रश्नांची एकत्रित स्वरूपात उकल होणे होय. या प्रश्नांच्या अभ्यासात सरसकट सर्व स्तरांतील स्त्रीला व शेतकरी स्त्रीला केंद्रबिंदू गृहीत धरले आहे. ''स्त्री आणि तिचे प्रश्न'' हे समीकरण १९८४-८५ पर्यंत सर्व स्तरांतील स्त्रियांकरिता, विशेषत: शेतकरणी (गृहिणी) करिता त्यात काही अपेक्षित नव्हते. याचा अर्थ स्त्रीप्रश्नाचा अभ्यासच झाला नाही असे नव्हे. मात्र जो काही अभ्यास झाला तो प्रामुख्याने कामकाजी स्त्रियांच्या व मजूर स्त्रियांच्या प्रश्नांचाच झालेला आढळतो. मार्क्सने स्त्री प्रश्नाच्या केलेल्या मांडणीत ग्रामीण गृहिणी कुठेच दिसून येत नाही. त्यामुळे स्त्रीचे काही वेगळे प्रश्न असतील याची जाण आम्हा स्त्रियांनादेखील नव्हती.

१९८४-८५ साली शेतकरी संघटनेच्या माध्यमातून जेव्हा गावागावात जायला लागलो आणि शेतीमालाच्या रास्त भावाचा प्रश्न मांडायला लागलो तेव्हा असे वाटत असे की ही आर्थिक प्रश्नांची लढाई जिंकलो की आपले प्रश्न सुटतील, सभेला येणारी स्त्री ही आर्थिक सधनता आल्यावर चांगलं आयुष्य जगू शकेल. याच काळात स्त्रियांच्या बाजूने पगारवाढीकरिता काही महिला संघटना लढा देत असत तर काही संघटना हुंडाबळी, घटस्फोट, बलात्कारासारखे प्रश्न घेऊन रस्त्यावर येत असत. हुंडाबळी, घटस्फोट हे वैयक्तिक प्रश्न आहेत म्हणून सर्वसामान्य ग्रामीण स्त्री या प्रश्नांकडे जवळिकीने बघत असलेल्या आढळत नव्हत्या. अशा स्थितीत दोन पैसे हाती आले म्हणून आम्ही स्त्रिया सुखी झालो नाहीत, उलट दारुची बाटली घरी आली व आमचा मार वाढला अशा आशयाची मांडणी स्त्रिया करू लागल्या तेव्हा आर्थिक प्रश्नांपेक्षाही वेगळे प्रश्न सामान्य स्त्रियांचे आहेत याची जाणीव झाली. चांदवडच्या शिदोरीत हे प्रश्न खऱ्या अर्थाने समोर आले. समग्र महिला आघाडीने एकत्रितपणे या प्रश्नांची उकल

करण्याचा प्रयत्न केला आणि महत्त्वाचा दुवा सापडला तो म्हणजे आर्थिक प्रश्न म्हणजे स्त्री प्रश्न नव्हे. त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटल्याने स्त्रियांच्या समस्या मार्गी लागतीलच असे नाही. याकरिता तिच्याशी संवाद साधून तिच्याकडून या समस्या जाणून घेण्यात आल्या.

त्यातून, स्त्रीचा आर्थिक दर्जा सुधारण्यासोबतच तिचा सामाजिक दर्जा सुधारणे अधिक महत्त्वाचे आहे हे स्पष्ट झाले. सामाजिक दर्जा सुधारण्यात सर्वप्रथम तिला कुटुंबात असणारे दुय्यम स्थान नष्ट करून बरोबरीचे स्थान मिळणे महत्त्वाचे होते. कारण नोकरदार व मजूर स्त्री जरी बरोबरीने अर्थार्जन करीत होती तरी तिला स्व इच्छेने स्वत:करितासुद्धा काहीही खर्च करण्याचा अधिकार नव्हता. म्हणजे स्त्री ही घरात पैसा आणणारे यंत्रच ठरले होते. अशा स्थितीत शेतकरी महिला आघाडीने स्त्रियांच्या हक्काकरिता व समाजात तिचे स्थान तिला मिळवून देण्याकरिता ''चांदवडची शिदोरी'' च्या माध्यमातून एक नवीन दालन उघडण्याचे काम केले; स्त्रीला समाजात बरोबरीचे स्थान मिळविण्याकरीता 'स्त्री विरुद्ध पुरुष' ही भूमिका योग्य नाही हे स्पष्ट केले. स्त्री आणि पुरुष हे परस्परविरोधी नव्हे तर परस्परपूरक घटक आहेत हे इतक्या वर्षांच्या समाजबांधणीतून स्पष्ट झाल्याचे दिसते. कारण पती-पत्नी, आई-मुलगा, वडील-मुलगी, भाऊ-बहीण ही प्राथमिक नाती प्रत्येक स्त्री-पुरुषाने मान्य करून एक सुंदर भावनिक गुंफण केल्याचे स्पष्ट होते. मात्र या सर्व नात्यांतील स्त्री पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे दुय्यमत्वाकडे गेल्याचेही आढळते. स्त्रीच्या या दुय्यमत्वाला केवळ पुरुष नव्हे तर स्त्रियाही जबाबदार आहेत हे इतिहासाने सिद्ध झाले. स्त्रीचे दुय्यमत्व संपवून तिला माणूस म्हणून जगण्याची संधी मिळविण्याची संकल्पना म्हणजे 'चांदवडची शिदोरी' होय.

नोव्हेंबर १९८६ मध्ये लाखलाख स्त्री-पुरुषांनी संपूर्ण चांदवडची शिदोरी तीन दिवस डोळयात प्राण आणून समजून घेतली. स्त्री-पुरुष समानतेच्या समाज जीवनाची ''गीता' म्हणून तिचा स्वीकार केला. पत्नीशी वागण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनात बदल झाला. सामाजिक परिवर्तनातून स्त्रीपुरुषमुक्तीची ही पहिली पायरी आम्हा सर्व स्त्रियांना सुखावून गेली, हे चांदवडचे वैशिष्ट्या आहे. चांदवड अधिवेशनाच्या ठरावांनी संपूर्ण स्त्रीचळवळीला नवीन दिशा दिली; स्त्रीला तिच्या प्रश्नाची जाणीव करून दिली. ''आमच्या समस्या आम्हाला चांदवडच्या शिदोरीतून कळल्या'' हे स्त्रियांचे मत म्हणजे स्त्रीप्रश्नाची खरीखुरी मांडणी झाल्याची पावतीच होय.

१९८६ साली चांदवडच्या अधिवेशनातून परतलेली स्त्री आपल्या समस्या



सोडवून घेण्याकरिता शेतकरी संघटनेसोबत पुढे सरसावली; आसखेड पद्धतीने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, मुलांमुलींच्या आरोग्याचा व शिक्षणाचा प्रश्न, कुटुंबातील आपल्या स्थानाचा विचार, मुलीला कमी न लेखण्याचा निर्धार, आर्थिक लुटीचा विरोध करण्याच्या जागरुकतेसोबतच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने सत्तेत स्थान मिळवून घेण्याकरिता सिद्ध झाली.

१९८९ मध्ये अमरावती अधिवेशनातील आयुध घेऊन शे.म.आ. पुढे सरसावली. गावातील गावगुंडाचे अड्डे नष्ट करण्याकरिता दारू दुकान बंदीचे पाऊल उचलले. जिल्ह्या-जिल्ह्यांत दारूची दुकाने बंद पाडून सरकारला कायदा करण्यास भाग पाडले. स्त्रियांना मालमत्तेत अधिकार असावा, ती परित्यक्ता व निराधार होऊ नये याकरिता समाजाचे मनपरिवर्तन करून 'लक्ष्मी मुक्ती'चा कार्यक्रम राबविला. कमी अधिक दोन लाख स्त्रियांच्या नावाने जमिनी करण्यात याव्या या आशयाचे अर्ज तालुक्यातालुक्यातील कार्यालयांत येऊन पडले. या जागृतीतून 'लक्ष्मी मुक्ती'चा अध्यादेश १९९४ साली काढण्यास महाराष्ट्र सरकारला भाग पडले. दहाबारा वर्षे लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आंदोलनात्मक मार्गातून सरकारला घेण्यास भाग पाडले. चांदवडच्या ठरावानुसार १०० टक्के स्त्रिया उभ्या करण्याचा निर्णय घेऊन ग्रामीण स्त्री ग्रामस्वराज्य आपल्याकरिता आहे या त्वेषाने निवडणूक लढली व १०० टक्के स्त्रिया निवडून येऊन येनोरा (जि. वर्धा), मेटीखेडा (जि. यवतमाळ), विटनेर (जि. जळगाव) अशा ठिकाणी ५ वर्षे यशस्वी कामकाज केल्याच्या नोंदी आहेत याचे विवेचन या स्त्रीसाहित्यातून मिळते.

मजल दरमजल शेतकरी महिला आघाडीची सरशी होत आहे हे बघून स्त्रीमताच्या गठ्ठयाकडे लक्ष ठेवून शासनाने महिला धोरण व महिला आयोग निर्माण केले. हे आयोग व हे धोरण स्वतंत्रपणे व स्वबळावर स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याच्या प्रयत्नात असलेल्या महिला (आंदोलनाला) विचाराला खीळ घालण्याचे धोरण आहे हे ''दळभद्री चिंधी'' ने अभ्यासपूर्ण मांडणी करून स्पष्ट केलेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात या देशात दारिद्र्य, अनारोग्य, शिक्षणाच्या नावाने शंख, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव, असुरक्षितता, शून्य आर्थिक विकास याचेच उत्तर सरकारला शोधता आले नाही, या सरकारच्या नाकर्तेपणावर कोणत्याही प्रकारे चर्चा न करता आसखेड पध्दतीने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, भारत वैद्यकाचा अभ्यास करून आरोग्याचा प्रश्न सोडविण्याकरिता, गावात शिक्षण उद्योजकतेकडे नेणारे असावे याचा विचार करण्याकरिता व स्त्रीला

स्वतंत्रपणे तिच्या अस्तित्वाची जाणीव व्हावी याकरिता कोणत्याही सरकारी धोरणाशिवाय व कायद्याशिवाय स्त्रीला स्वातंत्र्य मिळावे याचा प्रयत्न समाजप्रबोधनातून करण्यात आला. यात जात-नोकरी, शिक्षित-अशिक्षित, कुशल-अकुशल, गृहिणी-कामकाजी असे भेद न पाडता सरसकट स्त्रियांचा विचार करून निकोप समाज घडविण्याचा प्रयत्न या साहित्यात आहे.

खुली अर्थव्यवस्था येणार यात स्त्रीचे स्थान काय असेल हा प्रश्न भले ही भल्याभल्या विदुषींना पडला असेल; पण शेतकरी महिला आघाडीपुढे हा प्रश्न निर्माण झाला नाही. याचे कारण तिची शास्त्रशुद्ध वैचारिक मांडणी आहे. शेतकरी महिला आपले स्थान खुल्या अर्थव्यवस्थेत दुय्यम न होता स्वतंत्रपणे निर्माण करण्याच्या निर्णयाला येऊन कामाला लागली.

मात्र बेजिंग परिषदेतील ठरावामुळे पुन्हा तिला अग्निपरीक्षेकरिता उभे राहावे लागत आहे. बेजिंग परिषदेतील ठराव म्हणजे समग्र महिला चळवळ सरकारी दावणीला बांधण्याचा प्रयोग म्हंटला तर अतिशयोक्ती ठरणार नाही. हे 'बेजिंग परिषदेचा अर्थ व इशारा' यातून स्पष्ट होते. स्त्रीस्वातंत्र्याच्या लढ्यात राजकीय हस्तक्षेपाने प्रगती होईल हे स्वप्न चळवळीत अगदी प्रसिद्ध असलेल्या महिला कार्यकर्त्याने बघावे याच्यासारखे दुसरे दुर्दैव महिला चळवळीच्या नशिबी दुसरे असूच शकत नाही. स्त्री-पुरुष यांच्यात असलेली दुय्यमत्वाची दरी स्त्रियांच्या 'मंडलीकरणा'ने, स्त्रीपुरुषांच्या घरकामाच्या वाटणीने व समान श्रमविभागणीतून कायद्याच्या एका फटक्यात संपणार नाही, तसेच तिच्या घरकामाचा मोबदला आकारून सुटणार नाही. शे.म.आ. च्या साहित्यातून आ. शरद जोशींनी जो समाजपरिवर्तनाचा मार्ग दाखविला आहे तो अधिक भरवशाचा वाटतो. हे केवळ पुस्तकातच लिहिले नाही तर शे.म.आ. ने आपल्या वेगवेगळ्याा आंदोलनांतून व कामांतून सिद्ध करून दाखविले आहे.

जागतिक परिषदेतील ठराव, (काही नोंदी वगळता) आयोगाचे कार्य हे (वरवर) स्त्रियांना न्याय मिळवून देणारे जरी वाटत असले तरीही ते एक ''मृगजळ'' आहे यात शंका नाही. अनेक कायदे स्त्रीच्या विकास व न्यायाकरिता केले गेले पण त्यांची अंमलबजावणी नाहीच पण खुल्लमखुल्ला पायमल्ली होताना आपण बघत आहोत. समाजात स्त्रीला स्थान मिळावे याकरिता मलमपट्टीचा खटाटोप उदंड जाहला. आता वेळ वास्तविकतेकडे वळण्याची गरज आहे. समाज निर्माण करण्याची क्षमता असलेल्या स्त्रीकरिता समाजात बरोबरीचे स्थान मागावे लागत आहे आणि तेही सरकारी मदतीने हे महिला चळवळीला शोभनीय नाही. समाजबदलाच्या प्रक्रियेत समाजाचा विस्फोट न होता बदल होणे महत्त्वाचे



वाटते. या मानसिकतेत असलेला स्त्रीसमाज मात्र चांदवडच्या शिदोरीतून, अमरावतीच्या आयुधांतून, शेगावच्या चतुरंग शेतीतून, पंचायत राजच्या खऱ्या ग्रामविकासातून, औरंगाबाद येथील प्रचीतीच्या देण्यातून, रावेरीतील सीतेच्या सामर्थ्यातून खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत उतरण्याची क्षमता आपल्या अंगी बाणण्याचे धाडस ठेवते. दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती यांसारख्या पूजनीय स्त्रीसमाजाची परंपरा असलेली स्त्री आरक्षित असण्याचा शिक्का लावून घ्यायला तयार नाही. उलट भ्रष्ट राजकारणातून स्त्रीसमाजाची अधोगती झालेली दिसते. देशभर सर्वदूर असुरक्षिततेची टांगती तलवार स्त्रीचळवळीच्या डोक्यावर आहे. ही तलवार बाजूला करून, या चळवळीचे खच्चीकरण थांबवून योग्य मार्गाने चालण्याची वाट म्हणजेच शेतकरी महिला आघाडीचे संपूर्ण साहित्य होय. हे साहित्य एकत्रित आल्याने ते स्त्रीचळवळीला दिशादर्शक म्हणून उपयोगी ठरेल यात शंका नाही.

आ. शरद जोशींच्या अमृतमहोत्सवी वर्षाला या पुस्तकाच्या रूपाने स्त्रीचळवळीला शरदभाऊंनी दिलेली प्रेमळ भाऊबीजच आहे.

**सौ. सरोज काशीकर**
वर्धा



# मुक्ताईने केले ज्ञानेशा शहाणे

निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताबाई त्यांच्या आईबापांनी आत्मत्याग केल्यानंतर सर्व बाजूंनी अनाथ झाले. ब्रह्मसमाजाचा छळवाद त्यांच्या आईबापांचा बळी घेऊन शमला नव्हता. एके दिवशी ज्ञानेश्वर भिक्षा मागण्यासाठी गावात गेले असता एक धर्ममार्तंडाने त्यांचा अपमान केला. पायाखालील धरणी दुभंगावी तसे ज्ञानेश्वरांना झाले. पाठीवरून हात फिरवायला दुसरे कोणीच नसल्यामुळे घराचा दरवाजा बंद करून तो स्थितप्रज्ञ ज्ञानेश धाय मोकलून रडू लागला आणि मग बराच वेळ अपमानाच्या दु:खाला उजाळा देत स्फुंदत राहिला. जेव्हा धाकटी बहीण मुक्ताबाई घरी आली आणि कधी नव्हे तो दरवाजा बंद पाहून तिला आश्चर्य वाटले. थोड्या वेळाने हुंदक्यांचा पुसटसा आवाज आल्यावर काय झाले आहे ते त्या छोटुकलीने, केवळ भावाविषयीच्या प्रेमयोगाने, जाणले आणि तिने ज्ञानेश्वरांची, 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी विनवणी सुरू केली. 'वैराग्य हा मोक्षाचा मार्ग नाही, नियतीने वाढून ठेवलेले कर्म निष्काम भावनेने करावे' असे तत्त्वज्ञान त्या चिमुरडीने ज्ञानेश्वरांना सांगितले तेव्हा ज्ञानेशांचे मन शांत झाले आणि त्यांनी दार उघडले.

**चांदवडसाठी तयारीची मंथनशिबिरे**

१९८६ साली, चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनाच्या आधी मी अशा मुक्ताया लाखोंनी जोडल्या. शेतकऱ्यांना घामाचे दाम हवे असेल तर घामाची मोजदाद होऊन ज्यांनी ज्यांनी घाम गाळला त्यांना त्या घामाच्या प्रमाणात दाम मिळाले पाहिजे. पहाटे कोंबडा आरवल्यापासून ते रात्री उशिरा कांबरुणाला पाठ लागेपर्यंत शेतकऱ्याघरची लक्ष्मी दररोज पंधरा ते सोळा तास कष्टत असते; सकाळचे केरवारे, सारवण, पाणी भरणे, दळण, चूलपोतेरे, गोठ्यातील वैरणपाणी, साफसफाई अशी अनेक कामे. भाकरतुकडा झाल्यावर ती शेतावर जाते आणि सांजी झाल्यावर वाटेने काटक्याकुटक्या गोळा करीत

घरी परत येते. घरी आल्यावर पुन्हा एकामागोमाग एक कामे. सगळ्यांची भाकरी खाऊन झाली की, मग उरलेल्यातून स्वत:चे भागवून तिची पाठ जमिनीला लागते. यांतील घरची कामे सोडून दिली आणि फक्त शेतातील कामे मोजली तर बायांच्या घामाचे जे थेंब मातीत जिरतात त्यांची संख्या मातीत पडलेल्या, पुरुषांच्या घामाच्या थेंबांपेक्षा दुपटीने अधिक असते. हे केवळ काव्य नाही, याला अगदी संयुक्त राष्ट्रसंघाच्या शास्त्रीय आकडेवारीचा पुरावा आहे.

शेतकऱ्यांना घामाचे दाम हवे तर त्यांना मिळणाऱ्या दामाच्या दुपटीने दाम लक्ष्मीला मिळायला हवे. पण, तिला तर काहीच मिळत नाही. जमिनीवरच्या एखाद्या तुकड्यावरचा मालकी हक्क तर सोडाच, पण रोजाने येणाऱ्या मजुराइतकीही कमाई शेतकऱ्याच्या कारभारणीला म्हणजे शेतमालकिणीला मिळत नाही. शेतीच्या प्रश्नाकरिता शेतकरी संघटना उभी राहिली, शेतकऱ्याच्या लक्ष्मीकरिता कोण उभे राहणार? शेतकरी महिलांची संघटना हवी ही मनीषा माझी दिवंगत पत्नी लीला हिने सटाण्याच्या अधिवेशनात मंचावरूनच मांडली होती. स्वित्झर्लंडमधील सारा ऐषआराम सोडून शेतकऱ्यांच्या सेवेत जिच्या आधाराने रुजू झालो तिची इच्छा टाळता कशी येईल? पण ती पुरी तरी कशी करावी? शेतकरी संघटनेच्या कामाला लागण्याआधी आंबेठाणच्या मुरमाड जमिनीत मी कठोर तप करून शेतकरी जीवनाशी सरूपता साधली; शेतकऱ्याच्या लक्ष्मीशी अशी सरूपता कशी साधावी? आदि शंकराचार्यांनी भारतीच्या प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता परकायाप्रवेश केला, अशी सिद्धी मला पामराला कोठून यावी?

जेथे जेथे समस्या असेल तेथे तेथे उभे राहावे, परिस्थितीची दाहकता प्रत्यक्ष अनुभवाने समजून घ्यावी म्हणजे प्रश्नही समजतो आणि उत्तरही आपोआपच स्फुरू लागते. चांदवडचे शेतकरी महिला अधिवेशन, खरेतर, १९८५ सालीच व्हायचे ठरले होते. चंडीगडच्या तुरुंगात मला हृदयविकाराचा झटका आला आणि ते पुढे ढकलले गेले ही माझ्या दृष्टीने मोठी इष्टापत्तीच ठरली. 'अस्तुरी जल्मा'चा आकांत अनुभवायचा, समजून घ्यायचा, केवळ वर्तमानातील नव्हे तर अनादि काळापासून या प्रश्नाचा उगम आणि सातत्य समजवून घ्यायचे; सारेच काही प्रचंड आव्हानाचे काम. तरुणपणी माझ्या साम्यवादी जीवनकालात एंगल्स्चे 'कुटुंबसंस्था, खासगी मालमत्ता आणि राजसत्ता यांचा उगम' हे पुस्तक वाचले होते, एवढेच नव्हे तर, पचवले होते. पुरुषांनी आपली मालमत्ता आपल्या जैविक वारसास मिळावी अशा बुद्धीने स्त्रियांवर बंधने घातली आणि ती, अशा सामाजिक श्रमविभागणीत काहीही सोयीस्कर नसताना, स्त्रियांनी स्वीकारली ही कल्पना पटण्यासारखी नव्हती. स्त्रियांवरील



'चूल आणि मूल' यांचे ओझे केवळ सार्वजनिक रसोडे आणि पाळणाघरे काढून संपून जाईल ही कल्पना त्याही वेळी पटली नव्हती. पण, मार्क्स्वादाच्या वैश्विक दृष्टीचा (World View) प्रभाव इतका दांडगा होता की, खासगी मालमत्तेच्या उगमामुळे स्त्रिया गुलाम झाल्या ही कल्पनाच मुळी एखाद्या प्रचंड लाटेप्रमाणे पायापासून उचलून घेऊन वाहवत नेणारी होती.

एंगल्स्च्या सिद्धांताला पर्याय उभा करणे यासाठी लागणारा व्यासंग नव्हता, नव्या व्यासंगासाठी शेतकरी आंदोलनाच्या धुमश्चक्रीत सवड नव्हती, याखेरीज आणखी एक मोठी अडचण होती.

शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र विवरून सांगताना एक सिद्धांत मांडला होता. स्त्रियांच्या हातातील स्फ्य् नावाच्या दांडक्याने जमिनीच्या पृष्ठभागावर अगदी उथळ उथळ चिरा पाडून आणि त्यांत बी टाकून आदि-शेतीची सुरुवात झाली. माणसाच्या रानटी अवस्थेत माणसांच्या टोळ्या शिकार आणि कंदमुळे यांवर जगत असताना पुरुषांनी दिवसभर रानावनांत फिरून जमा केलेल्या अन्नाची वाटणी करणे ही जबाबदारी टोळीतील स्त्रियांकडे होती. वाटणारणीच्या वाट्याला काहीच वाटा राहिला नाही म्हणजे आसपासच्या हिरवळीत सापडणारे काही दाणे खाल्ल्यास पोट भरायला मदत होते हे स्त्रीने अनुभवले होते. हेच दाणे जमिनीत पडले तर त्यांतून गुणाकार श्रेणीने नवे दाणे तयार होतात हेही तिने पाहिले होते. त्यातूनच स्फ्य्-शेतीचा उगम झाला, तिची प्रभूता स्त्रीकडे.

**अन्नधान्याचे वरकड उत्पादन**

काही काळाने माणसाने बैलाला वेसण घातली. बैलाकडून अनेक कामे करून घेता येतात हे पाहिल्यानंतर बैलाच्या उपयोगाची आणखी एक शक्यता जाणवली. जंगलात, वनात फिरताना पुरेशी शिकार मिळेच असे नाही; कधीकधी हात हलवीत परत यावे लागे. कंदमुळांनी पोट भरणार ते किती? अन्नाचा तुटवडा असला म्हणजे बाया सभोवतालचे दाणे खातात, ते मिळण्याची काही शाश्वती होती म्हणून पुरुष आणि बैल शेतीला लागले आणि इतिहासाला विलक्षण कलाटणी मिळाली.

सगळीच जमीन तशी त्या वेळी जीवनपोषक द्रव्यांनी मुसमुसलेली होती. बैलांना जोडून नांगरट केली आणि पृष्ठभागाच्या थोडे खाली बी टाकले तर पृथ्वी, दोन्ही हातांनी घेववणार नाही असे उदंड पीक देते आणि 'दोन हातांनी घेशील किती आणि एका तोंडाने खाशील किती?' अशी समस्या माणसासमोर उभी राहिली. बैलाच्या कष्टांनी माणसाच्या गरजेपेक्षा अधिक पीक तयार होऊ लागले. भाकऱ्या खा. धान्य आंबवून तयार होणारे पेय मजेशीर, पाहिजे तितके

प्या. धान्याचा साठा कधी संपत म्हणून नाही अशी बायबलच्या जुन्या करारातील ईडन गार्डन (Eden Garden) सारखी स्वर्गसदृश परिस्थिती तयार झाली.

अन्नाचा प्रश्न तर सुटला पण इतर गरजा काही थोड्या नव्हत्या. उन्हापावसाला थोपवील अशा निवाऱ्याची गरज होती. अंगावर पांघरायला वस्त्रांची गरज होती. पायी चालण्यापेक्षा नव्याने शोध लागलेल्या चाकाचा उपयोग करून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कमी कष्टांनी कसे जाता येईल याचीही शक्यता दिसू लागली होती. टोळीतील सगळ्या माणसांनी आता शेतीत काम करण्याची आवश्यकता नाही तेव्हा काही माणसांनी शेतीचे काम सोडून लाकूडतोड, निवारा, वस्त्रवल्कले अशा कामांकडे वळावे अशी सहजप्रवृत्ती होऊ लागली. ही स्वप्ने साकारली असती तर शेतीतून तयार होणाऱ्या अमाप वरकड उत्पन्नातून सतत टिकाऊ आणि गणितश्रेणीने वाढणाऱ्या विकासाची प्रक्रिया सुरू झाली असती.

**वरकड उत्पादनाची लूट**

पण, असे व्हायचे नव्हते. बैल जोडून नांगरट करून शेती पिकविणाऱ्या लोकांच्या खटाटोपाकडे काही माणसे कुचेष्टेने पाहत होती. अन्न पिकविणारे राबराबून अन्न पिकवितात, त्यांच्याशी दांडगाई करून त्यांनी पिकविलेले अन्न लुटून नेणे हे तुलनेने कितीतरी अधिक सोपे. त्यामुळे, भुरट्या चोरीपासून ते सशस्त्र दरोड्यांपर्यंत लुटारूंनी झपाट्याने प्रगती केली. अन्न पिकविणाऱ्यांच्या हाती बैल लागला आणि लुटारूंच्या हाती घोडा! मगतर लुटारूंची चंगळच झाली. दूरवरच्या प्रदेशांत जाऊन लूट करता येऊ लागली. मोठ्या टोळ्यांचे नायक सरदार बनले, राजे बनले, सम्राट बनले. त्यांतील काहीनी लुटीसाठी काही तत्त्वज्ञाने बनविली. लुटी केल्याने पापतर लागत नाहीच, उलट परमेश्वराची मेहेरनजर होते अशी दर्शनेही तयार झाली. बैलांची शेती सुरू झाल्यापासून मनुष्यजातीचा सारा इतिहास हा शेतीत तयार होणाऱ्या वरकड उत्पादनाच्या लुटीच्या साधनांचा इतिहास आहे. कधी लूट तलवारीने झाली, कधी धनुष्यबाणाने, कधी बंदुकीने तर कधी तोफांनी. आपल्या अमलाखाली आलेल्या शेतकऱ्यांवर शेतसारा घातला गेला. स्थानिक राजाला सारा वसुलीची मक्तेदारी मिळाली आणि त्याबदल्यात परक्या आक्रमणापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही. राजे उभे राहिले आणि सम्राटही.

साम्राज्यशाहीच्या कालखंडात या लुटीचे स्वरूप बदलले. जुजबी रक्तपात करून वरकड उत्पादन दीड दांडीच्या तराजूच्या चमत्काराने लांबविण्याचे मार्ग निघाले. त्यांत इंग्रजांसारखे साम्राज्यवादी आले, स्टॅलीनसारखे समाजवादी



आणि नेहरूंसारखे गुलजार राजकीय महत्त्वाकांक्षेने पछाडलेलेही आले.

शेतकरी संघटनेने कुटुंबसंस्था आणि राज्यसंस्था यांचा उगम आणि अस्त मांडला होता. हा सिद्धांत एंगल्स्च्या सिद्धांतापेक्षा अधिक बरोबर का कमी याचा निर्णय इतिहासच करील. हा सिद्धांत आधुनिक महिला चळवळीने मांडलेल्या 'टोळीतील सुदृढ संततीसाठी परकीय टोळ्यांतील स्त्रियांच्या अपहरणाच्या' सिद्धांतापेक्षा कितीतरी पटीने तर्कशुद्ध होता. शेतकरी महिला आघाडीची महिला प्रश्नाची सैद्धांतिक मांडणी शेतकरी संघटनेच्या समाजविकासाच्या सिद्धांताशी सुसंगत असणेही आवश्यक आणि अपरिहार्यही होते.

महाकवी कालिदासाने रघुवंशातील एक एक उज्ज्वल चरित्राचे वर्णन लिहिण्याआधी–

*क्व सूर्य प्रभवो वंश: क्व चाल्प विषया मति:*

असा संदेह मांडला. स्त्रियांच्या प्रश्नाची मांडणी करायला सुरुवात करताना, वर्णन करावयाचा विषय केवढा मोठा आणि माझ्या हातून त्याचे मंथन व्हायचे कसे अशी चिंता मलाही पडली. मग, एकदम 'युरेका' झाले. 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' हा प्रयोग मी शेतकऱ्यांच्या बाबतीत केला. शेतकरी महिलेचा प्रश्न समजून घेण्यासाठी, तसे दुय्यम प्रतीचे पण सर्वोत्तम उपलब्ध साधन म्हणजे स्त्रियांनाच बोलते करणे एवढेच होते. आम्ही कामाला लागलो. आम्ही म्हणजे मी, 'योद्धा शेतकरी'चे लेखक विजय परूळकर आणि त्यांच्या पत्नी सरोजा परूळकर. महाराष्ट्रभर ठिकठिकाणी स्त्रियांच्या बैठका घेतल्या. १९८० सालापासून ते १९८५ सालापर्यंत शेतकरी वर्गाचे अलोट प्रेम मला लाभले होते. शेतकरी स्त्रियाही तोपावेतो, दरवाजाच्या फळीआड राहून संघटनेच्या सभा ऐकण्याचे सोडून सभेच्या अवतीभोवती बसू लागल्या होत्या. त्यामुळे, बैठकांचे आयोजन करणे कठीण नव्हते; खरे कठीण काम होते बायांना बोलते करण्याचे.

चांदवडच्या अधिवेशनाच्या तयारीसाठी पहिली बैठक झाली ती हळी हंडरगुळी या मराठवाड्यातील गावी. एका तात्पुरत्या उभारलेल्या मांडवात सतरंजीवर पंधरावीस बाया जमलेल्या. शाळेची आणि अक्षरांची जेमतेम ओळख. सगळ्या शेतीवर राबणाऱ्या. उन्हाने काळ्या पडलेल्या. पायांना भेगाच भेगा. पण तरीही, त्यांच्या डोळ्यांत एकाच वेळी कुतूहल आणि भीती होती. आपल्या मालकांनी त्यांच्या साहेबांच्या बैठकीला आपल्याला बसायला सांगितले, हे कसे? खुद्द मालकांनाच कधी शरद जोशींबरोबर असे बैठकीला बसायला मिळालेले नाही. आता आपल्याला काय विचारतात आणि कसे बोलायचे याचा धाक सगळ्यांच्या

नजरेमध्ये.

पहिल्यांदा मी बोलायला सुरुवात केली. 'शेतकरी संघटना आता बायांचा प्रश्न समजावून घेत आहे. तुमचे अनुभव, तुमची सुखदु:खे तुम्ही बोलून दाखविली तर संघटनेला ती समजू शकतील. घाबरू नका, तुम्ही काय बोलता ते तुमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनाच काय पण, तुमच्या मालकांनासुद्धा कळणार नाही. इ. इ.'

सगळ्या बायका मुखस्तंभ. मग, सरोजावहिनी परूळकरांनी त्यांना समजावून सांगितले. 'बरं का?', 'किनई?' अशा स्त्रीसुलभ शब्दांची पेरणी करीत जवळीक साधायचा प्रयत्न केला. पण, बायांच्या तोंडून हू नाही की चू नाही.

विजय परूळकर संयुक्त राष्ट्रसंघातील संचार विषयाचे विशेषज्ञ. ते नुसतेच गालातल्या गालात हसत पाहत होते. पुढे काहीच होत नाही म्हटल्यावर आम्ही जेवणाची सुटी घेतली. त्यानंतरच्या बैठकीत, बहुधा पोट भरल्यानंतर, बायका आश्वस्त दिसत होत्या. पुन्हा प्रश्नांची सरबत्ती करण्याचे धाडस मला झाले नाही. मग, मी माझा आवडता

*'जाऊ देवाचिया गावा, देव देईल विसावा*
*देवा सांगू सुखदु:ख, देव निवारील भूक'*

हा अभंग शक्य तितक्या सुरात म्हटला आणि त्यांना भजने, जात्यावरची गाणी जे काही म्हणता येत असेल ते म्हणायला सांगितले. सुरुवातीला कोणी गायलाही तयार होईना. मग, हळूहळू दोनचारजणी मिळून गायल्या. मग, एकटीदुकटी गाऊ लागली. मग, शेवटी 'तू थांब, आता मी म्हणते' अशी चढाओढही सुरू झाली. एकदा मनातील धास्ती गेल्यानंतर आवाजही खुले आणि सुरेल होऊ लागले. सगळ्यांच्या आवाजात, जात्यावर गात असताना बायांच्या आवाजात जो दु:खाचा टाहो असतो तो स्पष्ट जाणवत होता. भजनागाण्यांचा उत्साह ओसरल्यावर मी सहज म्हटल्यासारखे म्हटले, 'तुम्ही भजनं इतकी आर्जवून म्हटली की देव खरेच प्रसन्न होईल. पण समजा, देव आता तुमच्या पुढे उभा राहिला आणि वर मागा, एकच वर मागा म्हणाला तर तुम्ही काय मागाल?' पण, या प्रश्नालाही फारसे उत्साहाने उत्तर आले नाही. आपले उत्तर कोणाला पटेल, कोणाला आवडणार नाही असला धोका घेण्यापेक्षा अगदी बिनाधोक्याचे उत्तर द्यावे म्हणून एक मध्यमवयीन बाई म्हणाली, 'मी म्हणेन, द्येवा, माजं कुक्कू तेवडं शाबूत ठेवा!' तेवढ्याने बायांची भीड चेपली आणि त्या बोलू लागल्या. कोणी म्हणाली, 'माजं पोरगं तेवडं मास्तर होऊ द्या', कोणी म्हणाली, 'माज्या पोरीचं हात पिवळं होऊ द्या', कोणाला 'नातवाचं



तोंड पाहण्याची' इच्छा होती, तर कोणाला 'अहेवपणी मरणाची'. पण, अजूनही कोणी आपल्या मनातलं बोलत नव्हत्या, आपल्याला काय हवे, नको ते बोलत नव्हत्या असे जाणवत होते. मग, मला एकदम

*'सत्वर पाव गे मला, भवानी आई, रोडगा वाहीन तुला,*
*सासू माझी गावी गेली, तिथंच खपू दे तिला'*

या भारुडाची आठवण झाली. असल्या मनीच्या इच्छा बोलून दाखविण्याची कोणाची तयारी नव्हती. मग, मी आणखी एक प्रश्न धाडसाने विचारला. 'जन्मल्यापासून आतापर्यंत, बाईच्या जन्माला आले याचा कधी आनंद झाला का?'

उत्तर लगेच मिळाले, 'पहिला मुलगा झाला तवा लई आनंद झाला' आणि अचानक, एका साध्यासुध्या दिसणाऱ्या बाईने एक ओळ म्हणून दाखविली,

*'अस्तुरी जल्मा नको घालू शिरीहारी,*
*रात न दिस परायाची ताबेदारी'*

शेतकरी संघटनेच्या नैतिक दर्शनातील 'स्वातंत्र्याच्या कक्षा (Degrees of Freedom)' ही कल्पना इतकी सहज पुढे आल्यामुळे मी आनंदून गेलो. विजय परूळकरांनी एका कागदाच्या तुकड्यावर एक चिठ्ठी पाठविली, 'मी स्वत:ला संचारतज्ज्ञ समजतो, पण तुमच्यापुढे माझे साष्टांग दंडवत आहे.'

बायांची राहण्याची सोय जवळच्याच घरी होती. त्या दिवशी बाया घरी गेल्या. रात्री बहुधा त्यांनी अहमहमिकेने भजने म्हटली असावीत. दुसरे दिवशी नाश्ता करून त्या बैठकीला आल्या आणि मग, कुपोषणाची सर्व लक्षणे दिसणाऱ्या, एका बाईने मला म्हटले, 'भाऊ, तुम्ही कालपासून आम्हाला बोलायला सांगता. कोणाची हिम्मत होत नाही. पण, मी ठरवले आहे. पूर्वी माहेर असताना तेथे गेल्यावर सगळं काही – हातचं राखून न ठेवता सगळं – भावाला सांगायची. आता तुम्हीच माझे भाऊ; तुमच्यापासून काय लपवून ठेवायचं? मी तर सगळं काही सांगणार आहे.'

मग तिने तिची कहाणी सांगितली : 'उसाला भाव मिळाला, मालक दारू पिऊ लागले आणि मला फक्त मार पडायला लागला.' पुढे मी ही कहाणी अनेक वेळा सांगितली आहे. पण, त्या क्षणी शेतकरी महिला आघाडीच्या बाया आणि मी यांच्यात – पत्रकार सतीश कामत यांच्या शब्दांत – मालकाच्या 'साहेबां'ना 'भाऊ' म्हणणारे नाते तयार झाले.

नंतर एकेकीने आपले प्रश्न मांडले – भाषणासारखे नाही, बोलल्यासारखे. विधवापणामुळे किंवा संसार नासल्यामुळे माहेरी माघारी येऊन मोठ्या भावाकडे,

भावजयीच्या शिव्या खात कष्टणाऱ्या बाईनेही, २० वर्षांच्या कष्टानंतर 'अंगावरील धडुतं आणि पोटात सकाळी पडलेली कोरभर भाकर' याखेरीज या जगात आपलं असं काही नाही अशी आपली कैफियत मांडली.

बायकांची स्वत:चे मन सांगण्याची शक्ती शेकडो वर्षांपूर्वी खुंटून गेली आहे. पाहणी करायला प्रश्नावली घेऊन गेलेल्या कार्यकर्त्यांचीही समस्या हीच असते. कोणतेही उत्तर सरळ म्हणून यायचे नाही. इकडे तिकडे पाहत, आपले उत्तर कोणाला नापसंत तर होत नाही ना याचा अंदाज घेत ते देण्याची कला बायकांनी पराकोटीची सिद्ध केली आहे. शेकडो वर्षांच्या कोंडमाऱ्यानंतर, आमच्या या बैठकांत बाया बोलू लागल्या. शब्द अशुद्ध, व्याकरण मोडकेतोडके, पण अनुभवांची नोंद खणखणीत बंद्या रुपयाची.

चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनाआधी महाराष्ट्रभर अशा चारपाच बैठका झाल्या. मग, आंबेठाण येथे महिला कार्यकर्त्यांची शिबिरे झाली. 'चांदवडची शिदोरी' तयार झाली. चांदवडला लाखांनी बाया जमल्या. त्यांनी एका आवाजात साने गुरुजींचे *'किसानांच्या बाया आम्ही, शेतकरी बाया'* हे गीत म्हटले; नारायण सुर्व्यांच्या शब्दांतील *'डोंगरी शेत माझं गं, मी बेनू किती?'* ही आर्त कैफियत चांदवडच्या, उंच भिंतींसारख्या पहाडांसमोर ऐकवली; 'आम्ही स्त्रिया माणसं आहोत' ही घनगंभीर घोषणा केली. पुढे, इतिहास घडला.

**शेतकरी महिला आघाडी**

शेतकरी महिला अघाडीने 'दारू दुकान बंदी'चा कार्यक्रम राबविला. स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणासाठी पंचायत राज्य निवडणुका, १०० टक्के महिला पॅनेल उभे करून, लढविण्याची घोषणा केली. काही ग्रामपंचायतींत संपूर्ण महिला पॅनेल निवडून आणले आणि चांगला कारभार करून दाखवला. जिल्हा परिषद व पंचायत समितीवर कब्जा आंदोलन केले. लक्ष्मीमुक्ती अभियानात कमीत कमी दोन लाख स्त्रियांना त्यांच्याच माणसांकडून जमीन मिळवून दिली. स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कांसंबंधी सर्व कुटुंबीयांना भागीदार समजण्याची संकल्पना मांडली. ज्या गावांना पाण्याच्या टाकीचा खर्च झेपत नाही तेथे टाकीशिवाय पाणीपुरवठ्याची वाघाळे-आसखेड योजना अमलात आणली. असा हा सारा इतिहास घडला.

साऱ्या देशभर चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनाचे कौतुक झाले. त्या काळच्या स्त्रियांच्या संघटना प्रामुख्याने स्थानिक असत. दोनचार सुशिक्षित महिला प्रमुख असत. त्यांतील बहुतेक स्वत:च्या वैयक्तिक अनुभवापोटी सगळ्या



पुरुषसमाजावर दुगाण्या झाडीत असत. सासूसुनेचे वादविवाद कोठे झाले, कोठे सुनेला घराबाहेर पडावे लागले, कोठे हुंडाबळी झाला की ही मंडळे धावत जात. या मंडळांना शेतकरी महिला आघाडी पसंत पडली नाही. पुरुषांविषयी तिटकाऱ्याची भाषा नाही, सासूसुनांच्या विवादांमध्ये लक्ष घालायचे नाही आणि पंचायत राज्य निवडणुका मात्र केवळ महिला उमेदवारांनी लढवायच्या हे त्यांना रुचणारे नव्हते आणि झेपणारेही नव्हते. देशीपरदेशीच्या विदुषींनी विद्वज्जड मांडणी करून शेतकरी महिला आघाडीचे सिद्धांत खोडून काढण्याचा प्रयत्न केला. पुरुषांच्या वर्चस्वाचे मूळ त्यांच्या पाशवी शक्तीत नसून त्यांच्या शारीरिक आणि लैंगिक कमकुवतपणात आहे या कल्पनेवर तर त्यांनी मोठा हलकल्लोळ केला.

त्याच सुमारास संयुक्त राष्ट्रसंघामार्फत आंतरराष्ट्रीय महिला परिषदा भरत होत्या. केनियात भरलेल्या एका परिषदेचा एक निष्कर्ष असा होता की, घरच्या कुटुंबातील मिळकतीपैकी ९० टक्के कुटुंबप्रमुख पुरुषावरच खर्च होतो. इ. इ. बेजिंग येथे झालेल्या स्त्रियांच्या पुढील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या जाहीरनाम्याततर स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सबलीकरणासाठी सरकारी छत्राखालील योजनांचा पुरस्कार करण्यात आला आणि या योजना स्वयंसेवी संघटनांच्या (NGO) माध्यमांतून राबविण्यासाठी 'कृतिपीठ'ही आखण्यात आले. स्त्रियांची काळजी करण्याचे काम राष्ट्रीय महिला आयोग, स्त्रियांची न्यायालये, स्त्रियांची पोलिस यंत्रणा यांच्याकडे सोपविण्याचाही प्रस्ताव या जाहीरनाम्यात करण्यात आला. पुरुषांचेही संरक्षण करू न शकणारी सरकारी व्यवस्था स्त्रियांचे मात्र समर्थपणे रक्षण करणार आहे अश्या स्वप्नकथा त्यात मांडल्या होत्या.

शेतकरी महिला आघाडीची मूळ संकल्पना 'रात न् दिस, परायाची ताबेदारी' मोडून काढण्याची होती. शोषणावर आधारित अर्थव्यवस्था संपत आहे, त्यामुळे स्त्रियांच्या गुलामीच्या बेड्या कमजोर होत आहेत; नवीन तंत्रज्ञान स्त्रीसुलभ आहे आणि उद्याच्या खुल्या व्यवस्थेच्या काळात संयम, सोशिकता आणि कष्टाळूपणा या, स्त्रियांनी हजारो वर्षांच्या गुलामीची किंमत देऊन संपादिलेल्या, गुणांची चलती होणार आहे; स्त्रियांची पहाट येते आहे. या नवीन संकल्पनांशी बेजिंगी मुखंडींनी चालविलेल्या सरकारपुरस्कृत महिला चळवळीचे जमण्यासारखे नव्हतेच. शेतकरी महिला आघाडीने बेजिंग परिषदेच्या जाहीरनाम्याच्या विरोधात स्त्रियांची 'बेजिंगविरोधी परिषद' मुंबईत बोलाविली.

**बेजिंगविरोधी परिषद**

या परिषदेच्या तयारीसाठी अकोल्यात शेतकरी महिला आघाडीच्या बहिणींबरोबर एक बैठक भरली. या बैठकीची मला विशेष आठवण राहिली आहे ती आघाडीच्या निरक्षर पण अनुभवसंपन्न स्त्रियांनी केनिया महिला परिषदेच्या अहवालाच्या उडविलेल्या धांदोट्यांमुळे. सर्वसाधारणपणे, नवरा ९० टक्के रक्कम स्वत:वर खर्च करतो आणि बायकामुलांना कसेबसे १० टक्के उत्पन्न देतो या चित्रातील पुरुष शहरी विदुषींना पटणारा असला तरी शेतकरी महिलांच्या अनुभवास उतरणारा नव्हता. 'भाऊ, मालकांना दारूचं व्यसन असलं तर काय बी व्हतंया. पण, नवऱ्याला काडीचं बी व्यसन नसलं की रुपयातलं ७० पैसं घरावर खर्च होतात, बघा.'

कोण पत्रास ठेवतो अशा अनुभवसिद्ध मांडणीपुढे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या आकडेवारीने भरलेल्या अहवालांची?

महिला चळवळीत सरकारला प्राधान्य मिळाले की, त्याबरोबर स्वयंसेवी संघटनांचेही फावणार आहे ही गोष्ट शेतकरी महिला आघाडीच्या 'बेजिंगविरोधी परिषदे'त स्पष्ट करण्यात आली. स्वयंसेवी संघटनांकडे विचारांचे भांडवल नाही, महिलांचे व्यापक समर्थन नाही; परदेशातील महिला चळवळीतील विदुषींच्या लिखाणाची व भाषणांची वाटमारी आणि नक्कल करून देशातील व देशाबाहेरील सभापरिषदा गाजवणाऱ्या या महिला मुखंडींना सर्वसामान्य भारतीय महिलांच्या परिस्थितीची आणि आकांक्षांची काहीही कल्पना नसते. स्त्रियांच्या विकासाच्या निमित्ताने सरकारने आणि आंतरराष्ट्रीय धर्मादाय संस्थांनी काढलेल्या योजना मिळविणे; देणग्या आणि निधी गोळा करणे यांतच त्यांना स्वारस्य असते.

मुंबई येथील 'बेजिंगविरोधी परिषदे'त शेतकरी महिला आघाडीने महिला चळवळीतील सरकारच्या आणि स्वयंसेवी संघटनांच्या आक्रमणाबद्दल १९९६ सालीच चिंता व्यक्त केली होती. महिला आंदोलनाचा आज सरकारी यंत्रणेने आणि स्वयंसेवी संस्थांनी जो विस्कोट केला आहे त्याचे भाकित 'बेजिंगविरोधी परिषदे'त वर्तवण्यात आले होते.

**स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ – स्त्रीपुरुषदास्याची पक्षधर**

स्वातंत्र्याच्या नव्या पहाटेला विरोध करण्यासाठी पर्यावरण, शिक्षण, आरोग्य या विषयांचे नाव घेत चळवळी उभ्या राहिल्या. शहरी महिला चळवळही सरकारशाहीच्या समर्थनार्थ बायकांना वेठीस धरू लागल्या.

समाजवादाच्या ऐतिहासिक जागतिक पराभवाची कारणमीमांसा हिंदुस्थानात तरी फारशी झाली नाही. डाव्या पक्षांनी, रशियात होता तो खरा कम्युनिझम



नव्हताच अशी टोपी फिरविण्यापासून ते कम्युनिझमला स्टॅलिनवादाचे स्वरूप आले, हुकूमशाही बोकाळली, शेतीकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नाही अशा काबुलीजबाबापर्यंत हातचलाख्या करून दाखविल्या. समाजवादी रशियाचे पतन हे समाजवादी सिद्धांतांच्या दोषांमुळे होते, हे दोष लेनिन व स्टॅलिन यांच्या स्वभावांतील विकृतींमुळे आलेले नव्हते, त्यांचे मूळ खुद्द मार्क्स्‌वादातच होते हे, खरे म्हटले तर, उघड झाले होते. समाजवादी रशियाची अर्थव्यवस्था ढासळली त्यातून एवढेच सिद्ध झाले की सामूहिक निर्णय कधीही समूहाच्या हिताचे असत नाहीत. समूहाच्या नावाखाली एखादी व्यक्ती किंवा गट आपल्या स्वार्थाचे तत्त्वज्ञान बनवून ते समाजावर लादतो. ॲरो (Arrow)च्या सिद्धांतानुसार, सामूहिक निर्णय हे अशास्त्रीयच असणार हे सिद्ध झाले.

भारतात समाजवादाच्या पतनासंबंधी शास्त्रशुद्ध चर्चा झाली असती तर नेहरूवादाचे जोखड भिरकावून देऊन सरळसरळ सर्व उद्योजकांच्या प्रतिभेला आणि धाडसाला वाव देणारी व्यवस्था तयार झाली असती. पंडित नेहरू आणि इंदिरा गांधी यांचा, वेगवेगळ्या ऐतिहासिक कारणांमुळे, जनमानसावर मोठा प्रभाव राहिला. समाजवादातील वाह्यातपणा सर्वांच्या लक्षात आला; पण नेहरू चुकले आणि इंदिरा गांधी फसल्या हे कबूल करायला जनमानस धजेना.

ज्या ज्या देशात समाजवाद वीसपंचवीस वर्षेतरी नांदला त्या त्या देशात एक मोठी विचित्र परिस्थिती आढळून येते. उद्योगधंद्यांसाठी लागणारा कच्चा माल, श्रमशक्ती, तयार करायच्या मालाचा आराखडा आणि भांडवल एकत्र आणावे आणि सामाजिक उत्पादन वाढवून चरितार्थ चालवावा हा अर्थाचा पुरुषार्थ तेथे लुप्त होतो. सरकारने काय ते सारे निर्णय घ्यावे, सामान्य नागरिकांनी ठरलेल्या वेळात ठरावीक जागी जाऊन सांगितलेली कामे करावीत, त्याबद्दल जो काही मेहेनताना मिळेल तो, वर्तमान नेत्याचा जयजयकार करीत, स्वीकारावा अशी एक 'चाकरमानी' मानसिकता तयार होते. पूर्व युरोपातील समाजवादी अर्थव्यवस्था ढासळली त्यानंतर तेथील चांगल्या शिकल्यासवरल्या लोकांना, भारतासारख्या मागासलेल्या देशातील धारावीसारख्या झोपडपट्टीतही खासगी उद्योगधंदे लोक चालवतात याचे मोठे अद्‌भुत वाटे. १९९१ मध्ये डॉ.मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारांचा झेंडा उभारला पण, समाजवादाच्या काळात उभी केलेली सारी संस्थाने कायम ठेवली. नियोजन मंडळ तसेच राहिले, अन्नमहामंडळ तसेच राहिले, बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला हात लागला नाही आणि त्यामुळे देशाने आर्थिक क्षेत्रातील दिशा बदलली आहे हे सर्वसामान्य जनांना समजलेही नाही. चार दशके जोपासलेली 'मायबाप सरकार सर्व काही करील' ही मानसिकता

कायम राहिली. सरकारने रोजगार द्यावा, घर द्यावे, अडीअडचणीच्या काळी सरकारनेच मदत करावी अशी मोठी भयभीत मानसिकता दृढ झाली. सरकार सर्व क्षेत्रांत मूलत:च नालायक असते. अशा सरकारला कोणत्याही क्षेत्रात काय म्हणून अधिकार द्यावा याचे काही उत्तर नव्हते. पण, निदान शिक्षण, आरोग्य आणि अन्नधान्याचा पुरवठा या बाबतीततरी सरकारची निगराणीच नव्हे तर हस्तक्षेपही आवश्यक आहे असे बहुजनांचे मत झाले. हा विचार काही आर्थिक नव्हता. हे एक सामाजिक तत्त्वज्ञान होते. पण, डॉ. अमर्त्य सेन या भारतीय विद्वानाने शिक्षण, आरोग्य आणि दुष्काळनिवारण यासाठी व्यापक आणि कार्यक्षम सरकारी यंत्रणा आवश्यक आहे असा सिद्धांत मांडला आणि त्याबद्दल त्यांना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिकही मिळाले. डॉ. अमर्त्य सेन यांची कामगिरी पाहता त्यांना नोबेल पारितोषिक मिळावे यात फारसे काही अनुचित झाले असे कोणी म्हणणार नाही. पण, त्यांना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक का देण्यात आले हे मोठे आश्चर्य आहे.

सरकार या संस्थेचीच सर्वत्र छी: थू झाली असताना, शासनसंस्था कर्जात बुडत असताना आणि देशातील प्राथमिक सुरक्षा व कायदा आणि सुव्यवस्था राखणे सरकारला अशक्य झाले असताना मरू घातलेल्या समाजवादाला आणि शासनसंस्थेला डॉक्टरसाहेबांच्या सिद्धांताने ऑक्सिजन मिळाला. शिक्षण, पोषण, आरोग्य, पर्यावरण या क्षेत्रांत सरकारच्या हस्तक्षेपाचा मोठा बडेजाव होऊ लागला. जुने समाजवादी मोठ्या प्रमाणत या चार क्षेत्रांत घुसले आणि आपापल्या स्वयंसेवी संघटना काढून ते चांगल्यापैकी चरितार्थ करू लागले. ज्या स्वयंसेवी संघटनांना जनाधार नाही, समस्यांची समज नाही त्यांनी सरकारी खजिना लुटायला सुरुवात केली आणि सरकारी कागदोपत्रीही सरकारी कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि नियोजन यांत स्वयंसेवी संघटनाची फार महत्त्वाची भूमिका असल्याचे आवर्जून नोंदविले जाऊ लागले.

१९९७ साली भारतीय स्वातंत्र्याचा ५० वा वाढदिवस म्हणजे सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला. १९४७ च्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी सर्वदूर पावसाने रिपरिप लावली होती, देशाच्या विभाजनाचे दु:ख होते, निर्वासितांचा आक्रोश होता पण, तरीही जागोजागी लाखालाखांच्या संख्येने जनसमुदाय जमा होत होता, आनंदाने बेहोश होऊन 'जय हिंद'च्या घोषणा देत होता. १९९७ सालचे चित्र अगदी वेगळे होते. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांत स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांचे स्वप्न साकार होण्याचे दूरच, प्रत्यक्षात 'हे काड्यामोड्याचे पुढारी देश लुटून खातील' ही चर्चिलची शापवाणीच खरी ठरली याची जनसामान्यांना जाणीव



होऊ लागली होती. सुवर्णमहोत्सवाचे कार्यक्रम झाले पण, ते सर्व सरकारी यंत्रणेने आयोजित केले होते. लोकांची उपस्थिती किरकोळ. समारंभात पुढाऱ्यांचीच भाषणे झाली; सामान्य भारतीय मूकच राहिला. पुढाऱ्यांच्या भाषणांत आत्मपरीक्षणाचा लवलेशही नव्हता, शब्दांच्या आतषबाजीने आत्मप्रौढी तेवढी सांगितली जात होती. सुवर्णजयंती महोत्सव झाला तो व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या सुवर्ण महोत्सवासारखा, लोकांच्या उत्साहाविरहित.

**जनसंसदेची तयारी**

शेतकरी संघटनेने जनसामान्यांचा सुवर्ण महोत्सव घडवून आणायचे आणि त्यात आत्मपरीक्षणावर जास्त भर देण्याचे ठरविले. १९९८ साली अमरावती येथे जनसंसद भरविण्यात आली आणि निष्कर्ष 'स्वातंत्र्य का नासले?' या अहवालाच्या आधारे काढले गेले.

शेतकरी महिला आघाडीच्या एका बैठकीत प्रश्न उभा झाला की, 'स्वातंत्र्यानंतरच्या प्रगतीच्या व अधोगतीच्या ताळेबंदाचा निष्कर्ष स्त्रियांनाही लागू पडतो का?' पुरुषांची आणि सर्वसाधारण समाजाची प्रगती झाली तरी महिलांची प्रगती होतेच असे गृहीत धरता येत नाही. पंजाब-हरियाणात हरित क्रांती झाली, अन्नधान्याचे उत्पादन वाढले पण, शेतीतील मजुरी बिहार किंवा ओरिसातून आलेल्या मजुरांकडे गेली. निदान शेतामध्ये फिरण्याचे स्वातंत्र्य असलेली पंजाब-हरयाणाची स्त्री घरात कोंडली गेली व शेतावरील सर्व कामकऱ्यांकरिता रोट्या बडविण्याचे ज्यादा काम तिच्याकडे आले. पूर्वी डोक्यावरून भाजीपाला घेऊन बाजारच्या गावी जाणारी शेतकरी स्त्री, मालकाच्या हाती ट्रॅक्टर आल्यावर किंवा वाहतुकीची इतर सोय झाल्यामुळे घरी बसली आणि पुरुष मंडळी ट्रॅक्टरवरून बाजारगावी जाऊ लागली. भाजीपाला, दूध, अंडी, कोंबड्या, शेळ्या इत्यादीच्या विक्रीची मिळकत पूर्वी बायांकडे येई. आता ती सगळी पुरुषांकडेच राहू लागली. शेतकरी महिला आघाडीच्या एका शिबिरात, कोणाही विदुषीला न सुचलेला सिद्धांत मांडण्यात आला. स्त्री-चळवळीची नेमकी विषयपत्रिका कोणती? समाजाची आर्थिक सामाजिक सुधारणा हा सर्वच संघटनांचा विषय आहे. महिला संघटनांनी या विषयावर लिहिण्यास किंवा बोलण्यास काही हरकत नाही. स्त्रियाही नागरिक आहेत, माणूस आहेत; मनुष्य म्हणून या सर्व विषयांवर बोलण्याचा त्यांना अधिकार आहे. पण, महिलांच्या प्रतिनिधी म्हणून महिला संघटनांच्या विषयपत्रिकेत हे प्रश्न मोडत नाहीत. मग त्यांच्या विषयपत्रिकेत कोणते विषय मोडतात? शेतकरी महिलांनीच उत्तर दिले, जेथे जेथे पुरुषांचा विकास आणि स्त्रियांचा विकास यांच्यातील

प्रमाण व्यस्त असते किंवा दिशा वेगवेगळ्या असतात तेच महिला संघटनांचे पायाभूत विषय होत.

एवढे ठरल्यानंतर शेतकरी महिला आघाडीने एक नवीन उपक्रम सुरू केला. जिल्ह्याजिल्ह्यात महिलांची शिबिरे घेण्यात आली. देशाचे स्वातंत्र्य नासले पण, स्त्रीच्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत काय घडले? स्त्रियांनी काय कमावले, काय गमावले? याचा वेगळा ताळेबंद मांडण्याचे ठरले. देशात इतरत्र कोठेही स्त्रियांच्या प्रगतीचा वेगळा आलेख मांडण्याचा विचारही कोणा मुखंडीच्या मनात आला नव्हता.

शेतकरी महिला आघाडीची नेहमीची पद्धत – कोणत्याही स्त्रीप्रश्नावर भूमिका घ्यायची झाली म्हणजे कौल लावायचा तो शेतकरी बहिणींना. त्या विषयावर त्यांना काय वाटते? त्यांचा प्रत्यक्ष अनुभव काय आहे? हे कळले म्हणजे सारा प्रश्नच स्वच्छ स्वच्छ समजू लागतो. या वेळी शिबिरांची आणि शिबिरार्थी महिलांची संख्या वाढली. १० ते १२ जिल्ह्यांत महिलांची शिबिरे भरली. स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांत ग्रामीण बायकांच्या आयुष्यात काही सुख डोकावले काय? त्या मानाने त्यांचे कष्ट, दुःख, चिंता वाढल्या की कमी झाल्या? बहिणींसमोर प्रश्न ठेवले. १९८६ सालच्या पहिल्या शिबिरांच्या पहिल्या फेरीत आणि १९९८ सालच्या फेरीत मोठा फरक पडला होता. मध्यंतरीच्या काळात शेतकरी महिला आघाडीच्या बहिणींनी दारूची दुकाने कुलूप लावून बंद करण्याची किंवा प्रसंगी फोडण्याची मर्दुमकी गाजविली होती; लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमामुळे दोन लाखांच्या वर महिलांच्या नावे जमिनी झाल्या होत्या, बोलण्याचे – अगदी मायक्रोफोनच्या समोर जाऊन बोलण्याचे त्यांना काही भय वाटेनासे झाले होते.

**स्वातंत्र्यानंतर काय झाले?**

पहिली गोष्ट – गावात दारू फार माजली. जागोजागी गुंडपुंडांचे अड्डे बसू लागले. बायकांना एकटीदुकटीने रस्त्याने जाणे दुरापास्त झाले. इंग्रजांच्या काळात हिम्मत करून पोलिसांकडे गेले तर संरक्षणाची खात्री वाटे; अलीकडे, गुंड आणि पोलिसांची हातमिळवणी झाली असे वाटते. गुंड पोलिसाच्या थाटात फिरतात आणि पोलिस गुंडांसारखे वागतात. बाईवर अत्याचार झाला तर गुपचूप बसणे श्रेयस्कर; पोलिसांकडे गेले तर आणखी काय धिंडवडे निघतील हे सांगता येत नाही. थोडक्यात, स्वातंत्र्य आले आणि सुरक्षाव्यवस्था ढासळली. बाईला पूर्वीच्या काळी असलेले 'असूर्यम् पश्या'पण अधिक श्रेयस्कर वाटू लागले. देशाला स्वातंत्र्य मिळाले पण, बाईचे स्वातंत्र्य कमी झाले.



विशेष म्हणजे, 'स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही' या लोकमान्यांच्या घोषणेच्या विपरीतच काही घडले. राजकीय स्वातंत्र्य मिळाले, बाईचे स्वातंत्र्य कमी झाले. पण, अनेक तऱ्हांनी बाईचे जीवन सुकरही झाले.

शेतकरी महिला आघाडीच्या शिबिरांत सगळ्या बायांनी सांगितले की, शिवणयंत्र आले आणि बाजारच्या गावी जाऊन शिंप्याला माप देण्याचे अवघडपण टळले; गावात दळणाची गिरणी आली आणि दररोज पहाटेची कमरमोड थांबली; डिझेल इंजिन आले, विजेची मोटार आली आणि पाण्याकरिता डोक्याखांद्यावर हंड्यांची उतरंड घेऊन चालणे संपले. माणसे अलीकडे कॉलरा, देवी, प्लेग यासारख्या साथींनी फारशी मरत नाहीत; अगदी विषमज्वर झाला तरी गोळ्या घेतल्या म्हणजे बरा होतो.

शेतकरी महिला आघाडीच्या जवळजवळ निरक्षर स्त्रियांनी एक मोठा सिद्धांत मांडला. सर्वसाधारण लोकांच्या आयुष्यात सुधारणा होते ती तंत्रज्ञानाच्या प्रगतीने. हे तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण करून झारीतील शुक्राचार्याचे काम सरकार आणि स्वयंसेवी संस्था करतात. प्रगती होते ती तंत्रज्ञानामुळे, अडथळे आणणारे शासन असूनही होते. कारण, 'सरकार समस्या क्या सुलझाए, सरकार यही समस्या है.' एका तपानंतरसुद्धा पुन्हा एकदा, मुक्ताईने वडील भावाला बोध करावा तसे माझ्या बहिणी मला त्यांच्या जीवनाचे एक एक पदर उलगडून दाखवीत एक नवे दर्शन माझ्यासमोर ठेवीत होत्या.

**स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव**

या गोष्टीचा अनुभव पुन्हा एकदा गेल्या महिनाभरात आला. शेतकरी महिला आघाडीच्या स्त्रियांच्या 'अशिक्षित पटुत्वा'चा जो विलक्षण अनुभव मला आला त्याचा हा आढावा. शेतकरी महिला आघाडीने दारू दुकान बंदी, लक्ष्मीमुक्ती, सीताशेती, माजघरशेती असे अनेक – कार्यक्रम राबविले ते वेगळेच. स्त्रीजन्माला न जाता स्त्रीजीवनाचे सम्यक ज्ञान घडविणाऱ्या माझ्या मुक्ताईंच्या कौतुकाचा हा आलेख आहे.

२००७ जवळ आले आहे. भारतीय स्वातंत्र्याची ६० वर्षे पूर्ण झाल्याचा उत्सव– हीरकमहोत्सव साजरा व्हायचा आहे. १९९७–९८ साली स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने देशातील परिस्थितीचा व्यापक आढावा शेतकरी संघटनेने घेतला, शेतकरी महिला आघाडीनेही घेतला. आता लगेच १० वर्षांतच पुन्हा काय आढावा घ्यायचा?

शेतकरी संघटनेच्या दृष्टीने अलीकडच्या काही वर्षांत काही महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. २५ वर्षांपूर्वी देशातील गरिबीचा आणि गरिबांचा अभ्यास

करणाऱ्या सर्व विद्वानांचे एकमत होते की, 'गरिबीचा संबंध शेतीशी आहे. शेतकरी गरीब आहे, कर्जबाजारी आहे; शेतमजूर अर्धपोटी आहे.' त्या काळी गरिबी निर्मूलनाचे बहुतेक कार्यक्रम शेतीव्यवसायाला डोळ्यासमोर ठेवून आखले जात. त्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सरकारी तिजोरीतून सुटणारा बहुतेक पैसा, कै. राजीव गांधी यांच्या हिशोबाप्रमाणे रुपयातील ८५ पैसे, पुढारी आणि अधिकारी खाऊन जात आणि शेतकऱ्यांपर्यंत काहीच पोहोचत नसे ही गोष्ट वेगळी. पण, त्या काळी गरिबी व्यवसायातून निघते, तो काही कोण्या एका जातीचा किंवा धर्माचा प्रश्न नाही याबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती.

अलीकडे अलीकडे हे बदलले आहे. म्हणजे गरिबीच्या वाटपात काही बदल झाला असे नाही. पण, गरिबीचे राजकारण बदलले आहे. गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय यांच्यासाठी अधिकाधिक व्यापक आरक्षण देण्याचे राजकारण फळफळू लागले आहे. अल्पसंख्याकांच्या मतावर डोळा ठेवून त्यांच्यातील एका विशिष्ट समाजाचा अनुनय करणे म्हणजे मोठी राजकारणपटुता मानली जाऊ लागली आहे. केवळ २० वर्षांपूर्वी गरिबीची व्याख्या आर्थिक होती, जातीपातींवर आधारलेली नव्हती. आता ते सारे बदलले आहे.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारने (१९९८ ते २००४) हिंदुत्ववाद्यांना आटोक्यात ठेवून खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण पुढे रेटण्याचे काम केले. १९९१ साली त्या वेळचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी नेहरूप्रणीत समाजवादी समाजरचनेला पहिला टोला दिला आणि लायसेन्स्-परमिट-कोटा राज्य संपवायला सुरुवात केली. त्यांच्या आर्थिक सुधारांची मजल शहरी भागापुरतीच मर्यादित राहिली. उद्योगधंद्यांकरिता लागणारी लालफितीची व्यवस्था काहीशी ढिली झाली. पण, तेवढ्यानेसुद्धा हिंदुस्थानातील उद्योजक समाजात चेतना आली. विदेशातून येणाऱ्या गुंतवणुकीवरील बंधने कमी झाल्यावर त्याचा फायदा घेऊन त्यांनी आपल्या उद्योगधंद्यांची कार्यक्षमता वाढवायला सुरुवात केली; वाहतूक, संचार इत्यादी संरचनांचा विकास केला. भारतीयांच्या बहुराष्ट्रीय कंपन्या बनतील असे कधी वाटले नव्हते, ते प्रत्यक्षात घडून आले. माहितीतंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे नाव गाजू लागले. आर्थिक सुधारांचा प्रमुख नायक हा बुद्धिमंत, धाडशी आणि कल्पक आहे हे राष्ट्रीय लोकशाही सरकारच्या लक्षात आले होते. त्या आधारानेच त्या सरकारच्या शेवटच्या तिमाहीत त्यांनी विकासाची गती १० टक्क्यांच्या वर नेऊन दाखविली. परंतु विकासाच्या या प्रचंड हनुमानझेपेत



सर्वसामान्य नागरिक आणि गरिबगुरिबे यांनाही आपुलकी वाटणे आवश्यक आहे याचा त्यांना विसर पडला आणि 'आम आदमी'चा जयघोष करीत दलित, आदिवासी, मागासवर्गीय आणि मुस्लिम अल्पसंख्याक यांच्या मतांच्या जोरावर काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार दिल्लीत स्थानापन्न झाले.

समाजवादी रशियाची अर्थव्यवस्था ढासळली आणि हिंदुस्थानात १९९१ साली नेहरूव्यवस्था गुंडाळून ठेवण्यास सुरुवात झाली. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी समाजवादी नियमांचे जंगल, निदान कारखानदारी आणि विदेशी गुंतावणुकीपुरतेतरी, थोडे विरळ केले. चीनमध्ये आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमांची सुरुवात शेतीच्या क्षेत्रापासून झाली होती आणि त्याला मोठे यशही मिळाले होते. पण, भारतातील शहरी भद्रजनांच्या मनातील, शेती आणि शेतकरी यासंबंधीच्या दुस्वासामुळे आर्थिक सुधारांचा स्पर्श शेतीक्षेत्राला झाला नाही. समाजवादाची पोलादी चौकट खिळखिळी होऊ लागली आहे याची चिन्हे देशातील उद्योजकांपर्यंत पोहोचली. शासन फिरून एकदा समाजवादी प्रयोगात घुसणार तर नाही ना अशी शंका त्यांच्या मनात आली पण, त्यांनी ती दूर ठेवली. गुंतवणुकीच्या स्वातंत्र्यामुळे परदेशातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊ लागली, देशातील संरचना सुधारू लागल्या, शेअरबाजारात तेजीचे वातावरण येऊ लागले. भारतीय उद्योजक बहुराष्ट्रीय आर्थिक क्षेत्रातसुद्धा स्थान मिळवून बसले.

समाजवाद संपला, लायसेन्स्-परमिट-कोटा राज्य संपले तर निवडणुकांच्या वेळी मतदारांना आश्वासने द्यावी कोणती, याची चिंता पुढारी मंडळींना पडू लागली होती. पण, सरकार काही बुडत नाही, नोकरशाही काही संपत नाही, नियोजनही चालूच रहाणार आहे. त्यामुळे, निवडणुकीत मतदारांना भुलविण्याकरिता आश्वासने देण्यास भरपूर वाव तयार झाला.

भारतातील परिस्थितीत निवडणुकीतील भूलथापांसाठी आणखी एक सोय होती. शिक्षणसंस्था आणि नोकऱ्यांतील भरती व बढती यांकरिता दलित, आदिवासी यांच्यासाठी आरक्षणाची व्यवस्था स्वातंत्र्यानंतर लवकरच करण्यात आली होती. विश्वनाथ प्रताप सिंहांच्या काळात इतर मागासवर्गीयांना, म्हणजे ब्राह्मण व कायस्थ सोडल्यास जवळपास साऱ्याच जातिजमातींना मंडल आयोगाच्या शिफारशींवरून आरक्षणाचा लाभ देण्यात आला. सुरुवातीपासून आतापर्यंत आरक्षणाच्या व्यवस्थेमुळे सर्वसामान्य दलित, आदिवासी किंवा मागासवर्गीय यांचा काही लाभ झालेला दिसत नाही. आरक्षणाचा फायदा

जातीचे प्रमाणपत्र हजर करणाऱ्या कोणालाही मिळत असल्यामुळे दलित, आदिवासी यांतील काही वरिष्ठ उपजाती आणि काही भामटेपणाने दलित-आदिवासी असल्याचा दाखला तयार करणाऱ्या जाती यांनाच काय तो मिळाला. पण, या सर्व वर्गांना आरक्षणातून आपले उत्थान होणार आहे अशी पक्की भावना झाली. त्यात समाजवादातून तयार होणाऱ्या पुरुषार्थहीनतेच्या मानसिकतेतून दलित नेतृत्वाने जोपासलेल्या आरक्षण-व्यवस्थेची भर पडली. समाजवादाचा सर्वदूर पाडाव झाल्यानंतरसुद्धा भारतात बहुतेक सर्व क्षेत्रांत सरकारची भूमिका १९९१ सालाआधी जशी होती तशीच राहिली आहे.

अर्थकारणात समाजवादाच्या काळातील विकासाची 'हिंदू' गती संपून ८ टक्क्यांच्या वर वाढ होऊ लागली याचे श्रेय भारतीय उद्योजकांना आहे, कोणत्याही पक्षाला नाही. पण, बैलगाडीखाली चालणाऱ्या कुत्र्याला आपणच गाडी चालवतो असा दंभ असतो असे म्हणतात. भारतीय अर्थव्यवस्थेचा गाडा महासत्ता बनण्याकडे दौडू लागला आहे. कोणत्याही शासनाची त्यातील भूमिका बैलगाडीखाली चालणाऱ्या कुत्र्यापेक्षा अधिक महत्त्वाची नाही.

**खुल्या व्यवस्थेच्या उलटी दिशा**

१९९१ साली आर्थिक सुधारणांची सुरुवात झाल्यानंतर भारतीय उद्योजकांनी मोठी हनुमान उडी घेतली त्याचे श्रेय ना राष्ट्रीय लोकशाही आघाडीला, ना संयुक्त पुरोगामी आघाडीला. जे शासन उद्योजकांच्या मार्गात कमीत कमी अडथळे निर्माण करील ते शासन आर्थिक सुधारणांची आणि विकासाची गती वाढवील आणि जे शासन उद्योजकांच्या मार्गात अडथळे निर्माण करील त्याच्या काळात आर्थिक विकासाची गती कमी होईल.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या काळात खुल्या व्यवस्थेतील उद्योजक, प्रतिभावान, संशोधक यांच्या महत्त्वावर जास्त भर दिल्यामुळे काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात घेतलेली 'आम आदमी'वर लक्ष देण्याची भूमिका लोकांना अधिक श्रेयस्कर वाटली. निवडणुकीत काँग्रेस सर्वांत मोठा पक्ष म्हणून पुढे आला आणि इतर २२ पक्षांच्या मदतीने त्याने संयुक्त पुरोगामी आघाडी तयार केली.

संयुक्त पुरोगामी आघाडीच्या समान किमान कार्यक्रमातच काही आश्वासने देण्यात आली होती. डॉ. अमर्त्य सेन यांच्या सिद्धांताने चालणारे शासन, साहजिकच, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी दानधर्माचे कार्यक्रम यांच्या आधाराने प्रत्येक महत्त्वाच्या मतदार समाजाचे लांगूलचालन करू लागले. या समाजात स्त्रीसमाजाचाही अंतर्भाव होतो.



संयुक्त पुरोगामी आघाडीच्या समान किमान कार्यक्रमामध्येच, महिलांवर होणाऱ्या अत्याचारांसंबंधी कायदे करण्याचे आश्वासन होते; त्याबरोबरच, स्त्रियांना मालमत्तेचा हक्क आणि कायदेमंडळांत आरक्षणाची तरतूद यांचीही आश्वासने देण्यात आली होती. या कार्यक्रमांची काहीशा घिसाडघाईने अंमलबजावणी सुरू झाली आहे.

**स्त्री-चळवळीला मारक कायदे व कार्यक्रम**

संयुक्त पुरोगामी आघाडीने 'आम आदमी'ला खुश करण्याकरिता जाहीर केलेला सर्वांत मोठा कार्यक्रम म्हणजे 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना'. या योजनेअंतर्गत काही जिल्ह्यांतील प्रत्येक कुटुंबातील पाच व्यक्तींना मिळून वर्षामध्ये १०० दिवस रोजगार मिळण्याची हमी देण्यात आलेली आहे. प्रत्येक घराला एक ओळखपत्र देण्यात येते, त्यावर पाच व्यक्तींचे फोटोही छापलेले असतात. त्याच्यापैकी कोणीही गेल्यास सर्व मिळून १०० दिवस पुरे होईपर्यंत प्रत्येकास रुपये ८० प्रति दिन मिळावे अशी कल्पना आहे. प्रत्यक्षात, या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजनेच्या कार्यवाहीत जितका भ्रष्टाचार माजला त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक पट भ्रष्टाचार माजणार आहे. परंतु महिलांच्या दृष्टीने ही योजना विशेष त्रासदायक आहे. चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात, स्त्रियांना दुष्काळी कामे म्हणून अंगमेहनतीची, खडी फोडण्याची, माती खणण्याची किंवा माती वाहण्याची कामे देण्यात येऊ नयेत, अशी कामे दिल्यास स्त्रियांनी ती कामे करू नयेत असा ठराव करण्यात आला होता. संपुआ सरकारची नवी 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना' म्हणजे स्त्रियांच्या या मागणीचा उघड उघड अव्हेर आहे. खरे म्हणजे, प्रत्येक कुटुंबास दर वर्षाला ८,००० रुपये देण्यापेक्षा रोख रकमेने ४०,००० ते ५०,००० रुपये देण्यात आले तर त्यातून ते कुटुंब स्वतःचा काही भांडवली व्यवसाय सुरू करू शकेल आणि केवळ ढोरमेहनतीचे रोजगार करीत रहाण्यापेक्षा ते उद्योजकही बनू शकतील. अशा तऱ्हेचे उद्योग हे महिलांच्या दृष्टीने अधिक सोयीस्कर ठरतील. अशी योजना मात्र संपुआ सरकारने आणलेली नाही.

संपुआ सरकारने, अद्याप, कायदेमंडळातील स्त्रियांच्या आरक्षणाबद्दलचे बिल पुढे आणलेले नाही. संसदेच्या येत्या हिवाळी अधिवेशनात ते बिल येण्याची अपेक्षा आहे. या बिलानुसार, स्त्रियांना एक तृतीयांश मतदारसंघ राखीव करण्यात येणार आहेत आणि राखीव मतदारसंघ चिठ्ठ्या टाकून आणि नंतर पाळीपाळीने निवडण्यात येणार आहेत. या घिसाडघाईने केलेल्या योजनेचे फारच गंभीर परिणाम महिला चळवळीवर, पुरुषांच्या राजकीय कारकीर्दीवर आणि सबंध

देशावर होणार आहेत.

स्त्रियांवर घरामध्येच होणाऱ्या अत्याचारांपासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी एक कायदा संमत करण्यात आला आहे. त्या कायद्यामध्ये, नीट विचार न केल्यामुळे, स्त्रियांच्या अगोचर वागणुकीस उत्तेजन मिळाल्यासारखे होणार आहे आणि त्यामुळे, सबंध विवाहसंस्थाच धोक्यात येण्याची शक्यता आहे.

स्त्रियांवर घराबाहेर होणाऱ्या अत्याचारांसंबंधीही एक कायदा संमत करण्यात आलेला आहे. या कायद्यामध्ये एक 'तालीबानी' प्रवृत्ती दिसून येत असून त्यामध्ये स्त्रीपुरुषांनी जरासुद्धा एकमेकांशी संपर्क ठेवू नये अश्या प्रकारची बुद्धी वापरण्यात आली आहे. या 'तालीबानी' कायद्यामुळे देशातील निकोप स्त्रीपुरुष संपर्काचे वातावरण संपून जाईल आणि स्त्रियांना पुन्हा एकदा जनाना डब्यात ढकलले जाईल अशी सार्थ भीती आहे.

**शेतकरी महिला आघाडीचे विचारमंथन**

या सगळ्या प्रश्नांचा विचार करण्याकरिता शेतकरी महिला आघाडीने पुन्हा एकदा शेतकरी महिलांच्या बैठका भरवल्या. या बैठका नांदेड (१५, १६ सप्टेंबर २००६), चंद्रपूर (२०, २१ सप्टेंबर २००६ आणि बुलढाणा जिल्यातील धाड (२७, २८ सप्टेंबर २००६) येथे भरविण्यात आल्या.

या सर्व बैठकांत चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात मंजूर झालेले ठराव, चांदवड अधिवेशनात घेण्यात आलेली महिला आघाडीची शपथ यांचा परिच्छेदवार विचार करण्यात आला आणि स्त्रियांच्या दृष्टीने त्या अधिवेशनानंतरच्या काळात काय फरक झाला याचा आढावा घेण्यात आला; तसेच, संपुआ सरकारच्या स्त्रीविषयक धोरणाबद्दल काय भूमिका घेण्यात यावी यावरही विचार करण्यात आला.

**शेतकरी स्त्रियांच्या प्रतिक्रिया**

स्त्रियांच्या प्रतिक्रिया मोठ्या वाखाणण्यासारख्या होत्या.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात महिलांची सुरक्षितता अधिकच धोक्यात आली आहे. इंग्रजांच्या काळात गुंडांनी स्त्रियांवर केलेले अत्याचाराचे प्रकार फार क्वचित घडत असत आणि असे प्रकार घडले तरी पोलिसांकडे जाण्यास समाजातील कोणालाही भीती वाटत नसे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आज परिस्थिती अशी झाली आहे की, गुंडांचे अत्याचार परवडले पण पोलिस चौकीतील अत्याचार नकोत.

स्वातंत्र्यानंतर स्त्रियांची काही बाबतीत प्रगती झाली आहे आणि त्यांचे आयुष्य अधिक सुखमय झाले आहे. पण, त्याचे कारण शासन किंवा शासकीय नीती नसून तंत्रज्ञानातील प्रगती आहे. शिवण्याचे यंत्र, पिठाची गिरणी, पाण्याचे



पंप आणि मोटर इत्यादी साधनांनी स्त्रियांचे जीवन पुष्कळ सुखाचे केले आहे. गॅसच्या वाढत्या वापरामुळे धुराने भरलेल्या स्वयंपाकघरात जन्म काढण्याची आवश्यकता आता फारशी राहिलेली नाही.

याउलट, अलीकडे झालेल्या स्त्रियांसंबंधीच्या कायद्यांमुळे स्त्रियांच्या मार्गात अनेक अडचणी येण्याची शक्यता आहे.

महिला शिबिरांतील महिलांनी सुचविले की,

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची बारकाईने देखरेख करणे आवश्यक आहे. यासाठी, प्रत्येक जिल्ह्यांत शेतकरी महिला आघाडीची आणि शेतकरी संघटनेची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी आणि या समितीने जिल्हाभर देखरेख ठेवून जेथे जेथे लोकांना रोजगाराची गरज आहे, परंतु त्यांना रोजगार दिला जात नाही त्यांची नोंद करावी. जेथे रोजगार दिला जातो त्या ठिकाणी काम कश्या तऱ्हेने चालले आहे, यंत्रांचा वापर किती प्रमाणात केला जातो, तो नियमांनुसार आहे किंवा नाही, हजेरीपटावर दाखविलेली माणसे प्रत्यक्षात काम करतात किंवा नाही, दिला जाणारा रोज नियमाप्रमाणे आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवून त्यासंबंधीचा अहवाल खासदार शरद जोशी यांच्याकडे दर महिन्याला पाठवावा.

**स्त्रियांना कायदेमंडळात आरक्षण**

कायदेमंडळातील, स्त्रियांच्या आरक्षणासंबंधी बिल लवकरच संसदेसमेर येण्याची शक्यता आहे त्याबद्दलही शेतकरी महिला आघाडीच्या बहिणींनी असा विचार व्यक्त केला की, जर का राखीव मतदारसंघ चिठ्ठ्या टाकून निवडण्यात आले आणि त्यानंतर पाळीपाळीने ते बदलण्यात आले तर त्यातून काही भयानक विसंगती आणि विकृती उद्‌भवतील. उदाहरणार्थ, निवडल्या गेलेल्या मतदारसंघात, कदाचित, कोणीही खरीखुरी उत्साही महिला कार्यकर्ता नसेलच. याउलट, त्या मतदारसंघामध्ये अनेक वर्षे कष्ट करून राजकीय तयारी केलेला एखादा पुरुष असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी स्त्री आणि पुरुष या दोन्ही उमेदवारांवर मोठा अन्याय होईल.

त्याखेरीज, दर वर्षी पाळीपाळीने बदलून मतदारसंघ स्त्रियांसाठी राखीव करण्यात येणार असल्यामुळे काही विपरीतता निश्चित होतील. जी महिला आरक्षणाचा फायदा घेऊन एकदा निवडून आली आहे तिला पुन्हा त्याच मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची काहीही शक्यता राहणार नाही. दुसऱ्या महिला राखीव मतदारसंघात जाऊन तिथे निवडणूक लढवून ती जिंकणे हे

सर्वसाधारण महिलांना अशक्य होईल.

पुरुष आमदार खासदारांचीही परिस्थिती अशीच कठीण होऊन जाईल. पुरुषांकरिता खुल्या असलेल्या कोणत्याही मतदारसंघातून ते निवडून आले तर पुढील निवडणुकीमध्ये तो मतदारसंघ पुरुषांसाठीच खुला असेल याची काही खात्री नाही. त्यामुळे त्यांच्या मतदारसंघांचीही निगराणी होण्याची शक्यता नाही. एकूण सर्व मतदारसंघांपैकी दोन तृतीयांश मतदारसंघांत तरी आमदार खासदारांना मतदारसंघाची सेवा करण्यात काहीही स्वारस्य असणार नाही. याशिवाय कायदेमंडळात एक तृतीयांशापेक्षा जास्त अनुभवी लोकप्रतिनिधी न राहिल्यामुळे कायदेमंडळाच्या कामाचीही गुणवत्ता घसरण्याची शक्यता आहे. त्याखेरीज प्रत्येक निवडणुकीत दोन तृतीयांश मतदारांना- त्यात महिला मतदारांचाही समावेश असेल -ह्व महिला उमेदवाराला मत देण्याची संधीच मिळणार नाही.

हे सर्व लक्षात घेता शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अशी सूचना केली आहे की,

स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहीरनाम्यात प्रमाणशीर मतदानपद्धतीचा पुरस्कार करण्यात आला आहे. अशी पद्धत जर अमलात आली तर ना स्त्रियांना, ना दलितांना आणि ना आदिवासींना स्वतंत्र राखीव मतदारसंघ देण्याची गरज राहील.

जर का प्रमाणशीर मतदानपद्धती स्वीकारणे शक्य नसेल तर मग महिलांना राखीव जागा देण्यासाठी अधिक शास्त्रीय आणि तर्कशुद्ध योजना उभी करावी लागेल. सध्याच्या तीन मतदारसंघांचा मिळून एक मतदारसंघ बनविण्यात यावा आणि त्यामध्ये तीन उमेदवारांपैकी एक जागा महिलांसाठी असेल. मतदार हे कोणत्याही तीन उमेदवारांना मते देऊ शकतील, मात्र, त्यांतील किमान एक उमेदवार महिला असणे आवश्यक असेल अन्यथा ती संपूर्ण मतपत्रिका बाद धरण्यात येईल. सर्वांत जास्त मते मिळालेला उमेदवार- मग तो पुरुष असो की महिला- निवडणुकीत त्या मतदारसंघातील सर्वसाधारण जागेवर निवडून आला/आली असे धरायचे. उरलेल्या उमेदवारांमधील महिला उमेदवारांमध्ये सर्वांत जास्त मते मिळविणारी महिला उमेदवार महिलांच्या राखीव जागी निवडून आल्याचे धरण्यात यावे. त्यानंतर उरलेल्या उमेदवारांतील सर्वांत जास्त मते मिळविणारा उमेदवार-ह्वमग तो पुरुष असो की महिला-ह्वत्या मतदारसंघातील तिसऱ्या जागेसाठी निवडून आला/आली असे धरायचे. या पद्धतीमुळे आमदार खासदारांची संख्या वाढणार नाही, खर्चही वाढणार नाही, एवढेच नव्हे तर, निवडणुकीमध्ये मतदारांनासुद्धा त्यांच्या पसंतीनुसार उमेदवारांना कमीअधिक प्राधान्य देण्याची शक्यता निर्माण होईल. त्याशिवाय, सर्व मतदारांना महिला



उमेदवाराला मत देण्याची संधी मिळेल आणि कर्तबगार महिला उमेदवारांना आरक्षणाच्या भिकेशिवाय आपली कर्तबगारी सिद्ध करण्याची संधी मिळेल.

**स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्क**

स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कासंबंधी संपुआ सरकारने फारच घिसाडघाईने कायदे तयार करण्याचे काम चालविले आहे. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच पैत्रुक मालमत्तेचा हिस्सा मिळावा आणि पित्याच्या मृत्यूनंतर त्याच्या स्वकष्टार्जित मालमत्तेतही समान वाटा मिळावा ही मागणी चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनातही करण्यात आली होती परंतु ती मान्य करताना संपुआ सरकारच्या प्रस्तावामध्ये एक मोठी चूक राहिली आहे. ही मालमत्ता सासरी गेलेल्या मुलीस मिळाली तर तिच्या मृत्यूनंतर ही मालमत्ता कोणाकडे जाईल? या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने याबद्दल दिलेला निर्णय असा आहे की, ही मालमत्ता स्त्रीधन असल्यामुळे ती माहेरच्या माणसांकडे गेली पाहिजे, सासरच्या माणसांना ती मिळता कामा नये.

या विषयावर महिला शिबिरांत विस्तृत चर्चा झाल्या आणि महिलांचे सर्वसाधारण मत असे पडले की, जर का मरणानंतर माहेराहून आलेली स्त्रीची मालमत्ता स्त्रीधन म्हणून, तिच्या मरणानंतर, माहेरीच परत जाणार असेल तर त्याकरिता एवढा वादविवाद, तंटेबखेडे, कोर्टकचेऱ्या करण्याचे काहीही कारण नाही. यावर उपाय म्हणून, माहेराहून मिळणाऱ्या मालमत्तेचा अंतर्भाव स्त्रीधनात करू नये अशी एक सूचना आली. या पलीकडे, बहुसंख्य स्त्रियांचे मत असे होते की, मालमत्तेच्या हक्कापेक्षा हुंड्याच्या रूपाने होणारे संपत्तीचे वाटपच अधिक श्रेयस्कर आहे.

**संमतीवयाचा कायदा**

मुलीचे लग्न १८ व्या वर्षाआधी करू नये असा कायदा असतानाही बहुतेक ठिकाणी मुलींची लग्ने १८ व्या वर्षाच्या आधीच होतात याबद्दल खूप विस्तृत चर्चा झाल्या. निष्कर्ष निघाला तो असा की, गावामध्ये माजलेल्या राजकीय गुंडगिरीमुळे मुलींचे, आईबापाच्या घरी, कुँवारपणे राहणे मोठे धोक्यात आले आहे. त्यामुळे, मुलगी १६ वर्षांची झाल्यानंतर जेव्हा पहिली चांगली संधी मिळेल ती साधून आईबाप तिचे लग्न लावून देतात. थोडक्यात, ग्रामीण भागातील आईबापांच्या मते मुलींच्या विवाहासाठी किमान वयाची मर्यादा १६ वे वर्ष ही असणे अधिक योग्य राहील.

**स्त्रियांची सुरक्षितता**

स्त्रियांच्या सुरक्षिततेच्या कायद्याबद्दलही अशीच विस्तृत चर्चा या शिबिरांत झाली आणि स्त्रियांना घरात सुरक्षितता देण्याकरिता जर का कुटुंबव्यवस्थाच

धोक्यात येणार असेल आणि स्त्रियांच्या उठवळ वागण्याला प्रोत्साहन मिळणार असेल तर अशा तऱ्हेच्या कायद्यापेक्षा काही प्रमाणात हिंसाचार परवडला, असाही एक सूर निघाला. एवढेच नव्हे तर, नवराबायकोचे एकांतातील वर्तन यासंबंधी सरकारने डोकावू नये आणि त्यात हस्तक्षेप करू नये अशीही भूमिका महिलांनी परखडपणे मांडली.

आणखी एका विषयावर विस्तृत चर्चा झाली. चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात, स्त्रियांच्या शृंगारललित रूपास प्रोत्साहन देण्याच्या प्रवृत्तीचा धिक्कार करण्यात आला होता. त्यानंतरच्या २० वर्षांत ही प्रवृत्ती कमी झाली नसून वाढली आहे एवढेच नव्हे तर, मुलीही आता अहमहमिकेने अधिकाधिक शृंगारललित रूप दाखवून मॉडेल, नट्या, अभिनेत्री बनण्याचा प्रयत्न करतात असे दिसत आहे. या प्रवृत्तीला मात्र आळा कसा घालावा यासंबंधी काही निश्चित निर्णय या शिबिरांतील महिलाही देऊ शकल्या नाहीत. चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या स्त्रियांना आपोआप शिक्षा होईल, पण कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांना बहुमान देऊन त्यांची वाह वा केली जाऊ नये याबद्दल सर्वांचे एकमत झाले. महिला शिबिराने एकमताने एक ठराव संमत केला. जेथे जेथे रस्त्यावरील फलकांवर किंवा जाहिरातींवर स्त्रियांच्या शृंगारललित रूपाचे अवास्तव व उत्तान प्रदर्शन केलेले असेल त्या त्या फलकांवर किंवा जाहिरातींवर चांदवड अधिवेशनातील एका जाहिरातीतील आदिवासी स्त्रीचे- डोक्यावर पाटी घेतलेले, पाठीवर मूल बांधलेले ह्व चित्र असलेले आणि 'आम्ही मरावं किती?' असा मथळा असलेले पोस्टर चिकटवून आपला निषेध व्यक्त करावा.

**पसायदान**

२० वर्षांमध्ये कितीतरी प्रसंग घडले. वेगवेगळ्या वेळी स्त्रियांचे प्रश्न निर्माण झाले की मी सर्वसाधारण अडाणी, अशिक्षित स्त्रियांच्या बैठका बोलविल्या, त्यांच्या पुढे माझे प्रश्न- होतील तितक्या सोप्या शब्दांत- मांडले आणि मांडल्यावर, त्यांच्याकडून प्रतिक्रियांची अपेक्षा केली. सुरुवातीला त्यांच्याकडून प्रतिक्रिया मिळविणे हेच काम कठीण होते. त्याकरिता बरीच मशागत करावी लागली. पण ती एकदा केल्यानंतर भरभरून पीक आले आणि १९८६ ते २००६ सालापर्यंत या माझ्या शेतकरी बहिणींनी मला जे, हात भरभरून, ज्ञान दिले त्याची तुलना फक्त मुक्ताईने ज्ञानेशांना केलेल्या ज्ञानसंबोधनाशीच होऊ शकते.

*(शेतकरी संघटक ६ नोव्हेंबर २००६)*

■■



एक

# चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न

## १. शेतकरी स्त्रीचा आंदोलनातील सहभाग

१९८० साली शेतकऱ्यांच्या नव्या आंदोलनाला सुरुवात झाली, त्यानंतर सहा वर्षांनी शेतकरी स्त्रियांची सशक्त आघाडी उभी राहिली. अगदी १७६३ पासूनच्या सर्व शेतकरी आंदोलनांत स्त्रियांचा सहभाग होता आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीतही स्त्रियांनी उत्साहाने भाग घेतला होता. पण या नव्या आंदोलनात ग्रामीण भागातील स्त्री अर्थवादी चळवळीसाठी पहिल्यांदाच घराबाहेर आली. यापूर्वी, एक भक्तिमार्गाचा अपवाद सोडला तर, एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी स्त्री घराबाहेर पडलेली नव्हती.

१९८० सालच्या शेतकरी आंदोलनात चाकण, खेरवाडी, कसबेसुकेणे, चांदवड, साक्री, देरडे अशा अनेक ठिकाणी पोलिसांनी स्त्रियांना तुरुंगात न नेता सोडून देण्याची तयारी दाखविली. पण स्त्री-सत्याग्रहींनी आपल्याला तुरुंगात जायचेच आहे असा आग्रह धरला. साक्री तालुक्यातील स्त्रियांवर लाठीहल्लाही झाला. निपाणीच्या तंबाखू आंदोलनात पाच ते सात हजार शेतकरी, विडीकामगार, तंबाखू कामगार स्त्रिया हजर होत्या. दिवसभर कारखानावखारींतले काम सांभाळूनसुद्धा कामगारस्त्रियांनी सत्याग्रहाच्या ठिकाणी २३ दिवस हजेरी लावली. २० जुलै १९८४ रोजी महाराष्ट्रातील शेतकरी सत्याग्रहींना चंदीगढ येथे अटक झाली तेव्हा विदर्भात, पश्चिम महाराष्ट्रात, मराठवाड्यात संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या सुटकेसाठी जी निदर्शने झाली ती प्रामुख्याने स्त्रियांच्या सहभागानेच झाली.

निपाणीच्या गोळीबारानंतर सत्याग्रहातील शेकडो स्त्रीसत्याग्रहींना फक्त नेसत्या वस्त्रांवर शेकडो मैल दूरच्या बल्लारी व गुलबर्गा येथील तुरुंगांत पंधरा पंधरा दिवस नेऊन टाकले. तक्रार तर केली नाहीच उलट ''माहेरीसुद्धा आम्हाला एवढा आराम भेटत नाही'' असं कौतुक सांगितलं. एका म्हाताऱ्या बाईची दोन

मुलं पोलीस गोळीबारात ठार झाली. तिचं सांत्वन करायला जाणाऱ्यांना ती खंबीरपणे उत्तर देई, ''संघटनेने आदेश दिला तर मी तिसऱ्या मुलालाही सत्याग्रहाला पाठवायला तयार आहे.'' स्त्रियांच्या धैर्याच्या अशा अनेक हकीकती आंदोलनात घडल्या.

अगदी नेहमीच्या दिवसांतसुद्धा एक नवा चमत्कार डोळ्यांसमोर उलगडत होता. एरवीचं चित्र म्हणजे गावातल्या सभांना राजकीय पक्षांचे पुढारी आले की माय-बहिणी दारं बंद करून घरातच थांबायच्या. कुतुहलाने काही काळ कानावर येऊन आदळणारी भाषणे ऐकायच्या. पण त्यात काहीच अर्थ नाही हे लवकरच लक्षात आलं की कानझाक करून आपापल्या कामाला लागायच्या. संघटनेने काय नवी फुंकर घातली! गावागावात निःशंकपणे, निर्भयपणे महिला सभेला येऊन बसू लागल्या. पहिल्यांदा सभेपासून थोडं लांब उभं राहून किंवा बसून ऐकायच्या. नंतर हळूहळू हक्काने पुढे येऊन बरोबरीने बसू लागल्या, भाषणं ऐकू लागल्या. जे कानावर पडतं आहे ते झटकून टाकण्यासारखं नाही, त्यात नाटक नाही, आवेश नाही पण जो अर्थ आहे तो आपल्या गाडग्या-मडक्यात उरलेल्या दाण्यांपर्यंत पोहोचणारा आहे याची साक्ष त्यांना कुठेतरी पटत असावी.

**स्त्रीच्या प्रश्नाची तोंडओळख**

खरं म्हणजे शेतकरी संघटनेने शेतकरी स्त्रियांकरिता असा काहीच वेगळा कार्यक्रम ठेवला नव्हता. ३ जानेवारी १९८२ ला सटाण्याच्या अधिवेशनामध्ये शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नाची चर्चा वेगळी ठेवली होती. त्या वेळी आंदोलनातील शेतकरी महिलांच्या सहभागाची गरज, त्यांच्यामध्ये या प्रश्नाची जाणीव तयार करायची आवश्यकता म्हणजे थोडक्यात, शेतकरी आंदोलनाची ताकद वाढविण्याकरिता शेतकऱ्यांना मायबहिणींनीही हातभार लावायचा यापलीकडे, निदान पुरुष कार्यकर्त्यांच्या मनाततरी, फारशी स्पष्ट जाणीव नसावी. अधिवेशनात त्या स्त्रियांचा उत्साहही 'शेतकरी' या भूमिकेतून होता. स्त्रियांच्या प्रश्नावर यातून काही तोड निघेल असे त्यांनाही वाटले नसावे.

शेतकऱ्यांतील स्त्रियांचे म्हणून काही वेगळे प्रश्न आहेत काय? ते प्रश्न कसे तयार झाले? त्या प्रश्नांची सुटका काय? संघटनेतील सभांच्या भाषणांत उल्लेख येत...

* शेतकऱ्याच्या घरी मुलगी म्हणून जन्माला येण्यासारखं पाप नाही. पायावर उभी राहायला लागते ना लागते तो एखादं धाकटं भावंड सांभाळायची जबाबदारी.



* त्या कोवळ्या वयातही आईनं सांगितलं नाही तरी तिला मदत करायची जरूर असल्याची जाणीव पोरींना कशी होते कोणास ठाऊक?

* पाच, सहा वर्षांची झाली - ज्या वयात शहरातली मुलं थंडीच्या दिवसात ऊबदार पांघरुणात उशिरापर्यंत शांतपणे झोपून राहतात आणि त्यांना झोपलेले पाहून त्यांचे आई-बाप जोडीने उभे राहून कौतुक करतात त्या वयात ही शेतकऱ्याची पोर आईनं नाहीतर बापानं गोधडीतून उचकटून टाकल्यामुळे डोळे चोळीत चोळीत शेण गोळा करायला धावते.

* दिवसभर गुरांच्या मागे धाव धाव धावून संध्याकाळी अंग धुळीने भरलेले, केस धुळीने माखलेले आणि हातापायावर काट्याफांद्यांचे ओरखडे अशी पोटाशी पाय घेऊन झोपी पडते.

* चौदापंधरा वर्षांची व्हायच्या आत लग्न, सासर. लग्नाच्या दिवशी अंगावर फुलं चढतील तीच. त्यानंतर चढायची ती सरणावर चढतानाच. सासरी सगळं गोड असलं तरी कधी हौस नाही, मौज नाही. बाजारात गेली तर दुकानात एखाद्या कपाटांत बरी कापडं दिसली तर तिथं नजर टिकवायची नाही - उगंच मनात कधी पुरी होऊ न शकणारी इच्छा उभी राहील या भीतीनं. पण आई म्हणून लहानग्याला अंगडं, टोपडं चढवावं, तीट लावावी, काजळ घालावं, बाळाचं आपण कौतुक करावं, इतरांनी कौतुक करावं, त्याच्या बापानंही करावं एवढी साधी इच्छासुद्धा कधी पुरी व्हायची नाही.

*आणि जर का सासरचं दूध फाटलं व भावाकडे येऊन तुकडे मोडायला लागले तर मग सगळा आनंदच.

इत्यादी...

**एककलमी कार्यक्रम**

पण, या अवस्थेत शेतकरी बाई पडलीच कशी? 'उत्तम व्यवहार, शेतीतली लक्ष्मी अशी पायतळी आली कशी? ती या नरकातून सुटणार कशी?

देशातल्या गरिबीच्या समस्येवर संघटनेने ''शेतीमालाला रास्त भाव'' हा एककलमी कार्यक्रम सांगितला. देशातील गरिबी एकूण मुळात शेतीतली गरिबी आणि शेतीच्या गरिबीचे कारण शेती तोट्यात राहावी याचे पराकाष्ठेचे नियोजन. 'शेती तोट्यात राहावी म्हणून जे भगीरथ प्रयत्न चालतात ते बंद केले तर गरिबी आपोआप हटेल कारण गरिबी ही विकृती आहे, गरिबी नाहीशी होणे ही निसर्गसिद्ध गोष्ट आहे' असे संघटनेने मांडले. मग शेतकरी बाईची विपन्नावस्था ही विकृती का निसर्गसिद्ध रचना? या एककलमी कार्यक्रमात स्त्रियांच्या प्रश्नाचीही सोडवणूक आहे का?

"शेतमालाच्या रास्त भावाचा फायदा शेतमजुराला मिळतो याबद्दल आमची खात्री आहे पण त्याचा फायदा शेतकऱ्याच्या घरच्या मायबहिणींना मिळेल याबद्दल जबरदस्त शंका आहे. कालचा साधा शेतकरी आज सोसायटीचा चेअरमन, कारखान्याचा चेअरमन झाला, मुंबई-दिल्लीला गाडी-विमानाने फेऱ्या घालू लागला तरी त्याच्या बायकोची डोईवरची भाकरीची टोपली नशिबी कायम ती कायम."

आणि समजा, रास्त भावाचा फायदा शेतकऱ्याच्या कारभारणीपर्यंत पोहोचला तरी केवळ तेवढ्यानेच तिचे स्त्री म्हणून सगळे प्रश्न सुटतात काय?

**स्त्रियांतही 'इंडिया', 'भारत'?**

मग एककलमी कार्यक्रमाच्या पलीकडे शेतकरी स्त्रियांसाठी संघटनेचा कार्यक्रम कोणता? का शेतकरी संघटना एकूण शेतकरी समाजाच्या फक्त निम्म्या भागाची म्हणजे पुरुष शेतकऱ्यांचीच संघटना होणार?

शेतकरी संघटनेने भारत-इंडिया ही संदर्भरेषा मांडली. "भारत" - "इंडिया" म्हणजे खेडे-शहर नाही. संघटनेने खेड्यातील पुढारी शेतकरी आणि त्यांची गोतावळ हे इंडियाचे भारतातील 'रावसाहेब', 'रावबहादूर' म्हणून मानले; शहरातले झोपडपट्टीतील, फूटपाथवरील शोषित ही भारतातून इंडियात आलेली निर्वासित मंडळी म्हटले. शहरातील स्त्रियांची अवस्था काय आहे? त्याही गुलामगिरीत नाहीत काय? त्यांचेही शोषण होत असेल तर मग त्यांना इंडियात धरायचे का भारतात? भारतातील शेतकरी स्त्रीची इंडियातील पांढरपेशी गुलाम स्त्री "सखी" का "शत्रू"?

**मूलगामी विचाराची आवश्यकता**

स्त्रियांच्या हलाखीची सुरुवात मनुष्यजातीच्या इतिहासापासून म्हणजे अनादि कालापासून झाली नसेल तर ती झाली तरी केव्हापासून? आजपर्यंतचा इतिहास हा शेतीच्या शोषणाच्या साधनांतील उत्क्रांतीचा इतिहास आहे. दरोडेखोरांची लुटालूट, लुटारूंनी तयार केलेली राजसत्ता, महसूल, गुलामगिरी, वेठबिगारी, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, सावकारी, जमीनदारी, वसाहतवाद - पहिल्यांदा गोरा आणि मग काळा अशा टप्प्यांनी मनुष्यजातीच्या इतिहासाचा आलेख संघटनेने मांडला. यातील कोणत्या टप्प्यात स्त्रीच्या पायात साखळ्या पडल्या आणि तिच्या दुर्दैवाचे फेरे चालू झाले, असे का घडले, कसे घडले याची उत्तरे देण्याची जबाबदारी संघटनेवर आहे.

शेतकरी संघटना हा एक विचार आहे, एवढेच नव्हे तर ती एक नवी विचारपद्धती आहे असा आग्रह संघटनेने वारंवार धरला आहे. यापूर्वी असा



आग्रह धरणाऱ्या मार्क्सवादाने आपल्या दृष्टिकोनातून स्त्रियांच्या प्रश्नाचा इतिहास मांडला. सैद्धांतिक आणि व्यावहारिक पातळीवर मार्क्सवादाची स्त्री-प्रश्नाची उकल आज कोलमडली आहे. काही काळात कामगार चळवळीला स्त्री-कार्यकर्त्यांचा लाभलेला सहभाग एवढीच त्याची फलश्रुती राहिली. दुसऱ्या महायुद्धानंतर उभ्या राहिलेल्या स्त्री-वादी चळवळीला या प्रश्नाच्या हाताळणीबद्दल स्पष्ट असमाधान होते. या नवीन स्त्री-कार्यकर्त्यांचा उत्साह मोठा, झेप दांडगी पण जागरणाचा आवाका कुठे खोलवर पोहोचताना दिसत नाही. त्यात मार्क्सवादी लगबगीने सामील होऊन, मार्क्सवादी सिद्धांताचे अर्धे-मुर्धे समर्थन करून स्त्री-आंदोलनाच्या ताकदीचा प्रभाव आपल्या ताटात पुन्हा ओढून घेण्याची घाई करत आहेत. पण या प्रश्नाविषयी अडाण्यातल्या अडाण्यापासून सुशिक्षित सुसंपन्न स्त्रीपर्यंतच्या स्त्रीच्या मनातील सार्वत्रिक असंतोषाला तोंड फोडण्याची ताकद उभी राहताना दिसत नाही.

याउलट, संघटनेच्या महिला कार्यकर्त्यांच्या साध्या साध्या सभांना हजारोंनी स्त्री-पुरुष जमतात. अगदी छपरांवर गर्दी करून बसतात आणि ऐकतात. कालपर्यंत चार भिंतींच्या आत तोंड उघडायला घाबरणाऱ्या बायाबापड्या लाउडस्पीकरसमोर येऊन जिभेवर साक्षात सरस्वती प्रकटली असावी तसे बोलतात. पंडितांनी दिलेला विचार स्त्री-मुक्तीला अपुरा पडला. आता शेतकरी स्त्री स्वतःच आपला झेंडा आणि विचार घेऊन पुढे येत आहे. संघटनेच्या विचाराने ही दबलेली वाफ बाहेर पडायला मार्ग झाला हे संघटनेचे भाग्य. संघटनेच्या विचाराचा महिलाप्रश्नाशी संबंध महाराष्ट्रातल्या शेतकरी महिलांनी जोडून दाखविला. सामुदायिक विचारमंथनाचा एक अपूर्व प्रयोग 'गमभन'सुद्धा न शिकलेल्या, महाराष्ट्रातील शेतकरी स्त्रियांनी करून दाखविला. म्हाताऱ्या-कोताऱ्यांपासून चिरडीतल्या पोरींपर्यंत, काही शिकलेल्या, काहींच्या घरी पाटी-पेन्सिल अजून आलेली नाही; काही बऱ्या घरच्या, जरा तुकतुकीत शरीराच्या, तर काहींचं पोट हातावर आणि हातापायांवर भेगा - पण या सामुदायिक विचारमंथनात सहभाग सगळ्यांचा. संघटनेचा महिलाप्रश्नावरचा विचार आणि 'चांदवडचा जाहीरनामा' याच्या खऱ्या लेखिका या शेकडो शेतकरी आया-बहिणी आहेत.

## २. स्त्रियांची अवस्था

स्त्री आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहे, चूल आणि मूल याला बांधली आहे,

त्याबाहेर पडली तर ती श्रमाच्या कामात आणखीनच भरडली जाते वगैरे कल्पना वारंवार मांडल्या जातात. पण या शब्दांनी आणि वाक्यांनी स्त्रियांच्या अवस्थेची फार अस्पष्ट जाणीव होते.

काही दिवसांपूर्वी ''नैरोबी'' येथे संपूर्ण जगातल्या स्त्रियांच्या संस्थांची एक परिषद झाली. या निमित्ताने काही आकडेवारी दिली गेली. जगाच्या लोकसंख्येच्या ५० टक्के स्त्रिया आहेत. पण त्या एकूण कामाच्या २/३ काम करतात. तरीही कामाच्या एकूण मोबदल्यापैकी फक्त १० टक्के स्त्रियांच्या वाट्याला येतो. म्हणजे १/३ काम करणाऱ्या पुरुषांना ९० टक्के मिळकत. शेतीकडे पाहायचे झाले तर निम्मी जमीन स्त्रिया कसतात. पण स्त्रियांच्या मालकीची अशी जमीन रुपयात पैसासुद्धा नाही.

जितका देश गरीब तितकी बायकांची परिस्थिति आणखीनच बिकट. भारतासारख्या देशात अनेकांना पोटाला पुरेसे नाही. मग त्यात स्त्रियांच्या वाट्याला आणखी कमी. केवळ पुरेसे पोषण न मिळाल्यामुळे रातांधळेपणासारखे रोग जास्त करून मुलींना आणि बायकांनाच झालेले आढळतात. कायमचा मतिमंदपणा यावा इथपर्यंत स्त्रियाचं कुपोषण होते. अगदी साधा आजार झाला तर मुलगा किंवा पुरुष असला तर त्याला इस्पितळात नेण्यात येते. शेतकऱ्याच्या घरच्या बाईला इस्पितळात नेले म्हणजे ते शेवटच्या अवस्थेत. मुंबईतले सरकारी इस्पितळातील आकडेवारी लक्षात घेता, ग्रामीण भागातून भरती झालेल्या फारच थोड्या स्त्रिया वाचविण्याच्या अवस्थेतल्या असतात. हे आकडे आणि अहवाल खूप बोलके आहेत. पण खऱ्या परिस्थितीची दाहकता ही शेतकरी स्त्रियांच्या तोंडूनच ऐकायला पाहिजे. संघटनेच्या वेगवेगळ्या शिबिरांत अनेक महिलांनी आपले अनुभव सांगितले.

* पोरगी जन्मली तर आईला धड कोणी विश्रांतीही घेऊ देत नाही. पोरगा जन्मला तर बाईला त्यातले त्यात चांगलंचुंगलं खायला देतात. पोरगी झालेली आई दिवसा-दोन-दिवसांत उठते आणि कामाला लागते. पोरींचा पिंड पक्का म्हणून जगतात.

* मुलां-मुलींत उजवं डावं फार. जरा काही वेगळं खायला असलं तर पोरग्याला उजव्या हाताने. तूप दुर्मिळ; पण उजव्या हातानं चमचा पोराच्याच भाकरीवर. अगदी एका भांड्यातलं दही वाढायचं झालं तर वरचं सायीचं दही पोराला आणि खालचं पोरीच्या नशिबी.

* पोरींना बिचाऱ्यांना आपलं भाग्य लगेच समजतं. त्यांचे भाऊ बाहेर हुंदडायला गेले तरी त्या निमूटपणे आईच्या मदतीला लागतात. आई आजारी



पडली तर ७ वीतली मुलगी शाळेतून काढून घरकामाला घरी बसवतात. २१ वर्षाचा तिचा भाऊ धाकट्या बहिणीला मदतसुद्धा करत नाही.

* पोरींना आयांचा दु:स्वास फार. पोरीची जात. दुसऱ्या घरी जायची, धडपणे जाऊ दे या चिंतेने आयाही जळत राहतात आणि पोरींचं बालपणही करपवून टाकतात.

* जरा मोठी झाली की शाळा बंदच. १८ वर्षांनंतर लग्न हा केवळ पुस्तकी कायदा. कोणाच्या पदरी जायचं हे मुलींना विचारायची गरजसुद्धा वाटत नाही.

* लग्नाच्या दिवसाच्या आसपासच भाऊ बहिणींकडून संमती लिहून घेतात आणि तिचा जमिनीचा वाटा हडप करतात. बिचारी माहेरच्यांना लग्नाच्या निमित्ताने आलेला खर्च पाहून दबून गेलेली असते, सही/अंगठा देऊन टाकते.

* शहरातल्या मुली जाळून घेऊन जीव देतात किंवा जाळून मारल्या जातात त्याचा वर्तमानपत्रात गवगवा होतो, खटले होतात. ग्रामीण भागात घासलेट महाग, पण ज्या आडात ''पाय घसरून'' पोरी पडल्या नाहीत असा आड दुर्मिळ आणि पडणाऱ्या सर्व बायाच. पुरुष माणसं क्वचितच.

* सगळं काही ठीक चाललं तरी दारूची ब्याद कधी उपटेल आणि ज्याच्या आधाराने माहेर सोडलं तोच हाणायला, मारायला सुरुवात करील हे सांगणं कठीण. कुठं बोलायची सोय नाही. पुरुष माणूस आपल्याच बायकोला मारतो आहे म्हटलं की मधे कुणी पडतसुद्धा नाही.

* घरातून काढून लावणं अगदी सोपं. तीनदा 'तलाक' म्हणायचीसुद्धा गरज नाही. बहुतेक वेळा फक्त नेसत्या वस्त्रांवरच बाहेर पडायचं. परतायला दुसरी जागाच नाही, भावा-भावजयीच्याच दारात उभं राहायला पाहिजे.

* भाऊ मायेचा म्हणून पोटाला तरी भेटतंय. सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबते तरी चार पैसे गाठीला जमले नाहीत. भावाचं वय झालं, त्याच्या पाठीमागं माझं काय व्हायचं?

कोणत्याही आकडेवारीपेक्षा हे अनुभव खरं चित्र दाखवून जातात. पिढ्यान् पिढ्या शेतकरी बायांनी आपली दु:खं जात्याला सांगितली–

*''अस्तुरी जलमा नको घालू शिरीहारी*
*रान ना दिस परायाना ताबेदारी।''*

**विकासातूनही बंधने**

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्याची जी काही थोडी उदाहरणे

उपलब्ध आहेत. तेथेही घरातील स्त्रियांना सुखाचे दिवस आलेले दिसत नाहीत.

१) पंजाबमध्ये झालेल्या एका अभ्यासानुसार शेतकऱ्यांच्या हाती पैसा खेळू लागल्यानंतर गावातील दारू पिण्याचे प्रमाण वाढले, अंधार पडल्यानंतर गावात इतके असुरक्षिततेचे वातावरण तयार झाले की संध्याकाळनंतर आता बायका, कर्फ्यू असल्याप्रमाणे, घरात बसून राहतात.

२) पतियाळातील दलित स्त्रीचा अनुभव असा की आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर त्यांची पूर्वीची मजूर म्हणून असलेली स्वायत्तता गेली आणि पुरुषवर्गाने मध्यमवर्गीयांच्या पावलावर पाऊल टाकून आपल्या स्त्रियांवर नवीन बंधने लादली.

३) पंजाबमध्ये आता मध्य प्रदेश व बिहारमधील शेतमजूर कामाला जातात. त्याचे एक कारण, आता तेथील स्त्रियांना घरची मंडळी कामावर जाऊ देत नाहीत.

४) संथाळ परगण्यात आदिवासी जमातीतील स्त्रियांना पुष्कळ स्वातंत्र्य असे. वेगवेगळे कारखाने आणि खाणकाम सुरू झाल्यानंतर त्या निमित्ताने आलेल्या बाहेरच्या पुरुषांच्या विकृत दृष्टीमुळे या जमातीत स्त्रियांना पडद्यात ठेवण्याची पद्धत सुरू होते आहे.

५) शहरातील मध्यम, अगदी उच्चमध्यम वर्गातील स्त्रियांचाही, आसपासची वाढती असुरक्षितता आणि चौकोनी कुटुंबाची मर्यादा यामुळे, असह्य कोंडमारा होतो.

**महामनुंचे कारस्थान**

स्त्रीची ही कुत्र्यासारखी अवस्था का?

''स्त्री म्हणजे खोटेपणा, साहस, माया यांचे रूप. लहानपणी बाप, तरुणपणी नवरा, म्हातारपणी मुलगा यांच्यावर स्त्री अवलंबून असावी. स्वतंत्रपणे जगण्याची तिची पात्रताच नाही.'' असे भलेभले महामनु सांगून गेले. संतांनीही स्त्री म्हणजे पाप, स्वर्गाच्या मार्गातील धोंड, पुरुषाला सन्मार्गापासून दूर नेणारी मायावी शक्ती अशी तिची हेटाळणी केली.

प्राणिमात्रात श्रेष्ठ जन्म मनुष्याचा. पण मनुष्याचा म्हणजे पुरुषाचा. स्त्री ही वेगळी, कमी प्रतीची. अगदी भगवद्गीतेतही स्त्री, वैश्य आणि शूद्र यांना कृष्णाने एका माळेत गुंफले आहे. अगदी मार्क्सवाद्यांनासुद्धा स्त्री आणि पुरुष यातील फरक महत्त्वाचा वाटतो. या सगळ्यात एक महत्त्वाचा अपवाद म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. युरोपसारख्या पुढारलेल्या खंडातील मोठमोठ्या शास्त्रज्ञांना जी गोष्ट अलीकडे, अलीकडे समजू लागली ती ज्योतिबांनी १८८९



साली स्पष्टपणे सांगितली, ''स्त्री आणि पुरुष... या उभयतांमध्ये जास्त श्रेष्ठ स्त्रीच आहे.''

**श्रेष्ठतेचा वाद**

या प्रश्नावर खरीखुरी परिस्थिती काय आहे? स्त्री पुरुषापेक्षा निसर्गानेच कमी प्रतीची केली आहे असे गृहीत धरले तरीसुद्धा आज तिला मिळणारी वागणूक ही दुष्टपणाची ठरेल. दैवाने अपंग झालेल्यावर निदान करुणेने दया दाखविली जाते. स्त्री पुरुषाच्या तुलनेने कोणत्याही बाबतीत अपंग असेल तर तिच्याबद्दल विशेष सहानुभूतीने विचार करणे माणुसकीचे झाले असते.

पण, वस्तुस्थिती याच्या नेमकी उलटीच आहे. ही वस्तुस्थिती स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अगदी सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या किंवा आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या स्त्रिया शेवटी ''आपण बायामाणसं, आपण पुरुषांची बरोबरी कशी करणार?'' असं सहजपणे बोलून जातात. लहानपणी आईच्या मांडीपासून 'मुलगी ही कमी आहे, मुलगा हा भारी आहे' हे इतक्या प्रकारांनी सुचविले, सांगितले, दाखविले आणि पढविले जाते की त्याबद्दल आता मुलांच्याही मनात शंका येत नाही आणि मुलींच्या तर नाहीच नाही. कधी चुकून एखादी मुलगी थोडे खोडकरपणे किंवा उद्दामपणे वागली तर तिला कायमची आठवण राहील अशी शिक्षा ताबडतोब दिली जाते. एखाद्या मुलाने मनाची जरा ऋजुता दाखविली तर त्याचीही लगेच ''बायक्या'' म्हणून हेटाळणी होते. यामुळे, हा धडा पक्का गिरविला गेला आहे की बायका म्हणजे पुरुषांपेक्षा कमीच.

**जीवशास्त्रीय संशोधन**

आजपर्यंतचे संशोधन या विषयावर काय सांगते ते पाहू.

**(१) लिंग निश्चितीचे जीवशास्त्रीय सूत्र :**

मुलगे आणि मुली दोन्ही एकाच आईबापांच्या पोटी जन्म घेतात. आईच्या शरीरातील गुणसूत्रां (क्रोमोझोम्स्) च्या २३ जोड्यांपैकी प्रत्येकी एक अशी २३ गुणसूत्रे आणि बापाच्या शरीरातील गुणसूत्रांच्या २३ जोड्यांपैकी प्रत्येकी एक अशी २३ गुणसूत्रे एकत्र येतात. ही दोन्ही मिळून मुलाच्या शरीरातील गुणसूत्राच्या २३ जोड्या तयार होतात. प्रत्येक गुणसूत्राचे काही विशेष काम आहे. काही डोळ्यांचा रंग ठरवितात तर काही केसांचा. माणसाच्या शरीरातील प्रत्येक अवयवाचे रूप ही गुणसूत्रे ठरवितात. स्त्रियांच्या शरीरातील गुणसूत्रांच्या २३ जोड्यांपैकी प्रत्येक जोडीतील दोन्ही गुणसूत्रे एकाच प्रकारची असतात. पुरुषांच्या बाबतीतही फारसा फरक नाही. गुणसूत्रांच्या २३ जोड्यांपैकी २२

जोड्यांतील प्रत्येक जोडीतील दोन्ही गुणसूत्रे, स्त्रियांप्रमाणेच, एकाच प्रकारची असतात. म्हणजे २३ पैकी २२ गुणात स्त्री आणि पुरुष यांत काहीच फरक नाही. फक्त स्त्रियांमधील २३व्या जोडीतील गुणसूत्रे (X, X) असतील, तर पुरुषाच्या २३व्या जोडीतील (X, Y) असतात. गर्भबांधणीच्या वेळी स्त्रीच्या प्रत्येक जोडीतील एक आणि पुरुषाच्या प्रत्येक जोडीतील एक गुणसूत्र एकत्र येऊन गर्भपेशीच्या २३ जोड्या तयार होतात. त्यातील २३ वी जोडी बनताना पुरुषाच्या २३व्या जोडीतील X गुणसूत्राची निवड झाली तर स्त्रीलिंगी गर्भपेशी बनते आणि Y गुणसूत्राची निवड झाली तर पुल्लिंगी गर्भपेशी बनते. म्हणजे गर्भाच्या बांधणीकरिता जी ४६ गुणसूत्रे एकत्र येतात त्यापैकी लिंग ठरविण्यासाठी केवळ एकच गुणसूत्र कामाला येते. म्हणजे स्त्री–पुरुषांतील फरक हा जास्तीत जास्त दोन अडीच टक्क्यांचा आहे.

### (२) आधी स्त्री का आधी पुरुष

मनुष्यजातीत मुख्य काय तो पुरुष, स्त्री म्हणजे त्यापासून वेगळी तयार झालेली, प्रथम पुरुष जन्माला आला आणि मग स्त्री तयार झाली अशा समजुती अनेक धर्मांतील भाकडकथांनी सांगितल्या आहेत. मनुने ईलाला तयार केले किंवा पुरुषाच्या डाव्या बरगडीचे हाड घेऊन ईश्वराने स्त्री तयार केली अश्या अजागळ कथा परंपरेने सांगितल्या जातात. पण वस्तुत: स्त्री ही मूळ मनुष्य आहे. पुरुषत्व देणारे गुणसूत्र Y असल्याशिवाय मानवप्राणी बनू शकतो. परंतु X गुणसूत्राखेरीज मानवप्राणी असूच शकत नाही. गमतीची गोष्ट म्हणजे सर्वच प्राण्यांत असे असते असे नाही. उदाहरणार्थ, पक्ष्यांमध्ये याच्या उलट आहे. नरपक्षी हा एकाच पद्धतीच्या गुणसूत्रांच्या जोड्यांनी बनतो तर मादीमध्ये एका जोडीतील एक गुणसूत्र वेगळ्या पद्धतीचे असते.

### (३) संप्रेरके

जन्मणारे मूल मुलगा का मुलगी हे गर्भधारणेच्या वेळीच निश्चित होत असले तरी गर्भावस्थेच्या पहिल्या सहा आठवड्यांत दोन्ही गर्भात काहीच फरक नसतो. त्यानंतर लिंगव्यवस्थेतील बदल हळूहळू होऊ लागतात. म्हणजे काय? मानवाच्या शरीरात काही संप्रेरक द्राव (हार्मोन्स) तयार होत असतात. त्यांचे दोन प्रकार असतात. एक पुंसंप्रेरके (मेल हार्मोन्स) आणि दुसरा स्त्रीसंप्रेरके (फीमेल हार्मोन्स) ही दोन्ही प्रकारची संप्रेरके स्त्री व पुरुष दोघांच्याही शरीरांत तयार होत असतात. फक्त पुरुषांच्या शरीरात तयार होणाऱ्या पुं–संप्रेरकांचे प्रमाण स्त्री–संप्रेरकांपेक्षा जास्त तर स्त्रीच्या शरीरात तयार होणाऱ्या स्त्री–संप्रेरकांचे प्रमाण पुं–संप्रेरकांपेक्षा जास्त इतकाच फरक. म्हणजे स्त्री आणि



पुरुष यांच्यातील फरक परत टक्केवारीचाच आहे.

हा विषय तसा शास्त्रीय आणि गुंतागुंतीचा आहे. पण एवढी माहिती आणखी लक्षात ठेवायला हवी की उत्क्रांतीच्या प्रवाहात मनुष्य प्राणी हा काही त्याच्या शरीरातील रसायनांचा गुलाम राहत नाही. शरीरातील संप्रेरके बदलली की माकडाची वर्तणूक आपोआप बदलते. तसे मनुष्यप्राण्याचे होत नाही. समाजात वावरणारे स्त्री–पुरुष हे संप्रेरकांच्या प्रेरणांवर आवश्यकतेनुसार मातही करू शकतात. म्हणजे थोडक्यात, जीवशास्त्राने स्त्री–पुरुषांत केलेला फरक हा किरकोळ आहे.

### आकारमानातील फरक

स्त्री ही अबला आहे, कमकुवत आहे; पुरुष हा सशक्त आहे, स्त्रीरूपी वेलीला पुरुषरूपी वृक्षाची गरज आहे असा समजही सार्वत्रिक आहे. स्त्रिया आणि पुरुष यांच्या उंचीत आणि आकारमानात फरक असतो. १९व्या वर्षी सुखवस्तू घरातील मुलामुलींच्या उंचीत १२ सें.मी. चा तर वजनात ७ किलोचा फरक आपल्या देशातील एका पाहणीत १९७२ साली आढळला. अगदीच जन्मताही मुली त्यांच्या भावांपेक्षा उंचीने थोड्या कमी असतात. त्यानंतर, वयात येण्याच्या आधी काही काळ त्या मुलग्यांच्या तुलनेने जास्त उंच होतात. पंधरा वर्षांच्या वयानंतर मुले उंचीच्या बाबतीत पुन्हा पुढे सरकतात. एक गंमत अशी की आजही काही भटक्या जमातीत स्त्रिया उंचीने आणि आकारमानाने त्याच जमातीतील पुरुषांपेक्षा वरचढ असतात. सर्वसाधारपणे, आदिवासी टोळ्यांतील स्त्री–पुरुषांच्या आकारमानात तफावत खूपच कमी आढळते. याउलट, नागरी संस्कृतीत ही तफावत सर्वात जास्त आढळते. एक तर्क असाही मांडला जातो की इतिहासाच्या एका काळात वन्य पशूंच्या टोळीतल्याप्रमाणे दांडगट पुरुष आपला हक्क प्राधान्याने बजावून घेत असल्यामुळे लहान आकामानांच्या पुरुषांची संतती संख्येने कमी राहिली. परिणामत: पुरुषसंततीचं आकारमान स्त्रियांच्या तुलनेने वाढते राहिले. वेगवेगळ्या कारणांमुळे स्त्रियाच आपल्यापेक्षा आकारमानाने वरचढ जोडीदार पसंत करीत असल्यामुळे आकारमानातील पुरुषांचे श्रेष्ठत्व आजही टिकून आहे. पण, यदाकदाचित एखाद्या समाजातील तमाम स्त्रियांनी आपल्यापेक्षा लहान आकारमानाचे जोडीदार स्वीकाराचे ठरविले आणि तो निर्णय अंमलात आणता आला तर दोनअडीचशे वर्षांच्या कालावधीत पुरुषांचे आकारमान स्त्रियांपेक्षा लहानखोर होऊन जाईल.

आकारमानाचा संबंध प्रत्यक्षात लिंगभेदापेक्षा पोषणाच्या सकसतेवर अवलंबून दिसतो. उदाहरणार्थ, वर उल्लेख केलेल्या १९७२ सालच्या अभ्यासात अत्यंत

गरीब वर्गातील मुलांची आणि मुलींची सरसरी उंची वयाच्या चौथ्या वर्षी अनुक्रमे ९३.६ आणि ९३.१ सेंमी होती. अत्यंत संपन्न गटात हेच प्रमाण १००.५ आणि ९८.९ सेंमी होते. थोडक्यात, संपन्न गटातील मुली विपन्न गटातील मुलांपेक्षा चांगल्या ५ सेंमी ने अधिक उंच होत्या. अश्याच तऱ्हेची प्रवृत्ती वजनाच्या बाबतीतही दिसते. पण वयात आल्यानंतर संपन्न गटातील मुली उंचीने आणि वजनाने गरीब गटातील मुलांच्या तुलनेने मोठ्या असल्या तरी संपन्न गटातील मुलांपेक्षा आकारमानाने लहानच राहिल्या.

**शारीरिक सामर्थ्य**

पुरुषाचे हृदय आणि फुफ्फुसे आकाराने जास्त मोठी असतात. त्यामुळे, सर्वसाधारण पुरुषाची कार्यशक्ती ही सर्वसाधारण स्त्रीच्या तुलनेने जास्त असते. पण याचा अर्थ सर्व पुरुषांची कार्यशक्ती सर्व स्त्रियांच्या कार्यशक्तीपेक्षा उजवी असते असे नाही. कित्येक स्त्रिया या बाबतीत बहुतेक पुरुषांना वरचढ असतात. १९८२ साली दिल्लीत झालेल्या एशियाड क्रीडा स्पर्धेतील पुरुषांचे उच्चांक ऑलिंपिक स्पर्धेतील स्त्रियांच्या उच्चांकापेक्षा कमी प्रतीचेच होते. स्त्रिया क्रीडा क्षेत्रात येऊन फार थोडी वर्षे झाली तरी ही स्थिती आहे. आणखी काही कालानंतर स्त्रिया क्रीडाक्षेत्रातही पुरुषांच्या फारश्या मागे राहणार नाहीत.

ताकद आणि कार्यशक्ती याबाबत पुरुषांना जो काही लाभ निसर्गाकडून मिळाला असेल तो असो. पण याउलट, भूक सहन करणे, सोशिकता, चिकाटी, रोगाची प्रतिकारशक्ती, शांतपणा या अनेक गुणांत स्त्रिया सरस भरतात. परिणामत:, ससा आणि कासवाच्या शर्यतीच्या गोष्टीप्रमाणे आयुष्याची शर्यत जिंकण्यात स्त्रियाच यशस्वी होतात. अगदी गर्भावस्थेपासून पुरुष-गर्भ हा नाजूक असतो. एका अभ्यासानुसार, गर्भधारणेच्या वेळी मुली व मुलगे यांचे प्रमाण १००:१२४ असे असते. वेगवेगळ्या कारणांनी गर्भावस्थेत आणि जन्मानंतर मुलांचे मृत्यूचे प्रमाण जास्त राहाते आणि त्यामुळे ३५व्या वर्षांपर्यंत स्त्रिया आणि पुरुष यांची संख्या समसमान होते. ७० वर्षांपर्यंत जगण्याची शक्यता स्त्रियांच्याबाबतीत ७५ टक्के आहे तर पुरुषांच्या बाबतीत ती ५७ टक्के आहे.

**मातृत्व – वरदान आणि शापही**

निसर्गाने स्त्रीवर टाकलेल्या मातृत्वाच्या जबाबदारीमुळे तर स्त्री ही वंशसातत्याच्या दृष्टीने श्रेष्ठच राहते. कोणत्याही पशुपालनात मादीचे महत्त्व अधिक असते हे उघडच आहे. निसर्गाच्या या देणगीमुळे स्त्री काहीशी अडचणीतही सापडते. मासिक पाळी, गर्भारपण, बाळंतपण, मुलांची जोपासना



या अवस्थांत तिची हालचाल मंदावते आणि स्वसंरक्षणाची शक्ती मर्यादित होते. साहजिकच, या काळात निवारा आणि संरक्षण यांची तिला विशेष आवश्यकता असते.

**बौद्धिक ताकद**

शारीरिक सामर्थ्याबाबत जी गोष्ट तीच मेंदूच्या कामाबाबत म्हणजे बुद्धीबाबत. शारीरिक वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थांत मुली मुलांपेक्षा वरचढ ठरतात. असामान्य बुद्धिमत्तेमध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण जास्त, पण त्याबरोबर अतिमंद बुद्धीतही स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण जास्त. सर्वसाधारणपणे, स्त्रिया बुद्धिमत्तेच्या सरासरी पातळीच्या जवळपास राहतात. याचाच अर्थ असा की बहुसंख्य स्त्रिया या अर्ध्याअधिक पुरुषांपेक्षा बुद्धिमत्तेने श्रेष्ठ असतात. एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की आजपर्यंत सर्वोच्च बुद्धिनिर्देशांक नोंदवलेल्या दोनही व्यक्ती मुली होत्या.

बालपणात अगदी आरंभीच्या काळात शब्दाने अर्थ व्यक्त करण्याची प्रतिभा मुली सहज संपादन करतात. मुलांना हे सहसा जमत नाही. पण एक दोन वर्षांच्या अवधीनंतर मुलांना मूर्त स्वरूपातील वस्तू हाताळण्याचे कौशल्य चांगले जमून जाते. हे मितिज्ञान संपादन करण्याच्या भानगडीत मुली फारशा पडत नाहीत कारण शब्दप्रतिभेने त्यांच्या सर्व गरजा पुऱ्या होत असतात. कोणत्याही कारणाने का होईना, काही प्रमाणात मुले मितिज्ञानात उजवी, तर मुली शब्दसामर्थ्यात उजव्या ठरू शकतात. घरची किंवा समाजातील परिस्थिती संपन्न असली तर मितिज्ञानातील ही तफावत कमी होते. याउलट, हिंदुस्थानसारख्या दरिद्री देशात मितिज्ञानाच्या बाबतीत मुली विशेष मागासलेल्या असतात. पोषण आणि शिक्षण यांनी भरून काढण्यासारखी ही त्रुटी आहे.

**हिंसाचार**

एका क्षेत्रात मात्र पुरुषांची बरोबरी करण्याचे स्त्रियांनी फारसे प्रयत्न केल्याचे दिसत नाहीत. प्रत्येक देशाच्या इतिहासामध्ये समरागंणावर शौर्य गाजविलेल्या अनेक रणरागिणींची नावे नोंदली गेली आहेत पण तरीही हालचालींमधील चपलता, कार्यशक्ती, आक्रमकता आणि एक प्रकारची बेफिकीरी यामुळे हाणामारी आणि हिंसाचाराच्या कामात पुरुष जास्त सुलभतेने भाग घेऊ शकतात. स्त्रिया याबाबतीत, विशेषत: प्रजननाच्या जबाबदारीच्या काळात, मागे पडतात. एवढेच नव्हे तर, या काळात मागे म्हटल्याप्रमाणे, त्यांना निवारा आणि संरक्षण यांची गरज असल्यामुळे पुरुषांवर अवलंबून राहणे, विशेषत: धामधुमीच्या काळात त्यांना आवश्यक वाटते.

## ३. स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान

निसर्गाची योजना पाहिली तर स्त्रियांना आजची हलाखीची स्थिती प्राप्त होण्याचे काहीच कारण दिसत नाही. पुरुषांत आणि स्त्रियांत शेवटी फरक दिसले कोणते?

(१) स्त्रियांवर गर्भधारणा आणि नव्या पिढीला जन्म देणे व तिची जोपासना करणे या जबाबदाऱ्या आहेत आणि त्या अनुषंगाने तिची शारीरिक आणि मानसिक रचना आहे. आक्रमकता, हिंसाचार यात ती सहज भाग घेत नाही. पण प्रसंगी स्वत: झीज सोसूनही गर्भाची जोपासना करणे, काटकपणा, सोशिकता, धीरगंभीरता, ममता हे गुण स्त्रियांमध्ये सहजपणे आढळतात.

(२) स्त्रियांमध्ये शाब्दिक अभिव्यक्तीचे सामर्थ्य आहे तर पुरुषांच्या तुलनेने मितिज्ञान काही प्रमाणात कमी पडते.

(३) मुली वयात लवकर येतात त्यामुळे त्यांच्या जोडीदाराशी त्यांचे संबंध सहजपणे असमानतेचे असतात. याच कारणाने मुलींना शिक्षणासाठी अवधी थोडा कमी मिळतो. उंची, आकारमान आणि शारीरिक सामर्थ्य यात त्यांचे कमीपण ही वस्तुत: गंभीर बाब नाही. (ॲम्बॅसेडर गाडी आणि फियाटगाडी यांची तुलना केली तर आकाराने मोठी, जास्त धावू शकणारी, म्हणजे ॲम्बेसेडर गाडीच जास्त श्रेष्ठ असे म्हणता येणार नाही. या उलट लहान आकाराची, जास्त टिकणारी, कमी पेट्रोल खाणारी अशी फियाट गाडी अनेकांना पसंत असते.) थोडक्यात, जीवशास्त्रीय कारणासाठी स्त्रीला आजची अवस्था प्राप्त होण्याचे काहीही कारण नाही.

निसर्गाने स्त्री-पुरुषांची योजना ही एकमेकांशी संघर्ष करण्यासाठी किंवा एकमेकांवर मात करण्यासाठी केली असावी हेही शक्य नाही. निसर्गामध्ये कोणत्याही योनीत अशा संघर्षाची योजना दिसत नाही. प्रजनन हा निसर्गाचा प्रधान हेतू सर्वत्र दिसतो. स्त्री-पुरुष तत्त्वे एकत्र यावीत आणि त्यातून निर्मिती व्हावी यासाठी निसर्ग अद्‌भुत वाटावा असा खटाटोप सातत्याने चालवत असतो. मनुष्यजात नष्टच व्हावी अशी निसर्गाची योजना नसेल तर स्त्री-पुरुष निसर्गाने परस्पर पूरक म्हणूनच योजले असले पाहिजेत. १८८२ साली ताराबाई शिंदे यांनी त्यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या प्रसिद्ध पुस्तिकेत म्हटल्याप्रमाणे

''ईश्वराने हा जोडा स्वेच्छेनेच नेमिला आहे. पाहा, पक्ष्यांपासून तो निर्जीव झाडाझुडपांतदेखील त्याने स्त्रीजाती निर्माण केलेली आहेच. प्रत्येक गोष्टीला,



जिनसेला, दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्यावाचून शोभा येतच नाही.''

**भूमिकेतील फेरफार**

मग पुन्हा प्रश्न शिल्लक राहतो तो हा की स्त्रीपुरुषांचे समाजातील परस्पर संबंध ठरतात तरी कोणत्या कारणाने?

(१) काही जीवशास्त्रीय बदल घडले तर स्त्रिया व पुरुष यांचे समाजातील परस्पर स्थान बदलल्याखेरीज राहणार नाही. अगदी विज्ञानकथांच्या जगात जायचे तर माणसांच्या पिलांचा जन्म हा स्त्रीला गर्भभार वाहावा न लागता होऊ शकला तर स्त्रियांच्या परिस्थितीत केवढा तरी फरक पडेल. अल्डस हॅक्सले याच्या 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' मध्ये अशा समाजाचे तपशीलाने वर्णन केले आहे. पाळीपाळीने गर्भधारणाची जबाबदारी पुरुषांवर येत असती तरी समाजाचे चित्र वेगळे दिसले असते.

(२) इतके आमूलाग्र बदल सोडून दिले तरी काही छोट्या बदलांनीसुद्धा स्त्रियांची परिस्थिती बदलू शकते. उदाहरणार्थ, स्त्रीपुरुष हे केवळ गर्भधारणेकरिता एकत्र येत नाहीत. चतुष्पाद प्राण्यांप्रमाणे मादीची शारीरिक तयारी स्त्रीपुरुषांना एकत्र येण्याकरिता आवश्यक नाही. त्यांची कामभावना सर्व ऋतुंत जागी असते. प्राण्यांप्रमाणेच स्त्री-पुरुषांची कामवासना काही ऋतुतच जागृत होत असती तरी समाजाची रचना अगदी वेगळी झाली असती. दोन ऋतुंमधील काळात स्त्री पुरुष एकत्र संसारात राहणे असंभव झाले असते.

(३) मानवजातीत स्त्रीपुरुषांच्या शारीरिक ठेवणींमुळे लैंगिक बळजबरीचा प्रयोग होऊ शकतो. बलात्काराची शक्यता व धोका आणि त्याचे शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेऊन समाजातील अनेक रचना तयार झाल्या आहेत.

(४) गर्भधारणेवर इतिहासाच्या बहुतेक काळात स्त्रियांचे काहीच नियंत्रण राहिलेले नाही. कुटुंबनियोजनाची तांत्रिक शक्यता आणि हे तंत्र व्यवहारात वापरण्याची संभाव्यता जितकी वाढेल तितकी स्त्री स्वत:च्या भवितव्याची स्वामिनी बनू शकेल.

(५) निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या आदिवासी स्त्रिया आणि त्यांची सहजसुलभ प्रसूती याबद्दल पुष्कळ लिहिले गेले आहे. पण बाळंतपणे, विशेषत: पहिली बाळंतपणे परवापरवापर्यंत जीवावरची दुखणीच होती. प्रसूती ही अगदी अलीकडे आधुनिक वैद्यकाच्या सोयी सवलती उपलब्ध असलेल्या थोड्या भाग्यवंतांकरिता सुलभ झालेली आहे. या सोयीसवलती जितक्या दूरवर आणि सर्वसामान्य स्त्रीला उपलब्ध होतील, त्या प्रमाणात बाळंतपण आणि गर्भारपण

हे दोन्ही कसोटीचे काळ स्त्रियांच्या दृष्टीने कमी कठीण होतील.

(६) अगदी निर्बुद्ध म्हटल्या जाणाऱ्या म्हशीची रेडकेसुद्धा जन्मत:च चारही पायांवर बागडण्याइतकी बुद्धी घेऊन जन्मतात. बुद्धिमान माणसांची पोरे जन्माच्या वेळी निव्वळ गोळे, त्यांना पायावर उभे करण्यातच वर्ष निघून जाते. चालते-बोलते करेपर्यंत काही वर्षे आणि व्यावहारिकदृष्ट्या स्वत:च्या पायावर उभे करीपर्यंत आई-वडिलांचे निम्मे आयुष्य निघून जाते. मुलांच्या जोपासनेचा हा काळ अनेक दृष्टींनी निर्णायक महत्त्वाचा आहे.

(७) युद्धासारख्या एखाद्या कारणाने स्त्रीपुरुषांचे समाजातील समसमान प्रमाण बिघडले तर त्यामुळे सर्व समाजातील आर्थिक, सामाजिक, अगदी नैतिक घडीसुद्धा बिघडून जाईल. उदाहरणार्थ, पुरुषांचे प्रमाण बदलले तर त्यांचे स्थान अजून उंचावेल.

**कामजीवनातील बदल**

मनुष्यप्राण्याचे कामजीवन म्हणजे अगदी जगाच्या सुरुवातीपासून अंतापर्यंत जसेच्या तसे राहाते असे नाही. बदल ही एकच गोष्ट कायम आहे. स्त्री असणे किंवा पुरुष असणे हा संप्रेरकांच्या टक्केवारीचा प्रश्न आहे असे एकदा मान्य केले की या टक्केवारीचे परस्परप्रमाण इतिहासात सदासर्वकाळ तेच ते राहिले असे समजण्यास काही कारण नाही. वन्यपशुंशी दररोज सामना पडणाऱ्या शिकाऱ्याच्या शरीरातील पुरुष संप्रेरांचे प्रमाण, सकाळी १० ते ५ कचेरीत खर्डेघाशी करणाऱ्या त्याच्या वंशजांशी जुळण्याचे काहीच कारण नाही. हिंसाचाराच्या दडपणाखाली दररोज जगणाऱ्या प्राचीन महिलेच्या आणि आधुनिक पुरंध्रीच्या शरीरातील संप्रेरके एकच असणे संभव नाही. किंबहुना, मानववंशाचा इतिहास हा स्त्रियांच्या वाढत्या पुरुषीकरणाचा आणि पुरुषांच्या वाढत्या स्त्रीकरणाचा इतिहास आहे असेही काहीजण मानतात. कदाचित इतिहासाची गती स्त्री-पुरुषांच्या समानतेच्या दिशेनेच असेल असे नाही. चक्रनेमिक्रमाने स्त्री-पुरुष काही काळात एकमेकांपासून प्रवृत्तीने विभक्त होत जातात आणि परत काही काळानंतर प्रवृत्तीने एकमेकांच्या जवळ येतात असेही मानता येईल. अर्धनारीनटेश्वर आळीपाळीने दोन्ही प्रवृत्तींचे धृवीकरण आणि विलीनीकरण करतो असेही मानता येईल. बदलाचे स्वरूप काही असो, बदल होत राहतो हे निश्चित.

कालपरिस्थितीनुसार वेगवेगळ्या वंशांत, राष्ट्रांत कामजीवनाचाही आविष्कार वेगवेगळ्या तऱ्हेने होतो. आग्नेय आशियातील समाजसंस्थांविषयी आणि तेथील स्त्रियांविषयी ''सॉमरसेट मॉम''ने केलेले लिखाण या दृष्टीने अभ्यासनीय आहे.



अगदी स्त्री स्त्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींतही हे प्रमाण सारखे नसते आणि एकत्र काम करणाऱ्या दोन भावांतही.

या वेगवेगळ्या जीवशास्त्रीय किंवा जीवशास्त्रांशी संबंधित घटकांपेक्षाही समाज-अर्थशास्त्रीय घटक हे जास्त निर्णायक महत्त्वाचे ठरतात. जीवसृष्टीतील खालच्या पायरीत शरीररचना आणि भोवतालची परिस्थितीच प्राण्याचे भवितव्य बहुतांशी ठरवते. मनुष्यासारख्या उत्क्रांत योनीत आनुवंशिक उपलब्धींपेक्षा जन्मानंतरची परिस्थिती आणि प्रयत्न यांचा परिणाम अनेक पटींनी जास्त मोठा.

**श्रमविभागणी**

समाजातील कामांची श्रमविभागणी कशी होते? आजपर्यंतच्या बहुतेक समाजातील स्त्री आणि पुरुष यांच्यामधील श्रमविभागणी ही व्यक्तीव्यक्तींच्या गुणवत्तेनुसार न होता ठोकळेबाजपणे, लिंगभेदाच्या आधारे झाली. स्त्री-पुरुषांत मूलत: फरक थोडा. जे गुण पुरुषाचे म्हणून मानले जातात त्या गुणांतही अनेक स्त्रिया बहुतेक पुरुषांना वरचढ असतात. हे लक्षात घेऊनही सरसकट सर्व स्त्रियांची एकाच प्रकारच्या कामावर योजना करण्याची अशास्त्रीय, अकार्यक्षम पद्धती बहुतेक समाजांनी अवलंबली आहे. अनेक गबाळ पुरुष जबाबदारीच्या जागेवर जातात आणि कर्तबगार स्त्रिया आयुष्यात कधीतरी येणाऱ्या बाळंपणाच्या कारणाने 'चूल व मूल' यात अडकून जातात. ही परिस्थिती आजपर्यंतच्या अजागळ समाजाला परवडली, उद्याच्या वैज्ञानिक समाजाला न परवडणारी आहे.

समाजात वापरली जाणारी उत्पादनाची साधने कोणत्या प्रकारची? ती हाताळण्याला शारीरिक ताकदीचा कितपत उपयोग? आर्थिक प्रगती कितपत झालेली? समाजातील सर्वसाधारण पोषणाची पातळी काय? राहणीमानाचा दर्जा काय? आणि समाजातील सर्वसाधारण व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या कक्षांची लांबी, रुंदी काय? यावरूनही स्त्रीचे समाजातील स्थान ठरू शकेल. प्रत्येक स्त्रीचे स्थान तिचे व्यक्तिगत गुण आणि आवडीनिवडींनुसार ठरले तर अन्यायाला आणि तक्रारींना वाव राहणारच नाही. सरसकट सर्व स्त्रियांना लागू होणारा नियम त्यांच्यावर अन्याय करणाराच ठरेल.

## ४. स्त्री चळवळीची विविध रूपे

पाश्चिमात्य देशांतील स्त्रियांची चळवळ ही प्रामुख्याने स्त्रियांनीच उभी केली. अमेरिकेतील गुलामगिरीच्या विरोधातील आंदोलन उभे करण्यात स्त्रियांचा फार मोठा सहभाग होता. १९२० साली स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा

याकरिता अमेरिकेत एक व्यापक आंदोलन झाले. इंग्लंडसारख्या लोकशाहीच्या माहेरघरात मतांचा हक्क मागणाऱ्या स्त्रियांवर पोलिसांनी लाठ्याही चालविल्या होत्या. आर्थिकदृष्ट्या पुढारलेल्या या देशांत, जेथे सर्व स्त्रिया किमान साक्षरतरी होत्या अशा देशांत ही स्थिती.

**भारतातील करुणावाद**

गेल्या शतकाच्या शेवटाला आपल्या देशात इंग्रजांचा अंमल स्थिर झाला. त्या वेळी देशातील यच्चयावत् स्त्रियांची स्थिती जितकी हलाखीची आणि करुणास्पद होती तितकी ती इतर कोठे वा कधी झाली नसेल. बाकी कोणाला असो नसो, स्त्रियांना मात्र इंग्रजी राज्य हे ईश्वराचे परम वरदान ठरले. आजही शरीयतसारख्या प्रश्नावर जी खळखळ माजते ती पाहता, इंग्रजी अमलात एका मागोमाग एक झपाट्याने झालेले कायदे पाहिले तर कौतुक वाटल्याखेरीज राहत नाही. १८२९ मध्ये सती-बंदीचा कायदा झाला आणि विधवांना सक्तीने जाळण्याला बंदी घातली गेली. १८५६ साली हिंदू विधवांच्या पुनर्विवाहासाठी आवश्यक तो कायदा अमलात आला. १८७२ साली घटस्फोटाची तरतूद करण्यात आली. १९२९ साली 'शारदा' कायदा मंजूर होऊन बालविवाह हा गुन्हा ठरविण्यात आला.

या सर्व काळात राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळराव आगरकर, हरविलास सारडा, बाबा पदमनजी अश्या मंडळींनी स्त्रियांचे प्रश्न पुढे मांडले. पण स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याकरिता एका मागोमाग एक कायदे होत गेले तसतसे नवनवीन प्रश्नही समोर येऊ लागले किंवा जुन्या प्रश्नांचे स्वरूप नव्या गंभीरतेने पुढे येऊ लागले. १९४६ साली द्विभार्याप्रतिबंधक कायदा झाला. स्वातंत्र्यानंतरही विवाहाची नोंदणी, हुंडाप्रतिबंध, हिंदू वारसा कायदा आणि हिंदू कोड बिलाच्या संबंधाने अनेक कायदेशीर तरतुदी कायद्याच्या पुस्तकात तयार झाल्या. घटनेने स्त्रियांना समान हक्क दिले. देशाच्या पंतप्रधानपदीसुद्धा एक स्त्री विराजमान झाली. पण व्यवहारात सर्वसामान्य स्त्रीच्या दृष्टीने फरक काहीच न पडल्यासारखा आहे. विधवा आता सती सर्रास जात नाहीत पण अजूनही सतीच्या घटना वर्तमानपत्रात अधूनमधून ऐकू येतात आणि सतीच्या स्थळी हजारो, लाखो लोक भक्तिभावाने जमतात. बालविवाहाचा कायदा होऊन ६० वर्षे झाली पण अजूनही ग्रामीण भागातील जवळजवळ सर्व लग्ने हा कायदा मोडून होतात. स्त्रियांना मालमत्तेचा हक्क मिळाला पण परिणाम एवढाच झाला की लग्नाच्या वेळी प्रत्येक मुलीकडून बापाच्या मालमत्तेवरील हक्क सोडून दिल्याचे कागदोपत्री लिहून घेतले जाऊ



लागले. जिल्हापातळीपर्यंत वर्तमानपत्रे कायद्याच्या दृष्टीने अर्थहीन असलेल्या एकतर्फी काडीमोडीच्या नोटिसांनी भरलेली असतात. गावोगाव, सासरी नांदविल्या न जाणाऱ्या मुली माहेरी दिवस कंठतात, पण नवऱ्याकडून कायद्याप्रमाणे पोटगी कोर्टातून मिळवल्याची उदाहरणे दुर्मिळ आणि पोटगीची रक्कम प्रत्यक्षात नियमितपणे मिळत असल्याची उदाहरणे तर उंबराच्या फुलाइतकी दुर्मिळ. कागदोपत्री सुधारणांत काही कोठे कमी नाही. कायद्याच्या पुस्तकात समान मानली गेलेली आणि धर्मग्रथांत देवता म्हणून वंद्य मानलेली आणि साहित्यात माता, भगिनी इत्यादी भूमिकांबद्दल नावाजली गेलेली स्त्री प्रत्यक्षात हलाखीने जगते. याचा अर्थ, स्वातंत्र्य कागदोपत्री तरतुदींनी मिळत नाही; प्रश्न करुणेने सुटत नाहीत. त्यासाठी अधिक व्यापक विश्लेषणाची व समर्थ प्रयत्नांची आवश्यकता असते. असे प्रयत्न करणारे थोडे नव्हते. या विषयांवर अनेकांनी वेगवेगळी मतेही मांडली आहेत. सर्वच मतांचा परामर्श घेणे कठीण आहे. पण स्थूलमानाने दोन मतप्रवाहांचा विचार केला पाहिजे. (अ) मार्क्सवादी आणि (ब) आधुनिक स्त्रीवादी.

## (अ) मार्क्सवादी मतप्रवाह

समाजातील सर्व विचार आणि व्यवस्था आर्थिक घटकांमुळे ठरतात. प्रत्येक समाजात उत्पादनाची जी साधने वापरली जातात त्या साधनांमुळेच समाजातील घटकांमध्ये वेगवेगळ्या तऱ्हेचे संबंध तयार होतात. उत्पादनाच्या साधनांतील फरक आणि त्यामुळे तयार होणारे वर्गसंघर्ष यावरून इतिहासाचा खरा अर्थ समजतो. एवढी व्यापक भूमिका प्रथम मार्क्सवादाने घेतली. शिकारी, रानटी टोळ्यांपासून पशुपालन आणि शेती, खाणकाम, हस्तोद्योग आणि औद्योगिकीकरण या टप्प्यांत मनुष्यसमाजातील संबंधांत बदल घडत आले. त्याचा सुसंगत अर्थ मार्क्सवादी विचारवंतांनी मांडला. उत्पादनांच्या साधनांची खासगी मालकी प्रस्थापित करणाऱ्या भांडवलदारी व्यवस्थेने या प्रगतीत मोठी मोलाची कामगिरी बजावली आणि जुनाट व्यवस्था व प्रतिगामी विचार मोडून उत्पादकता आणि परखड विचार यांचे युग सुरू केले. पण ही व्यवस्था कामगारांच्या शोषणावर अवलंबून होती. उत्पादनांच्या नव्या साधनांसाठी लागणाऱ्या भांडवलाची निर्मिती ही कामगारांच्या शोषणातून या व्यवस्थेत तयार होते. कामगाराला मिळणारे वेतन हे त्याला जगण्याकरिता आणि नवीन पिढी तयार करण्याकरिता लागणाऱ्या वस्तूंइतके असते, तर त्यांच्या श्रमातून

त्यापेक्षा कितीतरी अधिक वस्तू तयार होतात. या शोषणाचा परिणाम म्हणून एका बाजूला मंदीच्या लाटा अपरिहार्यपणे तयार होतात, तर दुसऱ्या बाजूला पिळल्या जाणाऱ्या सर्वहारा कामगारवर्गात जागृती तयार होऊन भांडवली व्यवस्था व खाजगी मालमत्ता यांचा अंत होतो आणि वर्गविहीन, शोषणरहित समाज तयार होतो अशी मार्क्सवादाची थोडक्यात मांडणी आहे.

अगदी सुरुवातीच्या काळापासून मार्क्स आणि एंगल्स इतकेच नव्हे तर लेनिनपर्यंत विचारवंतांनी स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी मते मांडली. त्या सगळ्या मतांमध्ये एकसूत्रता सापडतेच असे नाही. आधुनिक स्त्री-मुक्ती आंदोलनातील अनेक कार्यकर्त्यांनी मार्क्सवाद हीही एक पुरुषी विचारपद्धती आहे आणि कामगारांच्या कोणत्याही क्रांतीपेक्षा सर्व जगातील, लोकसंख्येने अर्ध्या असलेल्या स्त्रियांची क्रांती ही जास्त व्यापक आणि महत्त्वाची आहे असे आग्रहाने मांडले. स्त्री-मुक्ती आंदोलनाचे एक श्रेय विरोधकांनाही मान्य करावे लागेल. मार्क्सवाद्यांना त्यांच्या मूल ग्रंथातील विचारांच्या अचूकपणाबद्दल आणि शास्त्रीयतेबद्दल कडवा अभिमान असतो. वेदोपनिषदांचे आधार सांगणाऱ्या ब्राह्मण पंडितांपेक्षाही त्यांचे ग्रंथप्रामाण्य मजबूत असते. पण मार्क्सवादी विचारात स्त्री-प्रश्नाबाबतीत काही कमतरता कदाचित असू शकेल असा बचावात्मक पवित्रा घेणे त्यांना आधुनिक स्त्रीवाद्यांमुळे भाग पडले आहे.

**साम्यवादी जाहीरनामा**

साम्यवाद्यांच्या जाहीरनाम्यात स्त्रियांच्या प्रश्नाचा उल्लेख पहिल्यांदा सापडतो. मार्क्सने आपल्या जळजळीत उपहासाच्या शैलीत भांडवलशाही कुटुंबव्यवस्थेतील दांभिकता आणि अमानुषता यावर आसूड ओढले आहेत. कुटुंबव्यवस्था ही फक्त ''आहे रे'' (संपन्नां)ची मक्तेदारी आहे. याउलट, कामगारांना हे भाग्य जवळपास नाही आणि त्याउलट, खुले आम वेश्यव्यवसाय पसरलाय. या व्यवस्थेत पालक मुलांचे शोषण करतात आणि स्त्रिया या केवळ उत्पादनाची साधने बनतात आणि ''आहे रे'' मंडळी केवळ ''नाही रे'' च्या स्त्रियांवर अत्याचार करतात एवढेच नव्हे तर एकमेकांच्या स्त्रियांबरोबर व्यभिचार करतात असा त्यांनी आरोप केला आहे. भांडवल नष्ट झाले म्हणजे ''नाही रे'' ची कुटुंबहीनता व वेश्याव्यवसाय नष्ट होईल आणि त्याचबरोबर ''आहे रे'' ची कुटुंबव्यवस्था अपरिहार्यपणे नष्ट होईल. मार्क्सवादी व्यवस्थेत स्त्रियांवर सामायिक मालकी प्रस्थापित होईल या कल्पनेची मार्क्स खिल्ली उडवतो आणि भांडवली व्यवस्थेतच अशा तऱ्हेची सामायिक मालकी असल्याचे प्रतिपादन करतो.

**एंगल्सकृत मांडणी**



स्त्रीप्रश्नावरची सुसंगत मांडणी एंगल्सने केली. आदिमानवाच्या समाजातील व्यवस्था ही अनेक जोडप्यांची साम्यवादी व्यवस्थाच होती. स्त्रियांकडे त्यांच्या नैसर्गिक गुणधर्माप्रमाणे ''घरकाम'' आले हा श्रमविभागणीचा भाग होता. पण घरकामाचे स्वरूप सामाजिक गरज भागविणाऱ्या सार्वजनिक उद्योगाचे होते. पुढे जोडप्यांची कुटुंबव्यवस्था तयार झाली त्या वेळी घरकाम एक खासगी सेवा बनली आणि आपली मालमत्ता आपल्याच जैव वारसाकडे जावी याकरिता स्त्रियांवर लैंगिक आणि आर्थिक-सामाजिक बंधने घालण्यात आली. म्हणजे, खासगी मालमत्ता हे स्त्रीच्या गुलामगिरीचे प्रथम कारण. प्रत्येक पुरुष, बाहेरच्या जगात तो मालक असो का मजूर, चार भिंतीच्या आत ''सुलतान'' बनला आणि त्याची स्त्री त्याची ''गुलाम''. स्त्रीची मुक्तता केव्हा होईल? एंगल्स म्हणतो, ''सर्व स्त्रीजात जेव्हा घराबाहेर पडून पुन्हा एकदा सार्वजनिक उत्पादनात सहभागी होईल त्यावेळी आजच्या कुटुंबाचे 'आर्थिक घटक' हे स्थान नष्ट होईल.''

**कामगार चळवळीची सोय**

स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी मार्क्सवादाने मांडलेल्या भूमिकेचा फार मोठा प्रभाव स्त्रीकार्यकर्त्यांवर राहिलेला आहे. किंबहुना, स्त्रियांची चळवळ ही प्रामुख्याने डाव्या चळवळीचे एक अंग या स्वरूपातच दिसते.

स्त्रीकार्यकर्त्यांनी कामगार चळवळीत मोठ्या हिरीरीने भाग घेतला. तत्कालिक कायद्याच्या अर्थवादी मागण्यांच्या यादीत स्त्री-प्रश्नांच्या जाणिवेने काही भर पडली. समान काम समान वेतन, बाळंतपणाची रजा, पाळणाघरे, स्त्री-कामगारांसाठी वेगळी विश्रामगृहे, कामाच्या जागी अल्पखर्चात भोजनाची सोय इत्यादी मागण्याही आता कामगारांच्या मागण्यांच्या यादीत सामील होऊ लागल्या. कामगार चळवळीच्या अंतिम यशातच म्हणजे भांडवली व्यवस्था आणि खासगी मालमत्ता यांच्या नाशातूनच स्त्री-स्वातंत्र्याचा मार्ग जातो असे म्हटल्यानंतर स्त्रीकार्यकर्त्यांची पलटण कामगार लढ्याच्या दिमतीला उभी राहू लागली आणि स्त्रियांनी कामगार म्हणून केलेल्या चळवळीच स्त्री-मुक्ती चळवळी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

**(१) घरकाम = स्त्री?**

घरकाम स्त्रियांकडे त्यांच्या जीवशास्त्रीय गुणधर्माप्रमाणे झालेल्या श्रमविभागणीने आले हे म्हणणे आता जीवशास्त्रालाही मान्य होणार नाही आणि प्राग्मानवसमाजशास्त्रातील पुराव्यांचाही त्याला पाठिंबा नाही. घरकाम प्रत्येक समाजात सर्व काळी अपरिहार्यपणे स्त्रियांकडेच राहावे असे समजण्याचे काहीही

कारण नाही. मार्गारेट मीड इत्यादिंनी केलेल्या संशोधनात, वेगवेगळ्या टोळ्यांमध्ये कामाची अगदी वेगवेगळ्या पद्धतीची विभागणी आढळून आलेली आहे. काही स्त्रियांमध्ये किंवा बहुतांश स्त्रियांमध्ये कदाचित् घरकामाची आवड असेलही. प्रजजनासंबंधी जबाबदाऱ्या लक्षात घेता व त्यामुळे हालचाल करण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेता काही काळ स्त्रियांना निवारा व संरक्षण यांची गरज आहे असे मानले तरी त्यामुळे सगळ्या स्त्रियांना सर्व काळ घरकामातच ठेवण्याची व्यवस्था का निघाली? किंवा स्त्रीपुरुषांची जीवशास्त्रीय वैशिष्ट्ये लक्षात घेताही, सरसकट लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी का व्हावी या प्रश्नाचे एंगल्स्चे उत्तर अपुरे आहे.

**(२) स्त्री आणि वर्ग**

मार्क्सवादी विचार हा वर्गसंघर्षाचा विचार आहे. वर्गाची निश्चित व्याख्या देण्याचे मार्क्सनेही टाळले आहे आणि एंगल्सही सुस्पष्ट व्याख्या देत नाही. ''मिळकतींच्या उगमांची आणि स्वरूपांची समानता'' या पलीकडे जास्त स्पष्टता नाही. ''आहे रे'' वर्गाची व्याख्या त्या मानाने सोपी आहे. उत्पादनांच्या साधनांवरील मालकीचा आणि अतिरिक्त मूल्यांचा लाभ घेण्याची ताकद ज्या वर्गाजवळ असेल तो ''आहे रे''. पण क्रांतिप्रवण वर्गाची खूण मिळकतीच्या स्वरूपावरून ठरवणे कठीण आहे. आधुनिक मार्क्सवादी समान हितसंबंधांची जाणीव आणि एकजूट करण्याची प्रवृत्ती व ताकद हीच वर्गाच्या व्याख्येची महत्त्वाची अंगे समजतात. या व्याख्येने तपासता वर्गविग्रह इतिहासात कधी दृष्टोत्पत्तीस आला किंवा नाही याबद्दलही शंका घेण्यास जागा आहे. वर्गाचे अस्तित्व मानले तरी एकाच घरातील स्त्रीपुरुष एकाच वर्गाचे घटक आहेत हे म्हणणे कोणत्याही व्याख्येने कठीण आहे. एकीकडे चार भिंतींच्या आतील उत्पादनांच्या साधनांचा मालक आणि अतिरिक्त मूल्याचा स्वामी तर दुसरीकडे सर्वार्थाने सर्वहारा, गुलामांची गुलाम स्त्री. पण या दोघांत बाहेरच्या संघर्षाला तोंड द्यायचे झाले तर एकजुटीने लढण्याची प्रवृत्ती. ही कुटुंबाची रचना वर्गाच्या संकल्पनेचा पायाच उखडणारी आहे. राष्ट्राराष्ट्रांमध्ये शोषकांच्या फायद्यासाठी लढाया होतात. पण प्रत्येक राष्ट्रातले सर्वहारा शोषित आपापल्या देशातील शोषकांच्या बाजूनेच ठामपणे उभे राहतात. त्याप्रमाणे सर्व संकटांना तोंड देण्याकरिता पतीपत्नींची होणारी एकजूट ही आर्थिक वर्गाच्या कल्पनेलाच नाकारणारी आहे.

**(३) घरकामाचे श्रममूल्य**

स्त्रीच्या घरकामाचे स्थान काय? घरातील तिचे श्रम उत्पादक आहेत किंवा



नाहीत? या प्रश्नावरही मार्क्सवादी अर्थशास्त्र कोलमडून पडते. भांडवलदार वर्गाकडून होणाऱ्या शोषणाच्या क्षेत्रात घरकामाचे श्रम मोडत नाहीत असे म्हटले तर स्त्रियांची स्त्रिया या नात्याने होणारी दडपणूक किंवा शोषण हे भांडवली शोषणाचा अंगभूत भाग असणार नाही. मग स्त्रियांची पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे होणारी दडपणूक भांडवली चौकटीमध्येच संपू शकते असा किंवा भांडवली व्यवस्था नष्ट झाल्यानंतरही संपत नाही असा निष्कर्ष निघतो.

घरकामाचे श्रम उत्पादक असतात आणि म्हणून भांडवली शोषणाचा भाग असतात असे धरले तरी अडचणी संपत नाहीत. कामगारांच्या श्रमशक्तीचे मूल्य हे त्याच्या जीवनासाठी आणि पुनरुत्पादनासाठी लागणाऱ्या सर्व क्रयवस्तूंच्या मूल्याइतके असते हा मार्क्सचा मूलभूत सिद्धांत आहे. कामगार खानावळीत जेवले तर खानावळीचे पैसे - ज्यांत स्वयंपाक्याचे, मोलकरणीचे, वाढप्याचे वेतन अंतर्भूत असते - या मूल्यात मोजता येतात; पण घरकाम करणाऱ्या बायकोला वेतन नसल्यामुळे तिच्या श्रमाचे मूल्य त्यात धरता येत नाही. मार्क्सची मूल्यमीमांसा ही किती अजागळ आहे याबद्दल अर्थशास्त्र्यांचे फार काळापासून एकमत आहे. स्त्री-चळवळीच्या संबंधाने ही गोष्ट आणखीनच स्पष्ट झाली. एरवी हा भाग विनोदाचाच.

**(४) घरकामाचे सार्वजनिकीकरण**

आर्थिक घटक म्हणून कुटुंबाचे अस्तित्व साम्यवादी व्यवस्थेत नष्ट होईल पण त्याच वेळी युगुलसंबंधांचे आदर्श रूप म्हणून कुटुंब साकार होईल या दोन कल्पना परस्परविरोधी आहेत. घरकाम समजल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी आणि कामे ही एक अर्थाने विस्तारित कामक्रीडेचाच भाग असतात. गृहव्यवस्थेतील आर्थिक क्षेत्र आणि लैंगिक अंगे यांना वेगळे करणे अशक्यप्राय आहे. स्त्री-मुक्ती ही सर्व घरकामाचे सार्वजनिकीकरण करण्याने येणार असेल तर रोगापेक्षाही औषध भयानक असा प्रकार होईल. स्त्री सार्वजनिक उत्पादनक्षेत्रात आल्यामुळे तिचे प्रश्न सुटतात असे म्हणणे म्हणजे गेल्या क्रांतीनंतरच्या सत्तर वर्षांत सोव्हिएट स्त्रीचे सर्व प्रश्न सुटले आहेत असे म्हणण्यासारखे आहे.

सार्वजनिकीकरणाने स्त्री-मुक्तीचा मार्ग मोकळा होईल असे एका बाजूला मार्क्सवादी सांगत असताना दुसऱ्या बाजूला साम्यवादी म्हणवणाऱ्या देशांत उत्पादनक्षेत्रात वाढते खासगीकरण करण्याची प्रवृत्ती अधिकृतपणे बळावत आहे. सत्तर वर्षांच्या साम्यवादी नियोजनानंतर सार्वजनिकीकरणाचा मार्ग सोडून देणे साम्यवादी नियोजकांना अपरिहार्य वाटू लागले असेल तर ''सार्वजनिकीकरणातून स्त्री-मुक्ती'' हे एक मृगजळ होते असे मानावे लागेल.

### (५) अतिरिक्त मूल्य

मार्क्सवादाची गेल्या शतकातील पीछेहाट ही प्रामुख्याने त्या विचारसरणीतील अतिरिक्त मूल्याच्या चुकीच्या सिद्धांतामुळे झाली आहे हा विचार शेतकरी संघटनेने तपशीलवार मांडलेला आहे. पुढील शतकांचे काही सांगता येणार नाही, पण आजपर्यंतच्या इतिहासात भांडवलनिर्मिती ही कामगारांच्या श्रमशक्तीपेक्षा शेतीतील श्रमशक्ती आणि असमान विनिमय यामुळे झाली हे स्पष्ट आहे. भांडवलदाराने कामगारांचे शोषण केले एवढ्याच कारणास्तव केवळ कामगाराच्या स्त्रीला तिच्या नवऱ्याची ताबेदारी पत्करण्याची काहीही आवश्यकता नव्हती. कामगारांच्या वेतनाच्या हिशोबातील फेरफारीनेच शोषणाची चाके फिरत असती तर स्त्रियांना चार भिंतींच्या आत दुय्यम दर्जा स्वीकारण्याची सक्ती झालीच नसती. पुरुषांना आपली खासगी मालमत्ता आपल्याच वारसाकडे जावी अशी इच्छा उत्पन्न झाली म्हणून हजारो वर्षे समान हक्क बजावणाऱ्या स्त्रियांना विनातक्रार बंधने स्वीकारण्याची गरजही पडली नसती.

मातृसत्ताक किंवा स्त्री-वर्चस्व असलेल्या समाजांतील स्त्रिया केवळ पुरुषांच्या हाती वरकड निर्मिती झाली आणि शुद्ध वारसाची गरज त्यांना वाटू लागली म्हणून सुखासुखी, विनाप्रतिकार किंवा स्वखुशीने आणि आंनदाने पुरुषसत्ताक व्यवस्था स्वीकारतील हे असंभव आहे. देशभर प्रस्थापित झालेली बौद्धांची राजकीय आणि धार्मिक सत्ता शंकराचार्यांनी केवळ वादविवादाने काही वर्षांतच समूळ नष्ट करून टाकली, या भाकडकथेइतकेच हे असंभाव्य. किंवा गुणक्रमविभागश: चातुवर्ण्यकर्त्याने व्यवस्था तयार केली आणि अंत्यवर्णीयांनी ती विनातक्रार मान्य केली असे समजण्याइतके ते बाष्कळ आहे.

अश्या तऱ्हेची उलथापालथ शांततामय रीतीने मतपरिवर्तनाने, परस्पर सौहार्दाने घडून येत नाही. रूप एवढे बदलण्यासाठी सगळी वस्तूच वितळवून टाकण्याइतक्या धगीची भट्टी आणि मूस असावीच लागले. कोठेतरी ताकदीचा, अगदी पाशवी ताकदीचा, सैन्याचा, शस्त्रांचा उपयोग निर्णायक पद्धतीने घडला असला पाहिजे. वरकड उत्पादनाच्या पहिल्या उपयोगात अवजारांबरोबर हत्यारेही तयार झाली. या हत्यारांचा उपयोग पुरुषांनी एका काळी स्त्रियांविरुद्ध केला असेल हे असंभाव्य नाही, पण ते पुरुषांच्याच हितसंबंधांना हानिकारक आणि मारक ठरले असते. अगदी स्त्रियांनासुद्धा निसर्गसिद्ध वाटावी अशी पुरुषप्रधान कुटुंबरचना केवळ पाशवी बळाच्या जोरावर प्रस्थापित करता आली नसती. सुप्त प्रतिकाराच्या ठिणग्या दीर्घकाळपर्यंत धुमसत राहिल्या असत्या.

स्त्रियांच्या दास्याचे मार्क्सवादी विश्लेषण हे अपुरे आहे. असह्य अशी



बंधने इतिहासाच्या एका अवस्थेत स्त्रियांनी का स्वीकारावी याचे समाधानकारक विश्लेषण मार्क्सवादात मिळत नाही. स्त्री-स्वातंत्र्याचा विचार हे मार्क्सवादाने लावून घेतलेले मातीचे कुल्ले आहेत. ते टिकून राहण्यासारखे नाहीत आणि मार्क्सवादाची आर्थिक क्षेत्रात पीछेहाट होत असताना या बुडत्या जहाजात चढण्याची स्त्री-आंदोलनाला काही आवश्यकताही नाही.

## (ब) आधुनिक स्त्रीवाद्यांचा मतप्रवाह

स्त्रियांच्या सद्य:स्थितीचे आणि समाजातील दुय्यम दर्जाचे कारण काय? आणि वेगवेगळ्या समाजातील स्त्रियांच्या दर्जातील फरकाचा अर्थ कसा लावायचा? आणि याहून शेवटी, स्त्रियांच्या समस्येचे उत्तर काय? हे प्रश्न गेल्या वीस एक वर्षांतच आग्रही स्वरूपात मांडले जाऊ लागले. स्त्रियांची चळवळ सुरुवातीच्या काही काळात सुधारणवादी पुरुषांच्या हाती होती. दयाबुद्धीने आणि करुणेने प्रेरित होऊन अभागी अबलांची परिस्थिती सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न होता. १९६५ सालापासून स्त्री-मुक्ती चळवळीचे नवीन युग सुरू झाले असे समजले पाहिजे. इथपासून चळवळ प्रामुख्याने स्त्रियांनी स्वत:च हाती घेतली आणि अनेक वर्षे कोंडून ठेवलेली वाफ बाहेर उफाळून यावी त्याप्रमाणे या काळात स्त्रियांनी स्त्री म्हणून अत्यंत मोकळेपणे स्त्रियांच्या प्रश्नाची अनेक अंगे व विश्लेषणे विस्ताराने आणि अभ्यासपूर्वक मांडली. मार्क्सवादाची चौकट स्त्रियांच्या प्रश्नाची उत्तरे देऊ शकत नाही हे त्या चळवळीच्या नवीन प्रवर्तकांनी अगदी ठामपणे मांडले आणि आपले नवे सिद्धांत पुढे ठेवले.

एका अर्थाने मार्क्सवादाच्या आधीच्या "आदर्शवादी" किंवा "विधायक" साम्यवादी चळवळींशी १९६५ च्या आधीच्या चळवळींची तुलना करता येईल. १९६५ पासून शास्त्रीय स्त्री-मुक्तीचा विचार उमलू लागला आहे. हा विचार पुढे मांडणारांमध्ये शुलामिथ फायरस्टोन यांचा क्रमांक खूपच वरचा लागेल. मार्क्सवादाला समांतर अशा अनेक संकल्पना तिने मांडल्या. उदाहरणार्थ, आर्थिक वर्गाप्रमाणे लिंगवर्ग, ऐतिहासिक वस्तुवादाचाही अर्थ, लिंग विभागणीच्या आधारावर इतिहासाचा अर्थ समजून घेणारी विचारपद्धती इत्यादी.

१९७० साली केट मिलेटने एका शब्दाचा प्रयोग केला आणि तो लवकरच रूढ झाला. "पितृसत्ताक". पितृसत्ता म्हणजे लष्करी, औद्योगिक, तांत्रिक, वैज्ञानिक, शैक्षणिक, राजकीय, वित्तीय या सत्तांच्या सर्व स्रोतांचे पुरुषांच्या हाती एकवटणे. पितृसत्ता म्हणजे वडिलांची किंवा बापाची सत्ता-

*जिच्यात समाजाची, कुटुंबाची सैद्धांतिक आणि राजकीय व्यवस्था ही*

*दमनशक्ती, दबाव, रूढी, परंपरा, कायदा, भाषा, शिष्टाचार, शिक्षण आणि श्रमविभागणी यांचा वापर करून स्त्रियांचे समाजातील स्थान दुय्यम ठरवते.* (ॲड्रीयन रिच.)

*जन्मजात लिंगभेद आणि स्त्रीला देण्यात आलेली समाजातील भूमिका यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. सर्व पुरुषांनी मिळून सर्व स्त्रियांवर लादलेली ही एक प्रकारची गुलामगिरी आहे. समाजातील हरएक साधनाचा उपयोग करून पुरुषी प्रचाराने आणि फितूर झालेल्या वयस्कर स्त्रियांच्या साहाय्याने ही व्यवस्था राबविली जाते.* (एलिझाबेथ जेन्वे).

शुलामिथ फायरस्टोनने पितृसत्ताक व्यवस्थेची उपपत्ती वस्तुवादाच्या आधाराने सांगितली. पण हा मार्क्सएंगल्स्चा आर्थिक वस्तुवाद नाही तर स्त्री-पुरुष यांच्या शरीरशास्त्रीय वास्तवावर आधारलेला वेगळाच वास्तववाद आहे.

*स्त्री-पुरुषांच्या जन्मजात फरकाने नव्हे तर प्रजननसंबंधी जबाबदाऱ्यांच्या वेगळेपणामुळे लिंगवर्ग आणि स्त्रियांचे शोषण उद्‌भवले. जीवशास्त्रीय कुटुंबाचे घटक चार - १. स्त्रियांचे पुरुषांवर परावलंबित्व. २. माणसाची पोरे स्वतंत्र होण्याकरिता लागणारा दीर्घ काळ. ३. आईबाळाच्या खास नात्यामुळे होणारे मानसिक परिणाम. आणि ४. स्त्री-पुरुषांतील श्रमविभागणी. स्त्री-मुक्ती ही जीवशास्त्रीय कुटुंब नष्ट केल्यानेच होऊ शकेल. कृत्रिम प्रजोत्पादन, मुलांच्या जोपासनेसाठी सार्वजनिक व्यवस्था प्रस्थापित केल्यानेच स्त्री स्वतंत्र होऊ शकेल हा विचार एकांगी आहे.*

*स्त्री-मुक्तीसाठी किमान चार आघाड्यांवर बदल घडवून आणावा लागेल. १. आर्थिक उत्पादनातील स्त्रीची भूमिका. २. प्रजोत्पादन ३. लैंगिकता आणि ४. मुलांची सार्वजनिक देखभाल* (ज्युलिएट मिचेल).

मिशेल रोझाल्डाचे मत थोडे वेगळे आहे.

*बाळंतपणाच्या जबादारीपेक्षा मुले वाढविण्याची जबाबदारी नैसर्गिक रितीने स्त्रियांवर पडते आणि त्यामुळे इतिहासातील यच्चयावत् समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले आहे. याउलट, पुरुषांची घरकामापासून आणि मुलांपासून दूर राहू शकण्याची ताकद हे त्यांचे महत्त्वाचे सामर्थ्य आहे.*

प्रजनन किंवा मुलांची जोपासना यामुळे स्त्रीवर बंधने पडतात या विचारापेक्षा अगदी वेगळा विचार सुसान ब्राऊनमिलर हिने मांडला.

*पुरुषी सत्तेचे खरे रहस्य पुरुषांची पाशवी शक्ती हेच आहे. सर्व प्राणीजगतात मनुष्य प्राण्यातच बलात्कार शक्य होतो. कामपूर्तीसाठी त्यांना कोणत्याही ऋतूची आवश्यकता नसते हे पुरुषांच्या एकदा ध्यानात आल्यानंतर शत्रूचा*



*आणि स्त्रियांचा मानसिकदृष्ट्या बीमोड करण्यासाठी या हत्याराचा वापर करण्यात आला. आधुनिक समाजात बलात्कारी गुन्हेगार संख्येने थोडे पण त्यांनी निर्माण केलेल्या धोक्याचा फायदा प्रत्येक पुरुष घेतो. बाहेरच्या बलात्काराला तोंड देण्यापेक्षा घरचे अत्याचार निमूटपणे सोसून घ्यायची प्रवृत्ती स्त्रीत तयार होते.*

*बलात्काराचे तंत्र एका अर्थाने देशच्या देश नामोहरम करणाऱ्या साम्राज्यवाद्यांचेच आहे.* (सुसान ग्रेफीन)

बलात्कारासंबंधीच्या या मांडणीमुळे मार्क्सवाद आणि त्यातील वर्गविग्रहाची मध्यवर्ती कल्पना यापासून स्त्री-मुक्ती चळवळ दूर सरकली. त्याचबरोबर वंशभेदाच्या सर्व वादांपासूनही ती दूर झाली. बलात्काराला वर्गाच्या मर्यादा नाहीत आणि वंशाच्याही नाहीत.

स्त्री-मुक्तीच्या संकल्पना सुचवतानासुद्धा अगदी निर्भीड नि:संकोचपणे काही अतिरेकी कल्पनासुद्धा चर्चेसाठी मांडल्या गेल्या.

*कामगारांच्या चळवळीत साम्यवादाचे जे स्थान आहे तेच स्थान स्त्री-चळवळीत स्त्रियांतील समसंभोगाचे आहे.* (टाय्-ग्रेस ॲट्किन्सन)

ही संकल्पना अतिरेकी तर खरीच आणि स्त्री-चळवळीतही त्यामुळे मोठ्या प्रमाणावर फाटाफूट झाली, पण स्त्रियांना पुरुषनिरपेक्ष जगता आले पाहिजे हा महत्त्वाचा मुद्दा त्यामुळे पुढे मांडला गेलाच.

अगदी मानसशास्त्रासारख्या शास्त्रानेदेखील स्त्रीविरुद्ध भाकडकथा रचल्या आहेत. स्त्रीने कसे वागले पाहिजे, स्त्रीची निरोगी वर्तणूक कोणती याच्या पुरुषी संकल्पना मनोविकारतज्ज्ञही वापरतात. एखादी कर्तबगार बुद्धिमान स्त्री आयुष्यात जरा कोठे नवीन वाट शोधू लागली की, "तुझे वागणे स्त्रीत्वाला धरून नाही, यामुळे तुला मानसिक ताण सहन करावे लागतील." असा इतका धाक दाखविला जातो की ती खरोखरच मनोरुग्ण व्हावी. एखाद्या मुलाने जरा कुठे ऋजुता, ममता, नाजूकपणा दाखविला तर त्याचीही हेटाळणी व्हायला आणि त्याच्या पौरुषाविषयी शंका घ्यायला वेळ लागत नाही. स्त्री-पुरुष यांच्या आदर्शात पुरुषसत्ताक व्यवस्थेने अनैसर्गिक ध्रुवीकरण घडवून आणले आहे. अशा ध्रुवीकरणाला जीवशास्त्रीय आधार काही नाही. जीवशास्त्राच्या दृष्टीने स्त्री व पुरुष हा फरक काही टक्केवारीचा आहे. फिलीस चेझलर, कॅरोलिन हेलब्रून, आर्ना सॅण्डा बेम यांनी संतुलित व्यक्तिमत्त्वाची नवी संकल्पना मांडली. पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या मानसिक परीक्षा करण्यासाठी हा नटेश्वराचा आदर्श होता. स्त्रियांना आणि पुरुषांना दोघांनाही शौर्य, धैर्य, पराक्रम तसेच ममता, प्रेम, सहनशीलता हे गुणही दाखविण्यास ही नवीन संकल्पना वाव देते.

पुरुषनिरपेक्ष जग हे हास्यास्पद आहे हे नक्की. पण निदान, पुरुषार्थाच्या आक्राळविक्राळ विपरीत कल्पनांपासून तरी केवळ स्त्रियांचीच नव्हे तर पुरुषांचीही सोडवणूक करणे आवश्यक आहे.

ही कल्पना सर्वांनाच मान्य होण्यासारखी नव्हती.

*मालक आणि गुलाम यांच्या गुणांचे मिश्रण म्हणजे नवा आदर्श होऊ शकत नाही* (जेनिस् रेमंड)

*पुरुषांचे दुर्गुण पुरुषांनाच लखलाभ असोत. गेल्या कित्येक शतकांच्या दास्यातून स्त्रियांना दुर्दैवाने का होईना काही गुण अंगी बाणून घ्यावे लागले आहेत. पराधीनांना भावनाशीलता सहजच येते. स्वामीश्रेष्ठांचे रागलोभ त्यांना काही वेगळ्याच इंद्रियाने चटकन जाणवतात. या भावनाशीलतेच्या आधारावरच येणाऱ्या जगात स्त्री पुरुषापेक्षा श्रेष्ठ ठरेल.* (जीन बेकर मिलर)

*मातृत्वाची जबाबदारी आणि त्याचे परिणाम हा सर्व स्त्री-चळवळीत वारंवार आढळणारा विषय आहे. मातृत्व स्वयंसिद्ध उदात्त अनुभव आहे. पुरुषी राजकीय आणि आर्थिक प्राबल्यामुळे मातृत्व हा शाप झाला आहे.* (ॲड्रीयन रिच)

*स्त्रियांनी अजून स्वत:च्या शरीराचा आणि व्यक्तिमत्त्वाचा, मानसिक ताकदीचा, संवेदनक्षमतेचा, असाधारण बुद्धिमत्तेचा, सोशिकतेचा आणि विविधरम्य शारीरिकतेचा विचारही करायला सुरुवात केलेली नाही. या त्यांच्या सुप्त शक्तींचा थोडा तरी उपयोग झाला तरी जी ऐतिहासिक जगड्व्याळ क्रांती होईल तिच्यापुढे कोणत्याही समाजवादी क्रांतीची काहीच मातबरी राहणार नाही. स्त्रियांची स्वशरीरावरील सत्ता परत येणे हे कामगारांच्या हाती उत्पादनांच्या साधनांची मालकी येण्यापेक्षा समाज बदलण्यासाठी अधिक आवश्यक आहे.* (ॲड्रियन रिच)

आधुनिक स्त्री-मुक्ती आंदोलनाच्या वेगवेगळ्या प्रवर्तकांनी आपापल्या देशात गाजविलेली कामगिरी पाहिली म्हणजे केवढी कर्तबगारी, बुद्धिमत्ता समाजात न फुलताच कोमेजून जात असेल याची कल्पना येते. स्त्री-आंदोलनाच्या पहिल्या स्फोटात शास्त्रीयतेच्या कठोर परिसीमा थोड्याफार उल्लंघिल्या जाव्यात हे समजण्यासारखे आहे. पाश्चिमात्य देशांच्या आजच्या परिस्थितीत स्त्री विरुद्ध पुरुष असा मूलगामी संघर्ष आहे अशी कोणी मांडणी केली तर तेही समजण्यासारखे आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भांडवशाहीतील प्रमुख संघर्षाबद्दल मार्क्सही असाच चकला होता. पण यापुढे स्त्री-मुक्ती विचाराला दुसऱ्या कोणत्या विचाराशी किंवा सिद्धांताशी जुळवून घेणे आवश्यक नाही. आजपर्यंतचे विचार मनुष्यजातीपैकी निम्मे लोकच डोळ्यासमोर ठेवून शिजवण्यात



आले किंवा निम्म्या लोकांपैकी म्हणजे पुरुषांपैकी काही गट पुढे ठेवून मांडण्यात आले. आता उरलेल्या निम्म्या मनुष्यप्राण्यांची कैफियत मांडली जात आहे. तिच्या प्रकाशात बाकीच्या सगळ्या विचारधारांनी आपली शास्त्रीयता तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.

## ५. स्त्रीप्रश्नाचा इतिहास

स्त्रीप्रश्नावर दोन प्रमुख मतप्रवाह, एक ''मार्क्सवादी'' तर दुसरा ''स्त्रीवादी'', हे आपण पाहिले. मार्क्सवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे मनुष्यजातीच्या सुरुवातीला जेव्हा समाज निसर्गावस्थेच्या निकट होता त्या वेळी बहुतेक समाजांत स्त्रियांचे प्राबल्य होते किंवा निदान त्यांना दुय्यम स्थानतरी नव्हते. इतिहासाच्या ओघात मधे एके काळी दररोजच्या गरजा पुरून वस्तू उरू लागल्या, टिकाऊ वस्तू तयार होऊ लागल्या तेव्हा त्यांच्या मालकीचा प्रश्न उपस्थित झाला आणि स्त्रीवरच्या बंधनांना सुरुवात झाली. काही काळानंतर साम्यवादी क्रांतीनंतर ही बंधने दूर होऊन पुन्हा एकदा स्त्री मुक्त होईल असे त्यांचे मत आहे.

याउलट, स्त्रीच्या शरीरशास्त्रीय वैशिष्ट्यामुळेच तिच्यावर परावलंबी जीवन जगण्याची पाळी आहे, मनुष्यजातीच्या सर्व इतिहासात स्त्रियांची परिस्थिती हीच राहिली आहे आणि प्रजनन व मुलांची जोपासना यांच्या कचाट्यातून विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगिकीकरण यांच्या आधाराने सुटल्याखेरीज स्त्रीला मुक्तपणे जगण्याची आशा ठेवायला फारशी जागा नाही असा ''स्त्रीवादी'' विचार प्रवाह.

**मानव समाजाचा इतिहास**

मानव समाजाच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे प्राग्मानवसमाजशास्त्र. हे शास्त्र अजूनही एक बाल्यावस्थेतील शास्त्र आहे. निश्चित पुरावे मिळवण्यातील अडचणी आणि मिळालेल्या पुराव्यांचे लावता येण्यासारखे निरनिराळे, एवढेच नव्हे तर काही वेळा परस्परविरोधी अर्थ यामुळे आजही या शास्त्राच्या आधाराने अमुक-अमुक पद्धतीने समाजांचा विकास झाला असे ठामपणे सांगणे अशक्य आहे. पण आजपर्यंतच्या इतिहासाचे तीन भाग पाडणे सर्वच शास्त्रज्ञांना मान्य आहे.

(१) पहिला जंगलातील जवळजवळ रानटी अवस्थेतील मानवसमाजाचा. यालाच ''अरण्ययुग'' किंवा ''पूर्वपाषाणयुग'' आणि काही वेळा ''मृगया अन्नचयनयुग'' असेही ओळखले जाते. जंगलात राहणारा समाज, दगडांच्या

हत्याराची प्राथमिक ओळख होऊ लागलेला आणि शिकार किंवा अन्न गोळा करून जगणाऱ्या मानवांचा समाज.

(२) दुसऱ्या युगात माणसाने जनावरे पाळण्याला आणि शेतीला सुरुवात केली. गरजेपेक्षा जास्त उत्पादन, त्यांचा व्यापार आणि शेती-व्यतिरिक्त कामांची सुरुवात व व्यापारी देवघेव या काळात झाली. याला ''रानटी युग'', ''बर्बरतायुग'' किंवा ''पाषाणयुग'' अशी शास्त्रीय पारिभाषिक नावे आहेत.

(३) तिसऱ्या कालखंडाची सुरुवात नांगराच्या वापराने शेतीकामाला सुरुवात झाली तेव्हापासून धरण्यात येते. यालाच ''संस्कृतियुग'' म्हटले जाते.

या प्रत्येक कालखंडाचे, बारकाव्याने अभ्यास करण्यासाठी आणखी पोटभाग पाडले जातात. पण कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीने या प्रत्येक कालखंडाची काही वैशिष्ट्ये आहेत.

पोट भरणे आणि प्रजोत्पादन म्हणजे, अर्थ आणि काम या मनुष्यमात्रांच्या प्रेरणा आहेत. पण प्रजोत्पादन म्हणजे केवळ मुलांना जन्म देणे नाही. त्यांची योग्य तऱ्हेने वाढ करणे हेही त्यात सामावलेले आहे. योग्य तऱ्हेने वाढ म्हणजे पुन्हा नवीन पिढीला चांगल्या तऱ्हेने अर्थ आणि काम साधेल अशा पद्धतीने म्हणजे समाजातील उत्पादनाच्या व्यवस्थेला आवश्यक त्या प्रकारची आणि तितकी माणसे तयार करणे हे कुटुंबव्यवस्थेचे उद्दिष्ट असते.

**स्त्रीची दुय्यम भूमिकेकडे ढकलणूक**

पूर्वपाषण युगामध्ये सुरुवातीच्या काळाततरी लैंगिक संबंधावर कोणतीच बंधने नसावीत. पण हळूहळू वयोमानाप्रमाणे गट तयार होणे साहजिकच होते. त्याबरोबर, अगदी सहोदरांचे म्हणजे एकाच आईपोटी जन्मलेल्या भावा-बहिणींचे संबंध आणि त्यानंतर जवळपासच्या रक्ताच्या नातेवाईकांशी संबंध हे निकृष्ट, अवांछनीय, निंद्य मानले गेले आणि त्यांचा संततीवरचा दुष्परिणाम पाहता सर्वच समाजातून ते नष्ट झाले.

स्वैर संबंधाची जागा आता समूहविवाहाने घेतली. म्हणजे, रक्ताच्या नात्याच्या पुरुषांचा एक गटच्या गट, रक्ताच्या नात्याच्या स्त्रियांच्या एका गटाशी संबंध ठेवू लागला. अशा गटाला कुल म्हणत. काही कुलांच्या ज्ञाती आणि ज्ञातींचे गण बनत. पण दिवसेंदिवस निरोगी अपत्य संभवाकरिता योग्य गोत्रीय जोडीदार मिळणे दुरापास्त होऊ लागल्यावर गटांचे संबंध दुर्मिळ होऊ लागले आणि एकएकट्या स्त्री-पुरुषांच्या मिथुनकुटुंबांना सुरुवात झाली.

पूर्वपाषाण युगात आणि नवपाषाणयुगात, निदान गरजेपेक्षा जास्त वरकड उत्पादन हाती येईपर्यंत स्त्रियांची अवस्था काय होती याबद्दलही काही मतभेद



आहेत. स्त्रीवाद्यांतील एक गट याही काळात स्त्रीची पराधीनता अपरिहार्य होती असे मानतो. मार्क्सवाद्यांतील एक गट या काळात स्त्रियांचे प्राधान्य असलेली कुटुंबपद्धती किंवा मातृअधिकार अस्तित्वात होता असे मानतात तर काही जण त्यापलीकडे जाऊन त्या काळात स्त्री-सत्ताक समाज होते आणि पुरुषांची अवस्था दुय्यम दर्जाची होती असे मानतात. मार्क्सवाद्यांतील दोन्ही गटांच्या मताप्रमाणे मिथुनकुटुंबात स्त्रीचे वर्चस्व चालू राहिले. पुरुषांचे काम - शिकार करणे, जनावरे पाळणे आणि शेती पिकवणे हे - दुय्यम समजले जाई. मुलांना जन्म देणे, जोपासना करणे आणि आणलेल्या अन्नाची वाटणी व वासलात लावणे ही स्त्रियांची कामे जास्त महत्त्वाची समजली जात. पण हळूहळू मांस, दूध-दुभते आणि अन्नधान्ये यांची मुबलकता तयार होऊ लागली, आवश्यकतेपेक्षा अधिक होऊ लागली तसतसे निर्वाहसाधनांची वरकड हाती आल्यामुळे वस्त्रे, निवारा, अवजारे आणि त्याहूनही महत्त्वाचे, हत्यारे यांचे उत्पादन करण्यास आवश्यक ती सवड आणि श्रमशक्ती मिळू लागली. या भांडवली वस्तू खाऊन, वापरून संपत नाहीत; दीर्घकाळ चालतात. त्या निर्माण करणारा मरून गेला तरी मागे उरतात. साहजिकच, त्यांची मालकी हा एक महत्त्वाचा प्रश्न बनतो. आपण तयार केलेली साधने आपल्या हाती राहावीत, एवढेच नव्हे तर आपल्यानंतर ती आपल्या खऱ्याखुऱ्या, रक्ताच्या वारसाकडे जावीत, भलत्यासलत्या लुंग्या-सुंग्याच्या हाती ती लागू नयेत अशा प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू झाली आणि वारस मुलाच्या पितृत्वाची बिनधास्त खात्री ठेवता यावी यासाठी पुरुषांनी स्त्रियांवर बंधने लादायला सुरुवात केली. हळूहळू मातृसत्ता, मातृअधिकार, मातृप्राधान्य आणि मातृवंशकता संपुष्टात येत पितृवंशकता, , पितृप्राधान्य, पितृअधिकार आणि पितृसत्ता अशी व्यवस्था टप्प्याटप्प्यांनी प्रस्थापित झाली.

स्त्रीवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे सुरुवातीपासून जीवशास्त्रीय कारणांमुळेच पुरुषसत्ता प्रस्थापित झाली. बळजोरीने, घरगुती व शैक्षणिक संस्काराने आणि ''फितुर'' वयस्कर स्त्रियांच्या मदतीने पुरुषांनी सत्ता टिकवून धरली हे किमानपक्षी संभाव्य तरी वाटते; स्त्री-पुरुषांत अशा तऱ्हेची विद्वेषभावना असावी हे गृहीततत्त्व मुळातच विकृत आहे ही गोष्ट अलाहिदा. पण, स्त्री-पुरुषांत नैसर्गिक वितुष्ट आहे हे जर मान्य केले तर जहाल स्त्रीवाद्यांची सैद्धांतिक बैठक निदान व्यावहारिक शक्यतेच्या कसोटीला उतरते.

## ६. शेतकरी संघटनेची स्त्रीप्रश्नाची मांडणी

खासगी मालमत्तेच्या वारसाबद्दलच्या पुरुषी चिंतेने गुलामगिरी निर्माण झाली ही मार्क्सवादी कल्पना अगदी बाळबोध तर्कालाही न पटणारी आहे. अतिरिक्त निर्मितीचे शोषण हे जवळपास शिस्तशीरपणे, शांततेने झाले; या शोषणाचे स्वरूप औद्योगिक क्रांतीनंतर बदलून त्याला श्रमशक्तीच्या शोषणाचे रूप आले आहे या मार्क्सवादी कल्पनेला इतिहासात आधार नाही. श्रमशक्तीची उत्पादकता, श्रमशक्तीच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या क्रयवस्तूंचे मूल्य असल्या कीर्दखतावणींच्या खेळींनी भांडवलनिर्मिती इतिहासात घडलीच नाही. वरकड उत्पादन जन्माला आले ते शस्त्रास्त्रांना बरोबर घेऊनच. औद्योगिक क्रांतीच्या व्यवस्थांमुळे काहीसा बदल येईपर्यंत या वरकड उत्पादनांच्या नियंत्रणासाठी जगभर नासधूस, बलात्कार, जाळपोळ, रक्तपात यांचा एकच हलकल्लोळ उडून गेला. मध्ययुगातील सर्व राष्ट्रांचे इतिहास या हलकल्लोळीने भरले. या हलकल्लोळीत जगूनवाचून टिकण्याकरिता सर्व स्थिर समाजांना आपापल्या व्यवस्था बदलून टाकाव्या लागल्या. या उत्पातांचा अर्थ समजल्याखेरीज स्त्रियांच्या प्रश्नाचे मूळ समजणे शक्य नाही.

स्त्रीवाद्यातील जहालांचा जीवशास्त्रीय वस्तुवाद निर्णायक ठरला असेल हे तर्कसुसंगत नाही. उत्क्रांत मनुष्यप्राण्यात जन्मजात शारीरिकतेपेक्षा जन्मानंतर कमावलेल्या गुणांचेच प्राबल्य असते. जन्मतः स्त्री दुर्बल नाही हे आता जीवशास्त्राने स्पष्ट केले आहे. पण ती तशी असती तरीसुद्धा तेवढ्याच कारणाने ती अनंतकालपर्यंत दुय्यम दर्जाची राहिली नसती. मार्क्सवादी वस्तुवाद इतिहासाचा अर्थ समजण्यासाठी आजही अधिक उपयुक्त आहे. पण मार्क्सवादी तत्त्वज्ञान रास्त असले तरी मार्क्सवादी जीवशास्त्र चुकीचे सिद्ध झाले आहे आणि अर्थशास्त्र इतिहासाच्या कसोटीला उतरलेले नाही.

शेतकरी संघटनेच्या विचारपद्धतीची विशेषता ही की मार्क्सवादाचे निष्कर्ष चुकीचे आहेत असे दिसून आल्यानंतर स्त्रीवाद्यांतील जहालांप्रमाणे गडबडून जाऊन संघटनेने मार्क्सवादातील ग्राह्य भागाचाही त्याग केला नाही. वस्तुवाद मान्य करून संसिद्ध जीवशास्त्र आणि इतिहासात दिसून आलेल्या अतिरिक्त उत्पादनाच्या शोषणाच्या पद्धती यांच्या आधारे एक व्यापक आणि सुसंगत स्पष्टीकरण पुढे ठेवले.

स्त्री जन्मतः श्रेष्ठ, कनिष्ठ नाही. काही प्रमाणात मितिज्ञान, प्रतिभा आणि हिंसकता यात काय फरक असेल तेवढाच. इतिहासात वेगवेगळ्या समाजांत स्त्री-पुरुषांची श्रमविभागणी वेगवेगळ्या प्रकारे झालेली आढळते. मानव-समाजातील स्त्रियांच्या प्रश्नाचे मूळ आर्थिक घडामोडीतच असले पाहिजे



आणि परिणामतः स्त्रियांवरील या अन्यायाच्या अंधाराचा शेवट अपरिहार्यपणे झालाच पाहिजे.

ही संघटनेच्या विचाराची शास्त्रशुद्ध मांडणी आहे.

प्राग्मानवसमाजशास्त्राने सांगितलेल्या पहिल्या कालखंडात मानवसमाजांची अर्थ आणि कामव्यवस्था नेमकी कशी राहिली असेल याबद्दलचे पांडित्यपूर्ण वादविवाद स्त्री-प्रश्नाच्या चर्चेसाठी अनावश्यक आहेत. शास्त्राच्या आजच्या अवस्थेत असे वादविवाद निर्णायक ठरण्याची काहीही शक्यता नाही.

वरकड उत्पादन ही प्रचंड क्रांतिकारी घटना होती. पृथ्वीवरील सर्व प्राण्यांत गरजेपलीकडचे उत्पादन करणारा मनुष्य हा पहिला प्राणी झाला. या उत्पादनामुळेच त्याच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावू लागल्या आणि निसर्गाच्या दास्यातून मनुष्यप्राणी पहिल्यांदा सुटका करून घेऊ लागला. पशुपालन आणि शेती यातून तयार झालेले पहिले वरकड उत्पादन आपल्या पश्चात कोणाकडे जाईल याची चिंता करायला त्या काळच्या समाजाला फारसा वेळ मिळाला असण्याची शक्यता नाही. वरकड उत्पादनाच्या आधाराने काहींनी नांगर, औते, औजारे बनवली आणि उत्पादन आणखी वाढविण्याची कास धरली.

**लुटीच्या अनेक तऱ्हा**

शिकारीसाठी आणि पशुपालनासाठी तयार केलेली आणि परजलेली हत्यारे माणसांविरुद्धही वापरता येतात हे काही त्याला माहीत नव्हते असे नाही. त्या वेळेपर्यंत मनाला आवडलेली एखादी स्त्री मिळवण्याकरिता शस्त्रांचा त्याने तसा वापरही केला होता. पण त्या शस्त्रांच्या साहाय्याने आता साधनसंपत्ती हस्तगत करण्याची नवीनच शक्यता तयार झाली. नांगर, बैल लावून शेतीतून जास्त उत्पादन काढण्यापेक्षा हा मार्ग अधिक सोपा आणि किफायतीशीर. लुटालूट ही वरकड उत्पादनाची जवळजवळ जुळी बहीणच. शेतीत पिकलेल्या अन्नधान्याची लूट सुरुवातीस काही भुरट्या चोरलुटारूंनी केली असेल. नंतर हे काम दरोडेखोरांच्या टोळ्यांनी केले. काही काळानंतर या टोळ्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि राजकीय सत्तेची स्थापना झाली. राजकीय व्यवस्थेची सुरुवात सज्जनपणे पशुपालनाने व शेती करणाऱ्या मानवांनी केली नाही. राजकारण हे पहिल्यापासूनच दुसऱ्यांच्या श्रमावर मौज मारू इच्छिणाऱ्या ऐतखाऊंचे कुरण होते.

लहान लहान टोळ्यांत प्रदेशाच्या विभागणीसाठी लढाया होत. त्यात कोणीही जिंको कोणीही हरो, शेतकऱ्यांची लुटालूट होतच असे. यातूनच राज्ये, साम्राज्ये उभी राहिली. युद्धकैद्यांची गुलामगिरी, वेठबिगारी, जातिव्यवस्था, महसूल या

मार्गांनी वरकड उत्पादनाचे शोषण होतच राहिले. व्यापारी आणि औद्योगिक क्रांतीनंतर सावकारी, जमीनदारी आणि अपुरे भाव ही शोषणाची नवीन हत्यारे तयार झाली.

वरकड उत्पादनाच्या पहिल्या कालखंडात सगळीकडे एकच धुमाकूळ सुरू झाला. पावसाळा संपला की लुटारू बाहेर पडायचे. ते पुन्हा शेतीचा हंगाम चालू होईपर्यंत कार्यक्रम लढायांचा आणि लूटमारीचा. हिंदुस्थानसारख्या देशात तर बाहेरून येणाऱ्या आक्रमकांची त्यात भर. या लढायांमध्ये पुरुष माणसे अतोनात मारली जायची. त्यामुळे स्वाऱ्यांचा हेतू वरकड उत्पादन लुटण्यापुरताच मर्यादित न राहता लोकसंख्यावाढीच्या दृष्टीने स्त्रियांचे अपहरण हाही झाला. असुरक्षिततेचे आणि हिंसाचाराचे वातावरण आणि स्त्रियांची अशा परिस्थितीत निवाऱ्याची आणि संरक्षणाची गरज ही एकच गोष्ट कुटुंब आणि समाजव्यवस्थेत बदल घडवून आणायला पुरेशी होती. नटेश्वर प्रकृतीचे विभाजन आणि ध्रुवीकरण मध्ययुगातील गदारोळात अपरिहार्य होते.

पुरुषांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होत असल्याने समाजातील पुरुषांचे प्रमाण सांभाळणे हा सुसंस्कृत समाजाच्या चिंतेचा विषय झाला. प्रत्येक घर हल्ल्याच्या प्रतिकारासाठी सज्ज तटबंदीसारखे दिसू लागले. स्त्रियांना अधिकाधिक सुरक्षित जागी दडवण्याचे प्रयत्न झाले असले पाहिजेत. परिणामतः, जितकी संपन्नता अधिक तितकी त्या कुटुंबातील स्त्रियांची गुलामगिरी अधिक. ज्यांच्याकडे लुटण्यासारखे काही नव्हते आणि ज्यांच्या स्त्रिया काबाडकष्टात रुतलेल्या होत्या त्यांना या संरक्षणाची गरजही कमी आणि शक्यताही कमी. जास्तीत जास्त मुलगे जन्मावेत, त्यांना बालपणापासून संरक्षणाच्या आणि आक्रमणाच्या कामासाठी मनाने व शरीराने तयार करावे ही समाजाची प्राथमिक गरज बनली. त्यासाठी जी काही झीज सोसायची ती साहजिकच स्त्रियांच्या माथी आली. जगून, वाचून राहणे हेच उद्दिष्ट झालेल्या समाजात स्त्रियांची हालचाल, शिक्षण, स्वातंत्र्य व सुख यांची चिंता पुरुषांनी केली नाही आणि भीतीने भारलेल्या त्या काळात स्त्रियाही सर्व काही सोसून या संरक्षणप्रयत्नांच्या मागे उभ्या राहिल्या.

ज्या समाजांचा एकामागोमाग एक सतत पराभवच होत गेला त्यातील स्त्रियांची त्या प्रमाणात पीछेहाट झाली. पुरुष गेल्यावर संरक्षक नावालाही नाही अश्या परिस्थितीत सतीसारख्या अमानुष प्रथेलाही समर्थन आणि प्रतिष्ठा मिळू शकली.

मध्ययुगातील लढायांत हरो, जिंको कोणीही, शेतकरी लुटलाच गेला.



तसेच हरले, जिंकले कोणीही, तरी स्त्रियांची सदैव पीछेहाटच झाली. जेती समाजातील पुरुषांना काही लाभ मिळाला असेल आणि त्या अनुषंगाने स्त्रियांच्या अंगावर काय लुटीतले अलंकार आणि वस्त्रे चढली असतील ती असोत, जेते राष्ट्रेही असुरक्षिततेच्या वातावरणाचे बळी झाली. जेत्या राष्ट्रांतही पुरुषांचे प्रमाण कमीच झाले. जेते आणि जित दोन्हीपक्षी हिंसाचाराला तोंड देण्याची तयारी एकाच पद्धतीची. त्यामुळे दोन्ही समाजांतील स्त्रियांचा प्रत्येक लढाईत पराभवच होत गेला.

### स्त्रियांचा प्रश्न

वरकड उत्पादनाच्या सुरुवातीपासूनच मनुष्यसंस्कृतीला ग्रहण लागल्यासारखे झाले. पशुंनासुद्धा लाजवतील अशा तऱ्हेच्या लक्षावधी क्रूर कथांनी आणि शेकडो स्त्रियांच्या अश्रूंनी हा काळ भरलेला आहे. यथावकाश लुटारूही राज्ये, साम्राज्ये स्थापून स्थिर झाले. वरकड उत्पादनाच्या उपलब्धीमुळे आणखी एका चमत्काराला सुरुवात झाली. शास्त्र आणि विज्ञान यांच्या प्रगतीमुळे तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास होऊ लागला. पहिल्या औद्योगिकीकरणापेक्षा दुसऱ्या औद्योगिकीकरणाचे तंत्रज्ञान वेगळे आणि तिसऱ्या पिढीतील त्याहून वरचे अशा झपाट्याने तंत्रज्ञानाची प्रगती होऊ लागली. एका काळी मँचेस्टरच्या कापडगिरण्यांना संरक्षण मिळावे म्हणून विणकारांचे अंगठे क्रूरतेने कापणारे आता कापड तयार करण्याबद्दल उदासीन झाले. त्यापेक्षा कापड बनविण्याची यंत्रे तयार करणे त्यांना जास्त आकर्षक वाटू लागले. आता त्यांना गरज होती, कापड विकत घेणाऱ्यांची नव्हे तर कापड तयार करणारी यंत्रे विकत घेणाऱ्यांची. जुन्या वसाहतवादाची उपयुक्तता संपली. त्यामुळे गोऱ्या वसाहतवादाचा अंत झाला. प्रत्येक वसाहतीतील साम्राज्याच्या काळात परकीयांशी सहकार्य करणाऱ्या मंडळींच्या हाती सत्ता जाऊन देशोदेशी स्वातंत्र्याचे नवे झेंडे लागले आणि काळ्या वसाहतवादाची सुरुवात झाली. नव्या सत्ताधाऱ्यांनी राष्ट्रीय नियोजन, समाजवाद, आर्थिक विकास, 'गरिबी हटाव', शास्त्र आणि विज्ञान, एकविसावे शतक अशा फसव्या नावांखाली परदेशातील नवी यंत्रसामग्री आणि वरकड उत्पादन यांची खरेदी पूर्वीपेक्षाही मोठ्या प्रमाणावर सुरू केली. मँचेस्टरची धन चालूच राहिली वर मुंबईकलकत्त्याची भर पडली. शेतीतील वरकड उत्पादनाची लूट करणारे आता लुटल्या जाणाऱ्यांच्याच रंग रूपाचे आहेत एवढाच काय तो फरक. जित आणि जेते यांचे स्वरूप आता 'भारत' आणि 'इंडिया' असे झाले.

**असुरक्षिततेचे जनक फक्त बदलले**

इंग्रजांच्या आमदानीपासूनच व्यावसायिक ठग, दरोडेखोर आणि लुटारू यांचा मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त झाला होता. त्याआधी राजकीय वर्चस्व गाजविलेले मुसलमान गावात काय आणि शहरात काय, वस्तीमोहल्ल्यात कसाबसा जीव तगवून राहत होते. तेराव्या शतकापासूनच हिंसाचाराचे थैमान घालणारे दोन्ही घटक आता थंड झाले आणि त्याबरोबर १३व्या शतकापर्यंत ज्यांनी शेतकऱ्यांना लुटण्याचा व्यवसाय केला होता त्यांच्या हातीच पुन्हा एकदा आर्थिकच नव्हे तर राजकीय सत्ताही आली. शासकीय प्रकल्पांच्या व सहकाराच्या साम्राज्यातून गावोगाव गुंडगिरीच तयार झाली. आर्थिक प्रगती आणि स्त्रियांची मुक्ती यांचा संबंध किती किरकोळ आहे हे कोणत्याही साखर कारखान्याच्या परिसरात पाहायला मिळेल. कारखाना झाला, नव्या डांबरी सडका आल्या, ट्रॅक्टर दिसू लागले, मळे हिरवेगार दिसू लागले, कर्जबाजारीपणा वाढला तरी, उचलीचे का होई ना, चार पैसे हातात खेळू लागले, तरीही या भागात स्त्रियांच्या परिस्थितीत पडलेला फरक अगदी अत्यल्प. कारण वातावरणातील असुरक्षितता कायम राहिली, तिचे जनक फक्त बदलले!

शेतीच्या जीवावर पोसलेल्या इंडिया समाजातसुद्धा हीच परिस्थिती. उंच उंच मजल्यांच्या इमारती चढल्या. काही निवडक लोकांच्या हाती अगदी पाश्चिमात्य देशांतील अद्ययावत उपभोगाची साधने खेळू लागली. स्त्रिया मोठ्या प्रमाणावर घराबाहेरील कामही करू लागल्या आणि तरीही स्त्रीच्या दर्जामध्ये कोठे फरक पडतो आहे असे दिसले नाही.

शहरांच्या वाढीबरोबरच उद्ध्वस्त झालेल्या खेड्यांतून लक्षावधी निर्वासितांचे लोंढे शहरांकडे जात आहेत. मोठ्या शहरांत झोपडपट्ट्यांत व फूटपाथवर राहणाऱ्यांची संख्या निम्म्याहून अधिक झाली. शेतीच्या भोवऱ्यात सापडलेली ही मंडळी खाली खेचली जात असताना इतक्या कठीण अनुभवातून जाऊन एक दिवस गावातील घरदार, चीजवस्तू फुंकून शहरात दाखल झाली. त्यातील बहुसंख्यांचा आता कोणत्याही संस्कृतीशी संबंध राहिलेला नाही. शहरातील अठरापगड जमातींच्या गलिच्छ वस्त्यांमध्ये काही काळ जीव घुसमटला तरी दिवसातून निदान एकदा पोट भरण्याची शाश्वती असण्याचे समाधान काही थोडे नसते. आपण कोठे होतो, कोण होतो, कोठे आलो, काय करतो आहोत हा विचार अशक्य झाला आहे. हातभट्टी, मटका, गुंडगिरी, गुन्हेगारी, तस्करी येथून ते इमारत बांधणी आणि आयातनिर्यातीचा व्यवसाय इथपर्यंत काळ्या व्यवसायांची साम्राज्ये चालविणाऱ्यांची दादागिरी शहरांत प्रस्थापित झाली. अमेरिकेतल्या अनेक शहरांत अंधार झाला म्हणजे बाहेर पडण्याची कोणाची



छातीसुद्धा होत नाही. घराच्या दरवाजाला आतून चार चार कड्या लावून माणसं स्वत:ला बंद करून घेतात. इथल्या शहरांत ही अवस्था फारशी दूर नाही. मध्ययुगीन असुरक्षिततेचे वातावरण कायम राहिले, फक्त असुरक्षिततेचे जनक बदलले.

१९७५ सालानंतर या देशातील स्त्री-मुक्तीच्या प्रामुख्याने शहरी उद्गात्यांच्या दु:खाचे मूळ कारण हे आहे. सुसान ब्राऊन मिलरने मांडलेली कल्पना ''चार भिंतीच्या बाहेरच्या अत्याचारापेक्षा आतले अत्याचार स्त्री पत्करते'', इथे साकार झालेली दिसते. आर्थिक शोषणाच्या लढाईतील जेत्यांच्या घरच्या गुलामांचे हे दु:ख आहे. कागदोपत्री आणि कायद्यांच्या पुस्तकात काहीही तरतुदी मिळवल्या तरी असुरक्षिततेच्या वातावरणात स्त्री-मुक्ती हे मृगजवळच राहणार.

जेत्या इंडियातील स्त्रियांनी जसे आपल्या प्रश्नाकडे व्यापक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे तसेच जित भारतातील स्त्रियांनाही या प्रश्नाकडे केवळ आर्थिक शोषणाच्या दृष्टीतून पाहून चालणार नाही. वरकड उत्पादनाच्या निर्मितीपासून तयार झालेला हा जुना रोग आहे. त्याच्या आर्थिक आघाडीवर पुरुष मंडळी लढाईची जमवाजमव करत आहेत. त्याच वेळी भारतातील स्त्रियांना तिहेरी लढाई द्यावी लागणार आहे.

(१) शेतीत राबणाऱ्या कामकरी, कष्टकरी म्हणून त्या कष्टाचा मोबदला मिळविण्याचा लढा.

(२) स्त्री म्हणून सहन कराव्या लागणाऱ्या अनेक अन्यायांविरुद्धचा लढा.

(३) समाजातील असुरक्षितता दूर करून तंत्रज्ञान उघडून देत असलेल्या नवीन दालनात शांततेच्या काळातील स्त्रीच्या सर्वश्रेष्ठ अशा देणग्यांचा उपयोग करणे.

या तीनही आघाड्यांवर सर्व स्त्रियांची एकजूट होऊ शकते. शेतीचे शोषण कायमचे बंद करण्यात प्रत्येक स्त्रीला स्वारस्य आहे, अगदी त्या शोषणातून आर्थिक लाभ मिळणाऱ्या स्त्रियांनासुद्धा.

**''कामकरी स्त्रियांची आघाडी''**

उत्पादक श्रमात पूर्णपणे भाग घेत असताना त्याबरोबरच सगळ्या घरकामाचाही गाडा वाहायचा हे सुशिक्षित स्त्रियांचे आजकालचे दु:ख शेतकरी स्त्री पिढ्यान्‌पिढ्या वाहत असते. पंधरा, सोळा तास रोज काम. त्यात सुटी नाही, अगदी आजारपणातसुद्धा नाही. बाळंतपणाची सुटी नाही. लहान पोरसुद्धा पाठुंगळी बांधून नाहीतर झुडुपाच्या सावलीला झोपवून काम ओढलंच पाहिजे.

मजुरीवर असेल तर वेतन अपुरे. घरची शेती असेल तर फक्त नेसूची लुगडी आणि भाकरीवरच बोळवण. शेतीमालाच्या भावाच्या मागणीला स्त्रियांचा पाठिंबा राहीलच पण या मागणीत बाळंतपण, लहान मुलांना सांभाळायची सोय एवढेच नव्हे तर हातपाय चालेनासे झाल्यानंतर काही पोटापाण्याची तरतूद यांची सोय असली पाहिजे. या योजना नोकरशाहीच्या माध्यमातून येता कामा नयेत. नाहीतर सगळ्या सरकारी योजनांप्रमाणे शेतकऱ्यांच्या डोक्यावर त्यातून आणखी काही साहेबांचीच भर पडेल. स्वतंत्रपणे, कार्यक्षमपणे व व्यावसायिक पातळीवर या सेवा उपलब्ध होतील आणि त्या परवडतील अशी परिस्थिती तयार झाली पाहिजे.

शेतीवर बहुसंख्येने स्त्रियाच मजुरी करतात. प्रत्येक वर्षातून निदान निम्मे दिवस मजुरीची काहीच शक्यता नसते. रोजगार हमी योजनेच्या कामांवर बहुसंख्येने स्त्रिया जातात, मातीकाम करतात, दगड फोडतात. ही स्त्रीत्वाची कुचेष्टा आहे. ती थांबली पाहिजे. स्त्रीला तिच्या घराजवळ शेतात, तिच्या सवयीचे आणि मगदुराचे काम मिळाले पाहिजे. शेतीतून तयार होणाऱ्या भांडवलातून ग्रामीण भागात रोजगार निर्माण होण्याची स्वयंभू प्रक्रिया जोपर्यंत शासन अटकावून धरीत आहे तोपर्यंत शासनाला ही जबाबदारी घ्यायला लावणे भाग पाडले पाहिजे.

### ग्रामीण स्त्रियांची आघाडी

स्त्रीचे आर्थिक स्थान काहीही असो, ती कुटुंबाचे ओझे बनली आहे. मुलाला हुंडा द्यावा लागणाऱ्या समाजातही ती ओझे आहे आणि मुलीला हुंडा मिळत असला तरी मुलीचे स्थान तेच. मुलीच्या जन्मापासून घडोघडी आणि पदोपदी तिला मिळणाऱ्या सापत्न वागणुकीचे कारण समाजातील असुरक्षितता हे आहे. या काळात बाहेरच्या जगात मार खाणाऱ्या पुरुष मंडळींनी घरातल्या गुलामांवर काही कमी अन्याय लादलेले नाहीत. एकवेळ दहीवाटीतील तिचा वाटा तिला सहज मिळू लागेल, पण तिचे शिक्षण मध्येच बंद पडू नये यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागतील. माहेरच्या मालमत्तेतील स्त्रीचा हक्क प्रत्यक्षात आणणे अनेक कुटुंबांत अत्यंत कठीण होईल. जमिनीची वाटणी करत राहिल्याने तुकडेमोड वाढत जाईल आणि सासरी नांदणाऱ्या मुलीचा त्यात अर्थाअर्थी काही फायदाही होणार नाही. शेतकरी स्त्रीला माहेरच्या मालमत्तेत हक्क मिळावयास पाहिजे असेल तर शेतीतून वरकड उत्पन्नाची योग्य प्रमाणात निर्मिती आवश्यक आहे. स्वित्झर्लंडसारख्या देशात जमिनीची वाटणी करण्यांला बंदी आहे. पण शेतीत निर्माण होणाऱ्या वरकड उत्पन्नामुळे इतर मुलांना जमिनीच्या



तोलामोलाची दुसरी वाटणी शेतकरी बाप देऊ शकतो.

शेतकरी स्त्रीच्या मालमत्तेचा प्रश्न खरा गंभीर होतो तो सासरचा संसार नासल्यावर. विधवा स्त्रीस कायद्याने दिलेले हक्क क्वचितच पदरात पाडून घेता येतात. तिची रवानगी माहेरी झाली तर माहेरच्या मालमत्तेवरचा हक्क तिने आधीच सोडून दिलेला असतो आणि एरवीही तिला तो मिळण्यासारखा नसतो. स्वतंत्रपणे राहून मोलमजुरी करणे समाजात अशक्य. मग माहेरच्या आधाराने काढता येतील तितके दिवस काढायचे हा एकच पर्याय. काडीमोड कायद्याने दिल्याच्या गोष्टी विरळच. सासरहून काढून लावले म्हणजे काम भागते. कायदेशीर घटस्फोट मिळाला आणि पोटगीचा हुकूम झाला तरी महिन्यामहिन्याला पोटगी प्रत्यक्ष हातात पडणे दुरापास्तच. पोटगीसाठी महिन्या-महिन्याला खेटे घालताना त्या दादल्याची लाचारी नको, पोटगी नसली तरी चालेल असं शंभरदा मनात येऊन जातं. पण पोटाची लाचारी पर्याय ठेवत नाही. महिन्या-महिन्याला पोटगी देण्याची तरतूद ही नोकरमान्या पांढरपेशा समाजाची आहे. शेतकरी समाजाला योग्य अशा व्यवस्थेकरिता वेगळा लढा द्यावा लागेल. बापाच्या घरून जाताना मालमत्तेचा हिस्सा घेऊन सासरी जावे आणि लग्नाची भागीदारी जमली नाही आणि त्यातून बाहेर पडावे लागले तर त्या दिवशी सासरच्या असलेल्या मालमत्तेची वारसा-कायद्याप्रमाणे विभागणी व्हावी हे अगदी तर्कसंगत आणि आवश्यक आहे; बेजबाबदार काडीमोडांना निर्बंध घालण्यासाठी हे आवश्यक आहे.

पण, शेतकऱ्यांचा लढा शेतकरी संघटनेने जसा शेतीमालाच्या केंद्रस्थानाभोवती बांधलेला आहे तसा शेतकरी स्त्रियांचा लढा असुरक्षितता दूर करण्याभोवती बांधला गेला पाहिजे. एका स्त्रीवरचा हल्ला हा शेतकरी संघटनेच्या प्रत्येक स्त्रीवरचा हल्ला समजून त्याचा प्रतिकार झाला पाहिजे. यासाठी सरकारी यंत्रणा आणि पोलिस व्यवस्था सुधारण्याची वाट पाहणे व्यर्थ आहे. ही कुंपणे मोडत चालली आहेत आणि शेते खाण्याकरिताच त्यांची प्रसिद्धी जास्त. संघटनेचा बिल्ला लावणाऱ्या स्त्रीवर वाकडी नजर टाकण्याची कोणाची हिंमत होऊ नये असे वातावरण संघटनेला तयार करावे लागेल. कोणा गुंडाची हिंमत झाली तर त्याला शासन करण्याकरिता कायद्याने होणाऱ्या शिक्षेचा धोका पत्करूनही संघटनेचे पाईक तयार झाले पाहिजेत. स्त्री-स्वातंत्र्यासाठी लढ्याचे हत्यार सत्याग्रहच राहील. पण कायदेभंगाच्या साधनाला एक नवी विधायक दिशा द्यावी लागेल.

शेतकरी स्त्रीचा कामगार म्हणून लढा आणि स्त्री म्हणून लढा यशस्वी होणे

ही काळाची गरज आहे. पण हे घडवून आणण्यासाठी स्त्रिया जितक्या निर्धाराने उठतील आणि आघाडी बांधतील तितका त्यांचा विजय सहज सुलभ होणार आहे. कारण त्यांचे शत्रू समाजातील असुरक्षितता, भीती हे आहेत.

स्त्री-मुक्ती म्हणजेच भीतीवर मात. ही मात केल्यानंतरच विज्ञानतंत्रज्ञानाच्या नव्या युगात स्त्री स्वतःच्या अधिकाराने पाऊल टाकू शकेल.

**नवी पहाट**

शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने स्त्रियांच्या दास्याच्या मूळ कारणाविरुद्ध एका बाजूला आघाडी उघडली जात आहे. त्याच वेळी दुसऱ्या बाजूला एका नव्या तंत्रज्ञानाच्या युगाची पहाट होत आहे. पाशवी शक्तीच्या जोरावर चालणारी आर्थिक व्यवस्था आणि तंत्रज्ञान दोन्ही मागे पडत आहेत आणि नव्या युगाला लागणारे सर्व गुण, हजारो वर्षांच्या गुलामगिरीची किंमत मोजून, कमावलेली स्त्री पुढे येत आहे. ''इंडिया''तील स्त्रियांसमवेत आघाडी बांधून या नव्या युगाचे पाईक होण्याची संधी साधणे हे आजच्या महिला आघाडीचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट असेल.

*(प्रथम प्रकाशन : नोव्हेंबर १९८६)*

■■



दोन

# अमरावतीची आयुधे

**शेतकरी महिला आघाडी : विचार आणि दिशा**

चांदवड येथे नोव्हेंबर १९८६ मध्ये शेतकरी संघटनेने पहिले महिला अधिवेशन भरवले. शेतकरी महिला आघाडीची स्थापना चांदवड येथील अधिवेशनातच झाली. अमरावती येथील हे अधिवेशन शेतकरी महिला आघाडीने भरवलेले आहे. चांदवडच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष रामचंद्र बापू पाटील होते. अमरावतीच्या स्वागताध्यक्षा सौ. विमलकाकू पाटील आहेत.

चांदवड ते अमरावती हा प्रवास काही लहानगा नाही.

शेतीमालाला भाव मिळाल्यावर शेतकरी बाईचीही दुःखं संपतील काय या प्रश्नाचे उत्तर शोधण्याकरिता चांदवडला शेतकरी महिला जमल्या. गावातल्या पाणवठ्यावर जमून बायांनी एकमेकींना सुखदुःखाच्या गोष्टी सांगाव्या त्याप्रमाणे चांदवडच्या अधिवेशनात साऱ्या महाराष्ट्रातून बाया जमल्या. त्यांनी पुढे टाकलेला प्रश्न होता, ''आम्ही मरावं किती?'' चांदवडच्या अधिवेशनाचे प्रतीक होते शेतात राबणारी, पाठीला पोर बांधलेली, डोक्यावर पाटीचे ओझे वाहणारी, शेतात कष्टणारी स्त्री.

अमरावतीच्या अधिवेशनाचे प्रतीक आहे स्त्री-शक्तीचे प्रतीक दुर्गा. अमरावतीला ग्रामीण विभागातील स्त्रिया जमणार आहेत त्या केवळ दुःख मांडायला नाही, त्यावर तोडगा काढायला. शेतकऱ्यांच्या या स्वातंत्र्यवर्षात ग्रामीण स्त्री शेतकरी भावांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलनात भाग घेत आहे आणि त्याचबरोबर स्त्रियांच्या वेगळ्या अशा प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिताही ती सज्ज आहे.

चांदवडच्या अधिवेशनात बाया ''चांदवडची शिदोरी'' घेऊन आल्या होत्या. त्यांच्यातल्या थोड्या शिकल्यासावरल्या बायांनी काही ठराव तयार केले. एक जाहीरनामासुद्धा तयार केला. तेथे जमलेल्या, संख्येने दोन लाखांपेक्षा जास्त,

स्त्रियांनी एक शपथही घेतली. चांदवडला जमलेल्या स्त्रिया बहुसंख्य अशिक्षित पण त्यांनी मांडलेल्या ठरावांतील विचारांची स्पष्टता आणि दूरदृष्टी शहरातील बहिणींनाही अचंबा करायला लावणारी. ठराव झाले त्यांचा गोळाबेरीज अर्थ पुष्कळांना समजला, काहींना समजला नाही. बहुतेक ठरावांची अंमलबजावणी फारशी झाली नाही. पण याचा अर्थ चांदवडचे अधिवेशन निरर्थक झाले असा नाही. चांदवडच्या ठरावाने एक, भल्या लांबरुंद पायाचा, आराखडा दिला. पण त्या आराखड्यानुसार पाया खणायला, भरायला आणि वर कळसापर्यंत इमारत चढवायला जी साधनांची जोडणी आणि माणसांची जमवाजमव व्हायला पाहिजे तिचा कुठे पत्ताच नव्हता.

साधनांची जुळणी होईपर्यंत चांदवडचा आराखडा तयार केलाच कशाला हा प्रश्नही फारसा बरोबर नाही. आराखडाही मांडला नसता तर साधनांची जुळवाजुळवी करायला सुरुवातही करता आली नसती. चांदवडच्या अधिवेशनानंतर शेतकरी महिला आघाडी उभी राहिली. साधनांची जुळवाजुळव झाली. इमारतीच्या बांधकामाला आता लागायचे आहे. म्हणून अमरावतीचे हे दुसरे अधिवेशन भरवणे आवश्यक झाले. चांदवडने आराखडा दिला, अमरावती येथे प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

चांदवड येथे जमलेल्या महिलांनी कोणता विचार मांडला, कोणते प्रश्न उभे केले? थोडक्यात मांडायचे झाले तर तो विचार आणि प्रश्न खालीलप्रमाणे-

१) 'भीक नको, हवे घामाचे दाम' हे शेतकरी संघटनेचे ब्रीदवाक्य आहे. शेतीत घाम पडतो तो सगळ्यात जास्त शेतकरी बायकांचा. कारण शेतीतील आणि शेतीच्या संबंधातली बहुतेक कामे बायाच करतात. नांगरट आणि मशागतीसारखी अवजड मानली जाणारी कामे जास्त करून पुरुष करतात हे खरे, पण तेवढे सोडल्यास बहुतेक सर्व कामे स्त्रियांच्याच माथी बसतात. ज्या घामाला दाम मिळत नाही तो घाम शेतकरी पुरुषांपेक्षा शेतकरी बाईचा अधिक आहे. शेतकऱ्याच्या घामाचे दाम मागणारी संघटना ही मुख्यत: शेतकरी बायांचीच पाहिजे होती.

२) बाई घाम गाळून माल पिकविते, त्याला भाव मिळू नये असे धोरण शासन राबवते. जी तोटकी किंमत मिळते त्यावरही हात मारणारे अडते, व्यापारी, सावकार, बँका आणि डल्ला मारणारे पुढारी यांची एकच गर्दी. या सगळ्यांच्या लुटालुटीतून वाचून घरापर्यंत जे काही पोचेल त्यातलादेखील अगदी शेवटचा वाटा बाईच्या वाट्याला. भाकर कमी पडली तर तांब्याभर पाणी पिऊन तसेच झोपण्याची वेळ बाईवरच यायची. शेतीमालाचा पुरेपूर भाव



शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोचला तर घराच्या आततरी बाईला माणूस म्हणून वागवले जाईल काय?

३) बाई कष्टाला कुठेच कमी पडत नाही. सकाळपासून रात्रीपर्यंत राबते, घरकाम बघते, पोरांचे बघते, शेतातले बघते, पाणी वाहून आणते, सरपण गोळा करून आणते. पुरुष घडीघडीला तंबाखूसाठी तरी सावलीला बसतात. बाईचा कामाचा झपाटा चालूच असतो. पुरुषांना न जमणारी किती तरी कामे बायाच करतात. खास पुरुषांची मानली जाणारी कामेही वेळ पडली तर बाया करू शकतात आणि करतात. जोतिबा फुल्यांनी म्हटल्याप्रमाणे श्रेष्ठकनिष्ठ विचार करायचाच झाला तर स्त्री आणि पुरुष या उभयतांमध्ये जास्ती श्रेष्ठ स्त्रीच आहे. तरीही मग तिची अशी दैन्यावस्था का?

४) इंडिया भारताचे शोषण करतो असे शेतकरी संघटनेच्या विचारात मांडले; पण इंडियातल्या बायापण काही सुखी दिसत नाहीत. तेथील पुरुषांनी लुटून जमा केलेल्या ऐश्वर्याचा काहीसा झगमगाट त्यांच्याही अंगावर दिसत असेल. पण दरवेशाने आपल्या माकडाच्या अंगावर घातलेले मखमलीचे जाकीट दरवेशाचे वैभव दाखवते, माकडाचे नाही. इंडियातील स्त्रीही दु:खी, भारतातील बाईही दु:खी. मग या दोघींतील नाते दोस्तीचे की दुश्मनीचे?

'चांदवडच्या शिदोरी'त या सगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न झाला. देवाने स्त्रीपुरुष वेगळे निर्माण केले, पण त्या वेगळेपणात श्रेष्ठ- कनिष्ठता नाही. बायकांनी चूलमूल सांभाळावी व पुरुषांनी घराबाहेरील कामे करावीत ही आज सर्वत्र दिसणारी पद्धत काही कोण्या परमेश्वराने घालून दिलेली नाही. अगदी स्त्रियांनी शिकारीचे, लढाईचे काम करावे आणि पुरुषांनी घरकाम सांभाळावे असेही समाज असू शकतात; एवढेच नव्हे तर इतिहासात प्रत्यक्ष होतेही. स्त्रीचे आजचे दुय्यम स्थान तिच्यावर लादलेले नाही, इतिहासाच्या एका विशिष्ट परिस्थितीत आपापले संसार टिकवण्याकरिता स्त्री-पुरुषांनी सोयीसोयीने तयार केलेली ही एक तात्पुरती व्यवस्था होती. ज्या परिस्थितीमुळे स्त्रियांना दुय्यम स्थान स्वीकारावे लागले ती परिस्थिती झपाट्याने नाहीशी होते आहे. आता दुय्यम स्थान मान्य करण्यात स्त्रीला काहीही स्वारस्य राहिले नाही. पुरुषप्रधान व्यवस्था चालत राहिली आहे ती परंपरेच्या ओघाने आणि पुष्कळशी बळजबरीने. स्त्रियांना आता माणूस म्हणून जगायचे आहे.

स्त्रीप्रश्नावरची आजवर मांडलेली सर्व मते आणि मांडण्या चांदवडला जमलेल्या बायांनी खोडून टाकल्या. मार्क्सवादी आणि स्त्रीमुक्तिवादी या दोघांचेही विचार बाजूस ठेवून साधी सोपी आणि सरळ, पण मनाला पटणारी अशी

स्वच्छ मांडणी त्यांनी केली. स्त्रियांच्या प्रश्नाचा उगम काय याबद्दलच त्यांनी वेगळे मत मांडले असे नाही तर स्त्री काय शोधते आहे याबद्दलच्याही आजपर्यंतच्या मांडलेल्या सर्व कल्पना त्यांनी रद्द ठरवल्या.

**स्त्रीप्रश्नाची उकल**

स्त्रीप्रश्नाचा उगम काय याबद्दलच्या आजपर्यंतच्या मूलभूत कल्पनांनाच त्यांनी धक्का दिला.

स्त्रीपुरुषात जीवशास्त्रीय श्रेष्ठ-कनिष्ठता नाही, त्यांच्यात श्रमविभागणी विविध प्रकारांनी होऊ शकते, स्त्री विरुद्ध पुरुष असा काही वर्गसंघर्ष नाही व मालमत्तेच्या मालकीसाठी झालेले हे भांडण नाही आणि केवळ जुलूम जबरदस्तीने व्यवस्था टिकून राहत नाही, टिकून राहण्यासाठी सर्व संबंधितांची काही परस्पर सोय असते हे मानले म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नाची एक अगदी नवी उकल करणे जरुरीचे होते.

'चांदवडच्या शिदोरी'त स्त्रीप्रश्नाच्या आदिकारणाविषयी मांडलेला तर्क थोडक्यात असा आहे-

शेतीमध्ये पहिली बचत झाली तेव्हापासून लुटालुटीच्या एका कालखंडाला सुरुवात झाली. उत्पादकांपेक्षा लुटारूंचाच धंदा किफायतशीर ठरला. तेव्हापासून लुटारूंच्या व्यवसायात मोठी उत्क्रांती होत गेली. एका काळचे चोरलुटारू हळूहळू सरदारसुभेदार बनले; कधी दूरवरच्या प्रांतातून, देशांतून सुलतान आले. शेतीत होणाऱ्या गुणाकारावर ताबा मिळविण्याकरिता लढायांचे एक पर्व सुरू झाले. उत्पादकांच्या श्रमावर लुटारूंनी जगण्याचे हे पर्व.

पहिली बचत तयार झाल्यानंतर जो समाज तयार झाला तो या बचतीतून तयार झालेल्या मालमत्तेचा वारसा कोणाकडे जाईल याची चिंता करणारा नव्हता, तर प्रामुख्याने या नव्या भयाण कालखंडात जगून वाचून कसे राहायचे याची चिंता करणारा होता. मनुष्य ज्याप्रमाणे गाईम्हशींच्या गोठ्यावर जगतो त्याप्रमाणे लुटारू शेतकरी समाजाच्या जीवावर जगू लागले. शेतीतील धनधान्य काढून न्यावे, गुरेढोरे, घोडे ताब्यात घ्यावेत; श्रमशक्ती वाढविण्याकरिता स्त्रियांनाही उचलून न्यावे असा एकच हैदोस सुरू झाला. शेतकरी समाजात तशी निरुपयोगी गोष्ट एकच आणि ती म्हणजे पुरुष. गाई-म्हशींच्या गोठ्यात जश्या कालवडी राखल्या जातात, गोऱ्हे-रेडे निरुपयोगी म्हणून काढून टाकले जातात त्याप्रमाणे गावावर धाड पडली की पुरुषांची सरसहा कत्तल होत असे. स्वसंरक्षणासाठी हाती हत्यार घेऊन लढाई करण्याचे काम पुरुषांकडे या कारणाने आले. अश्या परिस्थितीमध्ये एक नवीन समाजव्यवस्था तयार झाली. या व्यवस्थेत



लढाई करू शकणाऱ्या पुरुषांची उत्पत्ती जास्तीत जास्त व्हावी हे प्रमुख उद्दिष्ट बनले. पुरुषांची संख्या वाढावी, त्यांच्यातील लढाऊ गुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच स्त्रियांनीही युद्धकाळात तटस्थ राहू नये, पुरुषांच्या बरोबरीने समाजाच्या संरक्षणासाठी निष्ठा ठेवावी अशी रचना तयार झाली. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे आणि गुलामगिरीचे हे उगमस्थान आहे.

लुटारूदरोडेखोरांची जागा राजामहाराजांनी घेतली. त्यांच्या जागी जमीनदार, सावकार आले. त्यांचीही जागा काही काळाने व्यापारीकारखानदारांनी घेतली. लुटीच्या पद्धती बदलत गेल्या. लुटीची व्यवस्था कायमच राहिली. आज लूट होते ती हत्यारांचा किमान वापर करत, पण गावांत गुंडांचे आणि शहरांत दादांचे राज्य चालूच आहे. घराबाहेरची असुरक्षितता ही आजही स्त्रीच्या मार्गातील सगळ्यात मोठी अडचण आहे. बाहेरच्या अत्याचारापेक्षा घरचा अत्याचार परवडला या जाणिवेने स्त्री घरातले आणि समाजातले दुय्यमत्व चालवून घेते एवढेच नाही, गोडही मानून घेते.

लुटालुटीच्या व्यवस्थेने समाज व कुटुंबजीवन दूध फाटल्यासारखे झाले आहे. स्त्री आणि पुरुष यांना दोघांनाही ममता, प्रेम, ऋजुता, सौंदर्य, बुद्धी, कर्तबगारी, धाडस, शौर्य या सर्व गुणांचा समुच्चय कमीअधिक प्रमाणात मिळाला आहे. लुटीच्या व्यवस्थेत या गुणांची विभागणी झाली आणि ममता, प्रेम, ऋजुता, सौंदर्य इत्यादि गुणांचे अतिशयोक्त रूप स्त्रीवर लादण्यात आले; तर कर्तबगारी, शौर्य, क्रौर्य इत्यादि गुणांचे राक्षसी विडंबन पुरुषांवर लादण्यात आले. स्त्रीची गुलामगिरी ही पुरुषांनाही बाधक आहे.

स्त्रियांवर दुर्दैव कोसळले ते केवळ जित आणि पराभूत समाजातच नव्हे, जेत्यांच्या टोळ्यांतल्या स्त्रियांचीही गत यापेक्षा काही वेगळी झाली नाही. हल्लाखोर जेत्यांनाही त्यांच्या समाजाची रचना युद्धपातळीवरच करावी लागली म्हणजे पर्यायाने स्त्रीवर दुय्यमत्व आलेच. स्त्रियांची परिस्थिति जेत्या समाजात वाईट असायचे आणखी एक कारण होते. लुटून आणलेल्या मालमत्तेची मालकी वारसाहक्काने कोणाकडे जायची या चिंतेतून जेत्या समाजात स्त्रियांवर विशेष कडक बंधने लादली गेली. स्त्रियांच्या जागतिक ऐतिहासिक पराभवाच्या एंगल्सच्या मीमांसेला जेत्या समाजात काहीसे स्थान आहे. लुटीच्या व्यवस्थेने समाज नासला. त्या वेळी तयार झालेली आपत्कालीन समाजव्यवस्था चिरस्थायी झाली. त्यातून स्त्रीकडे विकृत मृदुतेची भूमिका आली तर पुरुषांकडे विपरीत विक्राळ क्रौर्याची. लुटीत कोणी जिंकले, कोणी हरले, प्रत्येक लढाईत पराभव झाला तो दोन्हीकडच्या स्त्रियांचा.

स्त्रीप्रश्नाच्या विश्लेषणातील दोष काहीही असोत, हा स्त्रियांचा प्रश्न शेवटी सुटणार तरी कसा आणि कधी? याबद्दल तसे मार्क्सवादी किंवा स्त्री-मुक्तिवादी काही आशा दाखवतात काय? याबाबतही सगळी ओरडच आहे.

स्त्रीवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे मनुष्य-वंशाच्या सुरुवातीपासूनच पुरुष शिकारी भक्षकाच्या भूमिकेत राहिला असेल तर तो काळाच्या अंतापर्यंत तशाच भूमिकेत राहील व स्त्री ही सदासर्वकाळ भरडलीच जाईल असा निष्कर्ष अपरिहार्यपणे निघतो. ज्या गोष्टीला सुरुवात नाही त्याला अंत नाही. स्त्री सुरुवातीपासूनच गुलाम राहिली असेल तर ती अखेरपर्यंत गुलामच राहील असा भयानक निष्कर्ष निघतो.

मार्क्सवादाने वर्गविहीन समाजात घरकामाचे सार्वजनिकीकरण झाल्यानंतर स्त्रियांची मुक्तता होईल अशी आशा दाखविली. रशियन क्रांतीनंतर गेल्या ७५ वर्षांत तेथील स्त्रियांची स्थिती काही विशेष स्पृहणीय राहिली असे नव्हे आणि आता तर रशियन सत्ताधारीही सार्वजनिकीकरणाची कल्पना फेकून देण्याच्या मार्गावर आहेत. रशियातील नवीन उदारमतवादाचा व्यापक अर्थ काहीही असो, समाजसत्तावादातून स्त्रियांच्या प्रश्नाची सोडवणूक होत नाही एवढे त्यातून सिद्ध होते हे नक्की.

लुटालुटीच्या व्यवस्थेतून सगळ्या समाजात आणि कुटुंबातही कामाच्या वाटणीची एक ठोकळेबाज पद्धत तयार झाली. कोणी मुलगा म्हणून जन्मले की त्याने असेच वागले पाहिजे, कुणी मुलगी म्हणून जन्मली की तिच्या आयुष्याचा सगळा आराखडा आणि चौकटी पक्क्या बांधलेल्या. मुलांकरिता आणि मुलींकरता ठरवलेले आदर्श वेगळे, त्यांनी करायची कामे वेगळी. पुरुषांनी मृदुता दाखवणे हा हेटाळणीचा विषय तर स्त्रियांची कर्तबगारी हा देखील कुचेष्टेचाच विषय. स्त्रियांवर लादलेल्या दुर्बलतेमुळे त्यांच्यावरतर अन्याय झालाच पण त्याबरोबर अवास्तव व न झेपणाऱ्या कठोरतेचे सोंग घेणे भाग पडलेल्या पुरुषांवरही अन्याय झाला.

स्त्रीआंदोलनाचे उद्दिष्ट ही ठोकळेबाज श्रमविभागणी रद्द करून प्रत्येक व्यक्तीला, मग ती स्त्री असो वा पुरुष असो, तिच्या वैयक्तिक गुणधर्माप्रमाणे आयुष्याचा आराखडा ठरवण्याचे स्वातंत्र्य मिळावे हा होय.

**भविष्याची पहाट**

हजारो वर्षांच्या या गुलामगिरीचा अंत होणार तरी कसा? पहाट होण्याची काही शुभलक्षणे दिसत आहेत. ज्या लुटालुटीच्या व्यवस्थेने स्त्रियांवर दास्य लादले गेले त्या लुटालुटीच्या व्यवस्थेविरुद्ध शेतकरी आंदोलनाच्या झेंड्याखाली



एका बाजूला आघाडी उघडली जात आहे. शारीरिक ताकदीलाच मानणारे तंत्रज्ञान मागे पडून इलेक्ट्रॉनिक्सने स्नायूचे बळ आवश्यक नसणारे तंत्रज्ञान पुढे आणले आहे. विज्ञानात एका नव्या युगाची पहाट होत आहे. नवे पदार्थविज्ञान समजण्यासाठी पुरुषांना उपलब्ध असणाऱ्या मितिज्ञानापेक्षा स्त्रियांना सहजसुलभ प्रतिभा जास्त उपयोगाची आहे असे मांडले. हजारो वर्षांच्या गुलामगिरीच्या काळात स्त्रियांनी ऋजुता, सौम्यपणा, सोशिकता, नीटनेटकेपणा, टापटीप इत्यादि गुण अंगी बाणून घेतले आहेत. नवीन युगात हेच गुण पुरुषी दंडेलीपेक्षा अधिक उपयोगी ठरणार आहेत. शेतकऱ्यांच्या पहाटेबरोबरच स्त्रियांचाही उष:काल येणार आहे हे निश्चित. पण यासाठी प्रयत्न कोणत्या दिशेने व्हावयास पाहिजे? स्त्रियांचे युग येत आहे, येत आहे म्हणून स्वस्थ बसून राहण्याने काही साधेल हे कठीण व हातातोंडाशी आलेली संधी निघून जायची शक्यता जास्त. मग स्त्रियांचा कार्यक्रम हा कोणत्या पद्धतीने असावा?

**चांदवडनंतरच्या चर्चा**

चांदवडच्या अधिवेशनात हा विचार मांडला गेला आणि त्यावर लाखलाख स्त्रियांनी आपले शिक्कामोर्तब केले. 'आम्ही माणसे आहोत, माणसे म्हणून जगण्याचा आम्हाला हक्क आहे' असा घोष केला. एक निश्चित कार्यक्रम जाहीर केला. चांदवडच्या अधिवेशनात जमलेल्या स्त्रियांनी काही महत्त्वाचे ठराव मंजूर केले. रोजगार हमी योजना, स्त्रियांच्या रोजगारासाठी सोयी आणि मेहनताना, पिण्याच्या पाण्याची सोय आणि खेडेगावातील मुलींचे शिक्षण अशा विषयांवर नवीन दृष्टिकोन देणारे ठराव तर झालेच, पण त्यापलीकडे समान नागरी कायदा, स्त्रियांचे मालमत्ता, हुंडा, पोटगी इत्यादि प्रश्न, स्त्रियांवरील अत्याचार आणि स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी सार्वजनिक सत्तास्थानांवर ताबा मिळवणे अशाही विषयांवर ठराव झाले. जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढविण्याचे ठरले पण प्रत्यक्षात पंचायत राज्याच्या निवडणुका महाराष्ट्रात तेव्हापासून झाल्याच नाहीत. तरीसुद्धा पंचायत राज्य संस्थांत स्त्रियांना महत्त्वाचा वाटा मिळाला पाहिजे हे आता विरोधी पक्षांनीच नव्हे तर राज्यकर्त्यापक्षानेही मान्य केले आहे. केंद्र शासनाच्या नवीन पंचायत राज बिलात स्त्रियांसाठी तीस टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे. एवढेच नव्हे तर शेतकरी महिला आघाडीच्या जिल्हा परिषद निवडणूक जाहीरनाम्यातील बहुतेक भाग या बिलात मान्य करण्यात आला आहे.

'चांदवडच्या शिदोरी'बद्दल देशभर मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली. मार्क्सवाद्यांनी अर्थातच टीकेचा भडीमार केला. पण नव्या महिला आंदोलनास

मार्क्सवाद्यांच्या बुडत्या गलबतात चढण्याची आवश्यकता नाही हे त्यानंतर रशियात घडलेल्या घटनांनी अधिकच स्पष्ट होते.

काही किरकोळ वादांचे मुद्दे उपस्थित झाले. उदा. लुटालुटीची व्यवस्था, विशेषत: स्त्रियांचे अपहरण व पुरुषांची गुलामी यांची सुरुवात नेमकी कोणत्या पायरीला सुरू झाली? शेतीत बचत तयार झाल्यानंतर म्हणजे शेतीवर काम करणाऱ्या सर्वांना पुरून उरेल इतके धान्याचे उत्पादन होऊ लागल्यानंतर की त्या आधी?

शेतीत बचत तयार होणे याचा अर्थ शेतीवर जगणाऱ्या सर्वांना खाऊन-पिऊन उरेल इतके उत्पादन होणे ही व्याख्या शांततेने आणि गुण्यागोविंदाने भांडवल निर्मिती करणाऱ्या समाजात योग्य आहे. लुटालुटीच्या व्यवस्थेत मात्र शेतीतील बचत याचा अर्थ लुटारूंच्या दृष्टिकोनातून वेगळा होतो. शेती पिकते ती वर्षातून ठरावीक दिवसात. खळ्यात धान्याची रास असायचीच, लुटारूंच्या दृष्टीने त्या वेळी लूटमारीची शक्यता तयार होतेच. लुटीनंतर शेतकरी स्वत:चे पोट कसे काय भरेल याची चिंता लुटारूंना पडण्याचे काहीच कारण नाही. म्हणजे लुटालुटीचे राज्य शेतीवर आर्थिक बचत तयार होण्याच्या आधीच सुरू झाले असावे हे तर्काला पटण्यासारखे आहे.

पण अशी लूटयोग्य बचत तयार होण्याच्या आधीच स्त्रियांना पळवणे व पुरुषांना गुलाम करणे या कार्यक्रमास सुरुवात झाली असेल हे मोठ्या प्रमाणावर तरी शक्य नाही. स्त्रियांना काय किंवा गुलामांना काय, पळवून आणायचे ते काही हेतूने, उपाशी ठेवून मारण्यासाठी नाही त्यांना खायला घालण्याकरिता तरी पळवणाऱ्याकडे धान्याचा पुरेसा साठा असणे आवश्यक आहे. लुटारूंच्या स्वत:च्या आवश्यकतेपेक्षा जास्त धान्य त्यांच्याकडे साठा म्हणून असले पाहिजे किंवा असे धान्य मिळत राहण्याची काही किमान शक्यता असली पाहिजे. थोडक्यात, कुठेतरी नेहमीच्या आवश्यकतेपेक्षा जास्त धान्य साठ्यात असल्याखेरीज स्त्रियांच्या किंवा पुरुषांच्या पळवापळवीला काही अर्थ राहणार नाही.

शेतीतील पहिली बचत धान्याच्या रूपात झाली का पशुपालनात झाली याही वादाला तसे फारसे महत्त्व देण्याची गरज नाही. शेती आणि पशुपालन हे थोड्याफार अंतराने जवळजवळ एकाच काळात सुरू झालेले व्यवसाय आहेत. जनावरे पाळली जातात तेव्हा सगळ्याच वेळी त्यांना चरायला कुरणात सोडता येते असे नाही. काही काळापुरती त्यांचीसुद्धा बांधल्या जागी खाण्याची सोय करावी लागते. जनावरे पाळण्याची कला आणि व्यवसाय शेतीमध्ये वरकड



उत्पादन झाल्याखेरीज फारसे संभवत नाही. शेतीतील बचतीला मोठ्या प्रमाणावर सुरुवात बैल नांगराला जुपल्यानंतरच झाली असावी. काही ठिकाणी बैलाच्या जागी गुलामही वापरले गेले असतील. पण सर्वसाधारणपणे पशुपालन आणि शेती या दोघांतील विकासात फार मोठ्या काळाची तफावत संभवत नाही.

वरकड उत्पादन थोड्याफार काळाच्या फरकाने शेतीत तयार झालेले असो की पशुपालनात असो आणि लुटीची सुरुवात वरकड उत्पन्न खऱ्या अर्थाने तयार होऊ लागले तेव्हापासून असो, का खळ्यात धान्याची रास पडू लागल्यापासून असो मध्ययुगातील आणि सरंजामशाहीतील लुटालुटीचा कालखंड शेतीच्या उत्पादनाशी संबंधित आहे व स्त्रियांची गुलामगिरी ही या लुटालुटीस तोंड देण्याकरिता उभी केलेली आपत्कालीन व्यवस्था होती यात काही शंकेला जागा नाही. तात्पुरता वाटणारा आपत्काळ हजारो वर्षे टिकला. किंबहुना, आजपर्यंत मानवी इतिहास आणि संस्कृती म्हणून जे जे ओळखले जाते ते या लुटीशी संबंधित आहे. स्त्रियांनी अनपेक्षित संकटाला तोंड देण्याकरिता एक ओझे स्वीकारले पण सिंदबादच्या सफरीच्या गोष्टीतील म्हाताऱ्याप्रमाणे, ते ओझे हजारो वर्षे झाली, खाली उतरायलाच तयार नाही.

चांदवड अधिवेशनानंतर महिला चळवळ मार्क्सवादी विचारापासून दूर सरू लागली. रशिया व चीन येथील घटनांमुळे मार्क्सवादी विचाराची एकूणच पकड ढिली झाली. व्यावसायिक मार्क्सवादी पुऱ्या निष्ठेने बेजिंगमधील गोळीबाराचेसुद्धा समर्थन करू लागले, पण सद्सद्विवेकबुद्धी शाबूत असलेल्या मार्क्सवाद्यांना काही पर्याय शोधणे आवश्यक वाटू लागले. त्याप्रमाणेच काही मार्क्सवादी पठडीतील स्त्रीकार्यकर्त्यांनाही पर्यायी विचार शोधणे आवश्यक झाले.

स्टॅलीनच्या हत्याकांडानंतर रशियन व्यवस्थेला उबगलेल्या कोस्लर, मानवेंद्रनाथ रॉय या विचारवंतांप्रमाणे त्या स्त्रीकार्यकर्त्यांचीही स्थिती झाली. मार्क्सवादाचा पराभव त्यातील चुकीच्या आर्थिक व सामाजिक गृहीततत्त्वात व विश्लेषणपद्धतीत आहे. याउलट, मार्क्सवादाची इतिहास-विश्लेषणाची वस्तुवादी मीमांसा आजही अबाधित राहिली आहे. मार्क्सवादाच्या पाडावाने भांबावून गेलेल्या विचारवंतांनी मार्क्सवादातील वाईटाबरोबर चांगलेही फेकून देऊन काही असंबद्ध विचारसरणी मांडायला सुरुवात केली आहे व ही नवीन विचारसरणी जणू काही एक क्रांतिकारक परिवर्तन आहे असेही नगारे वाजवायला सुरुवात केली आहे.

स्टॅलीनच्या शेतकी धोरणामागे मार्क्सवादातील वरकड मूल्याची चुकीची मीमांसा आहे. याविषयी गोंधळ झाल्यामुळे अनेकांनी अध्यात्माकडे पावले

टाकायला सुरुवात केली. मार्क्सवादापासून दूर जाणाऱ्या स्त्रीकार्यकर्त्यांचीही अशीच अवस्था झालेली आहे.

सर्व विश्व ही एक व्यवस्था आहे व ती अनेक उपव्यवस्थांची बनलेली आहे. अशी सम्यकवादी (Holistic) विचारसरणी आता त्यांना मान्य होते पण हीच विश्लेषणपद्धती सामाजिक प्रश्नांनाही लावली म्हणजे वर्गविश्लेषण मोडून पडते एवढेच नव्हे तर स्त्री विरुद्ध पुरुष अशा प्रकारच्या विश्लेषणालाही आधार राहात नाही हे मात्र त्यांच्या लक्षात येत नाही. नीतिमत्ता किंवा मूल्य ही व्यवस्थेची कारणे नसून परिणाम असतात याचाही त्यांना विसर पडतो. आणि एका काळी मार्क्सवादाच्या वैचारिक शिस्तीची जाण असलेली ही मंडळी उपभोग मर्यादित झाले पाहिजेत, नैतिक परिमाणे नसतील तर तंत्रज्ञान नकोच असे मांडतात. एवढेच नव्हे तर हक्क, स्वातंत्र्य, समता या कल्पनांनाही विरोध करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. पर्यावरण व त्याचे प्रदूषण यासंबंधी आज मोठी जागृती होत आहे. या चळवळीशी महिला आंदोलनाचा बादरायणी संबंध जोडण्याचा प्रयत्न होतो आहे. औद्योगिकीकरणातून तयार होणारी प्रदूषणसमस्या ही भांडवलनिर्मितीच्या विपरीत प्रक्रियेशी संबंधित आहे हे न जाणता पुरुषप्रधान नियोजनव्यवस्थेवर त्याचा दोषारोप टाकणे हे याच प्रवृत्तीचे उदाहरण आहे.

चांदवडनंतर घडलेली आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे समग्र महिला आघाडीने जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढवण्यासाठी केलेली तयारी व त्यानंतर या विषयावर घडून आलेले मोठे बदल. विकासाची दिशा ग्रामीण स्त्रीच्या दृष्टिकोनातून ठरली पाहिजे असे चांदवड अधिवेशनात आग्रहाने मांडण्यात आले आहे.

ग्रामीण स्त्रियांच्या दृष्टिकोनातून विकासाच्या प्रक्रियेत काय फरक पडले याची व्यावहारिक उदाहरणे समग्र महिला आघाडीच्या जाहीरनाम्यात दिली होती. या विकासाच्या दृष्टिकोनास आणि पंचायती राज्य व्यवस्थेत स्त्रियांचा मोठा सहभाग असावा या कल्पनेस सर्वमान्यता मिळालेली आहे.

**कार्यक्रमाचे स्वरूप**

अगदी सुरुवातीच्या समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणावर भर दिला होता. स्त्री-शिक्षणाने गेल्या काही वर्षांत मोठी प्रगती केली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मॅट्रिक झालेल्या कोणासही रेशन खात्यात, इतरत्र नोकरी मिळू शकते असे दिसल्यावर सर्व रूढी आणि परंपरा मोडून अगदी भद्र लोकांच्या घरातील लेकीसुनासुद्धा शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी



घराबाहेर पडल्या. अजून निरक्षरांमध्ये स्त्रियांचेच प्रमाण जास्त आहे. मुलींना विनासायास शिक्षण घेता यावे यासाठी भगीरथ प्रयत्नांची अद्यापही गरज आहे. मुली शिकल्या, पैसे कमवू लागल्या, नोकरीच नाही तर स्वतंत्र व्यवसायही करू लागल्या पण त्यांची बाईपणाच्या ओझ्यातून सुटका झालेली क्वचितच दिसते. त्यांचेही बालपण अजून विवाहापेक्षीच आहे. हुंड्यापायी त्यांची होणारी कुचंबणा थांबलेली नाही. मालमत्तेवर त्यांना कोणत्याही प्रकारचा अधिकार मिळालेला नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तबगारी गाजवणाऱ्या महिलांची संख्या कमी नाही, पण अशा स्त्रियाही बहुधा कोण्या एका पुरुषाच्या सावलीत काम करताना दिसतात. हुंडाबळी पडणाऱ्या आणि जाळून मारल्या जाणाऱ्या सुनांत, विशेषत: दिल्लीसारख्या शहरात अगदी विद्यापीठाचे शिक्षण मिळालेल्या स्त्रियांचा भरणाच अधिक.

समाजसुधारकांच्या काळापासून स्त्रियांना संरक्षण देणारे कायदे करवून घेण्याकडे मोठा कल दिसतो. सतीबंदी, पुनर्विवाह, द्विभार्या प्रतिबंध, किमान संमतीवय, हुंडाविरोधी, सुलभ घटस्फोट, पोटगीचा हक्क, एवढेच नव्हे तर स्त्रियांवरील अत्याचाराच्या प्रकरणी विशेष न्यायालय व वेगळी न्यायपद्धती अशा अनेक विषयांवर कायदे झाले, होत आहेत, होत राहतील. सतीचा कायदा होऊन शंभराहून अधिक वर्षे झाली पण अजूनही सतीचे प्रकार होतात. पुनर्विवाह तसा दुर्मिळच. संमतीवयाचा कायदा होऊन किती वर्षे लोटली, पण ग्रामीण भागातील बहुसंख्य मुलींना अठरा वर्षांच्या आतच मुंडावळ्या बांधल्या जातात. वारसाहक्काने देऊ केलेल्या मालमत्तेवरील तुटपुंजा हक्कसुद्धा आग्रहाने मिळवू शकणाऱ्या स्त्रिया बोटावर मोजण्याइतक्या. कायद्यातील कलमे कायद्यातच राहतात. कायदा करणाऱ्यांचे नाव होते. स्त्रिया जिथल्या तिथेच राहतात.

अनेक स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची प्रकरणे हाती घेतली. जेथे जेथे म्हणून स्त्रियांना मारपीट होईल तेथे जाऊन चौकशी करणे, निदर्शन करणे, पोलिसांवर दडपण आणणे, वकील देणे, कोर्टाचे कामकाज चालवणे, आरोपींवर सामाजिक बहिष्कार घालणे असे कार्यक्रम वर्षानुवर्षे पार पडत आलेले आहेत. काही प्रकरणी गुन्हेगारांना शिक्षा देवविण्यात यश मिळाले. उलट काही ठिकाणी अगदी फटफजिती झाली. एकेका प्रकरणात तड लावण्यासाठी चांगले चांगले कार्यकर्ते वर्षानुवर्षे खपले. पुष्कळसे थकले, काही बदनाम झाले. पण सोडवलेल्या एकेका प्रकरणामागे अत्याचारांची नवी शेकडो प्रकरणे उपटली. हाती तुराटे घेऊन वणवा विझवायला निघावे असा हा केविलवाणा प्रयत्न.

### पुढील दिशा

चांदवडच्या अधिवेशनाने शिक्षण, कायदा आणि व्यक्तिगत मदत या तीनही मार्गांनी झालेल्या प्रयत्नाचे ऐतिहासिक महत्त्व मानले. पण अशा प्रयत्नांच्या मर्यादाही दाखवून दिल्या व महिला आघाडीच्या काही कार्यक्रमाच्या दिशा स्पष्ट केल्या.

१) महिला आघाडीचे आंदोलन पुरुषविरोधी नाही. महिला आंदोलनाला पुरुषविरोधी स्वरूप देणे आपण बसलेल्या फांदीवरच कुऱ्हाडीचा घाव घालण्यासारखे आहे. आंदोलनाचे स्वरूप लुटीची व्यवस्था विरुद्ध लूटविरोधी व्यवस्था असे आहे.

२) महिला संघटनांनी पुरुषांनी चालवलेल्या संघटनांच्या विचारांचे कोणतेच ओझे बाळगू नये. ज्या महिला कार्यकर्त्या सार्वजनिक संस्थांत काम करतात त्यांनी अशा संस्थांसंबंधीची निष्ठा, महिला आघाडीच्या निष्ठेच्या तुलनेने नेहमीच दुय्यम समजावी.

३) शेतकरी संघटना ''भारत'' आणि ''इंडिया'' असा भेद मानत असली तरी महिला आघाडीला अशा प्रकारचे भेद मानण्याचे कारण नाही. स्त्रियांचा लढा हा सम्यक महिला आघाडीच्या रूपानेच परिणामकारक होऊ शकेल.

४) शेतकरी स्त्री शेतकरी आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक लढ्यात शेतकरी म्हणून तिला पुरुषांपेक्षाही जास्त स्वारस्य आहे. शेतकरी आंदोलनात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. अशा सहभागामुळे त्यांचा आर्थिक फायदा तर होईलच, पण त्यापलीकडे, महिला आंदोलनही सशक्त होईल. यासाठी शेतकरी आंदोलनात भाग घेतानाही स्त्रियांनी शक्यतो स्वायत्तपणे भाग घ्यावा.

५) स्त्रियांचे प्रश्न व्यक्तिगत नव्हे तर सम्यक पातळीवर हातात घेतले गेले पाहिजेत. पाचपंचवीस स्त्रियांनी एकत्र येऊन विद्वत्तापूर्ण चर्चा किंवा निवेदने करण्यापेक्षा एखादा छोटासा कार्यक्रम घेऊन लाखा-लाखाच्या संख्येने एकत्र येणे जास्त फलदायी आहे. कार्यक्रम दारूबंदीसारखा छोटा असो, किंवा सार्वजनिक बलात्काराच्या निषेधार्थ पंतप्रधानांच्या घराला वेढा घालण्याचा असो, निवडणुका लढवायच्या तर पंचायत राज्याच्या असो किंवा लोकसभेच्या असो, स्त्रियांची संघशक्ती उभी करणे ही स्त्रियांनी समाजात हजारो वर्षांपासून गमावलेली प्रतिष्ठा, हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळविण्यासाठी बिनतोड साधन ठरणार आहे.

चांदवड अधिवेशनानंतर शेतकरी महिला आघाडीस स्वतंत्रपणे एखादे आंदोलन करण्याची संधी मिळाली नव्हती. नांदेड अधिवेशनानंतर दारू दुकान



बंदी आणि ३ जुलै ८९ रोजी जिल्हा परिषदांवर कब्जा या निमित्ताने शेतकरी महिला आघाडीस स्वतंत्रपणे आंदोलन करण्याची, ताकद दाखविण्याची संधी मिळाली. या आंदोलनांच्या यशापयशाचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग असल्याखेरीज महिला आघाडीचे आंदोलन उभे करणे कितपत शक्य आहे किंवा नाही, आवश्यक आहे किंवा नाही या संबंधीही विचार झाला पाहिजे.

*(मूळ प्रकाशन : नोव्हेंबर १९८९)*

■■

तीन

# शेतकरी महिला आघाडी :
## महिला आरक्षणासंबंधी आणि वारसाहक्कासंबंधी भूमिका

### १. कायदेमंडळात महिलांसाठी राखीव जागा

स्वतंत्र भारत पक्षाचा शेतकरी महिला आघाडीशी घनिष्ठ संबंध आहे. शेतकरी चळवळीच्या मुख्य प्रवाहातील या महिलांच्या आघाडीने १९८६ साली, महिलांनी महाराष्ट्रातील पंचायत राज्याच्या निवडणुकीतील सर्व जागा लढवाव्या यासाठी पुढाकार घेतला. महिलांमध्ये नवी जागृती निर्माण होण्याच्या धास्तीने प्रस्थापित सत्ताधारी हादरून गेले आणि त्यांनी स्त्रियांसाठी ३३% जागा राखून ठेवण्याची आणि स्त्रियांसाठी राखीव मतदारसंघ चिठ्ठ्या टाकून पाळीपाळीने ठरवण्याची शक्कल काढली. दुर्दैवाने, हीच पद्धती लोकसभेसमोर सध्या विचाराधीन असलेल्या कायदेमंडळात महिलांसाठी राखीव जागांच्या विधेयकात उचलली गेली आहे.

शेतकरी महिला आघाडीने स्त्रियांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे याकरिता सर्वात प्रथम पुढाकार घेतलेला आहे. या विषयातील तिचा अधिकार निर्विवाद आहे.

राखीव जागांच्या सवलतीने कोणा गटास सामाजिक न्याय मिळण्यास मदत होते किंवा नाही याबद्दल आमच्या मनात जबरदस्त शंका आहे. राखीव जागांची पद्धती लिंगभेदावर आधारित अन्याय दूर करण्यासाठी अगदीच अप्रस्तुत आहे असे आम्हास वाटते. वेगवेगळ्या राज्यांत राखीव जागासंबंधात आजपर्यंत आलेला अनुभव पाहता याबाबतीतल्या आमच्या भीती खऱ्या ठरल्या आहेत. महिलांसाठी राखीव जागा ठेवल्याने प्रस्थापित पुरुष पुढाऱ्यांच्या परिवारातील बायकामंडळीच स्त्रियांच्या प्रतिनिधी म्हणून मिरवू लागल्या. त्या कामकाजातही अधिक कार्यक्षम असत नाहीत आणि भ्रष्टाचारही कमी करताना दिसत नाहीत. राखीव जागांची पद्धती नसतानाही, भारतीय राजकारणावर प्रभुत्व असलेल्या



समाजातील उच्चभ्रू (क्रीमी) स्तरातील स्त्रियांनी चालविलेल्या राज्याचा अनुभव आपण आधीच घेतला आहे.

प्रत्यक्षात, स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवल्यामुळे स्त्री-चळवळीविषयी सहानुभूती बाळगणारे अनेकजण या चळवळीपासून दुरावले गेले आहेत. महिलांतील भाग्यवान थरातील स्त्रियाच राखीव जागांची मागणी हिरीरीने मांडत आहेत. यात व्यावसायिक राजकारणी, सरकारी निधीच्या आधाराने चालणाऱ्या संस्थांच्या पुढारी अग्रेसर आहेत. स्त्रियांच्या प्रश्नाविषयी स्पष्ट कल्पना नसलेले अनेक पुरुष आपल्यावर 'पुरुषीपणाच्या प्रेमातील डुकरे' असल्याचा शिक्का बसू नये म्हणून स्वत:ला स्त्रियांच्या मुखंडी म्हणवणाऱ्या स्त्रियांच्या या प्रस्तावास पाठिंबा देतात. राखीव जागांच्या संकल्पनेचा सध्या बोलबाला आहे हे मान्य करायलाच हवे आणि हा बोलबाला इतका झाला आहे की महिलांसाठी राखीव जागा ठेवण्याच्या कल्पनेला विरोध करणे आज कठीण आहे.

स्वतंत्र भारत पक्षाचा, तरीही, ज्या पद्धतीने महिलांसाठी राखीव जागांची पद्धती अमलात आणली जाणार आहे त्याला, विशेषत: मतदारसंघ पाळीपाळीने निवडण्याच्या पद्धतीला सक्त विरोध आहे. या पद्धतीमुळे महिला चळवळीसच नव्हे तर सर्व राष्ट्रासच धोका संभवतो.

पाळीपाळीने राखीव मतदारसंघ ठरवण्याची ही पद्धत काय आहे? पहिल्या निवडणुकीत एकूण मतदारसंघापैकी १/३ जागा चिठ्ठ्या टाकून महिलांसाठी राखीव म्हणून निवडल्या जातील. त्यापुढील निवडणुकीत पूर्वी राखीव नसलेल्या २/३ जागांपैकी निम्म्या जागा पुन्हा चिठ्ठ्या टाकून निवडल्या जातील व त्यापुढील निवडणुकीत उरलेल्या १/३ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतील. या पद्धतीचे काही गंभीर परिणाम होणार आहेत.

१. निवडल्या जाणाऱ्या 'महिलाराखीव' मतदारसंघात लायक महिला उमेदवार असतीलच असे नाही. याउलट, कार्यशील असलेल्या चांगल्या महिला उमेदवार केवळ त्यांचे मतदारसंघ राखीव नाहीत या कारणाने मागे पडतील.

२. काही विशेष करिश्म्याच्या महिला सोडल्यास स्त्रियांना खुल्या मतदारसंघातून निवडून येणे अशक्य होईल.

३. मुद्दा १ आणि २ यांचा संयुक्त परिणाम असा होईल की कोणाही स्त्रीला कायदेमंडळात लागोपाठ दोन वेळा निवडून जाणे अशक्य होईल.

४. लागोपाठ दोन वेळा निवडून जाणे हे पुरुषांच्या बाबतीत तर अधिकच कठीण होईल. कारण, त्यांच्यापैकी निम्म्यांना आपल्याच मतदारसंघातून निवडणूक लढवताच येणार नाही.

५. महिला प्रतिनिधींच्या लक्षात येईल की त्यांना त्यांच्या मतदारसंघातून पुढील निवडणूक लढवता येणार नाही आणि पुरुष प्रतिनिधीनाही वाटत राहील की त्यांना त्यांच्या मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवण्याची शक्यता ५० टक्केच आहे. यामुळे आपल्या मतदारसंघाची सेवा करण्याच्या कामात कोणालाच फारसे स्वारस्य व म्हणून उत्साह राहणार नाही.

६. परिणामी, कोणत्याही कायदेमंडळात दुसऱ्यांदा निवडून आलेल्या प्रतिनिधींची संख्या ३३ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही; त्यामुळे सदस्यांच्या कौशल्याचा आणि अनुभवाचा कायदेमंडळाला लाभ होणार नाही.

७. कोणा प्रतिनिधीने राजीनामा दिला किंवा त्याचा मृत्यू ओढवला किंवा कोणत्याही कारणाने तो अपात्र ठरला अथवा सर्व कायदेमंडळच बरखास्त होऊन मध्यावधी निवडणुका घेण्याचा प्रश्न आला तर राखीव जागांचे वाटप समान पद्धतीने करणे अशक्य होईल.

८. कोणत्याही एका निवडणुकीत १/३ मतदारच स्त्री-उमेदवारांना मते देऊ शकतील.

पाळीपाळीने चिठ्ठ्या टाकून राखीव मतदारसंघ निवडण्याच्या या पद्धतीचे भयानक परिणाम ओढवणार आहेत याची कुणाला स्पष्ट कल्पना आलेली दिसत नाही; कोणी याचा अभ्यासही केलेला दिसत नाही.

या पद्धतीचे दुष्परिणाम टाळता येणे शक्य आहे. प्रत्येक मतदारसंघातून तीन प्रतिनिधी निवडले जावे, त्याकरिता सध्याचे तीन मतदारसंघ एकत्र करून एक संयुक्त मतदारसंघ तयार करता येईल. प्रत्येक मतदारास एकूण तीन मते असतील, त्यापैकी किमान एक मत कोणत्या ना कोणत्या स्त्री-उमेदवारास देणे अनिवार्य राहील. एकाही स्त्री उमेदवारास मत न दिल्यास मतपत्रिका बाद धरण्यात येईल. सर्वात जास्त मते मिळवणारे पहिले दोन उमेदवार हे - स्त्री असोत का पुरुष - सर्वसाधारण जागांवर निवडून आले असे जाहीर केले जाईल. तिसऱ्या जागेसाठी, प्रथम निवडून आलेले पहिले दोन उमेदवार वगळता उरलेल्यांतील महिला उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते मिळवणाऱ्या स्त्रीस विजयी घोषित केले जाईल.

पाळीपाळीने राखीव जागा ठरवण्याच्या पद्धतीतील साऱ्या दोषांपासून ही पद्धत मुक्त आहे. या पद्धतीत मतदारसंघ मोठ्या आकाराचे होतील हे खरे, पण विस्तृत मतदारसंघ हा अप्रत्यक्षपणे फायद्याचा ठरण्याची शक्यता आहे. उमेदवाराचे आजपर्यंतचे काम व गुणवत्ता, त्याने ऐनवेळी उठवलेल्या प्रचाराच्या धुमाळीपेक्षा जास्त महत्त्वाची ठरतील. एका मतदारसंघातून अनेक प्रतिनिधी



निवडून देण्याच्या पद्धतीमुळे मतदारांना आपला मताचा अधिकार अधिक चांगल्या तऱ्हेने बजावता येईल. सध्याच्या पद्धतीत मतदारांना उमेदवार किंवा पक्ष स्वीकारणे किंवा नाकारणे यापलीकडे काही मार्ग राहत नाही. नव्या पद्धतीत तो आपली तीन मते वेगळे पक्ष आणि वेगवेगळे उमेदवार यांत वाटून देऊ शकेल.

स्वतंत्र भारत पक्षाने आपल्या या जाहीरनाम्यामध्ये आजच्या 'सर्वाधिक मते मिळविणाऱ्याला विजयी घोषित करण्याच्या' पद्धतीऐवजी 'प्रमाणशीर प्रतिनिधित्व' पद्धतीचा पुरस्कार केला आहे.

त्यानुसार, महिलांसह सर्वच पात्र विशेष समाजघटकांसाठी राखीव जागांची तरतूद असेल तर, प्रत्येक नोंदणीकृत पक्षाने आपल्या उमेदवारांची प्राधान्यक्रमाची यादी बनविताना ती आरक्षणाच्या टक्केवारी विचारात घेऊन बनविली तर अपेक्षित आरक्षण आपोआपच साधले जाईल. उदाहरणार्थ, महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण निश्चित केले गेले तर पक्षाच्या उमेदवार यादीतील दर दोन उमेदवारांनंतर तिसऱ्या जागी महिला उमेदवाराचे नाव असावे लागेल.

### २. वारसाहक्क कायद्यातील सुधारणा

सुधारित वारसाहक्क कायद्यानुसार मुलीला आता वडिलांच्या मालमत्तेत जन्मजात समान अधिकार प्राप्त झाले आहेत. म्हणजे, आता वाडवडिलांकडून वारशाने आलेल्या संपत्तीत मुलग्यांप्रमाणेच मुलीलाही समान वाटा मिळणार आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर मुलीला, ती विवाहित असो की अविवाहित, वडिलांच्या स्वकष्टार्जित मालमत्तेतही तिच्या भावांच्या व आईच्या बरोबरीने हिस्सा मिळाला आहे. तिच्या सासरच्या मालमत्तेतही ती वारसदार असणार आहे.

सासरी नवऱ्यांच्या घरी एकत्र कुटुंबात नांदणाऱ्या स्त्रियांच्या मालमत्ताअधिकाराच्या प्रश्नाकडे या सुधारित वारसा हक्क कायद्याच्या मसुदाकारांनी पुरेसे ध्यान दिलेले नाही असे दिसते. विवाहित स्त्रीला वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता तिच्या मृत्यूनंतर 'स्त्रीधन' मानावे की नाही हा अजूनही वादाचा मुद्दा आहे. स्त्रीच्या मृत्यूनंतर, तिला माहेराहून वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता तिच्या माहेरी, माहेरातील हयात पुतणेपुतण्यांकडे किंवा हयात भाचेभाच्यांकडे जाईल हे शक्यतेच्या पलीकडील आहे असे दिसते. सुधारित वारसा कायद्यानुसार विवाहित स्त्रीच्या मृत्यूनंतर तिला माहेराहून मिळालेली संपत्ती पुन्हा तिच्या माहेरीच जायची असेल तर मग, सुरुवातीलाच माहेरच्या

माणसांना दुखावून, माहेरच्या संपत्तीत हिस्सा देण्याचा कायदा करण्यात काही अर्थ दिसत नाही.

कुटुंबप्रधान समाजातील, स्त्रियांच्या संपत्तीअधिकारासंबंधी गुंता भागीदारी कायद्याच्या धर्तीवर कौटुंबिक भागीदारीची कल्पना वापरून अधिक चांगल्या प्रकारे सोडविता येऊ शकेल. मुलीच्या आईवडिलांचे कुटुंब आणि लग्नानंतरचे सासरचे कुटुंब दोन्ही भागीदारी कुटुंबे धरली जातील ज्यामध्ये मुलीला जन्मतःच तिच्या आईवडिलांच्या कुटुंबाच्या संपत्तीत कुटुंबातील इतर सर्व सदस्यांबरोबर समान हिस्सेदार मानले जाईल.

या पद्धतीत, तिच्या लग्नाच्या वेळी तिच्या जन्मकुटुंबाची एकूण मालमत्ता व देणी यांचा हिशोब करण्यात येईल आणि तिला तिच्या वाट्याला येणारा नक्त मालमत्तेतील हिस्सा देऊन तिची सासरी पाठवणी करण्यात येईल. त्याच वेळी सासरच्याही एकूण मालमत्तेची मोजदाद करण्यात येऊन नवीन सुनेने माहेराहून आणलेल्या मालमत्तेच्या प्रमाणात तिचा हिस्सा धरण्यात येईल. काही योगाने, लग्नाने तयार झालेली ही कौटुंबिक भागीदारी मोडण्याची वेळ आली तर त्या वेळी असलेल्या सासरच्या मालमत्तेतील, लग्नाच्या वेळी ठरलेल्या प्रमाणातील हिस्सा तिला मिळेल; ही संपत्ती लग्नानंतरच्या काळात वाढलेली असेल किंवा घटलेलीही असू शकेल.

ग्रामीण महिलांच्या संपत्तीअधिकारांच्या बाबतीत आणखीही एक अडचण आहे, तीही अडचण सुधारित वारसा कायद्याने ध्यानात घेतलेली नाही. शेतजमीन ही स्थावर मालमत्ता आहे, ती उचलून नेता येत नाही, इतर ठिकाणी राहून सांभाळताही येत नाही. साहजिकच, सासरी राहणाऱ्या विवाहित मुली किंवा माहेरी राहणाऱ्या विधवा किंवा घटस्फोटिता यांना आपला माहेरच्या किंवा सासरच्या संपत्तीवरील अधिकार मिळवणे अत्यंत अवघड जाते. मुलीच्या लग्नाच्या वेळी सासरच्या कुटुंबाला काही एकरकमी धन देऊन आणि मुलीला दागदागिने करून शेतकरीसमाजातील वधूंचे बाप आणि भाऊ या समस्येचे निराकरण वर्षानुवर्षे करीत आले आहेत.

*(स्वतंत्र भारत पक्ष, लोकसभा निवडणूक जाहीरनामा २००९ मधून)*

■■



चार

# लक्ष्मीमुक्ती : मंगल सावकाराचे देणे

**माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,**

आपल्या गावातील शंभरावर शेतकऱ्यांनी आपल्या घरच्या लक्ष्मीच्या नावाने आपल्या जमिनीचा एक भाग करून दिला आणि लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम संपन्न केला याबद्दल आपला आणि गावाचा सन्मान करण्याकरिता मी येथे आलो आहे.

पण आपला सन्मान मी करतो म्हणण्यापेक्षा, मला वाटते माझा स्वतःचा आपण सन्मान केला आहे. गावात एवढा अभूतपूर्व आनंदोत्सव साजरा होत आहे. गावात सगळी साफसफाई करून, अंगणात सडे घालून, रांगोळ्या घालून, पताका लावून, रोषणाई करून आपण हा उत्सव साजरा करत आहात. अगदी दिवाळी दसऱ्याला करणार नाही असा सण आपण केलात आणि एवढ्या मंगल महोत्सवाला मला निमंत्रण देऊन उपस्थित राहण्याचे सद्भाग्य दिलेत याबद्दल आपणा सर्व भावाबहिणींचे शतशः आभार.

शेतकरी महिला आघाडीच्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमासंबंधी मी आज बोलू इच्छितो:

लक्ष्मीमुक्ती हा काय कार्यक्रम आहे? ज्या गावात शंभरावर शेतकरी आपल्या घरच्या लक्ष्मीच्या नावाने थोडीशी जमीन किंवा उत्पन्न करून देतील त्या गावाने 'लक्ष्मीमुक्ती' केली. एखाद्या गावात १०० खातेदारच नसले तर मग ८० टक्के शेतकऱ्यांनी असे केले आहे तर त्याही गावाला हा सन्मान मिळतो.

सव्वा वर्षापूर्वी म्हणजे २ ऑक्टोबरला १९९० रोजी मी जाहीर केले की ज्या ज्या गावात लक्ष्मीमुक्ती होईल त्या त्या गावात मी स्वतः जाऊन गावाच्या आनंदोत्सवांत सहभागी होईन; मग ते गाव भले आडवाटेला असो, दऱ्याखोऱ्यांत असो, डोंगराकपारीत असो, जंगलांत असो का वैराण माळमाथ्यावर असो. त्यावेळी माझी कल्पना अशी होती की उभ्या महाराष्ट्रात पाच-पंचवीस गावे

फार तर लक्ष्मीमुक्तीची होतील. दिलेले वचन पुरे करायला फारसे सायास पडणार नाहीत.

मोठमोठ्या विद्वानांनी, पुढाऱ्यांनी मला बजावले होते की, लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम अव्यावहारिक आहे. जमिनीच्या तुकड्याकरता शेतकरी भावाभावांत वैर माजते, डोकी फुटतात, मग स्वत:च्या बायकोच्या नावाने शेतकरी जमीन करून देतील हे निव्वळ अशक्य आहे असे अनेकांनी निक्षून सांगितले.

पण शाब्बास मराठी शेतकऱ्यांची. त्यांनी या सगळ्या भल्या पंडितांना खोटे ठरवले. आजपर्यंत मी ४०० वर गावच्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमांना हजर राहिलो. पण गावांची यादी वाढतच आहे. आजमितीला दीड हजारावर गावांची लक्ष्मीमुक्तीची तयारी झाली आहे. आणि एवढ्या सगळ्या गावांना पोचायचे कधी आणि कसे या विचाराने मी चिंताक्रांत झालो आहे.

इतक्या गावांत मी गेलो. स्त्रियांमध्ये अपार उत्साह, पुरुषांत नाराजीचा अंशही नाही. त्यांच्या चेहऱ्यावरून कृतार्थता ओसंडून चाललेली. गावांत साफसफाई करून, सडे घालून रांगोळ्या घालून पताका लावून रोषणाई करून स्त्री-पुरुष शेतकरी हा उत्सव साजरा करतात. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या गेल्या बारा वर्षात कितीक दु:खाचे प्रसंग कोसळले. घर उजाड झाले. कधी यश मिळाले कधी अपयशाचा सामना करावा लागला. आपण हाती घेतलेले हे सतीचे वाण कसे निभावते या चिंतेने कितीकदा व्याकूळ झालो. पण लक्ष्मीमुक्तीच्या या लोकविलक्षण यशाने सगळा शीण आणि सगळे दु:ख दूर होऊन जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटते आहे.

माझ्या अगदी जवळच्या सहकाऱ्यांच्या मनांतसुद्धा लक्ष्मीमुक्तीच्या आंदोलनाविषयी खूप गोंधळ आहे. शेतीमालाला रास्त भाव हा एक कलमी कार्यक्रम सोडून संघटना कुठे वाट चुकून भरकटत तर चाललेली नाही ना अशीही शंका अनेकांच्या मनात आहे.

काही कार्यकर्त्यांना वाटते, या लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमात काहीतरी खुबी, डावपेच आहे.

कदाचित जमिनीची विभागणी घडवून आणून लहान आणि सीमान्त शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सोयी सवलती सर्व शेतकऱ्यांना मिळाव्यात म्हणून साहेबांनी ही युक्ती काढली असावी असे काहींना वाटते.

शेतकरी आंदोलनात स्त्रियांनाही भाग घेण्यास तयार करावे म्हणजे आंदोलने अधिक मोठी होतील, आंदोलकांत स्त्रिया असल्या म्हणजे लाठीमार होणार नाही गोळीबार होणार नाही. शेतकरी आंदोलनाची ताकद अश्या तऱ्हेने



वाढवण्याकरता लक्ष्मीमुक्तीची शक्कल मी काढली असा काहींचा तर्क आहे.

काहीजण म्हणतात कर्जमुक्तीच्या आंदोलनाच्या वेळी कर्जमुक्तीचे अर्ज भरण्यात आपण हयगय केली. त्यामुळे नुकसान ओढवले. या वेळी अशी चूक करायची नाही. म्हणून लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम राबवावा.

बरेच कार्यकर्ते विचार करतात, शरद जोशी शेतीमालाच्या भावाकरता इतके झटतात, धडपडतात. त्यांना लक्ष्मीमुक्तीची हौस असेल तर त्यांच्या समाधानाकरता एवढे काम करायला काय हरकत आहे? करून टाकू या लक्ष्मीमुक्ती !

भाषणाच्या अगदी सुरुवातीलाच मी अगदी स्पष्टपणे सांगून टाकतो. लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमात डावपेच, युक्ती, खोटेपणा लपवाछपवी असे अजिबात काही नाही. हा अगदी निखळ आणि आरपार प्रामाणिक असा कार्यक्रम आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे हा मुळी काही वेगळा कार्यक्रम नाहीच. शेतकरी संघटनेच्या, ''उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव'' कार्यक्रमाचाच हा एक भाग आहे. एवढेच नाही तर, अगदी निक्षून सांगतो, लक्ष्मीमुक्तीखेरीज रास्त भावाचा लढा संपूर्ण यशस्वी होणे शक्य नाही.

आज आपल्यापुढे मी बोलणार आहे ते एवढी गोष्ट स्पष्ट करण्यासाठी. शेतकरी संघटनेच्या दोन मूळ घोषणा कोणत्या? ''शेतकरी तितुका एक एक'' आणि ''भीक नको, हवे घामाचे दाम'' याच की नाही?

आता माझ्या एका प्रश्नाचे उत्तर द्या. या सगळ्या मायबहिणी. या शेतकरी आहेत का नाहीत? लक्षात ठेवा मी काय विचारले. या 'शेतकरी आहेत का?' असे विचारले, 'शेतकरणी आहेत का?' असे नाही विचारले. शहरात डॉक्टरच्या बायकोला डॉक्टरीण म्हणतात, मग तिला औषधपाण्याचे औषधाइतकेही ज्ञान नसले तरीसुद्धा. वकिलाच्या बायकोला वकिलीण म्हणतात, तिला भले कायद्याचा काहीएक गंधसुद्धा नसला, तरीही. शेतकरी मायबहिणी नुसत्या शेतकऱ्याची बायको म्हणून शेतकरणी नाहीत. त्या स्वत: शेतकरी आहेत.

शेतकरी म्हणजे कोण? ज्याचे शेतावर पोट आहे तो शेतकरी. जो शेतांत घाम गाळतो तो शेतकरी. शेतकऱ्याच्या पोटचा पोरगा मंत्री झाला, मुख्यमंत्री झाला, मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर बसून शेतकऱ्यांचे गळे कापायला लागला तर तो भला शेतकऱ्याच्या रक्तामांसाचा असला तरी तो शेतकरी नाही असे आपण ठामपणे मांडतो.

या सगळ्या माझ्या मायबहिणींचे पोट शेतावर आहे, त्या शेतात घाम गाळतात. फार काय, मशागतीची आणि इतर जड कामं सोडली तर पेरणी–

निंदणीपासून पार उफणणी, निवडण्या, पोती भरण्यापर्यंत सगळी कामे बहुतेक त्यातच करतात. शेतात काळ्या आईच्या अंगावर घामाचे १०० थेंब पडले तर त्यातले साठ-सत्तर थेंबतरी मायबहिणींच्या श्रमाचे असतात. म्हणजे या सगळ्या मायबहिणी शेतकरी आहेत हे नक्की.

पण त्या शेतकरी आहेत म्हणजे शेतमालक आहे का शेतमजूर आहेत?

शेतमालक म्हणावे तर त्यांच्या नावाने जमीन म्हणून नाही. ७-१२ च्या उताऱ्याला त्यांचे नाव नाही.

शेतमजूर म्हणावे तर तेही मुश्किल. शेतमजूर सात-साडेसात तास काम करतात; पण ही आपली मायमाऊली पंधरा पंधरा तास राबते. दिवस नाही, रात्र नाही, ऊन नाही, पाऊस नाही. थंडी नाही वारा; नाही-राबते.

शेतमजुराला किमान वेतन कायदा आहे. घरधनिणीला कसले किमान वेतन? वर्षाला दोन लुगडी आणि पोटाला पुरेसे मिळाले म्हणजे धन्य झाले !

मालकाशी पटले नाही तर मजूर दुसरीकडे काम धरेल. लक्ष्मी तर तुमच्या संकटात, आजारपणात, दुःखातसुद्धा तसं करायचा विचारही मनात आणणार नाही. अगदी मुजोर दांडग्या मालकाचीसुद्धा आताशी मजुरावर हात उगारायची हिंमत होत नाही. दोन दिवसांत तालुक्याच्या गावाहून पोलिस शिपाई येऊन धरून नेतील. पण बाईच्या बाबतीत, ''पावसाने झोडपले आणि दादल्याने मारले तर तक्रार कुणाकडे करायची'' अशी परिस्थिती. 'अंगावर कापड आणि पोटाला भाकर' यावर राबणाऱ्या माझ्या या मायबहिणी मजूरसुद्धा नाही. निव्वळ वेठबिगारच म्हटल्या पाहिजेत. वेठबिगारांकरतासुद्धा कायदे झालेत. पण शेतकऱ्याच्या गृहलक्ष्मीला काहीच कशाचा आधार नाही.

शेतकरी संघटना म्हणजे काही 'शेतकरी पुरुष संघटना' नाही. मग एकूण शेतकरी समाजात संख्येने निम्म्या असलेल्या मायबहिणींच्या 'घामाच्या दामाचे' काय? त्यांच्या घामाला दाम कोण मिळवून देणार?

शेतकरी संघटना गेल्या दहा बारा वर्षांत वाढली. गावठाणांतून राजवाड्यांत गेली. उत्तरेत पार पंजाबपर्यंत गेली. दक्षिणेत तामिळनाडूत गेली. पण शेतकऱ्याच्या घरांतल्या चुलीपर्यंत फारशी पोचली नाही.

दहा एक वर्षांपूर्वी मला मराठवाड्यांतील एका शेतकरी बहिणीने प्रश्न केला. ''भाऊ शेतीमालाला भाव मिळाला म्हणजे सगळे सुखी होतील असं तुम्ही म्हणता. शेतकरी सुखी होईल. मजुराला मजुरी मिळेल, बलुतेदाराला काम मिळेल, व्यापार-उदीम वाढेल. देश सारा भरभराटीला येईल असे तुम्ही म्हणता. पण खरं सांगा भाऊ, शेतीमालाला भाव मिळाला तर शेतकऱ्याच्या



घरच्या बाईला एखादातरी दिवस सुखाचा भेटेल का हो?''

म्हणजे आपण सगळे शेतीमालाच्या भावाकरता आकाशपाताळ एक करीत होतो आणि ही लक्ष्मी देवाला आळवणी करीत होती शेतीमालाला भाव न मिळो म्हणून!

आणखी एका शेतकरी बहिणीने तिच्या आयुष्याची चित्तरकथा सांगितली. डोळ्यांतून आसवं गाळीत सांगितली.

तिला तीन भाऊ. बापाची जमीन पंधरा एकर. बाप वारल्यावर तीन भावांनी पाच पाच एकर वाटून घेतली. मुलीच्या नावाने काहीच नाही. थोरल्या भावाने जरा उजवी जमीन घेतली आणि त्याबदली बहिणीच्या लग्नाची जबाबदारी घेतो म्हणाला. पोरीचे लग्न ठरले. ५००० रुपये खर्च करायचे ठरले. पण ऐन लग्नाच्या मुहूर्तावर थोरल्या भावाने काखा वर केल्या. माझ्याकडे रुपये नाहीतच तर देऊ कुठून, म्हणाला. असं घडल्यावर काय होणार? व्हायचं तेच झालं. माहेरच्या माणसांना माया नाही तर सासरची माणसं कसली कीव करतात? त्यांनी तिला माहेरी परत पाठवून दिले. रुपये घेऊन आलीस तर परत ये म्हणून तिला सांगितलं. बाई सांगत होती, 'भाऊ, माहेरी येऊन आता पंधरा वर्षं झाली. भावाच्या घरी राहते. समोर ठेवतील ते पोटात ढकलते. एखाद्या वर्षी भावाने नवे नेसूंचे घेऊन दिले तर आनंद वाटतो. नाहीतर जुन्यावरच दिवस काढायचे. आता संसाराचा विचारही मनात येत नाही. पोरांबाळांची स्वप्नंसुद्धा विरली. भावजय तोंडाची मोठी फाटकी आहे. पण तिचं बोलणं ऐकलंच नाहीसं दाखवते आणि आलेला दिवस गेला म्हणत देवाचे आभार मानते. पण भाऊ उद्याचं काय? उद्या माझे हातपाय चालेनासे झाले तर मी जाऊ कुठे आणि करू काय?'

'गेली पंधरा वर्षे अब्रूच्या भीतीने भावाच्या आश्रयाने राहिले. याच्यापेक्षा शेजाऱ्याच्या शेतावर रोजीने गेले असते, तर काय चारपाच रु. रोज मिळाला असता. दिवसाकांठी चार आठ आणे शिल्लक टाकले असते तरी आजपर्यंत काहीतरी पैसे आधाराला साठले असते. भावाकडे राहिले म्हणून आज माझी स्थिती अशी की अंगावरची कापडं आणि पोटात सकाळी ढकलेली भाकर याखेरीज माझं म्हणून या उभ्या जगात काहीच नाही.'

महाराष्ट्र तर गरीब आहे. पण पंजाब तर मोठा सुजलाम् सुफलाम् म्हणतात ना? हरितक्रांती तेथे झाली म्हणतात. शेती फायद्याची तेथेही झाली नाही; पण शेतकऱ्यांच्या हाती पैसा तर खेळू लागला? या सगळ्या संपन्नतेचा घरच्या लक्ष्मीला काय लाभ मिळाला? काहीसुद्धा नाही. उलट तिचं आयुष्य आणखीच

दुःखी झालं. गावात दारू बोकाळली. पोरीबाळींना, बायामाणसांना दिवस मावळल्यावर घराच्या बाहेर पडायची चोरी झाली. शेतात कामाला बिहारची, ओरिसातील दूरदूरची माणसं आली अन् बाई घरात कोंडली गेली. तिच्याकडे आता सगळ्या माणसांच्या रोट्या भाजायची वेळ आली. अडकित्याने कडबा कापायचं काम मोठं अवजड; पण ते यायचं बाईच्या वाट्याला. अडकित्याच्या ऐवजी चॉपकटर आला. ते यंत्र बटन दाबून चालू करायचं काम मात्र हाती घेतलं पुरुषांनी. बाजरगावी डोक्यावरती अवजड ओझं घेऊन कोस कोस चालत जायचं काम बाई करी. ट्रॅक्टर चालवत बाजारला जायचं सोपं काम हाती घेतलं मर्दांनी.

सतीच्या छळाचा हा कार्यक्रम अगदी महासती सीतेपासून सुरू आहे.

सीतेचे स्वयंवर झाले. अयोध्येची महाराणी होण्याकरितां ती सासरी आली. कैकयीने रामाला चौदा वर्षे वनवासात पाठवायचं ठरवलं. तीसुद्धा सीतेला म्हणाली, "पोरी तुझ्या अंगावरची अजून हळद उरतली नाही. तू इथेच राजवाड्यात राहा." सीतेला वनवासात जाण्याची काही सक्ती नव्हती. पण तिचा ठाम निश्चय. जिथं राम तिथं सीता. वनवासात असताना रावणाने सीतेला पळवली हा काही तिचा दोष नाही. दोष ठेवायचाच तर तो रामावर आणि लक्ष्मणावरच ठेवायला पाहिजे त्यांना तिचं संरक्षण करता आले नाही म्हणून राम-रावण युद्ध झाले. वनवास संपला. राम, लक्ष्मण, सीता अयोध्येला परतले. रामाला राज्याभिषेक झाला. राम राजा झाला. सीता महाराणी झाली आणि एक दिवस रामाचे डोके फिरले. साक्षात अग्नीने सीतेला शुद्ध ठरवले पण रामाने तिला पुन्हा वनवासात पाठवले. सीतेला जवळ ठेवायचे किंवा नाही हा रामाचा निर्णय. त्याबद्दल आपण काय बोलायचे? पण रामापाठोपाठ चौदा वर्षे अरण्यवासात काढणाऱ्या सीतेची रामाने काय वासलात लावली? त्याच्याने एवढेसुद्धा बोलवले नाही; " बाई, मी राजा आहे. माझ्या कर्तव्यामुळे मी तुला ठेवून घेणे शक्य नाही. एवढ्या वैभवशाली अयोध्येतल्या कोणत्याही महालात तू सुखाने राहा." बाळंतपण होईपर्यंत तरी अयोध्येत दोन खोल्या सीतेला देऊ करायच्या! तेवढाही मनाचा मोठेपणा पुरुषोत्तम रामाला दाखवता आला नाही. सीता वनवासात आली. यवतमाळ जिल्ह्यातल्या, राळेगाव तालुक्यातल्या रावेरी गावी थांबली. एका खोपटात लवकुशांचा जन्म झाला. बाळंतपणानंतर पथ्याकरता म्हणून सीता गावकऱ्यांकडे पसाभर गहू मागायला गेली. एक काळच्या महाराणी महासती सीतेला पदर पसरून भीक मागावी लागली. गावकऱ्यांनी तेवढी भीकसुद्धा घातली नाही. लोककथा सांगते, सीतेने गावकऱ्यांना तळतळून शाप दिला,



"तुमच्या गावात गहू म्हणून पिकणार नाही." रावेरी गावचे शेतकरी सांगतात परवा-परवापर्यंत म्हणजे संकरित गव्हाचे वाण येईपर्यंत गहू म्हणून त्या गावच्या वावरांत कधी पिकलाच नाही.

अयोध्येत रामाच्या मंदिराचा आजकाल खूप गाजावाजा चालला आहे. रामाच्या मंदिराची काय घाई आहे? गावोगाव रामाची छोटी मोठी देवळे आहेत. निराश्रित म्हणून हजारो वर्षे महासती सीता फिरते आहे. तिला आसरा केव्हा मिळणार आहे? भूमिकन्या सीता निर्वासित झाली. आजच्या या मायबहिणींना आसरा देण्याचा 'लक्ष्मीमुक्ती' हा कार्यक्रम आहे.

गेली दहा बारा वर्षे मी शेतीच्या उत्पादनखर्चाचा हिशेब देशभरच्या शेतकऱ्यांना शिकवतो आहे. समजावून सांगतो आहे. आज तुम्हाला मी एक नवीन उत्पादनखर्चाचा हिशेब सांगायला आलो आहे. शेतीत होणारे प्रत्येक काम आणि प्रत्येक खर्च टिपून ठेवा म्हणून मी तुम्हाला विनवले. आज एक नवीन विनंती करतो.

एक दिवस भल्या पहाटे लवकर उठा; म्हणजे घरची लक्ष्मी उठायच्या आधी उठा. पेन्सिल घ्या आणि ती जे जे म्हणून काम करेल ते टिपायला लागा. चुलीचं, पोतेऱ्याचं, अंगणातलं, पोरांचं, जनावरांचं, रांधायचं, वाढायचं, उष्टी काढायचं, धुणी धुण्याचे, भांडी घासण्याचं, शेतातलं, सरपणाचं, गवऱ्याचं, जे जे काम ती करेल ती टिपून ठेवा. एवढं एक काम माझ्याकरता तुम्ही कराच. रात्री सगळी निजानीज होईपर्यंतची सगळी कामे लिहून ठेवा. पोरांना, सकाळी पावशेर दूध जास्त मिळावे म्हणून अर्ध्या रात्री उठून गुरांना ती चारा घातले तेही टिपून ठेवा.

सांगा, तुमच्या घरच्या लक्ष्मीच्या दररोजच्या कामाचे तास किती होतात? पधरा तासात तर काहीच कमी नाही. आता या सगळ्या श्रमाचे मोल काय? प्रत्येक दिवशी दोन रोजाचे काम करते, त्याची रोजी काय धरायची? सगळी कामे ती ज्या प्रेमाने, आपुलकीने, ममतेने करते त्याची किंमत शून्य धरा. तुमची, पोराबाळाची, वडीलधाऱ्यांची आजारपणात ती जी सेवा करते त्याचीही किंमत शून्य धरा. पण रोजगार हमी योजनेच्या मातीच्या पाट्या टाकणाऱ्या बाईची किमान रोजी तर तुमच्या लक्ष्मीच्या नावे लावाल कां नाही?

एक दिवसाचा हिशेब झाला रुपये ३०. तिला सुट्टी कुठली? उलट, जगाचा सण म्हणजे तिला दुप्पट उस्तवार. समजा, तुमची लक्ष्मी हळदीच्या पावलाने तुमच्या घरात आली त्याला २० वर्षे झाली. मी २० वर्षाचा हिशेब करून दाखवतो. प्रत्येक भावाने आपापल्या घरचा हिशेब मनाशी करून पाहावा. २०

वर्षांच्या कामाची रोजीच झाली रु. २ लाख १० हजार. तिला मिळालं काय, अंगावर कापड आणि पोटातली भाकर. सोसयटीचं देणं एवढं थकलं असतं तर आज थकबाकी निघाली असती किती? रुपये आठ लाखाच्या वर.

हिंदू समाजात दोन प्रकारच्या देव-देवता मानतात. मंगल देवता आणि ओंगळ देवता. मंगल देव म्हणजे विष्णू, कृष्णासारखे. त्यांना प्रसन्न केले तर ते भले करतात. पूजाअर्चा काही केली नाही तरी त्यांची काही तक्रार नसते. या उलट गावोगावचे म्हसोबा-खंडोबा या ओंगळ देवता. त्यांना जत्रेच्या दिवशी बैल दाखवला नाही की आटोपलाच कारभार. सगळी माणसं ओंगळ देवतांची मर्जी संपादायला धावतात. मंगल देवतांकडे कोणी लक्ष देत नाही.

सोसायट्या, बँका हे सगळे ओंगळ सावकार. तगादे लावतात, जीप पाठवून भांडी उचलतात, कोर्टात जातात, जप्ती करवतात. त्यांची कर्जं फेडण्याकरता आपण जिवाचा आकांत करतो. घरची लक्ष्मी सावकार खरी. थोड्याथोडक्या रकमेची नव्हेहे, चांगली ८-१० लाखाच्या कर्जाची. पण ती काहीच तगादा लावत नाही. उलट इतर सावकाराचं कर्ज भागवण्याकरता अंगावरचे दागिनेसुद्धा प्रसंगी उतरून देते. या मंगल सावकाराचं कर्ज फेडण्याचा विचार तुम्ही कधी करणार?

या कर्जातून मुक्त होणं महत्त्वाचं आहे. हे काम अगदी निकडीचं आहे. हे कर्ज न फेडल्याच्या पापाची किंमत, आपल्याला मोठी जबरदस्त द्यावी लागली आहे हे लक्षात ठेवा.

शेतीमालाच्या भावाच्या लढ्यासाठी १९८४ साली आपण गावबंदीचे हत्यार काढले. गावात जे कोणी उमेदवार निवडणूक प्रचाराकरता येतील त्यांना शेतीमालाच्या भावाबद्दल बोलायला लावायचे, नाहीतर गावबंदी करायची असे आपण ठरवले. प्रत्यक्षात काय झाले? इंदिराबाईंची हत्या झाली आणि उमेदवार आले ते डोळ्यांतून पाणी काढत आले. सरकारी धोरणामुळे आपल्या पोराबाळांची दैना झाली हे मायबहिणी विसरून गेल्या. "बिच्चाऱ्याची माय मेली त्याला मत द्या." म्हणून त्यांनी राजीव गांधींना प्रचंड मतानं विजयी केलं. गावबंदी अयशस्वी झाली.

१९८९ मध्ये पुन्हा तेच घडलं. सीतामाईला वनवासात धाडणाऱ्या रामाच्या देवळाच्या बाजूनं मायबहिणी गेल्या. कर्जमुक्तीचे, शेतीमालाच्या भावाचे त्यांना काही अप्रूप वाटले नाही. त्यांचे काय चुकले? शेतीमालाला भाव मिळाल्यामुळे त्यांच्या वेठबिगारात काही फरक पडणार आहे अशी त्यांना काही आशाच वाटत नाही तर त्यांनी आपल्या आंदोलनाच्या बाजूने का नेटाने उभे राहावे?



आपण घामाचे दाम मागतो. पण घरच्या लक्ष्मीच्या घामाची किंमत करत नाही. शेतकऱ्यांना इतर नागरिकांप्रमाचे सन्मानाने जगायला मिळाले पाहिजे असे म्हणतो पण घरातल्या लक्ष्मीला गुलामासारखे वागवतो. अशा खोटेपणाला यश कसे लाभेल? कापसाचा भाव मागायचा आणि राजीवस्त्रे घालून मिरवायचे अशासारखाच हा खोटेपणा झाला. घरच्या लक्ष्मीचा मान राखला नाही तर बाहेरची लक्ष्मी घरात यायची कशी? आणि आली तरी टिकायची कशी?

लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम म्हणजे काय हे आता स्पष्ट होऊ लागले असेल. घरच्या लक्ष्मीच्या कर्जातून मुक्त होण्याचा हा कार्यक्रम आहे. या एवढ्या लाखालाखांच्या कर्जातून मुक्त व्हायचे कसे? आणि कोणत्या जन्मी?

देवाच्या देण्यातून आपण कसे मोकळे होतो? तो आपल्याला हवा देतो, पाणी देतो, अन्न देतो, आकाश देतो, धरती देतो. त्याच्या ऋणातून आपण कसे मोकळे होतो? तोंडात घास टाकण्याआधी त्याला आपण नैवेद्य दाखवतो. म्हणतो बाबा हे सगळं तुझ्यामुळे आहे. झटकन देवाचं देणं फिटतं.

लक्ष्मीमुक्ती हा कार्यक्रम असा नैवेद्याचा आहे. शेतकरी त्याच्या लक्ष्मीला म्हणतो, "बाई, माझ्या गरिबाच्या संसारात तू हळदीच्या पावलांनी आलीस. तुझी काहीच हौस मौज घरात झाली नाही. आल्यागेल्या पै-पाहुण्याचं तू काही कमी पडू दिलं नाहीस. मी तुला वेडेवाकडे बोललो. काही वेळा हातही उगारला. तुझ्या सगळ्या कष्टांची आणि त्यागाची आज मी कृतज्ञतापूर्वक आठवण करतो आणि या एवढ्याशा जमिनीच्या तुकड्याचा तुला नैवेद्य दाखवतो."

लक्ष्मीमुक्ती करणारे गाव कोठेही असो- आडवाटेला असो, दऱ्याखोऱ्यांत असो, डोंगरकपारीत असो, जंगलात असो वा वैराण माळमाथ्यावर असो तेथे जाण्याचे मी का मान्य केले हे आता तुम्हाला समजले असेल.

लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमांत सहभागी झालेल्या या लक्षावधी शेतकऱ्यांनी काय केलं थोडक्यात सांगू?

रामाला जे धनुष्य पेलले नाही ते धनुष्य या बहाद्दरांनी उचलून दाखवले म्हणून हा अद्भुत चमत्कार पाहण्यासाठी मी तुमच्या गावात आलो.

भूमिकन्या सीतेला जे भाग्य लाभले नाही ते लक्ष्मीमुक्तीच्या प्रत्येक गावातील शंभरेक मायबहिणींना लाभले त्याचा आनंदसोहळा पाहण्यासाठी मी गावागावांत आनंदाने फिरतो आहे.

*(शेतकरी संघटक, २१ फेब्रुवारी १९९२)*

■■

पाच

# दळभद्री चिंधी

(महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण)

### महिला धोरणाची व्याप्ती

स्त्रिया लोकसंख्येत अर्ध्या हिश्श्याने आहेत. देशाचे नागरिक म्हणून अनेक प्रश्न स्त्रिया आणि पुरुष यांच्यात समानच असतात. देशाच्या विकासासंबंधीच्या पंचवार्षिक योजना, प्रकल्प, आर्थिक धोरण यांत पुरुषांइतकेच स्त्रियांनाही स्वारस्य असले तरी अशा प्रश्नांविषयी महिला धोरणाच्या दस्तावेजात चर्चा निरर्थक आहे. उदा. दृक्‌श्राव्य व इतर प्रसारमाध्यमे यांच्यावरील नियंत्रणासंबंधीचे धोरण समग्र देशासाठी एकत्रच ठरवले गेले पाहिजे. ऊर्जेविषयक राष्ट्रीय धोरण ठरवताना देशातील संख्येने निम्म्या असलेल्या स्त्रियांच्या गरजा लक्षात घेतल्या गेल्या पाहिजेत, तसे झाले नाही तर केवळ महिला धोरणात अशा विषयांवर काही वेगळाच सूर किंवा सिद्धांत सांगून भागणार नाही.

स्त्री–पुरुषांना समान असलेल्या प्रश्नांखेरीज काही प्रश्न खास स्त्रियांचे असे असतात. स्त्रियांवरील प्रजननाच्या नैसर्गिक जबाबदारीपोटी समाजरचनेत काही विशेष व्यवस्था अपरिहार्य होते. स्त्रियांचे शिक्षण, संरक्षण, मालमत्तेचा हक्क ही अशा प्रश्नांची उदाहरणे. असे प्रश्न कोणते ते ठरवण्याचा साधा नियम आहे. जेथे जेथे देशाचा विकास झाला तरी त्याचा लाभ स्त्रियांना मिळतोच असे नाही, मिळाला तरी पुरुषांइतका मिळत नाही आणि अनेक क्षेत्रात विकासाची प्रत अशी असते की स्त्रियांना लाभ होण्याऐवजी त्यांची पिछेहाटच होते या प्रकारची क्षेत्रे महिला धोरणाची व्याप्ती दाखवतात.

### दिशेचा गोंधळ

महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण १९९४ साली प्रसिद्ध झाले, त्याची परीक्षा १९९४ च्या संदर्भातच केला पाहिजे. स्वातंत्र्यानंतर ४७ वर्षे सर्व जबाबदारी शासनाकडे राहिली आहे. अनुभव काही फारसा सुखद नाही. विकास, कल्याण अशा सर्वच क्षेत्रांत शासनव्यवस्था संपवून विकेंद्रीकरण आणि खुली व्यवस्था



याकडे वाटचाल चालू झालेली आहे. सुरक्षाव्यवस्था अजून अनेक वर्षे शासकीयच राहील. शिक्षण, आरोग्य यासंबंधी योजना आणि प्रकल्प बराच काळ शासनाकडे राहण्याची शक्यता आहे. याउलट, उत्पादन, व्यापार आदि विकासयोजनांतून शासन आपले अंग काढून घेत आहे. पंतप्रधानांच्या अनेक निवेदनांतून मध्यममार्गाची ही कल्पना स्पष्ट झाली आहे. ज्या वेळी केंद्र शासन विकासाच्या जबाबदारीतून मोकळे होऊन कल्याणकारी क्षेत्रापुरते मर्यादित होऊ पाहात आहे, नेमके त्याच वेळी महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण कल्याणकारी दृष्टिकोन सोडून अधिक व्यापक विकासाची जबाबदारी स्वीकारू पाहात आहे, कलम (२:३). केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वयाच्या अभावाचे हे उदाहरण मानावे लागेल किंवा महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण करताना ना सिद्धांताचा, ना प्रचलित संदर्भाचा गंभीर विचार झाला असे मानावे लागेल.

### महिलांच्या विकासाची परागती

महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण सर्वसाधारण विकास अनेकदा स्त्रियांपर्यंत पोचत नाही हे मान्य करते (३:२); पण स्वातंत्र्योत्तर काळातील अनुभव सांगतो की काही तथाकथित विकासाचा स्त्रियांवर विपरीत किंवा दुष्ट परिणाम होतो. उत्पन्न वाढल्यावर दारूचे व इतर व्यसनांचे प्रमाण वाढणे, घरची स्थिती सुधारल्यावर बाहेर कामावर जाणाऱ्या स्त्रीस पुन्हा एकदा घर, चूल व मूल आणि अनेकदा पडदा यांत अडकवून घ्यावे लागणे, यांत्रिकीकरणामुळे सुलभ झालेली कामे स्त्रियांकडून पुरुषांकडे जाणे आणि जड कंटाळवाणी कामे स्त्रियांकडे येणे, शहरांच्या बकालीकरणामुळे स्त्रियांच्या मुक्त हालचालींवर बंधने येणे ही सर्वसाधारण विकास आणि स्त्रियांचा विकास यांच्यातील व्यस्त प्रमाणाची उदाहरणे आहेत. महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणामध्ये या वास्तविकतेची थोडीशीही जाणीव दिसत नाही. महिला धोरणाचा जो मुख्य विषय त्याविषयीच धोरणाच्या लेखकांचे असे अज्ञान आहे.

### शहरी नोकरदार महिलांचा दृष्टिकोन

स्त्रीचळवळीच्या सुरुवातीच्या कालखंडात चळवळीचे ध्येयधोरण, कार्यक्रम यांवर डाव्या चळवळीचा फार मोठा पगडा होता. मार्क्सवादी विचारातील वर्गविग्रह आणि वर्ग संघर्ष यांना समांतर अशा 'स्त्री विरुद्ध पुरुष' संघर्षाची मांडणी सर्रास होत असे. आता हा दृष्टिकोन फारसा मानला जात नाही. स्त्रीपुरुष यांच्यातील संबंध अर्थकारणातील संबंधांइतके बटबटीत आणि ढोबळ नाहीत, त्यांत अनेक बारकावे आहेत. स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या पुरुषांप्रमाणेच आई, पत्नी, मुलगी, बहीण यांच्याकरिता सर्वस्वाचा होम करणाऱ्या पुरुषांचीही

उदाहरणे असतात. एका बाजूस सर्व स्त्रिया आणि उलट बाजूस सर्व पुरुष असे संघर्ष इतिहासात आढळत नाहीत. स्त्री व पुरुष यांच्यातील वेगवेगळ्या प्रकारचे संबंध असणाऱ्या व्यवस्थांत संघर्ष होतात हे आज सर्वमान्य झाले आहे. महिलांची परिस्थिती सुधारण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण मात्र स्त्रिया ही एक वेगळी अल्पसंख्याक, दलित किंवा दुर्बल जमात आहे अशा आशयाचे दिसते. अल्पसंख्याक, दलित आणि दुर्बल यांच्या चळवळीने केलेल्या घोडचुकांची पुनरावृत्ती स्त्रियांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण करवू पाहत आहे. दलितांचे परंपरागत व्यवसाय त्यांनी केले पाहिजेत हा आग्रहही चुकीचा होईल, पण त्यांचे व्यवसाय दलित आहेत असे समजून त्यांचा त्याग करून त्यांना 'शहराकडे चला' असे सांगणे, उज्ज्वल भवितव्य काय ते नोकरदारीत आहे असे मांडणे तर्कशुद्ध नाही आणि अर्थशास्त्रात शक्य नाही. नव्या खुल्या व्यवस्थेत तर अशी कल्पनाही करता येणार नाही. स्त्रियांची प्रगती काय ती राजकीय स्थानिक स्वराज्य संस्थांतील सहभाग, प्रशासन् इत्यादितील नोकऱ्या आणि स्वयंरोजगार इत्यादी औपचारिक क्षेत्रातील कामांमुळेच होणार आहे ही कल्पना दलित चळवळीच्या पठडीतील आहे. विकसित देशांचा अनुभव असे सांगतो, की या वाटेने गेलेल्या स्त्रियांच्या चळवळी दिशा बदलून परत पहिल्या स्थानाकडे परतू लागल्या आहेत. चांभारांनी 'रापी' सोडून द्यावी अशा घोषणेच्या तालावर स्त्रियांनीही 'घराबाहेर' पडण्यातच आणि नोकरी धरण्यातच त्यांचा विकास आहे या महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाच्या गृहीततत्त्वास सैद्धांतिक अथवा ऐतिहासिक आधार नाही.

महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचा शहरी ढाचा अगदी स्पष्ट आहे. शहरात नोकरीवर जाणारी स्त्री हा महाराष्ट्र शासन महिला धोरणाचा केंद्रबिंदू आहे (७), (९:१), (९:२), (९:३), (९:४). शहरात रोजगार करणाऱ्या स्त्रीचा त्यात उल्लेख आहे, (९:५), (९:६). याउलट, स्त्री, तिचा साधा उल्लेखही महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणात आढळत नाही. या स्त्रियांच्या प्राथमिक समस्या पाणी आणि जळण. पण राष्ट्रीय विकास योजनांत त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. या स्त्रिया शेतावर राबतात, शेतीसंबंधीची कामे घरातही करतात, वर घरकामही करतात. सर्वसामान्य कामकरी स्त्रियांना जगभर मान्य झालेल्या बाळंतपणाची रजा, पाळणाघरे, जेवणाची सोय, आजारपणाची रजा, स्वच्छतागृहे इत्यादींचा स्पर्शही होत नाही. स्त्रिया करत असलेल्या अनेक कामांचे मोजमापही शेतीमालाच्या किमती ठरवताना होत नाही. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरणात प्रतिबिंब आहे ते भारतातील स्त्रियांच्या



एका अगदी छोट्या, शहरी सुशिक्षित भद्रलोक समाजातील स्त्रियांच्या समस्यांचे आणि आकांक्षांचे. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण महाराष्ट्रातील 'इंडिया'चेच काय ते चित्र दाखवते.

### हिंदू महिलांसाठीच फक्त?

यापलीकडे, महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाची व्याप्ती हिंदू समाजापुरतीच मर्यादित आहे. मुसलमान, ख्रिश्चन, पारशी इत्यादी समाजांतील पतीची मिळकत, स्थावर व जंगम मालमत्ता, विवाह, घटस्फोट, पोटगी हे सर्व विषय महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणकारांनी लेखणीच्या एकाच फटकाऱ्याने कोपऱ्यात ढकलून दिले आहेत (८:५:४).

समान नागरी कायदा हा आजकाल गंभीर चर्चेचा विषय आहे. आपल्याच धर्माची नागरी व्यवस्था श्रेष्ठ आहे अशा अभिनिवेषाने हिंदू मूलतत्त्वादी इतर धार्मिकांवर ती लादू पाहत आहेत. प्रत्यक्षात यच्चयावत् धर्मांच्या व्यवस्था स्त्रीवर अन्याय करणाऱ्याच राहिल्या आहेत. प्रत्येक नागरिकास त्याच्या धार्मिक आणि आध्यात्मिक कल्पनांप्रमाणे नागरी व्यवस्था राखण्याचे स्वातंत्र्य असणे हेही आवश्यक आणि त्याबरोबर समानता, न्याय आणि तर्क यांवर आधारलेला एक सूत्रबद्ध नागरी कायदा 'धर्माच्या कपाटां'तून सुटू इच्छिणाऱ्या सर्वांना मापदंड म्हणून उपलब्ध करून देणे ही अत्यावश्यक गोष्ट आहे. या विषयाला बगल देणारा कोणातही दस्तावेज 'महिला धोरण' अशी बिरूदावली मिरवल्यास उघडउघड अपाय आहे.

### कायद्याने समाज सुधारणा

कायदा केल्याने सामाजिक सुधारणा घडवून आणता येतात अथवा नाही हा विषय आंतरशालेय आणि महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धांत वर्षानुवर्षे राहिला आहे. सतीबंदीपासून सम्मती वयाचा कायदा, हुंडाबंदी, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, स्त्रियांच्या मालमत्ता हक्कासंबंधीचे अनेक कायदे या सर्वांचा अनुभव सांगतो की कायदा करणाऱ्यांची उद्दिष्टे सफल झाली नाहीत. एवढेच नव्हे तर, कायद्याने घालून दिलेल्या नैतिकतेच्या मापदंडांनासुद्धा मान्यता किंवा प्रतिष्ठा मिळत नाही. उलट, सरकारी कायद्यांविषयी अनास्था उद्‌भवते आणि अंमजबाजवणी यंत्रणेवर असह्य ताण पडून ती खिळखिळी होते. दारू, मादक द्रव्ये यांवरील बंदीच्या कायद्यांचाही अनुभव असाच आहे. काही व्यसनाधीन व्यक्तींना वाचवण्याच्या अतिरेकी अट्टाहासापोटी सर्व समाजव्यवस्था इतकी ढासळवली जाते की निरपराध नागरिकांना त्याची प्रचंड किंमत मोजावी लागते.

महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचे एक गृहीततत्त्व असे दिसते की

कोणत्याही विषयांत बदल किंवा सुधारणा घडवून आणावयाची असेल तर त्यासंबंधी कायदा केला म्हणजे निम्म्यावर काम झाले; उरलेले काम कार्यक्षम अंमजबजावणीने आणि संबंधितांच्या प्रशिक्षणाने पुरे होते. महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाच्या अनेक परिच्छेदांत प्रशिक्षणाचा उल्लेख आहे, (४:५), (४:५:१), (४:६), (७:२:६), (८:७), (९:४:४), (९:५:३), (९:६:१), (९:६:५), (९:६:८), (१२:४:१५). कायदा, अंमजबजावणी आणि व्यवस्था, प्रशिक्षण यांच्या परिणामकारकतेबद्दलच्या महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाच्या आशावादास वास्तवात आधार काही नाही.

**गोंधळ उद्दिष्टांचा का मसुद्याचा?**

सरकारी दस्तावेज म्हटला की तो अघळपघळ आणि मुद्द्याला सोडून असायचा यात काही आश्चर्य नाही. मसुद्याच्या तयारीत अनेकांचे हात लागतात. बरेचसे काम कात्री आणि गोंदाच्या साहाय्याने होते. आपली काही खूण दस्तावेजात उठावी अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारे अनेक. त्यामुळे दस्तावेज विस्कळित व्हावा हे समजण्यासारखे आहे. पण महाराष्ट्र शासनच्या महिला धोरणाची सारी मांडणी या मर्यादांपलीकडे बजबजपुरीची झाली आहे.

धोरणाचे उद्दिष्ट 'स्त्रियांची शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे' असे मोठ्या डौलाने मांडले गेले (३:१) आणि त्यासाठी जीवनाच्या सर्व अंगांमध्ये - राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक क्षेत्रांमध्ये समानता प्रस्थापित करण्यानेच उद्दिष्ट सफल होऊ शकते असेही तितक्याच थाटात मांडले आहे. उलट, पुढच्याच परिच्छेदात (३:२) स्त्रियांच्या बौद्धिक आणि व्यक्तिगत (कदाचित्, सामूहिक म्हणायचे असावे) क्षमतांचा विकास करण्याची भाषा आहे आणि या मार्गातील अडचणी सामाजिक, आर्थिक व राजकीय आहेत असे म्हटले आहे. म्हणजे मानसिक आणि सांस्कृतिक अंगे एका परिच्छेदाच्या अंतरातच गळून गेली.

हे सारे अडथळे ओलांडायचे कसे आणि या साऱ्या समानता प्रस्थापित करायच्या कशा या प्रश्नांची उत्तरेही वेगवेगळी मिळतात. विकासासाठी अत्यावश्यक पायाभूत सेवा, साहाय्यसेवा आणि प्रशिक्षण हे कार्यक्रम आणि सहभागासाठी स्थानिक संस्था, महिला-बालविकास समित्या, राष्ट्रीय महिला आयोग, राज्य महिला आयोग आणि महिला बाल विकास विभाग हे आयाम (२:४) (२:५) या दोन परिच्छेदांत दोन मांडले.

नंतर विविध संस्थांना मदत (३:३) आणि शिस्त (४:१:६), महिलांना राजकीय, आर्थिक, व्यवस्थापकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व (४:१) आणि साक्षरता,



प्रशिक्षण, जागृती व आर्थिक पायाभूत साधने यांवर नियंत्रण (४:१:१), हीही साधने सांगितली आहेत. आर्थिक पायाभूत साधनांचा अर्थ १०% गावजमिनीइतकाच मर्यादित आहे. प्रशिक्षणावर अनेक परिच्छेद आहेत, पण साक्षरता, प्रशिक्षण आणि जागृती यांवर महिलांना नियंत्रण मिळवून देण्याची काय योजना आहे हे अखेरपर्यंत गुलदस्त्यातच राहिले आहे.

यानंतर पाचव्या परिच्छेदात एकदम, लक्ष केंद्रित करण्याची क्षेत्रे म्हणून अत्याचारनिर्मूलन, समान हक्क, आर्थिक दर्जा, प्रसार, स्थानिक संस्था व सहकारातील सहभाग आणि शासकीय कामातील सहभाग अशी यादी दिली आहे. म्हणजे परिच्छेद (२:५), (२:४), (३:), (४:१), हे सगळे बरखास्त झाले आणि लक्ष केंद्रित करण्याची नवीनच क्षेत्रं ठरली. यापुढील अध्यायात तरी या एकेक मुद्द्यावर धोरण मांडले जाईल अशी अपेक्षा करावी तर तीही सफल होत नाही. मध्येच कल्याणकारी योजनांचा एक स्वतंत्र अध्याय डोकावतो (७). गंमत म्हणजे पुढे तेराव्या अध्यायात अत्यावश्यक विभाग म्हणून अ) आरोग्य ब) शिक्षण आणि साक्षरता व क) तांत्रिक शिक्षण एवढी यादीच मिळते; यत्किंचितही टिपणीशिवाय. त्यानंतरचे या विषयांवरील अध्याय हे उघडउघड नंतर चिकटविलेले दिसून येतात.

महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचा विषय आणि धोरण काहीही असो, मसुदा तयार करण्याचे काम अत्यंत अजागळ झाले आहे यात काही शंका नाही.

**बोलाचीच कढी-छप्परफाड योजना**

महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाने कार्यक्रमाचा आराखडा आणि पट मोठा मांडला, पण त्याकरिता लागणारी साधने येणार कुठून? महाराष्ट्र शासनाची वित्तीय अवस्था स्पृहणीय नाही. प्रशासनसेवेवर आधीच अवाढव्य खर्च होत आहे. महिला धोरणामध्ये सुचविलेल्या योजनांत खर्चवाढीच्या आणि नोकरशाहीची वाढ करणाऱ्या सूचना अनेक आहेत. किंबहुना, महिला विकासाच्या नावाने एक समांतर सरकार उभे करण्याचा प्रस्ताव आहे. गावांतील स्थानिक समित्या(४:१:२) पासून मंत्रिमंडळाची उपसमिती (१८:२) ते थेट प्रसारमाध्यमांसंबंधी राष्ट्रीय परिषद येथपर्यंत अनेक समित्या यात सुचविलेल्या आहेत. समाजवादी शासनाचे विसर्जन झाल्यामुळे नवीन नोकऱ्यांच्या जागा तयार करण्यावर खीळ बसली आहे ती ओलांडून नोकरभरती आणि नोकरशाहीचे पोषण ही खरी महाराष्ट्र शासनाचे महिला धोरणाची प्रेरणा दिसते. अन्यथा, आर्थिक क्षेत्रात अकार्यक्षम ठरलेल्या शासनाकडे ही जबाबदारी बळेच ओढून

मिळविण्याची निकड नव्हती.

कायदा सुव्यवस्था देशभरात इतकी ढासळली की अत्याचार झालेल्या स्त्रीनेदेखील पोलिस चौकीत तक्रार देण्याकरिता जाऊ नये असा सल्ला आजकाल महिला संघटनाच देत असतात. कोणीही स्त्री शासकीय आसरागृहात जाण्यापूर्वी किंवा सरकारी योजनेचा फायदा घेण्यापूर्वी तेथे कोणी 'पंडित सपकाळे' तर नसेल ना याचा दहादा विचार करेल. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण 'पंडित सपकाळे'च्या सोयीचे नसेल तर नोकरदारांच्या भरभराटीचा सोपान मार्ग दिसतो.

या सगळ्या षड्यंत्रासाठी पैसा कोठून उपलब्ध होणार? इंग्रज शासनाने शिक्षणावरील खर्चाचा संबंध दारूवरील कराशी जोडून दिला होता, त्याची आठवण करून देणारी तरतूद या धोरणात करताना लेखकांना निदान काही संकोच वाटावा अशी आशा आहे, (४:२). महिला कल्याण निधी (९:३:२:) मा.वि.म. नवे भांडवल (९:५:७) आणि महिला अध्यापिका निधी (१६:६) अशा निधीसंकलनाच्या किरकोळ तरतुदी मसुद्यात आहेत. त्या सगळ्यांची बेरीज पासंगालाही पुरणार नाही अशा खर्चाचे आराखडे महाराष्ट्र शासनाच्या धोरणाने सज्ज केले आहेत यामागील प्रेरणा अगदी उघड आहे.

### मालमत्तेच्या हक्काचा गोंधळ

स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कासंबंधी तरतुदी या धोरणात इतस्तत: पसरल्या आहेत. सरकारने दिलेल्या मालमत्तेतील सहभाग (४:१:४), संस्थांचे प्राथमिक सामायिक सभासदत्व (४:१:६), आरक्षण (४:३) इत्यादी.

यानंतर आठव्या प्रकरणातील माहेरची, सासरची मालमत्ता, पोटगी, दत्तक विधान, पालकत्त्व यासंबंधी काही तरतुदी आहेत. येथेही पुन्हा एकदा कात्री आणि डिंकाचा प्रयोग झाल्याने एक भयानक चूक घडली आहे ती साऱ्या महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचा अनभ्यस्तपणा सिद्ध करण्यास पुरेशी आहे. चौथ्या प्रकरणात काही बाबतीत स्त्रियांना पतीच्या मालमत्तेत आपोआप सहभाग मिळावा अशी तरतूद करण्यात आली आहे. पुढे केंद्र शासनास स्त्रियांना समान हक्क मिळण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याची विनंती करण्यात यावी असा प्रस्ताव आहे (८:४).

लगेचच नंतर, महाराष्ट्र राज्यामध्ये हिंदू वारसा कायद्यात सुधारणा करून जन्मजात हक्क म्हणून मालमत्तेत समान अधिकार देण्याची योजना आहे. एवढेच नव्हे तर, महाराष्ट्र शासनाने याविषयी एक कायदाही पास करून टाकला आहे.

माहेरच्या संपत्तीत मुलीस जन्मजात हक्क दिला आणि त्याबरोबरच पतीच्या



मालमत्तेत तिला स्वयंभू हक्क देण्यात आले तर काही विशेष तरतुदी करणे आवश्यक होते. माहेरून सासरी जाताना माहेरचा हिस्सा सोडवून कसा घ्यावा, तो मुलीने सासरी कसा न्यावा आणि सासरीही विभाजनाची वेळ आली तर सासरकडील हिस्सा कसा सोडवून घ्यावा हा एक मोठा जटिल आणि नाजूक विषय आहे. हा सोडविण्यासाठी पैतृक आणि स्वकष्टार्जित मालमत्ता इत्यादी संकल्पना बदलाव्या लागतील. एवढेच नव्हे तर, आजच्या कुटुंबव्यवस्थेचे स्वरूप बदलून तिला भागीदारीचे रूप द्यावे लागेल. त्याचबरोबरच स्त्रीधनाची कल्पनाही रद्द ठरवावी लागेल. आईबापांच्या वृद्धापकाळातील प्रतिपालनाविषयी जबाबदारीची फेरवाटणी करावी लागेल. या प्रश्नांवर विद्वानांत कायदेतज्ज्ञांत, लोकसभेत आणि घटना समितीत प्रदीर्घ चर्चा होऊनदेखील काही निश्चित निष्कर्ष निघालेले नाहीत. महाराष्ट्र शासनाला या विषयावर एकदम काही 'दिव्यज्ञान' प्राप्त झाल्याचा भास झाला आणि घाईगर्दीने त्यांनी कायदा पासही केला. 'जेथे देवदूत पाऊल ठेवण्यास घाबरतात तेथे विदूषक बिनदिक्कत जातात' ही म्हण काही खोटी नाही.

स्त्रियांचा आर्थिक दर्जा सुधारण्याकरिता अनेक योजनांची गर्दी प्रकरण ४, ७, ८ आणि ९ मध्ये आहे. त्यांत शहरात घरकाम करणाऱ्या स्त्रियांचा केवळ उल्लेख आहे. बाकी बहुतेक योजना संघटित नोकरदार स्त्रियांसाठी आणि स्वयंरोजगारी उद्योजक स्त्रियांसाठी आहे. अशा योजनांची रेलचेल सर्वसाधारण सरकारी धोरणांच्या दस्तावेजात असतेच. असल्या योजनांचा काही फायदा आजपर्यंत पुरुष वर्गाला झाल्याचेही लक्षण नाही. या दस्ताऐवजातील योजनांच्या थप्पीने स्त्रियांच्या जीवनात काही फरक पडेल अशी आशा बाळगण्याचे काही कारण नाही. प्रकरण (६) मध्ये स्त्रियांवरील अत्याचारांचे निर्मूलन करण्यासाठी संयुक्त संवर्ग, महिला पोलिस भरती, महिला ठाणी, महिला प्रमुख फिरती सुरक्षा पथके, इतकेच नव्हे तर प्रत्येक ठाण्यात ठेवायच्या स्वतंत्र गुन्हे नोंदवहीचाही समावेश आहे. पोलिस मुख्यालयाकडून लिहून परिच्छेद जसेच्या तसे, तेथे चिकटवण्यात आलेले आहेत हे सहज दिसून येते. वस्तुस्थिती अशी आहे. आहे ती पोलिस व्यवस्था पुरुषांनासुद्धा सुरक्षित वाटत नाही. तेव्हा समांतर पोलिस यंत्रणा तयार करून स्त्रियांवरील अत्याचार कमी कसे होतील हे महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणाचे शिल्पकारच जाणोत !

### महिलादृष्टीच्या योजना

सिद्धांत, सूत्रबद्धता आणि ऐतिहासिक अनुभव या सर्व कसोट्यांवर महाराष्ट्र शासनाचे धोरण अनुत्तीर्ण होते. बहुतांशाने, त्यांत मांडलेले वा सुचविलेले

कार्यक्रम निरर्थक किंवा अनभ्यस्त आहेत याचा आढावा इतरत्र घेण्यात आला आहे. पण या दस्तावेजात काही नव्या आकर्षक कल्पनांचे कणबिंदूही आहेत.

महिलांच्या दृष्टिकोनातून स्वच्छता, पाणीपुरवठा, इंधन या प्रश्नांना प्राधान्य देणे (४:८), अंगणवाडी व शाळा यांची जोड लावून मुलींना आपल्या धाकट्या भावंडास सांभाळता सांभाळता अभ्यासक्रम पुरा करता यावा (१५:४), कायम स्वरूपी नोकरी स्त्रियांवर अन्याय करणारी असल्यामुळे त्याज्य ठरवणे (९:४:१), शहरी रोजगार हमी योजना (९:६:१३) यांचा सन्मानपूर्वक उल्लेख आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील विकासाच्या धाटणीमुळे गावांतील निवासी शिक्षक ही संस्था संपुष्टात आली. निवासी शिक्षक-शिक्षिकांमुळे दुसऱ्या गावांतील शाळेत जाऊ न शकणाऱ्या मुलींच्या शिक्षणाची थोडीफार सोय होत असे. जीवन विद्या/शिक्षण मंदिरांमुळे शिक्षक कामापुरता गावात येऊ लागला. गावातला शिक्षक इतरत्र शाळेत जात असल्याने गावच्या मुलामुलींच्या शिक्षणाशी त्याचा संबंध तुटला. स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने हा मोठा आघात झाला. गावांतील शिक्षक निवासी असले पाहिजेत. अशीही सूचना या धोरणात केली असती तर परिच्छेद (९:४:२), (९:४:३), (९:४:४) च्या भूमिकेस धरून झाले असते.

**अनाहूत विनोद**

या धोरणात काही अनाहूत आणि अहेतुक विनोद घडले आहेत. पहिल्या नमनालाच, प्रस्तावनेत 'महाराष्ट्रातील काही ज्ञात आणि असंख्य अज्ञात स्त्रियांनी ज्यांनी नेहमीच बाजूला राहून आगेकूच करण्याची संधी दिली' त्यांचा उल्लेख आहे. म्हणजे सर्व स्त्रियांचा मागासलेपणा स्त्रियांनी आपणहून पुरुषांना वाव देण्याकरिता स्वीकारला आहे अशी उपपत्ती लावल्यानंतर पुढच्या साऱ्या मजकुराचे काही प्रयोजन राहत नाही. याखेरीज, मानसिक समता (३:१), आत्मिक फुलोरा (६:१) असे शब्दप्रयोग आहेत. शहरी स्त्री आर्थिक बाबतीत 'अधिक आक्रमक' असल्याचे सांगितले आहे म्हणजे काय ते लेखक जाणे.

शहरीकरणाच्या स्त्रियांवर होणाऱ्या परिणामाविषयी विस्ताराने उल्लेख आहे (६:३) आणि हे शहरीकरण औद्योगिकीकरण आणि दळणवळण यंत्रणेची वाढ यांच्यामुळे झाले आहे असे म्हटले आहे. स्त्रियांवरील विपरीत परिणाम शहरीकरणामुळे झालेले नसून असंतुलित विकासामुळे उद्‌भवलेल्या बकालीकरणामुळे आहे याचा कबुलीजबात दस्तावेजात नाही, याचे कारण समजणे कठीण नाही.

**दारू दुकानबंदीचे रामायण**

महाराष्ट्र राज्यात अंतुल्यांच्या काळापासून पुढाऱ्यांना दारूच्या दुकानांचे मक्ते आणि गुत्ते देण्यात आले आहेत.अशी दुकाने बंद करावीत, कारण दारूबरोबर तेथे गुंडपुंडाचे अड्डेही बनले आहेत अशी मागणी अनेक महिला संघटना करीत आहेत. महिलांनी बंद पाडलेली दुकाने शासन आणि पोलिस पुन्हा उघडून देताहेत. कोणत्याही ग्रामसभेने ठराव केल्यास त्या गावातील दारूचे दुकान बंद करण्यात येईल असे शासनाचे धोरण मुख्यमंत्र्यांनी वारंवार जाहीर केले आहे. शेकडो गावांत ग्रामसभांनी असे ठराव मंजूर केले आहेत आणि मुख्यमंत्र्यांच्या आसपासच्या अनेक मंडळींच्या दुकानांवर गंडांतर आले आहे. ग्रामसभेच्या ठरावाच्या आधाराने दुकाने बंद होत नाहीत. ठराव एकमताने झाला पाहिजे असा आग्रह खुद्द अधिकारीच धरतात. या प्रश्नावरही मुख्यमंत्री कचाट्यात सापडले आहेत. महिला धोरणाच्या निमित्ताने यातून अलगद सुटका करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. दारूची दुकाने बंद करण्यासंबंधी ग्रामसभेतील ७५ % महिला सदस्यांनी मत दिल्यास दुकाने बंद करण्याची शासन त्यांना खात्री देईल, असे धोरणात म्हटले आहे. दुकाने बंद करण्यासंबंधी सरकारने पाऊल मागे घेतले आहे, एवढेच नाही तर ग्रामसभेच्या एका विशेष प्रकारच्या निर्णयाला तीन चतुर्थांश स्त्रियांची संमती असली पाहिले असला, पंचायती राज्य कायद्याशी विसंगत प्रकार सांगण्यात आला आहे.

जसजसे दिवस जातील तसतसे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नवनवीन घोषणा करीत आहेत. टक्केवारीचा आकडा आता ६० पर्यंत उतरविण्यात आला आहे. याउलट, दारू दुकानबंदीची योजना शहरातही लागू करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी देऊन टाकले आहे. मुख्यमंत्र्यांनी आश्वासने देत पुढे जायचे आणि त्यांच्या पोलिसांनी मात्र दुकाने बंद करण्याची मागणी करणाऱ्या महिलांवर बेछूट लाठी चालवायची असा कारभार महाराष्ट्रात चालू आहे. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण हा स्त्रीमुक्तीचा गंभीर दस्तावेज नाही, जवळ येणाऱ्या निवडणुकांच्या राजकारणातील खेळीचा तो एक भाग आहे हे स्पष्ट होते.

**राज्य महिला आयोग**

महिला आयोगाच्या निर्मितीची अवस्थाही अशीच आहे. आयोगाच्या निर्मितीसंबंधीचे सारे विधेयकच स्त्री-प्रश्नांच्या कालबाह्य आणि एकांगी संकल्पनांवर आधारलेले. स्त्रियांवरील वैयक्तिक अन्यायाच्या प्रकरणांना अवास्तव महत्त्व दिले गेल्यामुळे आयोगाला दिवाणी न्यायालयाचे स्वरूप येत आहे आणि या कामातच आयोग अडकून पडत आहे. सदस्यांच्या नेमणुका उघड उघड राजकीय हेतूने झाल्या आहेत. एखादा अपवाद वगळता आयोगाच्या नियुक्त सदस्यांना प्रश्नांची जाण वा आंदोलनाचा अनुभव नसल्यात जमा आहे.

महिला आयोग एक सरकारी खाते होणार, एवढेच नव्हे तर, व्यक्तिश: सदस्य सत्ताधारी पक्षाच्या दडपणाखाली राहणार आहेत. सत्ताधारी पक्ष बदलला, दुसऱ्या कोणा पक्षाचे शासन आले आणि त्याने आयोगाची फेररचना स्वत:च्या राजकीय दृष्टिकोनातून केली तर महिला आयोग राजकीय खेळातील प्यादे बनेल.

महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणात आणि महिला आयोगाच्या कार्यालयात साऱ्या महिला चळवळीचे सरकारीकरण करण्याचा घाट घालता आहे. महिला संघटनांची नोंदणी करण्याचा, एवढेच नव्हे तर, नोंदणी रद्द करण्याचा अधिकार आयोगाने स्वत:कडे घेतला आहे. महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणातील परिच्छेद (२:२), (३:३), (४:७) आणि प्रकरण ११ ही महिला आंदोलनावर ताबा मिळवण्याच्या प्रयत्नांची काही उदाहरणे होत.

**नियंत्रण व मूल्यमापन**

नियंत्रण व मूल्यमापन या उद्देशासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती, विभागपातळीवर नियंत्रण समिती, जिल्हा पातळीवर महिला आणि बालविकास समिती अशी मोठी भरभक्कम यंत्रणा मांडली जात आहे. या यंत्रणेत सरकारी अधिकारी, लोकनियुक्त प्रतिनिधी, शिवाय स्वयंसेवी प्रतिनिधींचाही अंतर्भाव होणार आहे. या स्वरूपाच्या समित्यांचा आजपर्यंतचा अनुभव त्यात चर्चेच्या गुऱ्हाळाखेरीज काहीही निष्पन्न होणार नाही असा आहे.

नियंत्रण व मूल्यमापनव्यवस्था परिणामकारक व्हावी यासाठी काही निश्चित यशापयशांच्या फूटपट्ट्या मूळ धोरणातच घालून देणे आवश्यक होते. धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट आकड्यांत मांडली असती तर मूल्यमापनाला काही पाया तयार झाला असता.

अत्याचारनिर्मूलन, आर्थिक दर्जा सुधारणे, सत्तेत सहभाग अशा क्षेत्रांत काही किमान अपेक्षा ठरवून देणेही उचित झाले असते. महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण एका मर्यादेवर राहिले तर धोरण अपशयी ठरले आहे अशी मान्यता देण्याची तरतूद मूल्यमापन व्यवस्थेत पाहिजे.

**पंचायत राज्यात महिला**

शेतकरी महिला आघाडीने पंचायत राज्यातील सर्व जागा लढवण्याचा निर्णय नोव्हेंबर १९८६ मध्येच जाहीर केला होता. ३०% जागा महिलांकरिता राखीव ठेवण्याच्या कल्पनेचा मूळ उगम शेतकरी महिला आघाडीच्या निर्णयात आहे. राखीव जागांच्या योजनेचा अनुभव फारसा आनंददायी नाही. या योजनेत स्त्रियांच्या प्रतिनिधी पंचायत राज्य संस्थेत गेल्या नाहीत, प्रस्थापित पुढाऱ्यांच्या



संबंधी महिला त्या जागी बसल्या; प्रत्यक्ष कारभार घरच्या पुरुषांकडेच राहिला. ३०% जागा राखीव जागा झाल्यामुळे कोणीही नवी चेतना महिला आंदोलनात आलेली नाही. स्त्रियांमधील काही व्यक्तींना पुरुषसत्तेत सामावून घेतले म्हणजे स्त्रियांच्या हाती सत्ता आली असे होत नाही.

३०% जागा राखीव आणि राखीव मतदारसंघ पाळीपाळीने बदलायचे या योजनेमुळे पंचायत राज्य संस्थेचे नुकसान होत आहे. कोणाही सदस्यास किंवा कार्यकर्त्यास एखाद्या मतदारसंघात पुढील निवडणुकीकडे लक्ष ठेवून काम करणे आकर्षक वाटत नाही. या साऱ्या गोंधळामुळे स्त्रियांच्या चळवळीविषयी जनमत काहीसे कलुषितच झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणात मात्र पंचायत राज्यातील राखीव जागा म्हणजे स्त्री-प्रगतीचा मोठा टप्पा असे मांडण्यात आले आहे.

**निष्कर्ष**

स्त्री-मुक्ती आंदोलनाने काय मिळवले काय गमवले यावर मतभेद असू शकतील; परंतु या आंदोलनाने वैचारिक जगास जे प्रचंड योगदान दिले ते कोणी नाकारू शकणार नाही. 'एंगल्स'चा 'स्त्री-दास्याचा सिद्धांत' वर्षानुवर्षे सर्वमान्य होता. महिला आंदोलनाने तो रद्दबातल ठरवला, वर्गविग्रहाच्या सिद्धांतालाच सुरुंग लावला. साम्यवादी दृष्टिकोनाला शेतकरी विचारइतकेच स्त्रीमुक्तीच्या विचाराने कालबाह्य ठरवले आहे. आंदोलने अनेक झाली, त्याबरोबर महिला विचारवंतांनी व्यासंग, अभ्यास, अनुभवांची तरलता आणि प्रतिभेची झेप दाखविली. त्यानेच स्त्रिया पुरुषांपेक्षा, असल्या तर कांकणभर सरसच आहेत हे स्पष्ट दाखवून दिले.

या अशा भारदस्त क्षेत्रात शासनाने विनाकारण हस्तक्षेप करावा आणि महिला चळवळीच्या विचार प्रगल्भतेच्या परंपरेस डाग लावण्याचा प्रयत्न करावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. स्त्री चळवळी संबंधीच्या साहित्याच्या पैठणीस महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण ही लागलेली दळभद्री चिंधी आहे. निवडणूक संपली की त्याची आठवणही कोणाला होणार नाही. असल्या दस्ताऐवजावर टीकाटिप्पणी करून त्याची दखल घेण्यात महिला कार्यकर्त्यांना आणि संघटनांना वेळ घालवावा लागतो हेच मोठे दुर्भाग्य आहे.

*(महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण-दळभद्री चिंधी,*
*शेतकरी प्रकाशन, १२ नोव्हेंबर १९९४ )*

■■

सहा

## बेजिंग परिषदेचा अर्थ आणि इशारा

**प्रास्ताविक**

बेजिंग येथे १९९५ च्या सप्टेंबर महिन्यात चौथी जागतिक महिला परिषद भरली. या परिषदेकडे एरवी कोणाचेही लक्ष गेले नसते. पण अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या पत्नी हिलरी क्लिंटन परिषदेस हजर राहिल्या आणि आपल्या भाषणात त्यांनी चीनमधील मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या प्रश्नावर बरीच धूळ उडवली; शिवाय चिनी अधिकाऱ्यांनी गैरसरकारी संघटनांची महिला परिषद बेजिंगहून हलवून ५० कि.मी. दूर असलेले हुयारू या गावी नेली आणि तेथील व्यवस्थेत खूप गोंधळ माजवला. यामुळे बेजिंग परिषदेची प्रसिद्धी झाली. बेजिंगमध्ये मोठ्या थाटामाटात अधिकृत सरकारी परिषदेने जाहीर केलेले 'कृतिपीठ' किंवा गैरसरकारी संघटनांच्या परिषदेने तयार केलेले 'घोषणापत्र' याकडे सर्वांनी दुर्लक्षच केले; त्यावर काहीही चर्चा घडलीच नाही. जणू काही सर्वसाधारणपणे अशी काही परिषद झाली याची जाणीवच कोणाला नव्हती किंवा तेथील चर्चा आणि ठराव याकडे लक्ष देण्यात काहीही अर्थ नाही अशी सर्वसाधारण धारणा असावी. मधून मधून स्त्रियांना 'तोंडाची वाफ' मोकळी करण्याची संधी जागतिक परिषदेच्या प्रकाशझोतात मिळाली म्हणजे बरे असते! आता त्या पुढील परिषदेपर्यंत गप्प राहतील.'' अशी जगातील जाणत्यांची या परिषदेविषयी भावना असावी.

बेजिंग येथील परिषद ही जागतिक महिलांची चौथी परिषद. पहिल्या परिषदेपासून आजपर्यंत महिला चळवळीची आणि महिलांचीही सतत पीछेहाट होते आहे असे वाटते. १९७५ साली मेक्सिकोत पहिली जागतिक महिला परिषद भरली त्या वेळी आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या तेजोवलयांनी झगमगणाऱ्या महिला नेत्यांचे तारांगण जमले होते. मार्क्सवादी विचारांचा पाया खिळखिळा करून टाकणाऱ्या कार्यकर्त्या, लेखिका, विचारक यांनी मार्क्सवादी



वर्गसिद्धांताचा पायाच उखडून टाकला होता आणि जवळजवळ शंभर वर्षे सर्वमान्य असलेला एंगल्सचा 'स्त्रीप्रश्नाची उपपत्ती आणि सोडवणूक' या संबंधीचा सिद्धांत उधळून लावला होता. अशा स्त्रीस्वातंत्र्याची गर्जना देणाऱ्या या प्रभावी नेत्यांकडे दुर्लक्ष करणे शक्यच नव्हते. ''वैयक्तिक असे काही नाही, सगळे राजकीयच आहे.'' ही त्यांची युद्धघोषणा होती. त्यांच्या प्रभावळीपुढे सरकारी परिषद अगदीच फिकी पडली. कोपनहेगनची परिषद झाली १९८० साली. नैरोबीमध्ये १९८५ साली जेव्हा परिषद भरली तेव्हा परिस्थितीत मोठाच बदल घडला होता. नैरोबी परिषद लक्षात राहिली ती सरकारी परिषदेने जाहीर केलेल्या 'दूरदर्शी रणनीती' या दस्ताऐवजाने. तेव्हापासून सरकारी कार्यक्रम, पाठिंबा आणि वचने मान्यवर स्त्रीचळवळीचे अधिकार बनले. आजपावेतो नैरोबी येथे सरकारी प्रतिनिधींनी दिलेल्या वचनांची पूर्तता झालेली नाही. स्त्रियांविषयीच्या भेदभावाचे निर्मूलन करण्यासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेल्या सनदीला आजपर्यंत नव्वदावर देशांनी मान्यताही दिलेली नाही. पण, म्हणून काय झाले? बेजिंग येथे परिषद भरल्यावर, जुनी वचने अजून अधांतरीच राहिली असता नवीन अधिक व्यापक कार्यक्रम, प्रकल्प आणि घोषणा करण्याची तयारी बेजिंग परिषदेतील मुखंडींनी केली. मनुस्मृतितील वचन आहे–

*पिता रक्षती कौमारे*
*भर्ता रक्षति यौवने*
*रक्षन्ति स्थविरे पुत्रा*
*न स्त्री स्वातन्त्रमर्हति ।*

म्हणजे 'बालपणी पिता, तारुण्यात पती आणि म्हातारपणी पुत्र स्त्रीचे रक्षण करतात, त्यामुळे स्त्री स्वातंत्र्यास अपात्र आहे.' आता बेजिंगी मुखंडींनी नवा आदेश काढला आहे. शासन यापुढे पिता, पती आणि पुत्र या सर्वांनाच दूर करून स्त्रियांचे जिंदगीभर संरक्षण करण्याची जबाबदारी घेणार आहे, कारण स्त्रियांना स्वातंत्र्य नको असते!

बेजिंग येथे जमलेल्या सरकारी प्रतिनिधींनी गैरसरकारी संघटनांच्या महिलांनी केलेल्या घोषणापत्राचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला आणि सरकारी आधाराने महिलांचे सक्षमीकरण करण्याची योजना स्वत:चे खच्चीकरण टाळण्याकरिता स्वीकारली. बेजिंगमधील महिला मुखंडी सरकारच्या बुडणाऱ्या गलबताकडे पोहोण्यास त्वरेने सज्ज झाल्या.

**सरकारचे बुडते तारू वाचवावे कसे?**

लायसन्स-परमिटांचे राज्य स्थापन करून त्याच्या नियोजनाची कर्तृम्-

अकर्तृम् सुलतानी सत्ता शासनाच्या हाती दिली की केवळ अर्थकारणावरच नव्हे तर समाजावर आणि राजकारणावरही भयानक अरिष्टे कोसळतात याबद्दल आता जगातील सर्व देशांत जवळजवळ एकमत आहे. बाजारपेठेवर आधारित व्यवस्थेला पर्याय नाही हेही तितकेच सर्वमान्य आहे. मतभेद असला तर तो फक्त आर्थिक सुधारणांच्या गतीबद्दल आणि कार्यक्रमाबद्दल आहे.

तरीही, जुन्या व्यवस्थेत ज्यांची पोळी पिकली असा एक छोटा समाज अर्थव्यवस्थेवरील बंधने दूर करण्याच्या प्रयत्नांना विविध मार्गांनी येन-केन प्रकारेण विरोध करत आहे. या विरोधकांचा हेतू उघड आहे. त्यामुळेच सरकारी नोकरवर्ग, संघटित कामगार, काळाबाजारवाले, तस्कर, राजकीय नेते हे सर्व कृतनिश्चय होऊन उद्योजकतेला वाव देणाऱ्या आणि शासनाची सत्ता कमी करण्याच्या कार्यक्रमास विरोध करीत आहे. त्यांनी स्वत:च अर्धशतकभर दारिद्र्याने पीडलेल्या आणि अन्यायाने नाडलेल्या समाजाबद्दल त्यांना अचानक पान्हा फुटला आहे.

आता त्यांचा राष्ट्राभिमान उफाळून आला आहे आणि स्वदेशीच्या नावाखाली देशातील मक्तेदार कारखानदारांचे समर्थन करण्यास ते पुढे सरसावले आहेत.

खुलीकरणाच्या विरोधकांना अलीकडे एक नवा साक्षीदार मिळाला आहे. सरकारच्या माध्यमातूनच काय तो देशांचा विकास घडून येणार आणि आपापल्या देशात असे कार्यक्रम राबविणाऱ्या देशांचा समन्वय घडवण्याचे संयुक्त काम राष्ट्रसंघाचे आहे अशा समजुतीचा एक जमाना दुसऱ्या महायुद्धापासून होऊन गेला. त्या काळात संयुक्त राष्ट्रसंघामध्ये अनेक संस्था, खाती आणि पीठे स्थापन झाली. तेथील नोकरदारांना मोठी चिंता पडली आहे. सरकारचेच खच्चीकरण झाले तर मग संयुक्त राष्ट्रसंघाच्या झेंड्याखाली समन्वय करण्याचे प्रयोजनच काय उरणार? आणि मग आपले सारे साम्राज्यतनखे, भत्ते, ऐषाराम यांचे काय होणार?

'केवळ खासगी क्षेत्रावर आणि उद्योजकांवर भरवसा ठेवून भागणार नाही. सातत्याने आर्थिक भरभराट व्हावी अशी इच्छा असेल तर विकास कार्यक्रमांची सगळी सूत्रे सरकारच्या हाती असली पाहिजेत.' अशा घोषणांनी आजपर्यंत त्यांचे भले झाले. आता हा सर्व सिद्धांतच खोटा ठरला आहे. त्यामुळे ही मंडळी पर्यावरणाचा बचाव, लोकसंख्येचा प्रश्न आणि स्त्रीमुक्ती अशा तऱ्हेची व्यापक वाटणारी नकली तत्त्वज्ञाने शोधण्यात गर्क झाली आहेत. रिओ-द-जानेरो (१९९२) येथे पर्यावरणाचा बागुलबुवा उभा करण्यात आला; कैरो (१९९४) परिषदेत 'संपन्नता आली म्हणजे लोकसंख्यावाढीची गती आपोआप



आटोक्यात येते' या इतिहाससिद्ध अनुभवाला डावलण्यात येऊन लोकसंख्या आटोक्यात ठेवण्याच्या कार्यक्रमाची सूत्रेही सरकारच्या हाती देण्यात आली. सामाजिक विकासासाठी सरकारांनीच प्राधान्याने पुढे आले पाहिजे असे कोपनहेगनच्या (१९९५) परिषदेत सांगण्यात आले. बेजिंग येथील जागतिक महिला परिषदेत आता याच 'गवश्या' कार्यक्रमासाठी 'हौसे आणि नवसे' एकत्र आले.

बेजिंगच्या घोषणापत्रासाठी एकच हितसंबंध असलेले तीन गट एकत्र आले आणि या तिघांचे हे कारस्थान आहे हे स्पष्ट होते. संयुक्त राष्ट्रसंघातील नोकरशहा परिषदेच्या सचिवालयाच्या रूपाने बेजिंग येथे उपस्थित होते. होयारू येथे, बेजिंगपासून पन्नास किलोमीटर दूर गैरसरकारी संघटनांच्या महिला प्रतिनिधी डेरेदाखल झाल्या होत्या आणि सरकारांचे अधिकृत प्रतिनिधी आणि मंत्री अनधिकृत परिषदेस उपस्थित होते. या तिघांनाही सरकारी नोकरशाही आणि सत्ता वाढवण्यात स्वारस्य होते आणि त्यामुळेच बेजिंग दस्तावेजांच्या निमित्ताने त्यांनी शासनांच्या हाती कोलित दिले.

'नोकरदारांची संख्या वाढली की त्यांचे कामही आपोआप वाढत जाते' हा पार्किन्सनने प्रसिद्ध केलेला सिद्धांत. संयुक्त राष्ट्रसंघाची बांधणी गेली कित्येक दशके या सिद्धांतानुसारच होत आहे. इस्पितळ चालवण्यासाठी रोगी दाखल होण्याची गरज आहे हे त्यांना मान्य नाही. इस्पितळातील नोकरवर्ग एकमेकांना पगारभत्त्यांचे काम पुरवून सर्व वेळ कामात व्यग्र राहू शकतो अशी त्यांची मनोधारणा आहे. अशा धारणेनेच संयुक्त राष्ट्रसंघातील संस्था स्थापन केल्या जातात आणि चालवल्या जातात.

बेजिंगमध्ये गैरसरकारी संस्थांच्या परिषदांकरिता जमलेल्या स्त्रियांची स्थितीही अशीच. मेक्सिकोमध्ये जमलेल्या स्वयंसिद्धा, बुद्धिमान, कर्तृत्वशाली स्त्रीप्रतिनिधींचा येथे मागमूसही नाही. आता जमल्या होत्या पगारदार, नोकरदार स्त्रिया आणि सरकारी किंवा देशीपरदेशी संस्थांकडून निधी मिळवून त्यातून स्त्रीमुक्तीच्या नावाने कार्यक्रम चालवून उदरंभरण करणाऱ्या. बेजिंग येथील या महिला प्रतिनिधींना आपोआपच दुय्यम स्थान मिळाले आणि सर्व प्रकाशझोत सरकारी परिषदेकडे वळाला. याबद्दल महिलांना तक्रार करणेही शक्य नव्हते. महिला प्रतिनिधी तेथे जमल्या त्याच मुळी सरकारी कृपादृष्टीमुळे. त्यांतील बहुतेकांच्या बाबतीत त्यांचे कार्यक्रम पुढे चालणे, न चालणे हे त्यांच्या त्यांच्या सरकारांच्या मेहरनजरेवरच अवलंबून होते.

स्त्रीचळवळीविषयीची जुनी निष्ठा संपली आणि आता गैरसरकारी स्त्रियांच्या

संघटना म्हणजे सरकारी यंत्रणेच्याच प्रतिकृती बनल्या आहेत. नोकरशाही, फालतू खर्च, नासधूस, अकार्यक्षमता, विशेष ज्ञानाचा अभाव - सगळे काही. सरकारांना कर गोळा करता येतो. तसे अधिकार या संस्थांना नाहीत म्हणून पैशासाठी सरकारांकडे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडे आशाळभूतपणे पाहावे लागते एवढीच काय ती कमतरता. सरकारांचे खच्चीकरण झाले की गैरसरकारी संघटनांचा कारभारच आटोपला! जगातील सर्व सरकारांच्या नेत्यांना हे कळून चुकले आहे की सरकारशाहीचा सुवर्णकाळ संपला आहे. आज ना उद्या त्यांना आर्थिक सत्ता सोडावी लागणार आहे. लोकांच्या भोळसटपणावर आणि लालचीपणावर त्यांचा पुरेसा विश्वास आहे. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सामाजिक सुरक्षा, स्त्रिया, स्वदेशी असल्या कार्यक्रमांच्या घोषणा देऊन लोकांना अजून काही काळ बनवता येईल आणि सरकारचे संस्थान थाटात चालू ठेवता येईल अशी त्यांची खात्री आहे.

सरकारी आणि गैरसरकारी तबेल्यांतील मुखंडींच्याही हे ध्यानात आले की अशा आर्थिक सुधारणा झाल्या तर स्त्रियांचे काय भलेबुरे व्हायचे असेल ते होवो, पण त्यांची सर्व जीवनशैलीच धोक्यात येईल आणि याच कारणाने त्यांनी खुलीकरणाला विरोध करण्यासाठी कमरा कसल्या. बरोबरीने स्त्रियांच्या चळवळीचा झेंडा उभारला तर आपला कारभारही व्यवस्थित चालू शकतो याची जाणीव काही चलाख नेत्यांनाही झाली. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने काही वर्षांपूर्वी जाहीर केलेले महिला धोरण हा याच प्रकारचा एक खास नमुना.

**समांतर संयुक्त राष्ट्रसंघ**

या तीनही साथीदारांनी पुरेसा संयम दाखवला असता आणि त्यांचे कारस्थान थोडा आब राखून पार पाडले असते तर त्यांचा डाव साधलाही गेला असता. त्यांच्या दुर्दैवाने आणि जगातील सर्व स्त्रियांच्या सुदैवाने तिघांनीही स्वार्थ साधण्याच्या अट्टाहासाने अतिरेक केला आणि सारेच काही गट्टम करण्याचा प्रयत्न केला आणि तेथे त्यांचा डाव हुकला.

बेजिंगमध्ये जमलेल्या प्रतिनिधींनी त्यांच्या विषयपत्रिकेवर जगामधील यच्चयावत विषय घेतले आणि त्यावर विचार करण्याचा, एवढेच नव्हे तर निर्णय घेण्याचाही आपल्याला अधिकार आहे असे गृहीत धरले. गरिबी, विषमता, अन्याय, बेकारी, पर्यावरण विनाशी विकास, युद्ध, लिंगवाद, वंशवाद, वंशविद्वेष, मनुष्यविद्वेष, स्त्रियांविषयीचा भेदभाव आणि अत्याचार हे सगळेच विषय त्यांनी आपल्या कक्षेतील मानले. लष्करी खर्च किती असावा, जागतिक



व्यापार संघटनेने काम कसे करावे, आरोग्य, शिक्षण, आंतरराष्ट्रीय संघटनांचे कामकाज, कामगारांच्या कामांसंबंधी नियम, धोक्याच्या मादक, स्फोटक, किरणोत्सर्गी वस्तूंची आंतरराष्ट्रीय तस्करी, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा शांततेकरिता उपयोग, बौद्धिक संपदांचा हक्क, राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिशेबाची पद्धत, विकासाच्या वेगवेगळ्या औषधोपचार पद्धतींचे गुणावगुण, एड्स रोग, मुलांची शिक्षणपद्धती इत्यादी इत्यादी आणि कितीतरी. या सर्वांवर बोलण्याचा आणि त्याबद्दल शिफारशी करण्याचा आपला अधिकार आहे असा समज त्यांनी करून घेतला. सरकारी प्रतिनिधीही थोडेच कमी पडणार? त्यांनीही आणखी काही विषय पत्रिकेवर वाढवले आणि सहभागी कुटुंब आणि बेजिंगमधील मंजूर कार्यक्रमासाठी आवश्यक ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साधनसंपत्ती यावरही ठराव केले.

**महिलांचा प्रश्न**

पहिला प्रश्न उभा राहातो तो हा, की स्त्रियांच्या बैठकी, परिषदा, संमेलने जेव्हा जेव्हा होतात तेव्हा त्यांच्या विषयपत्रिकेवरील प्रश्नांचे स्वरूप काय असले पाहिजे आणि महिला धोरणांची व्याप्ती काय असावी?

महिला चळवळीचा मंच हा काही जगातील यच्चयावत प्रश्न, अगदी इतर अनुभवी तज्ज्ञ संस्थांनी निर्णय घेतलेले किंवा घेण्याचे प्रश्नसुद्धा उघडण्याचा आखाडा नव्हे. उदाहरणार्थ, शहरातील स्त्रिया दुपारी घरी असल्या म्हणजे पुष्कळ वेळ टेलिफोनवर निरर्थक बोलत राहातात. त्यांच्या टेलिफोन संभाषणाला त्या वेळी चालू असलेल्या, व्यापारी, औद्योगिक, प्रशासकीय संभाषणांना लागू असलेलाच दर लावणे योग्य नाही आणि असे मत संमेलनातील शहरी स्त्रियांचे असणे साहजिक आहे. पण, या प्रश्नावरचा निर्णय हा देशातील आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर (तार) दूरसंचार योजनेच्या मान्यवर संस्थांनी हाताळण्याचा आहे, स्त्रियांची परिषद ही कितीही व्यापक आणि जागतिक असली तरी त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार त्या परिषदेला नाही. स्त्रीपरिषदांचा आणि संमेलनांचा वापर सर्वसाधारण भले आणि स्त्रियांचे भले यांची दिशा आणि अंश यांत जेथे फरक पडतो अशा विषयांच्या/प्रश्नांच्या अभ्यासासाठी झाला पाहिजे. पंजाबात अलीकडे उत्पन्नाची वाढ झाली पण त्यामुळे स्त्रियांचा दर्जा सुधारण्याऐवजी तो खालावला. यंत्रांचा वापर वाढला, पण त्याचा पुरुषांना जितका फायदा झाला तितका स्त्रियांना झाला नाही. अशा प्रश्नांवर महिला मंचांनी विशेष लक्ष दिले पाहिजे. अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याने मुखंडींचा स्वार्थ कदाचित साधत असेल; स्त्रियांचे भले होण्याची काहीही शक्यता नाही.

स्त्रियांचा प्रश्न थोडक्यात काय आहे? जैविक शास्त्राच्या दृष्टीने किंवा मानसशास्त्राच्या दृष्टीनेही पाहिले तर स्त्री-पुरुषभेद हा अंशात्मक असतो, गुणात्मक नाही. परंतु, समाजातील श्रमविभागणी मात्र हा गुणवत्तेचा भेद असल्याचे धरून केली जाते. त्यामुळे साहजिकच अनेक स्त्रिया त्यांची सार्वत्रिक कर्तबगारी कोंडून ठेवून चूल आणि मूल या चक्रात अडकतात तर ऋजू स्वभावाचे अनेक पुरुष विनाकारणच पुरुषी समजल्या जाणाऱ्या रौद्र कामात जन्मभर अडकून राहतात. अशी विभागणी शरीररचनेच्या आधारेने झाली. पुरुष बाहेरील कामासाठी जास्त सशक्त असल्यामुळे स्त्रियांकडे घरकाम आले अशी उपपत्ती एंगल्स्ने मांडली. आज ही गोष्ट हास्यास्पद वाटत असेल तरी, विश्वास ठेवा किंवा ठेवू नका, त्यांनी ठाम सिद्धांत मांडला की, 'समाजवादी व्यवस्थेत सर्व मालत्तेचे राष्ट्रीयीकरण झाले आणि सर्वच पाळणाघरे व सार्वजनिक स्वयंपाकघरे तयार झाली म्हणजेच स्त्रियांची चूलमूल या कैदखान्यातून सुटका होईल.'

लिंगभेदावर आधारलेल्या श्रमविभागणीची साधीसोपी उपपत्ती सांगता येईल.

पुरुषांनी हाती तलवार घेतली म्हणून स्त्रियांकडे उरलेले घरकाम आले. पुरुषांनी तलवार घेतली ती त्यांच्या शारीरिक सामर्थ्यामुळे नाही. लुटालुटीच्या एका कालखंडामध्ये लुटारूंच्या झुंडी अन्न, संपत्ती आणि स्त्रिया पळवून नेत; टोळ्यांची लोकसंख्या वाढवण्याच्या कामी स्त्रियांचा उपयोग होई. याउलट, पुरुष पकडून नेण्यात त्यांना काहीच स्वारस्य नसल्यामुळे त्यांची सरसकट कत्तल होत असे. पुरुषांनी तलवार घेतली ती स्वसंरक्षणासाठी. गाईम्हशींच्या गोठ्यात गोऱ्हे आणि रेडे जन्मताच मारले जातात व कालवडी जन्मल्याचा आनंद साजरा होतो त्यातलाच हा प्रकार.

मग अशी आडमुठी श्रमविभागणी आजपर्यंत चालली कारण सर्वच समाज अशा पुरुषसत्ताक पद्धतीने चालत होता. घरकाम हा निजी मामला होता आणि स्पर्धात्मक बाजारपेठेच्या व्यवस्थेशी गृहकृत्यांचा संबंध येत नव्हता त्यामुळेच ही अशी अजागळ व्यवस्था टिकू शकली. ही व्यवस्था दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्त्रिया आणि पुरुष दोघांनाही आपापल्याआवडी निवडीनुसार कामाची निवड करू देणे. ज्या स्त्रियांना घराबाहेरील काम करण्यात आनंद वाटत असेल किंवा अशी कामे करण्याची ज्यांची विशेष कुवत किंवा कर्तबगारी असेल त्यांनी अशी कामे करण्यात कोणतीही सामाजिक निर्बंधांची अडचण येता कामा नये. पुरुषांनाही परंपरेने त्यांच्या समजल्या जाणाऱ्या रौद्र कामापासून दूर व्हायचे असेल तर तशी मुभा असली पाहिजे. लिंगभेदावर आधारलेली



श्रमविभागणीची व्यवस्था संपवायची असेल तर खुलीकरण हा एकच मार्ग संभवतो. हे लक्षात घेतले तर स्त्रियांची म्हणवणारी जागतिक परिषद खुल्या व्यवस्थेऐवजी नियंत्रित व्यवस्था शिरोधार्य मानते याचे अद्भूत वाटल्याखेरीज राहत नाही.

दुर्दैव असे की साधी, सरळ, सोपी उत्तरे उपद्व्यापी मंडळींना आवडत नाहीत. त्यांना स्वारस्य प्रश्नांची उकल करण्यात नसते, प्रश्नांच्या निमित्ताने स्वतःचे भले करण्याची त्यांची धडपड असते.

खरे म्हटले तर, गरिबांची अपेक्षा एवढीच होती की जगाने त्यांना पायदळी तुडवू नये, त्यांच्या छातीवरून उठावे. पण तरीही 'गरिबी हटाव' च्या निमित्ताने एक मोठा भरभराटीचा जागतिक उद्योगधंदा उभा राहिला. त्यामुळे, 'लोकसंख्या-नियोजनाचा सर्वोत्तम उपाय संपन्नता आहे' हा इतिहासाचा धडा बाजूला ठेवून कैरो परिषदेने कुटुंबनियोजनाची साधने आणि तंत्रे यांच्या प्रचारावर भर दिला. महिला मुखंडींनाही त्यांच्या त्यांच्या संस्थांची आणि कार्यक्रमांची वाढ व्हावी, स्त्रियांच्या हालाखीचे भांडवल करून, अशीच तळमळ दिसते. या कामात त्यांना आता वेगवेगळ्या देशांची सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांचीही साथ मिळाली आहे.

**आकडेमोडीतील हातचलाखी**

सदस्य राष्ट्रांना विकासासाठी मदत करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात एक साहाय्य कार्यक्रम (UNDP) स्थापन करण्यात आला. या संस्थेने बेजिंग परिषदेच्या मुहूर्तावर एक नवी आकडेवारीची मांडणी पेश केली. या मांडणीत तीन नवे निर्देशांक आकडेमोड करून दाखविण्यात आले. सर्वसाधारणपणे, राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा हा कोणत्याही देशाच्या विकासाचे गमक मानले जाते. पण, विकासाचे मोजमाप केवळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधाराने न करता साक्षरता आणि आयुष्यमान हे लक्षात घेऊन विकासाचे मोजमाप केले तर, राष्ट्रीय उत्पन्न जास्त असलेले अनेक देश या मानवी विकास निर्देशांकाप्रमाणे (माविनि) खालच्या पायरीवर येतात. साक्षरता आणि आयुष्यमान हे लक्षात घेतांना पुरुषांची परिस्थिती आणि स्त्रियांची परिस्थिती ही वेगळी तपासली आणि स्त्रियांची साक्षरता व जीवनमान यांच्या आधाराने नारी विकासाचा (नाविनि) एक वेगळा निर्देशांक काढता येईल. याखेरीज, प्रत्येक देशात अधिकाराच्या आणि सत्तेच्या जागांवर असलेल्या महिलांचे प्रमाण किती हे लक्षात घेऊनही स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा एक निर्देशांक (नासनि) बनवता येईल. संयुक्त राष्ट्रसंघाच्या साहाय्य कार्यक्रमाने जेथे जेथे आकडेवारी उपलब्ध होती तेथे तेथे या तीन निर्देशांकांची सिद्धता

करून काही निष्कर्ष मांडले. ते निष्कर्ष गणिती पद्धतीने थोडक्यात असे मांडता येतील.

HDI - Human Development Index - मानवी विकास निर्देशांक - माविनि
GDI - Gender Development Index- नारी विकास निर्देशांक - नाविनि
GEM - Gender Empowerment Measure- नारी सक्षमीकरण निर्देशांक - नासानि

**माविनि नाविनी नासनि इ.इ.**

या आकडेवारीचा खटाटोप करून संयुक्त राष्ट्रसंघाच्या साहाय्य कार्यक्रमाने अक्षरश: डोंगर पोखरून उंदीर काढला आहे. अहवालाचा निष्कर्ष किरकोळ आहे. एवढेच नव्हे तर, अगदी अडाणी माणसालासुद्धा माहीत असलेला असा आहे.

महिला शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांतील त्यांचे मागासलेपण संपवीत आहे. या उलट, इतर सर्व क्षेत्रांत आजही अगदी सुधारलेल्या देशांतही, पुरुषांच्या तुलनेने त्या मागासलेल्या आहेत. या निष्कर्षाबद्दल काहीच वाद नाही. हे निष्कर्ष ज्या पद्धतीने काढण्यात आले ती पद्धत मात्र मान्य होण्यासारखी नाही. ही अशास्त्रीयता चुकीने, निरागसपणे घुसलेली नाही. ही पद्धत बेजिंगमध्ये जमलेल्या साथीदारांच्या स्वार्थाच्या सोयीसोयीने काढण्यात आली.

दोन वेगवेगळ्या जीवनपद्धतींच्या गटांची तुलना करताना ती दोघांपैकी एकाच गटाला लागू असलेल्या मापदंडांनी करण्यात आली. साहाय्य कार्यक्रमाच्या मापदंडांत मातृत्वाचा आनंद, घरामधील सुरक्षा इत्यादि बाबी लक्षात घेतल्या गेल्या असत्या तर पुरुषांचा पुढारलेपणा बराच कमी दिसला असता.

दोन्ही गटांच्या जीवनशैलीस योग्य अशी सर्व गमके आणि मापदंड यांची सर्वंकष यादी तयार झाली तरीसुद्धा एक प्रश्न राहतोच. सत्ता, मिळकत, मालमत्ता यांचे महत्त्व किती आणि मातृत्व, बाजारपेठेपासून अलिप्त राहण्याचे भाग्य यांचे महत्त्व किती? शंभर रुपये मिळकत बरोबर किती वर्षांचे वाढते आयुष्यमान? हे कोणी ठरवायचे? हे ठरवण्यात थोडी जरी चूक झाली किंवा फरक झाला तर निघणारे निष्कर्ष अगदी वेगळे होऊ शकतात. बेजिंगच्या घोषणापत्रात एक वाक्य असे आहे -'आम्ही स्त्रिया जगातील दोन तृतीयांश काम करतो पण आमची मिळकत मात्र पाच टक्केसुद्धा नाही.' अशाच तऱ्हेचे एक विधान नैरोबी परिषदेच्या वेळेसही करण्यात आले होते आणि साहाय्य कार्यक्रमाच्या अहवालातही असेच काही गृहीत धरलेले आहे. या विषयावर काही अनौपचारिक अभ्यास करण्यात आला आणि त्यावरून असे दिसले की ज्या घरात दारू



किंवा इतर व्यसने नाहीत त्या घरात मिळणाऱ्या मालमत्तेतील उपभोगाचे प्रमाण इतके काही विषम नसते.

शेवटी एक प्रश्न राहतोच. स्त्री-पुरुष आणि त्यांचा संसार हा समाजाचा मूलभूत घटक आहे असे मानले तर तो घटक फोडून त्यातील स्त्री व पुरुष वेगवेगळे आहे असे मानून त्यांची तुलना करण्याच्या प्रयत्नांत कितपत अर्थ आहे?

**मुद्दा आहे स्वातंत्र्याच्या कक्षांचा**

थोडक्यात, सर्वसाधारण स्त्रियांच्या आयुष्याची गुणवत्ता ही ज्यांच्या त्यांच्या पुरुषांच्या तुलनेने कमी प्रतीची आहे हे नाकारता येणार नाही. पण, दोघांतील फरक मिळकत, मालमत्ता, सत्ता या मापदंडांनी मोजायला गेले तर अशास्त्रीय गृहीततत्त्वे मान्य करावी लागतात. यासाठी एक प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली चाचणी करण्यात आली. स्त्रिया व पुरुष यांच्या गटांना दोन प्रश्न विचारण्यात आले. पुन्हा जन्म घेण्याची संधी मिळाली तर त्यांना पुरुष होणे आवडेल का स्त्री? आणि दुसरा प्रश्न, किती मिळकत, मालमत्ता किंवा सत्ता दिल्यास आपला निर्णय बदलण्यास ते तयार होतील? प्रश्न विचारलेल्या जवळजवळ सर्वांनीच त्यांना पुरुष-जन्म घेणे आवडेल असे सांगितले. एवढेच नव्हे तर मिळकत, मालमत्ता किंवा सत्ता यांचा कितीही वर्षाव झाला तरी स्त्रीजन्म घेण्याची त्यांची तयारी दिसली नाही. निष्कर्ष असा की साहाय्य कार्यक्रमाने वापरलेले मापदंड हे कुचकामी आहेत.

स्त्री आणि पुरुष यांच्या आयुष्यातील गुणवत्तेचा फरक संपत्तीचा नाही आणि सत्तेचाही नाही. फरक आहे तो स्वातंत्र्याच्या कक्षांचा. पुरुषांशी तुलना करता स्त्रियांना त्यांच्या आयुष्यात निवड करण्याच्या संधी कमी वेळा मिळतात, निवड करण्याची संधी मिळते तेव्हा समोर येणाऱ्या विकल्पांची संख्या कमी असते आणि या विकल्पांचे क्षेत्र पुरुषांच्या तुलनेने अधिक मर्यादित असते. स्त्रियांना गरज आहे ती निवडीच्या स्वातंत्र्याची किंवा स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याची. स्वातंत्र्याची सत्ता, मत्ता इ. बाह्य आणि जुजबी लक्षणे महत्त्वाची नाहीत. स्त्रियांना स्वातंत्र्य हवे आहे, जास्त ऐसपैस सोनेरी पिंजरा ही त्यांची महत्त्वाकांक्षा नाही.

स्त्री-पुरुष भेदावर आधारलेली श्रमविभागणी म्हणजे स्त्री आणि पुरुष हे अगदीच दोन वेगवेगळे प्राणी आहेत, त्यांच्यात समान काहीच नाही, जो स्त्री असतो तो पुरुष नसतो आणि जो पुरुष असतो तो स्त्री नसतो अशा गृहीततत्त्वावर आधारलेली आहे.

प्रत्यक्षामध्ये जीवशास्त्रीय परिस्थिती अशी नाही. स्त्रियांमध्ये आणि पुरुषांमध्ये समानता अधिक, फरक कमी आणि जो फरक आहे तो गुणांचा नसून अंशाचा. स्त्री-पुरुष म्हणजे निव्वळ काळे-पांढरे असे नाही. बहुतेक स्त्री-पुरुष काळे आणि पांढरे यांच्या वेगवेगळ्या छटा घेऊन जन्माला येतात आणि जगतात. श्रमविभागणी करताना काळे-पांढरे पद्धत न वापरता अंशात्मक पद्धती वापरली असती तर त्या श्रमविभागणीमुळे तयार झालेला असंतोष सीमित राहिला असता. उत्तर युरोपातील स्कॅण्डिनेव्हियन देशांतील अभ्यासावरून हे स्पष्ट होते की स्त्रियांप्रमाणेच अनेक पुरुषांनाही त्यांच्यावर लादल्या गेलेल्या भूमिकेच्या कचाट्यातून सुटण्याची इच्छा आहे; निर्णय करण्याचे स्वातंत्र्य मिळाले तर पुरुष आणि स्त्रिया दोघेही आपापल्या विशेष प्रकृतिमानानुसार, आवडीनिवडीनुसार आपापल्या कुटुंबाची रचना आणि दोघांच्याही आवडीनिवडी लक्षात घेणारी श्रमविभागणी करतील आणि ती अशी लवचिक आणि बदलती ठेवतील की त्याचा जाच कोणालाच वाटू नये. सध्याची पुरुषप्राधान्याची कुटुंबव्यवस्था बदलून जाईल आणि विविध रंगाछटांची संसारातील भागीदारांच्या आवडीनिवडी लक्षात घेणारी आणि त्यांच्या इच्छाआकांक्षांना वाव देणाऱ्या कुटुंबपद्धतीची मालिका बहरून येईल. ही अशी उत्क्रांती कार्यक्षमतेचा आग्रह धरणाऱ्या व्यवस्थेतच होऊ शकेल. थोडक्यात, पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्था फक्त खुल्या व्यवस्थेतच विकास पावू शकते आणि या खुल्या व्यवस्थेचाच बेजिंगी मुखंडींना मोठा राग आहे.

खुलीकरणामुळे स्त्री-मुक्ती साध्य भली होत असेल, पण त्यामुळे गैरसरकारी संघटनांच्या मुखंडींच्या सर्व सुखाचे वाटोळे होते त्याचे काय? त्यामुळेच बेजिंग येथे जमलेल्या गैरसरकारी संघटनांच्या महिलांनी चंग बांधला आणि अशा काही मागण्या केल्या की, मामला इतका गंभीर नसता तर त्या हसण्यावारीच नेता आल्या असत्या. स्त्रिया मागासलेल्या आहेत, त्यांचे मागसलेपण प्रामुख्याने आर्थिक आणि राजकीय सत्तेच्या क्षेत्रात आहे. या क्षेत्रात त्यांचे सक्षमीकरण येन केन प्रकारेण घडवून आणण्याचा त्यांनी घाट घातला. प्रस्थापित सत्तेची सर्व केंद्रे विसर्जनाच्या वाटेवर आहेत, सक्षमीकरणाच्या व्याख्याच बदलत आहेत याचे त्यांना भान नाही.

**स्त्रियांच्या कामाचे मोजमाप**

बेजिंगी मुखंडींनी सर्व सरकारांकडे पहिली मागणी केली- ज्या कामाकरिता स्त्रियांना रोजगार मिळत नाही त्या कामाचेही मोजमाप आणि मूल्यमापन राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिशोबात झाले पाहिजे. आता कोणत्याही घरकाम करणाऱ्या स्त्रीच्या



दृष्टीने तिचे काम राष्ट्रीय उत्पन्नात मोजले गेले काय किंवा न गेले काय, काय फरक पडणार आहे? प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रा. सी.ई. पिगू यांनी एका विनोदी उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट केला आहे. 'कोणा ब्रह्मचाऱ्याने आपल्याच मोलकरणीशी लग्न केले तर राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा घटेल. कारण मोलकरणीस पगार मिळत होता तोपर्यंत तिचे काम मोजले जात होते; आता ते काम मोजले जाणार नाही. (कारण पत्नीला पगार दिला जात नाही). आणि म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात घट होईल.' या सर्व प्रश्नांत एक अत्यंत गंभीर, शास्त्रीय, संख्याशास्त्रातील प्रश्न गुंतला आहे. त्या प्रश्नावर कित्येक वर्षे जाणकार तज्ज्ञ काम करीत आहेत. असल्या प्रश्नात नाक खुपसण्याचे बेजिंगी मुखंडींना काहीही कारण नव्हते. कारण, मोजमाप झाले काय आणि न झाले काय स्त्रियांच्या आयुष्यात त्यामुळे काहीही फरक पडणार नाही.

बेजिंगी मुखंडींचा दुसरा प्रस्ताव - स्त्रीपुरुष भेदावर आधारलेली श्रमविभागणीची पद्धत संपवण्यासाठी श्रमविभागणीच रद्द करून टाकावी. सध्यांची पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्था ही काही कोणी लेखणीच्या फटकाऱ्याने तयार केलेली नाही. हिंसाचाराने ग्रासलेल्या एका कालखंडात ती मनुष्य जातीवर लादली गेली; बेजिंगी मुखंडी आता त्यांच्या कल्पनेतील एका कालखंडाचा 'मनू' होऊ पाहतात आणि लेखणीच्या फटकाऱ्याने एका नवीन 'सहभागी कुटुंबाचा' आराखडा समाजावर लादू इच्छितात. या नवीन कुटुंबव्यवस्थेमध्ये सर्वच कामे स्त्रीपुरुष दोघेही एकमेकांत वाटून घेऊन करतील व त्यामुळे गुण्यागोविंदाचे संबंध तयार होतील अशी त्यांची आज्ञा आहे. या नव्या तऱ्हेच्या कुटुंबाचा प्रचार करण्याची, त्याला प्रोत्साहन देण्याची आणि त्यासंबंधी प्रशिक्षण घडवून आणण्याची जबाबदारी शासनाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कृतिपीठात केली आहे.

सध्याच्या कुटुंबव्यवस्थेचे सर्वतोपरी समर्थन कोणी फारसे करणार नाही. जन्मतःच घरकाम आणि इतर कामे यांच्यात सर्व अर्भकांची लिंगाच्या बाह्यदर्शनाच्या आधारे वाटणी करणारी ही दुष्ट व्यवस्था स्त्री आणि पुरुष दोघांवरही मोठा अन्याय करते ही गोष्ट खरी आहे. पण, गर्भारशीपण आणि नंतर मुलांची जोपासना ही दोन महत्त्वाची सामाजिक कामे या संस्थेने अत्यंत बिकट कालखंडात पार पाडली ही गोष्टही नाकारता येणार नाही. पुरुषांपेक्षा स्त्रियांना सध्याच्या विवाह- आणि कुटुंबपद्धतीचा फायदा अधिक मिळतो ही गोष्ट खरी. सध्या विवाह करून कुटुंब स्थापू इच्छिणाऱ्या पुरुषांची संख्या एकूणच घटत आहे. इंग्लंडमध्ये तीस टक्क्यांपेक्षा कमी पुरुष विवाह करतात.

यावेळी, कुटुंबातील श्रमविभागणीशी खेळ केला तर परिणामतः कुटुंबव्यवस्था

मोडकळीस येईल काय? हा एक प्रश्न. आणि दुसरा महत्त्वाचा प्रश्न- भांडी धुण्यामध्ये सहभाग घेणारा नवरा ही सर्वच स्त्रियांची मागणी आणि स्वप्न आहे, या बेजिंगी मुखंडींच्या कल्पनेस सर्वच स्त्रिया पाठिंबा देतील किंवा नाही याबद्दलही शंका आहेच.

**स्त्रियांचे 'मंडली'करण**

यानंतर तर बेजिंगी मुखंडींनी सुचविलेला प्रस्ताव मोठा अफलातूनच आहे. गेल्या एका कालखंडातील स्त्रीचळवळीच्या नेत्या आग्रहाने प्रतिपादन करीत की स्त्री प्रश्नामुळे वर्गसंकल्पनाच कोसळून पडते. त्यांच्या वारसदार आता नवा खेळ खेळत आहेत. स्त्रिया जणू काही एक मागास वर्ग किंवा जात आहे असे गृहीत धरून त्यांचे सक्षमीकरण करण्याची त्यांची योजना आहे.

शिक्षण आणि आरोग्य यासंबंधीच्या सोयीसवलतींचा फायदा स्त्रिया अधिकाधिक घेतला आहेत. याबाबतीत त्यांची प्रगती पुरुषांपेक्षाही उल्लेखनीय आहे. या दोन्ही क्षेत्रांत स्त्रिया लवकरच पुरुषांची बरोबरी करतील. मिळकत आणि मालमत्तेचे हक्क याबाबतीत मात्र परिस्थिती नजिकच्या भविष्यकाळात बदलेल अशी शक्यता दिसत नाही. सक्षमीकरणासंबंधी ज्या काही घोषणा होतात त्यातील व्यावहारिक महत्त्वाचा भाग म्हणजे शैक्षणिक संस्था, नोकऱ्या आणि पंचायत राज्य, राज्यविधानसभा, लोकसभा इत्यादिसाठी होणाऱ्या निवडणुकीत राखीव जागा. थोडक्यात, बेजिंगच्या प्रतिनिधींनी स्त्रियांसाठी 'मंडली'करणाची योजना आखली आहे. सर्व स्त्रिया म्हणजे ओ.बी.सी (इतर मागासवर्गीय) आहेत असे धरून त्यांना शासनाने काही सोयीसवलती द्याव्यात म्हणजे त्यांच्यावर भूतकाळात झालेल्या अन्यायाचे परिमार्जन होईल! सक्षमीकरण अमलात आणण्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय यंत्रणांचे परिवर्तन अभिप्रेत आहे; परिवर्तन म्हणजे सहभागी कुटुंबाला प्रोत्साहन देणे आणि बाजारपेठेवर आधारित व्यवस्थांच्या जागतिकीकरणाला विरोध करणे. मंडल किंवा राखीव जागांची कोणतीही योजना अत्यंत आकर्षक दिसते. खास करून सरकारी नोकऱ्या अरेबियन कथांतील अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्याप्रमाणे आकर्षक असल्या की राखीव जागांची कल्पना साहजिकच आकर्षक वाटते. सरकारी नोकरीतील कामासाठी फारसे कौशल्य लागत नाही, काही जबाबदारी घ्यावी लागत नाही, धोका तर नाहीच नाही आणि त्याखेरीज, सरकारी नोकऱ्यात भरपूर पगार, महागाई भत्ते, इतर सोयीसवलती, पेन्शन इत्यादीची लयलूट असते. याउलट, खुल्या व्यवस्थेत अशा तऱ्हेच्या राखीव जागांच्या मार्गाने मागासवर्गीयांचे सक्षमीकरण घडवून आणण्यास काहीच अर्थ उरत नाही.



सध्याच्या परिस्थितीत राखीव जागा ठेवून कृत्रिमरीत्या मागासवर्गीयांचे किंवा स्त्रियांचे सक्षमीकरण घडवून आणले तर प्रत्यक्षात लाभ मिळणाऱ्या व्यक्ती सोडल्यास सर्व समाजाचा काही फायदा होतो असे दिसत नाही. स्त्रिया जर पुरुषांच्या बरोबरीने माणूस असतील, व्यक्ती असतील आणि समाजाचे बिनचेहऱ्याचे घटक नसतील तर स्त्रिया म्हणजे एक कळप आहे असे गृहीत धरणारा कोणताही कार्यक्रम फार तर अन्यायाची दिशा बदलवेल, आजपर्यंत स्त्रियांवर अन्याय झाला, आता काही काळ पुरुषांवर होऊ दे एवढीच गोष्ट करू शकेल. अशा तऱ्हेच्या परिवर्तित अन्यायाने कदाचित 'मंडल समाजा'चे कल्याण होत असेल. पण स्त्रियांचे अशा कोणत्याही व्यवस्थेमध्ये भले होण्याची शक्यता नाही.

मंडल पद्धतीच्या सक्षमीकरणाने स्त्रियांतील त्यातल्या त्यात समाजाच्या वरच्या थरातील स्त्रियांचाच फायदा होईल. संयुक्त राष्ट्रसंघाच्या साहाय्य कार्यक्रमाने दिलेली आकडेवारी जशी फसवी तसेच स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे निर्देशांक मोठे फसवे असतात. स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा निर्देशांक अर्धवट मध्ययुगीन समाजात वरकरणी उंचावलेला दिसला तरी एक 'इंदिरा गांधी' असलेल्या समाजात हजार वधू जाळल्या जातात हेही लक्षात ठेवले पाहिजे. अशा तऱ्हेचे सक्षमीकरण ही स्त्रियांची मागणी नाही. या तऱ्हेचे सक्षमीकरण झालेल्या स्त्रियांचे संबंध त्यांच्या समाजाशी उरत नाहीत, एवढेच नव्हे तर, अनेकदा त्यांची वर्तणूक पूर्वीच्या पुरुषसत्ताधाऱ्यासारखीच आणि काही वेळा त्याहीपेक्षा अधिकच दोषास्पद असते. महाराष्ट्रातला अनुभव सांगतो की राखीव जागांच्या मार्गाने सत्तेवर आलेल्या स्त्रिया, सर्वसाधारणपणे राखीव जागा नसत्या तर जे पुरुष निवडून आले असते त्यांच्या प्रमाणेच कामे करतात. अपवाद फक्त अशा स्त्रियांचा की ज्या महिला चळवळीत सहभागी होत्या आणि त्यांचा एक बऱ्यापैकी मोठा गट अधिकारात आला आहे. महाराष्ट्रातील राखीव जागांच्या पद्धतीत फिरत्या मतदारसंघांची जी व्यवस्था झाली आहे त्यामुळे पंचायत राज्य व्यवस्थेवर दुष्परिणाम झाले आहेत, एवढेच नव्हे तर, महिला चळवळीविषयीची लोकांची आस्थाही दुखावली आहे.

**प्रजननावरील नियंत्रण**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सहाय्य कार्यक्रमाच्या एका अहवालाचा वर उल्लेख आहे. त्यात दिलेली एक आकडेवारी अशी: १९७०-७५ साली स्त्रियांमध्ये जननाचे प्रमाण ४.७ दरडोई होते, १९९०-९५ या काळात हाच आकडा ३ पर्यंत उतरला होता. जन्माची उतरलेली संख्या हे स्त्रियांच्या प्रगतीचे निश्चित

अनुमान म्हणून सांगितले गेले आहे. बेजिंगच्या कृतिपीठाने स्त्रियांचा त्यांच्या प्रजननशक्तीच्या वापरावर पूर्ण अधिकार सांगितला आहे. लोकसंख्येसंबंधीच्या कैरो परिषदेत मात्र यापेक्षा जास्त व्यापक दृष्टिकोन घेऊन या निर्णयात सर्व कुटुंब, एवढेच नव्हे तर, शासनसुद्धा सहभागी केले आहे. उदा. 'लोकसंख्येसंबंधीची धोरणे तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे हा प्रत्येक राष्ट्राचा सार्वभौम हक्क आहे. आणि शासनाने लैंगिक आणि प्रजननसंबंधी आरोग्य आणि नियोजन यांच्या व्यवस्था सर्वदूर पोहोचतील अशी व्यवस्था केली पाहिजे.'

'कुटुंब हा समाजाचा मूलभूत घटक आहे.' आणि 'मुलांची संख्या आणि त्यांच्यामधील अंतर स्वतंत्रपणे आणि जबाबदारीने ठरवणे हा सर्व कुटुंबाचा आणि व्यक्तींचा मूलभूत हक्क आहे.'

बेजिंग येथे गैरसरकारी संस्थांच्या/संघटनांच्या महिलांनी या विषयावर एक नाटकीय भूमिका घेतली. सुदैवाने तिचा आपणा कोणावरही व्यवहारात काही परिणाम होण्याची शक्यता नाही. प्रजननगती कमी असणे हे सर्व समाजाच्या दृष्टीने हितकारी मानणे समजण्यासारखे आहे. ज्या स्त्रियांना त्यांच्या व्यक्तित्त्वाच्या विकासासाठी सक्षमीकरणाची गरज वाटते त्यांच्या बाबतीत मुलांच्या जन्माची संख्या कमी असणे हे फायदेशीर ठरेल. पण याचा अर्थ असा नाही की प्रत्येक व्यक्तिगत मातेलाही असेच वाटावे. बेजिंगी प्रतिनिधींनी तयार कलेला 'सहभागी कुटुंबाचा' आराखडा सर्वदूर लागू झाला नाही तर कुटुंबाचे वेगळे वेगळे प्रकार उभारून वर येतील आणि प्रत्येक कुटुंबात वेगवेगळ्या तऱ्हेने कुटुंबनियोजनाचे आणि प्रजननासंबंधीचे निर्णय केले जातील.

कुटुंबनियोजन आणि त्याच्या पद्धती हा विषयसुद्धा निर्णयासाठी कुटुंबाकडेच सोडणे योग्य होईल. सध्याच्या कुटुंबनियोजनाच्या व्यवस्थेत सरसकट गर्भ मारणे आणि वृद्धांना महागड्या वैद्यकीय सेवांच्या आधाराने अनिश्चित कालपर्यंत जिवंत ठेवणे ही काही सर्वोत्तम व्यवस्था म्हणता येणार नाही. कुटुंबनियोजनाच्या साधनांविषयी माहिती असणे आणि ती उपलब्ध होणे हे आवश्यक आहे कारण त्यामुळे संबंधितांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा वाढतात. पण याउलट, मुलांची संख्या कमी म्हणजे स्त्री जीवनाच्या गुणवत्तेत वाढ असे समजणेही भ्रामक ठरू शकते.

**सरकारचा उपयोग किती?**

आज अनेक स्त्रीपुरुषांना मोठी चिंता पडली आहे की, शासनाकडील आर्थिक सत्ता काढून घेतली गेली तर त्यांना खुल्या बाजाराच्या निर्दयी जगात एकाकी



परिस्थितीचा सामना करावा लागेल. तेथे तर मोठे मासे लहान माशांना खातात अशा भीतीने ते व्याकुळ झाले आहेत. नवे डावे – पर्यावरणवादी स्त्रीवादी आणि 'स्वदेशी' देशभक्त– सर्वसामान्यांच्या मनातील या भीतीना चेतवून निरागस स्त्रीपुरुषांना स्वतःच्या स्वार्थाला जुंपतात. बेजिंग घोषणापत्रातील खुल्या व्यवस्थेवरील टीका ही जुन्या काळातील केस पिंजारलेल्या लालभाईंनी 'भांडवलशाही कुत्र्यां'विरुद्ध केलेल्या सरबत्तीची आठवण करून देणारी आहे. अशा तऱ्हेची शिवीगाळ मार्क्सवादी गटात चालत असली तरी ती काही गंभीरपणे घेण्याची गरज नाही.

गेली अनेक वर्षे जगातील प्रत्येक देश सरकारशाहीच्या वेगवेगळ्या छटा असलेल्या व्यवस्थांखाली नांदत आहेत– साम्यवादी, मिश्र व्यवस्थावादी, कल्याणकारी राज्ये आणि केन्सच्या पद्धतीची देखरेख करणारी सरकारे. खुलीकरणाची प्रक्रिया अद्याप सुरूही झालेली नाही. नोकरशाहीच्या चौकटी आणि लायसन्स-परमिट नियमावलींचे जंगल अजूनही जागच्या जागी उभे आहे. अशा परिस्थितीत नियोजनाने घडवून आणलेल्या हाहाकारीबद्दल, उदयाला येत असलेल्या स्वतंत्रतेच्या व्यवस्थेस दोष देणे एक मानसिक असंतुलन तरी दाखवते किंवा व्यक्तिगत स्वार्थाची हाव. बेजिंग येथे गैरसरकारी संघटनांनी बाजारपेठी अर्थव्यवस्थांविरुद्ध केलेले सर्व दोषारोप शब्दशः सत्य आहेत असे मानले तरीदेखील जग आता पुन्हा एकदा सरकारशाही व्यवस्थांकडे परतून जाईल अशी संभावना राहिली नाही. कारण, सरकारशाहीने पोळल्याचा अनुभव अजून मनात ताजा आहे.

घोषणापत्रात काहीही म्हटले असले तरी आज जगाला नियोजन व्यवस्थांना पर्याय म्हणून बाजारपेठी व्यवस्थांखेरीज दुसरा कोणताही विकल्प माहीत नाही. बदल काय गतीने घडवून आणायचा आणि बदल घडवून आणण्याचा कार्यक्रम काय यासंबंधीच काय ती चर्चा होऊ शकते. लवकरच स्वातंत्र्याच्या पहाटेला होणारा विरोध मावळून जाणार आहे. विरोधी पक्षांचे मुख्यमंत्री शपथ घेतल्यानंतर काही तासांच्या आतच खुली व्यवस्थावादी होतात याची अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यांसमोर घडलेली आहेत. परिवर्तनकालात मनात धास्ती निर्माण व्हावी आणि काही शंका राहाव्यात हे समजण्यासारखे आहे. मनुष्यजातीच्या इतिहासात प्रत्येक वरची पायरी घेताना त्याला अपशकून करू पाहणाऱ्या Luddite सारख्या चळवळींचे काही नवे अवतार समोर येतात. पण, कोणीही मूल मनातील भीतीच्या डोंबाचा अनुभव घेतल्याखेरीज चालायला शिकत नाही आणि पक्ष्याची पिल्ले उडायला शिकत नाहीत. बेजिंग येथील गैरसरकारी

संघटनांच्या महिलांची स्वातंत्र्याबद्दलची प्रतिक्रिया पाहून आठवण होते पन्नास वर्षांपूर्वीची- चिनी स्त्रियांची पावले लहान आणि नाजूक दिसावीत म्हणून ती पट्ट्यांनी बांधून ठेवण्याची पद्धत होती. ती पद्धत बंद करण्याचे ठरले तेव्हा पाय बांधलेल्या स्त्रियांनीच पाय सोडण्याच्या कल्पनेस विरोध केला होता. बेजिंगी महिला आज नेमके तेच करीत आहेत.

महत्त्वाची एक गोष्ट. स्त्रियांची आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रातील प्रगती सरकारच्या सामाजिक कल्याणकारी कार्यक्रमांमुळे झाली ही कल्पनाच मुळात खोटी आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थानात स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या क्षेत्रात प्रगती झाली ती शासनाच्या प्रयत्नांमुळे झाली नसून शासनाच्या विरुद्ध प्रवाहात जाऊन झालेली आहे. अन्नधान्याची स्वयंपूर्णता हरितक्रांतीच्या तंत्रज्ञानाने झाली, आयुष्यमान वाढले ते औषोधोपचारांच्या बाबतीत घडून आलेल्या तांत्रिक क्रांतीमुळे आणि विशेषत: प्लेग, कॉलरा, देवी, क्षय यासारख्या साथीच्या रोगांवर तोडगे सापडल्यामुळे. लोकांची ज्ञानाची पातळी वाढली ती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे; जिल्हा परिषदांच्या शाळांमुळे फक्त शाळेत दाखल झाल्याची आकडेवारी फुगली! तंत्रज्ञानानेच मनुष्यजातीला सरकारशाहीच्या विद्ध्वंसापासून वाचवले आहे.

आर्थिक क्षेत्रातून सरकारची सत्ता कमी करणे याचा अर्थ सामाजिक किंवा कल्याणकारी कार्यक्रम सर्वतोपरी बंद करणे असा होत नाही. कल्याणकारी कार्यक्रम अजून कित्येक वर्षे चालूच राहतील. पण ती सरकारी नियंत्रणाखाली नाही तर अशा तऱ्हेचे कार्यक्रम चालवण्यात विशेष स्वारस्य आणि जाणकारी असलेल्या संस्थांच्या अधिपत्याखाली. उदाहरणार्थ, हिंदुस्थानातील गरिबी हटवायचा सर्वोत्तम कार्यक्रम गुरुद्वारांतील 'लंगर' हा आहे. सरकारशाही व्यवस्थांमध्ये सर्व सत्ता राजकीय सरकारांच्या हाती एकवटण्याचा प्रयत्न होतो. स्वतंत्रतावादी लोकशाही व्यवस्थेत सत्तेचे केंद्र एकवटलेले नसते, तर मनुष्याच्या बुद्धीतील वेगवेगळ्या पैलूंप्रमाणे स्वतंत्र सार्वभौम सत्ताकेंद्रांची एकमोठी प्रभावळ उभी असते - संरक्षण, स्पर्धात्मक अर्थव्यवस्था, अपंगांसाठी उदार मदत, खुली प्रसारमध्यमे, ज्ञानाच्या स्वायत्त संस्था आणि अनिर्बंध कला इत्यादी इत्यादी.

अशा व्यवस्थेविषयी भीती कोणाला वाटते? जी माणसे समाजाला जितके देतात त्यापेक्षा समाजाकडून कमी घेतात त्यांना सरकारशाहीच्या विसर्जनाबद्दल चिंता वाटत नाही. याउलट, समाजाच्या कष्टावर पोसणाऱ्या बांडगुळांना मात्र स्वातंत्र्याच्या अरुणोदयाबद्दल मोठी चिंता वाटते.



विशेषतज्ज्ञांची जडजंबाल चर्चा बाजूला ठेवली तरी उद्योजकांना वाव देणारी व्यवस्था ही सर्व समाजाच्या वाढीकरिता आणि विकासाकरिता श्रेयस्कर असते यात काही वाद नाही. सोव्हिएट युनियनच्या पतनानंतर आता याबाबतीत काही शंका उरलेली नाही.

स्त्री-पुरुष भेदाच्या आधाराने लादले गेलेले अन्याय दूर करणे हे मनुष्य जातीच्या इतिहासातील सर्वात व्यापक परिवर्तन आहे. अशा तऱ्हेच्या समाजव्यवस्थेच्या परिवर्तनासाठी सर्वंकष विकासाचे वातावरण आवश्यक आहे आणि असे वातावरण फक्त खुल्या व्यवस्थेतच मिळू शकते.

आतापर्यंतचा अनुभव पाहता, शासनाला स्त्रियांच्या उद्धाराचे काम देणे कितपत योग्य आहे? शासन 'कायदा आणि सुव्यवस्था'देखील राखू शकत नाही. शासकीय कल्याणकारी कार्यक्रम गोंधळात पडलेले आहेत. शासन कोणतीही समस्या सोडवत नाही कारण शासन हीच समस्या आहे. स्त्रियांवरील अत्याचार शासन थांबवू शकेल किंवा टाळू शकेल अशी आशा करण्यास काय जागा आहे? पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये पुरुषांचे भले करण्यास जी व्यवस्था अयशस्वी ठरली ती विरोधी वातावरणात स्त्रियांचे भले करू शकेल असे मानण्यास काय आधार आहे?

**बेजिंगची आवश्यकता होती काय?**

एक गोष्ट स्पष्ट आहे. महिलांची चळवळ चुकीच्या रस्त्याने जात आहे.

सरकारशाही मजबूत करू पाहणाऱ्यांनी स्त्रीचळवळीच्या या दोलायमान अवस्थेचा फायदा घेतला आहे. जर का स्त्री चळवळीच्या प्रवक्त्यांचा सर्वसाधारण स्त्रियांशी संपर्क राहिला असता तर अशी आपत्ती ओढवली नसती. स्त्रियांपैकी वरच्या थरातील काहीजणींना पुरुषप्रधान व्यवस्थेतच शिक्षण, नोकऱ्या आणि राजकीय सत्तांचा लाभ मिळाला आणि तो लाभ त्यांना टिकवायचा आहे. सर्वसाधारण स्त्रियांच्या दु:खाचे भांडवल करून त्यांना भाषणे, परिसंवाद, परिषदा यांतूनच एक किफायतशीर व्यवसाय जगभर उभा करायचा आहे. स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यात त्यांना काहीच स्वारस्य नाही. तसे केले तर सोन्याचे अंडे देणारी कोंबडी मारल्यासारखे होईल आणि म्हणून स्त्रीचळवळ चुकीच्या रस्त्यावर ढकलून देण्यात यांनी मदत केली आहे. सर्वसाधारण स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांविषयी म्हणण्यासारखे या प्रवक्त्यांजवळ काहीच नाही. स्त्रियांना ज्या प्रश्नांत किंचितही स्वारस्य नाही अशा प्रश्नांवर त्या लंब्याचौड्या गोष्टी करतात. गैरसरकारी संघटनांच्या घोषणापत्रात लिहिलेल्या काही गोष्टी जर संयुक्त राष्ट्रसंघाच्या कोण्या संस्थेच्या दस्तावेजात म्हटल्या गेल्या असत्या तर

राष्ट्रीय आक्रमणाबद्दल आणि दुसऱ्याच संस्थांच्या क्षेत्रात हस्तक्षेप केल्याबद्दल मोठा गदारोळ उठला असता. विकासाची व्यवस्था, टिकाऊ वाढीची परिणामे यासंबंधीचे निर्णय घटनात्मक पद्धतीने प्रस्थापित झालेल्या सार्वभौम सरकारांच्या अखत्यारीतील आहेत. खुद्द संयुक्त राष्ट्रसंघालाही या विषयांवर राष्ट्रीय शासनांना आदेश देण्याचा अधिकार नाही. पण गैरसरकारी संघटनांनी हे केले; बिनधास्तपणे केले. 'कृतिपीठा'मध्ये घोषणापत्राच्या व्यावहारिक कार्यक्रमांना पाठिंबा दिला आहे, पण बाजरपेठेविरोधी सिद्धांतांना नाही. पर्यावरणवादी आणि स्त्रीवादी यांच्या आधारानेच आता राजकीय पुढारी आणि नोकरशहा जगू शकतात अन्यथा स्वातंत्र्याच्या नव्या युगात त्यांना काही जागा उरणार नाही.

स्त्रिया अगदी खालच्या पातळीवरसुद्धा संघटित झालेल्या नाहीत, अगदी लहानशा शहरातसुद्धा संघटित झालेल्या नाहीत. शहरातील स्त्रियांच्या शेकडो संस्थांमधून मूठभर निष्ठावंत चेल्यांना त्या जमा करतात. एखाद्या स्त्रीला वैयक्तिक जाच होत असला तर तिच्या प्रकरणी लक्ष घातल्यासारखे करतात, ज्यांना बोलण्यालिहिण्याची काही देणगी आहे त्या लवकरच परिसंवादांच्या सर्कशीत उचलल्या जातात आणि जन्मभर विमानांच्या उड्डाणांतून जगभरच्या परिषदांत भाग घेत राहतात. वेगवेगळ्या पातळ्यांवर महिला आयोग नेमले जातात ते प्रामुख्याने राजकारणातून बाहेर फेकल्या गेलल्या स्त्रीनेत्यांची सोय लावण्याकरिता. अशा परिस्थितीमध्ये राष्ट्रपातळीवर सोडाच, राज्यपातळीवरसुद्धा स्त्रियांची खरीखुरी प्रातिनिधिक परिषद भरवणे आज शक्य नाही. अशा परिस्थितीत एक नाही, दोन नाही चार जागतिक महिला परिषदा वीस वर्षांच्या अवधीत भरवल्या गेल्या याचे इंगित काय? राज्य शासनांचे प्रतिनिधी म्हणून या परिषदांत भाग घेण्यास कोण गेले? गैरसरकारी संघटनांची निवड कोणी केली? समाजातील वेगवेगळ्या थरांच्या स्त्रियांचे खरेखुरे प्रतिनिधी निवडले गेले काय? गैरसरकारी संघटनांच्या घोषणापत्रात सर्वसाधारण स्त्रियांचे प्रतिबिंब नाही, हे त्यातील मजकुरावरूनच स्पष्ट आहे. जर प्रतिनिधींची यादी तपासली तर लक्षांत येईल की सर्वसामान्य स्त्रियांचा आवाज बेजिंगमध्ये उठवला जाण्याचीही शक्यता नव्हती आणि उठवला असता तरी तो ऐकला जाण्याची शक्यता नव्हती.

स्त्रियांच्या प्रश्नावर जागतिक परिषदा भरवणे हे सर्वसाधारण स्त्रियांच्या दृष्टीने अगदीच अनावश्यक दिसते. बेजिंगमध्ये मुसलमान आणि कॅथॉलिक धर्माच्या अधिकृत प्रवक्त्यांनी त्या त्या धर्माच्या स्त्रियांनी ज्या तऱ्हेने पाठिंबा दिला त्यावरून आजच्या घडीस जागतिक परिषदा महिला हिताला घातक ठरण्याचा धोका दिसतो.



आंतरराष्ट्रीय मंचावर स्वतःच्या धर्मव्यवस्थेसंबंधी विरोधी सूर काढणे म्हणजे द्रोहाचे महापापच ! आणि स्त्रियांची तशी हिम्मत होणे आज दुरापास्त आहे. जागतिक प्रकाशझोतात स्त्रीचळवळ, स्त्रिया फार लवकर ढकलल्या गेल्यामुळे त्यांच्यावर वर्षानुवर्षे जुलूम करणाऱ्यांचेच समर्थन करणे त्यांना भाग पडत आहे. बेजिंगला मोठे विचित्र दृश्य दिसले. स्त्रिया एकमेकींवर तुटून पडत होत्या. स्त्रियांचे हक्क बजावण्यासाठी नव्हे तर त्यांच्या आपापल्या धर्मांच्या व्यवस्था कशा सर्वश्रेष्ठ आहेत, स्त्रियांचा आदर करणाऱ्या आहेत आणि परिवर्तनीय आहेत हे हिरीरीने मांडण्याकरिता आणि त्या व्यवस्थामध्ये बाहेरून बदल घडवून आणण्याची काही आवश्यकता नाही हे सांगण्याकरिता.

जागतिक परिषदा भरवण्याऐवजी प्रादेशिक किंवा धर्मनिहाय परिषदा बोलावल्या गेल्या असत्या तर स्त्रियांना कदाचित त्याचा जास्त फायदा झाला असता. ठरलेल्या नमुन्यात प्रत्येक परिषदेस त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील स्त्रियांच्या परिस्थितीविषयी निवेदन करण्यास सांगण्यात आले असते. त्यांमुळे, स्त्रियांविषयी आपली व्यवस्था उदार आहे असे निदान दाखवणे शासनाला किंवा धार्मिक नेत्यांना आवश्यक झाले असते. वेगवेगळ्या व्यवस्थात त्यामुळे स्पर्धा निर्माण झाली असती. अणि त्याचा फायदा स्त्रियांना, विशेषतः स्त्रीपुरुष भेद, वंशवाद, गरिबी आणि धर्मवाद अशा बहुविध अन्यायांनी गांजलेल्या स्त्रियांना त्याचा काही फायदा झाला असता. आजच्या परिस्थितीत शासनांना स्त्रियांच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेली वचने पुरी करण्याची काहीही आवश्यकता वाटत नाही. जसजशा नवीन परिषदा भरतील तसतशा जुन्या वचनांची अंमलबजावणी न करता ते नवीन वचने देण्यास तयार होतात. नैरोबी परिषदेत १९८५ साली 'दूरदर्शी रणनीती'ची घोषणा करण्यात आली. त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. स्त्रियांविषयीच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेला अजून नव्वदावर देशांनी मान्यता दिलेली नाही आणि तरीही एक नवी परिषद बेजिंग येथे भरवण्यात आली. कारण अशा जागतिक परिषदांमुळे नोकरशाहीस आपले फायदे वाढवण्याकरिता स्त्रियांचा उपयोग करता येतो. परिषदांचे स्वरूप अधिक बांधीव असते तर त्यांना वाव मिळाला नसता.

**निष्कर्ष**

गैरसरकारी संस्थांच्या महिला बोलल्या त्या फक्त स्वतः पुरत्या. त्या इतर कोणाचेच प्रतिनिधित्व करत नव्हत्या. त्यातील बहुतेक डाव्या परंपरेतील आणि सरकारी नोकरशाही वाढावी आणि सरकारचा प्रभाव वाढावा यात स्वारस्य असलेल्या. त्यांनी जे घोषणापत्र तयार केले त्यात स्त्रीप्रश्नाची जाण कोठेच

दिसत नाही आणि आपल्या बहिणींचे अश्रू पुसण्याची तिळमात्र इच्छाही दिसत नाही.

बेजिंग परिषद हे जागतिक महिला चळवळीवर कोसळलेले एक मोठे अरिष्ट आहे. चळवळ पुन्हा योग्य मार्गावर आणायची असेल तर आजपर्यंत मूक राहिलेल्या कष्टकरी, स्वयंरोजगारी आणि उद्योजक महिलांनी बेजिंगविरुद्ध निषेधाचा आपला आवाज उठवला पाहिजे आणि सर्व जगाला स्पष्ट बजावले पाहिजे की, 'स्त्रिया माणसे आहेत आणि म्हणून त्यांना स्वातंत्र्य प्रिय आहे.'

*(शेतकरी संघटक, २१ फेब्रुवारी १९९६)*

■■



सात

# १९९७ च्या अधिवेशनांपुढील कामगिरी

## १. दुहेरी आत्मपरीक्षण

### आत्मपरीक्षणातील गळबटपणा

स्वातंत्र्याचे पन्नासावे वर्ष साजरे करण्याच्या निमित्ताने चहूकडे, पन्नास वर्षांत काय घडले? पन्नास वर्षांपूर्वी कोठे होतो? कोठे जायला निघालो होतो? कोठे येऊन पोहोचलो आहोत? दिवसेंदिवस प्रवास सुकर होण्याऐवजी खडतरच होत आहे, असे का? आपण वाट चुकलो तर नाही? योग्य वाटेला पुन्हा लागायचे कसे? या प्रश्नांची देशभर चर्चा व्हावी अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात हे प्रश्न काही गंभीरपणे चर्चेला घेतले जात नाहीत. उत्सवप्रियतेमुळे स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाचा जल्लोश साजरा करण्याची संधी आम्ही सोडत नाही. पण, खरे म्हटले तर गंभीरपणे आत्मचिंतन करण्याच्या कार्यक्रमाला कोठे सुरुवातही झालेली दिसत नाही.

### बाईला काहीच म्हणायचे नाही?

देशातील सर्व नागरिकांनी इतक्या गंभीर विषयाबाबत इतका गळबटपणा स्वीकारला. स्त्रियांच्या दृष्टिकोनातून गेल्या पन्नास वर्षांतल्या वाटचालीची पाहणी करण्याची कल्पनाही कोणाच्या मनाला सुचलेली नाही. मी मी म्हणणाऱ्या महिला अग्रणींनीही स्त्रियांनी एकत्र बसून स्वातंत्र्यानंतरच्या काळातील घडामोडींबद्दल काही वेगळा अभ्यास करावा असे सुचविलेले नाही. स्वातंत्र्यानंतर काय कमावले, काय गमावले? या प्रश्नावर स्त्रियांचा म्हणून काही वेगळा दृष्टिकोन असू शकतो असे कोणालाच वाटले नाही. हे काय विस्मरणाने घडले? ही साधी चूकभूल आहे काय? कामांच्या सगळ्या गर्दीत, धावपळीत स्त्रियांचा दृष्टिकोन पाहावा याची आठवण राहिली नाही काय?

ही साधी चूकभूल नाही. यामागे जास्त गंभीर समस्या लपलेली आहे. देशभरात डझनावारी महिला संस्था पंचायत राज्यातील स्त्रियांच्या अधिकारांबद्दल

वेगवेगळे अभ्यास करीत आहेत, परिसंवाद भरवीत आहेत. यांच्यापैकी कोणालाही स्वातंत्र्यानंतरच्या काळाचे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून अवलोकन करण्यासाठी एखादा परिसंवाद घ्यावा असे सुचले नाही? या विस्मरणाचे खरे कारण मोठे गंभीर आहे. या विषयावर स्त्रियांना म्हणून काही वेगळे मत असू शकेल हे मुळात महिला चळवळीतील कार्यकर्त्यांनासुद्धा सुचलेले नाही, उमगलेले नाही. देशाच्या प्रश्नात सगळ्यांचे जे मत तेच स्त्रियांचे, स्त्री-चळवळीची म्हणून काही वेगळी भूमिका असण्याचे काय कारण? देशाची प्रगती झाली असो का अधोगती, स्त्रियांना त्यांचा वाटा मिळाला की झाले ! साऱ्या स्त्रीचळवळीची बांधणी आणि धावपळ स्त्रियांना काही हिस्सा मिळावा, मुख्यत: बाईच्या दु:खाच्या कारणाने स्त्री-मुखंडींना सत्ता, साधने आणि अधिकार मिळावे या उद्देशाने होत आहे. देशात अंदाधुंदी माजली असली, भ्रष्टाचार बोकाळला असला, गुंडांचे साम्राज्य पसरले असले आणि न्यायालये तुंबली असली तरी स्त्रियांच्या संरक्षणाची मात्र व्यवस्था चोख असावी, निदान त्या निमित्ताने स्त्री-अधिकारी नेमल्या जाव्यात, सुरक्षिततेच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी स्त्रीमुखंडींना संवादपरिसंवाद करण्यासाठी साधनसंपत्ती मिळावी. सारे लोकतंत्र कोलमडून पडत असले तरी चालेल, स्त्री-पुढाऱ्यांना राखीव जागा मिळाव्यात. देशाचे आर्थिक दिवाळे का वाजो, स्त्रियांचा उत्पन्नातील आणि मालमत्तेतील वाटा कागदोपत्रीतरी ठरला पाहिजे. स्त्रीचळवळ अशी मर्यादित झाली आहे.

### अवघड जागी दुखणे

पन्नास वर्षांचे अवलोकन हे हिंदुस्थानातील महिला चळवळीच्या दृष्टीने अवघड जागेतील दुखणे आहे. शहरी महिला चळवळ डावेपणाचा डौल मिरविणाऱ्या मुखंडीच्या हाती आहे. शासन हेच देशाच्या आणि महिलांच्या उद्धाराचे आणि प्रगतीचे साधन आहे असा त्यांचा दृढ विश्वास आहे. पन्नास वर्षांच्या अवलोकनाचा पहिला निष्कर्ष त्यांच्या दृष्टीने मोठा अडचणीचा निघतो. सरकारने जेथे जेथे हात घातला त्या त्या विषयाचे वाटोळे झाले हे आता बहुतांशी मान्य झाले आहे. पण, हे मान्य करणे म्हणजे शहरी स्त्रियांच्या डावखुऱ्या चळवळीचा पायाच उखडून टाकण्यासारखे आहे. स्त्रियांच्या उद्धाराचे कायदे सुचवावेत, प्रकल्प सुचवावेत हे ज्यांनी सदासर्वकाळ केले आणि शासनाच्या दरवाजाशी जे जे ताटकळत याचना करीत उभे राहात आले त्यांची यजमानाचेच दिवाळे वाजले आहे हे कबूल करण्यात मोठी कुचंबणा आहे. थोडक्यात, देशातील आम महिला चळवळ स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या वर्षीच



नाही तर केव्हाही देशाच्या प्रगतीचे अवलोकन करण्यास स्वभावत:च असमर्थ आहे.

### एक आशेचा किरण

शेतकरी महिला आघाडीकडून या बाबतीत काही आशा करण्यास जागा आहे काय? स्वातंत्र्याची पन्नास वर्षे पुरी झाली त्याबरोबर चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनानंतर पुरी अकरा वर्षे उलटून गेली. शेतकरी महिला आघाडीने काय कमावले? काय गमावले? याचा ताळेबंद स्वातंत्र्याच्या ताळेबंदाबरोबर मांडला गेला तर त्यातून काही नवी जाण, नवी दिशा मिळू शकेल. शेतकरी महिला आघाडी दुहेरी समुद्रमंथनाचे हे आव्हान पेलू शकेल काय? सांगणे कठीण आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे. शेतकरी महिला आघाडीस हे आह्वान पेलले नाही तर दुसऱ्या कोणास हे शिवधनुष्य उचलण्याची हिम्मत होण्याचा काहीच संभव नाही.

शेतकरी महिला आघाडीचा आजपर्यंतचा इतिहास आणि विचार थोडी आशा दाखवितो. महिला चळवळीचे क्षेत्र काय? याची सुस्पष्ट व्याख्या शेतकरी महिला आघाडीनेच फक्त दिली आहे. देशात समाजवाद असावा का खुल्या बाजारपेठेची व्यवस्था? आंतरराष्ट्रीय व्यापार खुला असावा का बंदिस्त? रुपया परिवर्तनीय असावा का नसावा? या असल्या विषयांवर मतें बनविण्याचा आणि व्यक्त करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे - पुरुषांना तसेच स्त्रियांना. एखादी बाई या विषयांवर बोलते, मते व्यक्त करते तेव्हा ती स्त्री म्हणून बोलत नसते, एक नागरिक म्हणून बोलत असते. नागरिक म्हणून समान हक्काने हाताळावयाचे विषय हे स्त्री-चळवळीचे विषयच नाहीत. महिला आंदोलनाच्या व्यासपीठावर अशा सर्वसाधारण विषयांची चर्चा करणे म्हणजे चळवळीची ताकद, वेळ आणि साधने फुकट घालविण्यासारखे आहे. मग, स्त्री-चळवळीची विषयपत्रिका कोणती? शेतकरी महिला आघाडीच्या बेजिंगविरोधी परिषदेत याची सुस्पष्ट व्याख्या दिलेली आहे. देशाचा सर्वसाधारण विकास आणि स्त्रियांचा विकास यांत दिशेचा आणि गतीचा फरक जेथे जेथे आढळतो तो तो स्त्री-चळवळीचा जिव्हाळ्याचा विषय होतो. म्हणजे नेमके काय?

### स्त्री-आंदोलनाचे क्षेत्र

देशाची प्रगती झाली, उत्पादन वाढले पण, त्याचा स्त्रियांना लाभ होण्याऐवजी जाच होऊ लागला तर स्त्री-चळवळीने या प्रकरणी लक्ष घातले पाहिजे. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांच्या घरी पैसा आला पण, त्याबरोबर बाटलीबाईही

आली. पैशाबरोबर आलेल्या प्रतिष्ठेच्या कल्पनांपोटी बायकांचे घराबाहेर पडणे बंद झाले, घरात बसून रोट्या भाजण्याचेच काम त्यांच्याकडे राहिले. थोडक्यात, आर्थिक प्रगतीबरोबर स्त्रियांची पीछेहाट झाली. मग, या प्रश्नावर स्त्री-चळवळीने भूमिका घेतली पाहिजे. सर्वसाधारण विकासामुळे लोकसंख्येत निम्म्या असलेल्या स्त्रियांची पीछेहाट होत असेल तर तो विकास नव्हेच अशी मांडणी करणे, विकासाची पर्यायी संकल्पना मांडणे हे स्त्री चळवळीचे काम आहे.

सर्वसाधारण प्रगतीचा विपरीत परिणाम होत नाही, पण त्याचा लाभ पूर्णांशाने स्त्रियांपर्यंत पोहोचत नाही असे विषय असू शकतात. गावोगाव शाळा उघडल्या गेल्या, दवाखाने उघडले गेले; पण, या सगळ्या सुविधांचा लाभ स्त्रिया बरोबरीच्या हक्काने उठवू शकत नसल्या, तर असे का होते? स्त्रियांना अशा सुविधांचा पुरेपूर फायदा कसा घेता येईल? या सुविधा देण्याची पद्धतच मुळात बदलली पाहिजे का? हे सारे विषय महिला चळवळीचे विषय आहेत.

बाईचा दृष्टिकोन हा सर्वसाधारण दृष्टिकोनापेक्षा वेगळा असू शकतो. त्या दृष्टीने, स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या वर्षाच्या निमित्ताने देशाच्या प्रगतीचे मूल्यमापन करावयाचे असेल, आत्मपरीक्षण करावयाचे असेल तर ते दोन पातळ्यांवर झाले पाहिजे - सर्वसाधारण नागरिकांच्या पातळीवर झाले पाहिजे आणि स्त्रियांच्या दृष्टिकोनातूनही झाले पाहिजे.

## २. महिला आंदोलनाची दुर्दशा

### मंडळे उदंड माजली

जागोजागी भगिनीमंडळे, वनिता समाज, स्त्री-संघर्ष समित्या उगवतात आणि स्त्री-साहाय्याची काही जुजबी कामे करीत राहतात. स्वधर्मीयांकरिता, स्वजातीयांकरिता काही उपयोगी कामे करणे आवश्यक आणि अपरिहार्य आहे असे समजून लोक संस्था उभ्या करतात. जन्माच्या अपघाताने त्या जातीत किंवा धर्मात आपण जन्मलो त्याचा अभिमान तो काय बाळगायचा? आणि आपल्या बुद्धीचा, कर्तबगारीचा आणि त्यागाचा लाभ एका मर्यादित समाजापुरताच संकुचित का ठेवायचा? हा प्रश्न अनेकांना पडतही नाही. निसर्गधर्माने ते आपल्या जन्मदात्या समाजाचा अभिमान बाळगतात आणि त्यासाठी यथाशक्ती, यथाबुद्धी काहीतरी किडमिड कामे करीत राहतात. बहुतेक स्त्रीसंस्था आणि स्त्रीनेत्या यांची परिस्थिती अशीच आहे. स्त्रीजन्माला आलो आणि स्त्रीपुरुष संमिश्र समाजात आपल्या कर्तबगारीला पुरेसा वाव नाही अशी जाणीव झाली की स्त्रिया महिला चळवळीकडे वळतात; एखादा समाज, मंडळ किंवा समिती



स्थापतात.

मोठमोठ्या मान्यवर महिला संघटनांत लब्धप्रतिष्ठित स्त्रियांनी महत्त्वाची सारी पदे अडविलेली असतात. कोणत्याही कार्यक्रमात मिरवायला त्यांनाच मिळते, नाव त्यांचेच होते. त्यामुळे अशा संस्थांत नव्या उमेदीच्या कार्यकर्त्यांना आत शिरकायला फारसा वाव नसतो. अनेकदा होते असे की, महिला संघटनांतील स्त्रीचे स्थान तिच्या नवऱ्याच्या समाजातील प्रतिष्ठेवर आणि आर्थिक सुसंपन्नतेवर अवलंबून असते. म्हणजे तर, कर्तृत्वाने नाव मिळविण्याचा, काही करून दाखविण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तेव्हा जी ती एक नवी पाटी लावून आपली एक संस्था उभी करू पाहते. एकेका शहरात दीडशेदोनशे महिलासंस्था आपापल्या नावांच्या पाट्या आणि नोंदणी क्रमांक मिरवीत उभ्या असतात.

### पोलिसी कामे

अनेक घरांत नवराबायकोचे, सासूसुनेचे, नणंदाभावजयांचे पटत नाही; काही ठिकाणी या वितुष्टांना मोठे विक्राळ स्वरूप येते. काडीमोडाची वेळ येते, नवरा नांदवत नाही, बायको सासरी जात नाही, सून जीव देते किंवा सासरचे तिला मारून टाकतात अशी अनेक प्रकरणे प्रत्येक समाजात, हर वस्तीत, दररोज घडतच असतात. असे काही घडले की जवळपासच्या महिला संघटनांतील काही बाया असल्या प्रकरणात लक्ष घालतात; नवविवाहित सुनेची बाजू न्याय्य आहे असे गृहीत धरून कामाला लागतात. पोलिसांत तक्रार नोंदवतात, मोर्चे काढतात, निदर्शने करतात. काही वेळा थोडेफार यश मिळते, बहुधा हाती फारसे काही लागतच नाही. अशा प्रकरणांचा पाठपुरावा करायचा म्हणजे मोठी ताकद, साधने, संयम आणि धैर्य लागते. एक प्रकरण निकालात निघण्याआधी दहा नवी प्रकरणे उभी राहतात. अगदी उत्साही, तळमळीच्या कार्यकर्त्यांचीही दमछाक होऊन जाते. एखाद्या प्रकरणात थोडी चूक झाली तर महिला कार्यकर्त्यांवरही दोषारोप होऊ लागतात. त्यांचा उत्साह मावळू लागतो. कार्यकर्तीच्या घरात किंवा जवळच्या नातेवाईकांतच असे वितुष्टाचे एखादे प्रकरण उभे राहिले म्हणजे मग या साऱ्याच खटाटोपाच्या फोलपणाची जाणीव होऊ लागते.

नववधूंना आणि सुनांना होणारा जाच आणि छळ ही एक गंभीर समस्या आहे. भारतात इतक्या मोठ्या प्रमाणावर नववधू जीव देतात की, त्यांची कोणाही सुसंस्कृत समाजाला शरम वाटावी. पतिनिधनानंतर त्याच्या चितेवर स्वतःला जाळून घेण्यास शोकाकुल विधवा तयार होतात याचे लोकांना आश्चर्य वाटते; पण, नवविवाहित मुली स्वतःला जाळून घेण्यास तयार होतात ही गोष्ट

इतकी भयानक वाटत नाही. कौटुंबिक वितुष्टांची ही प्रकरणे स्त्रीचळवळीच्या विषयपत्रिकेवर असणे कितपत योग्य आहे? आत्महत्या असो, खून असो, शारीरिक छळाचा प्रश्न असो; ही सारी कृत्ये गुन्हेगारीची आहेत. दंडविधानात त्यासंबंधी यथायोग्य तरतुदी आहेत. असल्या प्रकरणात जाणकार तज्ज्ञांनी बारकाईने तपास करणे महत्त्वाचे असते. असले तपास हे काही हौशागवशा कार्यकर्त्यांचे काम नव्हे. बळी पडलेल्या स्त्रीचा कोणी एक जिव्हाळ्याचा माणूस आग्रहाने आणि निश्चयाने पुढे सरसावला तर पोलिसी तपास ढिला पडणे कठीण होते. माहेरची माणसे बळी स्त्रीला न्याय मिळवून देण्याकरिता पुढे सरसावली तर महिला संघटनांना असल्या प्रकरणी लक्ष घालण्याची गरज राहणार नाही.

खरे म्हणजे, असल्या प्रकरणांत महिला आंदोलनांचा काही संबंध नाही. स्त्रीवर जुलूम, अन्याय करणारे केवळ पुरुषच असतात असे नाही; बहुसंख्य प्रकरणी एका बाजूस सून तर दुसऱ्या बाजूस सासू आणि नणंद इत्यादि ठाकलेले असतात. सून ही स्त्री खरी, पण सासू आणि नणंद याही स्त्रियाच. वयाबरोबर सासू पुरुषसमाजात सामील होते आणि तेथे सत्तेचे स्थान मिळविण्यासाठी सुनेचा छळ करण्यात हातभार लावते असा एक अर्धाकच्चा सिद्धांत काहीजणांनी मांडला आहे. पण, हे नणंदेच्या बाबतीत तरी लागू नाही. पुष्कळदा नणंद ही भावजयीपेक्षाही वयाने कमी असते, विवाहित असल्यास तिलाही संसाराचे काही चटके सोसावे लागलेले असतात. थोडक्यात, असली प्रकरणे म्हणजे स्त्रीजातीवर इतरेजनांनी केलेला अत्याचार असे निखळपणे नसतेच आणि तरीही असल्या घरगुती प्रकरणांत महिला संघटना उत्साहाने लक्ष घालतात आणि आपली ताकद खच्ची करून घेतात.

स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या महिला संघटना इतरही पोलिसी थाटाचे प्रश्न हाती घेतात. बलात्कार, पोलिसी अत्याचार असे कुटुंबाबाहेरील गुन्हे घरगुती वितुष्टांइतकेच थकविणारे असतात.

### सेवाभावी संस्था

नवऱ्याने टाकून दिलेल्या, विधवा, कुमारी माता, अपंग स्त्रिया यांच्याकरिता शिक्षणाची सोय करणे, त्यांना काही आरोग्यसेवा देणे, त्यांच्या चरितार्थासाठी काही उद्योगधंद्यांची सोय करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे अशा तऱ्हेची कामे करता येतात. पण, गुजरातेतील इला भट यांच्या 'सेवा'संस्थेसारखे काही अपवाद सोडले तर त्यांत फारसे यश मिळत नाही. अशा कामांना प्रचंड मेहनत, चिकाटी, व्यवस्थापनकौशल्य आणि व्यवसायबुद्धी यांची गरज असते.



याखेरीज, स्त्रियांची वेगळी महिला बँक, स्त्रियांची वेगळी पतपेढी, स्त्रियांचा वेगळा साखर कारखाना असे अनेक क्षेत्रांत 'जनाना डब्बे' करण्यात अनेक संस्था गुंतल्या आहेत. या कार्यकर्त्यांचे त्यांच्या कामाबद्दल, कौशल्याबद्दल, कर्तबगारीबद्दल कौतुकच केले पाहिजे. आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांत अशा विधायक कामगिरीचे मोठे जबरदस्त नमुने उभे राहिले आहेत. तरीही, ही कामे महिला चळवळीचा भाग आहेत का हा प्रश्न तपासून घेतला पाहिजे.

स्त्रीआयुष्याचा काही एक ढाचा असतो. घरगुती काम, मुलांची देखभाल, बाळंतपणाच्या काळातील अडचणी हे सारे लक्षात घेतले तर शाळाकॉलेजांची वेळापत्रके आणि कारखाने, कार्यालये यांच्या काम करण्याच्या पद्धती स्त्रियांना अडचणीत टाकणाऱ्या आहेत. त्यामुळे, बरोबरीच्या नात्याने स्त्रियांना या क्षेत्रांत स्पर्धेत उतरण्यास आणि कर्तबगारी दाखविण्यास वाव मिळत नाही ही गोष्ट खरी. पण, या तऱ्हेची कामे दानधर्माच्या आणि करुणेच्या भावनेने हाती घेणे योग्य नाही. सध्याच्या व्यवस्थेत लोकसंख्येतील निम्मा भाग असलेल्या स्त्रियांची शक्ती व्यर्थ जात असेल तर त्याच कार्यक्षमतेचा उपयोग करून बाजारपेठेत उतरणे सहज शक्य व्हावे. असे करण्यात भांडवलाच्या तुटवड्याची अडचण तशी किरकोळ असते; स्त्रीच्या मनात शतकानुशतके रुजविण्यात आलेला न्यूनगंड आणि आत्मसन्मानाचा अभाव हे खरे अडथळे आहेत. सहानुभूतीच्या आधारावर केवळ असे कार्यक्रम आखले गेले तर ते सदासर्वकाळ चालतच ठेवावे लागतील. या उलट, आपल्या व्यक्तित्वाविषयीचा न्यूनगंड दूर करून त्यांना आत्मसन्मानाची भावना देता आली तरच हा प्रश्न खऱ्या अर्थाने सुटू शकेल.

### शास्त्रांना गवसणी

स्त्रीमुखंडींचा एक मोठा प्रभावशाली गट आणखी एक वेगळ्या प्रकारचे काम करीत असतो. स्त्रियांच्या प्रश्नाचे नेमके स्वरूप काय? स्त्री शरीराने कमजोर नाही, बुद्धीने कमी नाही तरी समाजातील तिचे स्थान सर्वदूर दुय्यम का झाले? समाजातील श्रमविभागणी लिंगभेदावर का आखली गेली? चूलमूल या रगाड्यातून स्त्रीची सुटका होऊ शकते किंवा नाही? असे अनेक प्रश्न अभ्यासणे, समजून घेणे महिला आंदोलनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. यासाठी अनेक स्त्रिया पायाभूत अभ्यास परिश्रमाने करीत आहेत. वेगवेगळ्या देशांत, प्रदेशांत, जातीत, काळात स्त्रियांची परिस्थिती काय आहे/होती याबद्दल तपशीलवार माहिती व आकडेवारी गोळा करणे; याखेरीज, प्राग्मानववंशशास्त्र, इतिहास,

अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र अशा वेगवेगळ्या शास्त्रांतील नवनव्या निष्कर्षांच्या प्रकाशात स्त्रीप्रश्नाची तपासणी करणे अशा संशोधनातही अनेक विदुषी काम करीत आहेत. स्त्रियांचा प्रश्न हा अनेक संस्थांत, विश्वविद्यालयांत अभ्यासाचा स्वतंत्र विषय म्हणून मान्यताप्राप्त झाला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या परिषदा भरविणे, परिसंवाद घडवून आणणे हे काम गल्लीपासून दिल्लीपर्यंतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रचंड जोमाने चालू आहे. महिला कार्यकर्त्या परिसंवादांच्या राज्यविस्तारात मान्यता पावतात, मग हळूहळू राष्ट्रीय पातळीवर त्या परिसंवाद करू लागतात आणि शेवटची पायरी म्हणजे, वर्षातून दोनचार वेळा वेगवेगळ्या देशांत घडणाऱ्या परिसंवादांतील जागाही भूषवू लागतात. महिला चळवळीतील कार्यकर्त्यांचे या दृष्टीने तीन संच बनतात : आगगाडीसंच, विमानसंच आणि जेटसंच.

स्त्रीमुक्ती आंदोलनाने काय मिळविले, काय गमावले यावर मतभेद असू शकतील; परंतु, या आंदोलनाने वैचारिक जगास जे प्रचंड योगदान दिले ते कोणी नाकारू शकणार नाही. 'एंगल्स'चा 'स्त्री-दास्याचा सिद्धांत' वर्षानुवर्षे सर्वमान्य होता. महिला आंदोलनाने तो रद्दबातल ठरविला; वर्गविग्रहाच्या सिद्धांतालाच सुरुंग लावला. शेतकरी विचारांइतकेच स्त्रीमुक्तीच्या विचारांनीही साम्यवादी दृष्टिकोनाला कालबाह्य ठरविले आहे. आंदोलने अनेक झाली, त्याबरोबर महिला विचारवंतांनी व्यासंग, अभ्यास, अनुभवांची तरलता आणि प्रतिभेची झेप दाखविली. त्यानेच स्त्रिया पुरुषांपेक्षा वेगळ्या असल्याच तर काकणभर सरसच आहेत हे स्पष्ट दाखवून दिले. स्त्रीचळवळीतील अभ्यासकांचा एक सुवर्णकाळ होऊन गेला. या पहिल्या पिढीतील विदुषींनी विलक्षण अडचणींना तोंड देऊन अभ्यास केले, निष्कर्ष काढले आणि ते निर्धाराने मांडले.

**.... आणि 'गवसे'ही**

दुर्दैवाने, त्या नंतरच्या पिढीत या अभ्यासांना उतरती कळा लागली. 'स्त्रीविषयक प्रश्नांचा अभ्यास' याला एक क्षेत्र म्हणून मान्यता मिळाली, या अभ्यासासाठी शिष्यवृत्ती आणि पगारी जागा तयार झाल्या, मुबलक प्रमाणावर निधी उपलब्ध होऊ लागले, मोठमोठ्या संस्था उभ्या राहू लागल्या आणि पार्किन्सनच्या नियमाप्रमाणे खराखुरा अभ्यास संपला. विद्वत्तेचे अवडंबर आणि शब्दजंजाळ उभारणाऱ्या विदुषी आपल्या अभागी बहिणींच्या दु:खाचे भांडवल करत आपली करिअर बनवू लागल्या.

स्त्रीप्रश्नाविषयीची खरी कळकळ ओसरू लागली, ती एक 'करिअर' बनली. याचे दोन मोठे गंभीर परिणाम झाले. स्त्रीप्रश्नाचे आकलन करण्यासाठी अगदी



नव्या संकल्पना आणि शब्दभांडाराची आवश्यकता होती. एक पर्यायी संदर्भरेषा त्यासाठी तयार करणे आवश्यक होते. दुसऱ्या पिढीतील विदुषींना स्त्रीप्रश्नासंबंधी नवी संदर्भरेषा तयार करण्यात अपयश आले. त्यांची तेवढी कुवतही नव्हती आणि जिद्दही नव्हती. परिणाम असा झाला की, पुरुषजगात शोषक-शोषितांच्या संबंधाने जे काही सिद्धांत प्रचलित होते त्यांच्याच साच्यात स्त्रीप्रश्न मारून मुटकून बसविण्यात आला. पहिल्या पिढीतील स्त्री-अभ्यासकांनी स्त्रीप्रश्नाच्या आधारे मार्क्सवादाच्या, विशेषत: वर्गविग्रहाच्या कल्पनेच्या धांदोट्या केल्या, तर दुसऱ्या पिढीतील त्यांच्या लेकींनी मार्क्सवादाच्या आधारेच पुरुषसत्ताक व्यवस्था विरुद्ध शोषित स्त्रिया अशी वर्गवादी मांडणी केली. अनेक ठिकाणी स्त्रियांची चळवळ ही डाव्या चळवळीचा महत्त्वाचा भाग बनली. नोकरदार, पगारी आणि दिखावू शब्दकौशल्य अंगी बाणवलेल्या स्त्रियांच्या हाती ही चळवळ गेली.

**आंदोलनाची दुर्दशा**

वेगवेगळ्या क्षेत्रांत आपापली कर्तबगारी दाखविणाऱ्या स्त्रिया होत्या. कोणी वकील होत्या, कोणी डॉक्टर, कोणी लष्करात जात होत्या तर कोणी वैमानिक बनत होत्या; कोणी साहसाची कामे करीत होत्या तर कोणी कलाक्षेत्रात चमकत होत्या. अनेक उद्योजक महिलांनी कारखानदारी, व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतही आपल्या स्त्रीपणाचा कोणताही आधार न घेता मोठी कामगिरी करून दाखविली. साऱ्या स्त्री-जातीस ललामभूत असलेल्या या दुर्गा स्त्री-चळवळीपासून दूर झाल्या आणि स्त्रीचळवळ वावदूक मुखंडींच्या हाती गेली.

डाव्या विचारांचा प्रभाव, नोकरदार स्त्रियांचे नेतृत्व आणि सरकारी तिजोरीतून मिळणाऱ्या निधींच्या आधाराने चालणाऱ्या परिसंवाद-परिषदा असले कार्यक्रम यांना स्त्रीआंदोलनात महत्त्वाचे स्थान मिळाले. परिणामत:, सारे महिलाआंदोलन शासनापेक्षी बनले. स्त्रियांचे काही भले व्हायचे असेल तर ते शासनाने केलेल्या कायद्यांमुळे, शासनाने चालविलेल्या प्रकल्पांमुळे, शासनाने दिलेल्या साधनसंपत्तीमुळे होईल अशी परिस्थिती झाली आणि स्त्रीआंदोलनाचे प्राथमिक उद्दिष्टच बदलून गेले. समाज कसाही असो, सरकार कसेही असो त्या सत्तेत स्त्रियांचा वाटा असला पाहिजे अशी 'सक्षमीकरणा'ची भाषा चालू झाली. डाव्या चळवळीच्या प्रभावाबरोबरच मागासवर्गीयांच्या चळवळीला सक्षमीकरणाचे वळण मिळालेले होते; स्त्रीचळवळीनेही ते बिनाचौकशी स्वीकारले. शासनाच्या आधाराने महिला आंदोलनाची उभारणी होत असताना समाजवादी रशियाचा

पाडाव झाला, एवढेच नाही तर शासन या संस्थेच्या उपयुक्ततेबद्दलच मोठी प्रश्नचिन्हे उभी राहिली आणि स्त्रीआंदोलनाची स्थिती बुडत्या जहाजात चढून बसल्यासारखी झाली.

## ३. शेतकरी महिला आघाडी

### सेवाग्रामची 'जनसंसद'

भारतभरच्या शेतकरी संघटनांनी ३० जानेवारी १९९८ रोजी सेवाग्राम मुक्कामी स्वतंत्र्याचा ताळेबंद मांडण्याचा कार्यक्रम ठरविला आहे. स्वातंत्र्य मिळाले तरी देश अधिकाधिक घसरणीसच का लागला या प्रश्नावरील चर्चा सेवाग्राम येथे केली जाईल. या चर्चेत भाग घेणारे सारे काही शेतकरी समाजातीलच असतील असे नाही; विविध क्षेत्रांतील विचारवंत आणि कार्यकर्ती मंडळीही या विचारमंथनाच्या कार्यक्रमात भाग घेणार आहेत. अशा सर्वांना आवर्जून निमंत्रण दिले जात आहे. देशाच्या पन्नास वर्षांच्या कालखंडाच्या जमाखर्च मांडणारे सारे काही पुरुषच असतील असेही नाही, त्यात भाग घेणाऱ्यांत मोठ्या प्रमाणात स्त्रियाही असतील. देशाच्या घसरगुंडीचे कारण तो 'एकमय लोक' या अर्थी राष्ट्र (Nation) झाला नाही; स्वातंत्र्य मिळाले; एक राष्ट्रगीत, एक राष्ट्रध्वज, एक संविधान, एक पंतप्रधान झाले तरी राष्ट्र एकरूप झालेच नाही; इंडिया भारताचे शोषण करू लागली; गोऱ्या इंग्रजांचे राज्य जाऊन काळ्या इंग्रजांचे राज्य आले; कष्टकरी उत्पादकांचे स्वराज्य प्रस्थापित होण्याऐवजी ऐतखाऊ बांडगुळांचे वर्चस्व तयार झाले. शेतकरी संघटनेची या विषयीची मांडणी ही थोडक्यात अशी आहे. ही मांडणी शेतकरी संघटनेचे पुरुष कार्यकर्ते करतील तसेच, शेतकरी संघटनेच्या बायाही करतील. ही मांडणी बाया करतील तेव्हा त्या शेतकरी म्हणून बोलत असतील, नागरिक म्हणून बोलत असतील; महिला म्हणून नाही.

पुरुषांच्या भूमिकेत असा काही प्रकार नाही. पुरुषांचे वर्चस्व असल्यामुळे शेतकरी/नागरिक या नात्याने पुरुष बोलतात त्यात त्यांचे पुरुष म्हणून विचारही सामावलेले असतात. शेतकरी म्हणून एक विचार आणि शेतकरी पुरुष म्हणून त्यासोबत दुसरी काही मांडणी करणे त्यांच्या बाबतीत आवश्यक नसते. स्त्रियांची गोष्ट वेगळी आहे. शेतकरी/नागरिक म्हणून शेतीच्या आणि देशाच्या विकासाच्या प्रश्नांत त्यांना स्वारस्य आहे. उदाहरणार्थ, शेतीमालाला भाव मिळाला पाहिजे हे साऱ्या शेतकरी बायांचेही मत आहे. पण, शेतीमालाला भाव मिळाला आणि त्यामुळे तिचे दुःख कमी न होता अधिकच वाढले तर काय याही प्रश्नाची



चिंता तिला करावी लागते. देशाच्या साऱ्या परिस्थितीची तपासणी करताना स्त्रियांचा हा दृष्टिकोन प्रकट होणे महत्त्वाचे आहे.

### दुसऱ्यांदा तशीच चूक नको

''एकमय लोक' या अर्थाने राष्ट्र झाले नाही, जातिभेद कायम राहिला आणि स्वातंत्र्य आले तर त्यामुळे पेशवाई नव्याने तयार होईल' ही भीती जोतिबांनी व्यक्त केली होती आणि ती खरी ठरली. पुरुष आणि स्त्रिया यांचे मिळून 'एकमय लोक' या अर्थाने राष्ट्र तयार झाले नाही तर पुढच्या पन्नास वर्षांतही नवी पुरुषशाही तयार होण्याचा धोका राहील. इंडिया-भारत संघर्ष टाळल्याखेरीज देश तरत नाही हे पन्नास वर्षांचा स्वातंत्र्याचा कालखंड वाया घालविल्यानंतर मान्य झाले; पण त्याबरोबर, स्त्रिया आणि पुरुष यांच्या विकासातील विषमता लक्षात न घेता पुढील कार्यक्रमांची आखणी केली गेली तर पन्नास वर्षांनी पुन्हा एकदा असेच रडगाणे गाण्याचा कार्यक्रम ठेवावा लागेल.

याच विषयावरचे चिंतन, मांडणी आणि आंदोलन करण्याची प्रकृती आणि सामर्थ्य साऱ्या देशभरच्या महिला चळवळीत एकट्या शेतकरी महिला आघाडीकडेच आहे असे मला वाटते. शेतकरी महिला आघाडीने हे काम केले नाही तर ताळेबंद अपुरा राहील, देशाच्या विकासकार्यक्रमाला पुन्हा एकदा चुकीची दिशा लागेल आणि कोणी बाई बोललीच नाही म्हणून तिच्या डोळ्यांतील आसवे पुन्हा मूकच राहून जातील. अशी ही एक ऐतिहासिक जबाबदारी आणि कामगिरी शेतकरी महिला आघाडीवर काळाने सोपविली आहे.

### सामर्थ्य चळवळीचे

शेतकरी महिला आघाडी प्रकृतीने आणि सामर्थ्याने ही जबाबदारी पेलू शकते, सामर्थ्याचा मुद्दा स्पष्ट आहे. ग्रामीण भागातील महिलांना शेतकरी महिला आघाडीने जेवढ्या मोठ्या संख्येने एकत्र आणले त्याला काही तुलनाच नाही. 'दारूदुकानबंदी'सारख्या कार्यक्रमाच्या निमित्ताने हजारो स्त्रिया तुरुंगवासाची तयारी ठेवून दारूदुकानांना कुलुपे लावण्यास आणि ती दुकाने उद्ध्वस्त करण्यासही तयार झाल्या. शेतकरी संघटनेच्या आरंभीच्या काळात, 'सूर्य ज्यांना पाहात नाही आणि ज्या सूर्याला पाहात नाहीत' अशी परंपरा होती त्या स्त्रियासुद्धा गावोगाव, दुसऱ्या जिल्ह्यांत एवढेच नव्हे तर, दूरवरच्या राज्यांतही शेतकरी महिला आघाडीच्या कार्यक्रमासाठी जाऊ लागल्या. स्त्रियांच्या प्रश्नातील सर्वांत जटिल प्रश्न म्हणजे स्त्रियांच्या मालमत्तेसंबंधी हक्काचा प्रश्न; निदान सीतेच्या वनवासाइतका हा जुना आजार आहे. शेतकरी महिला आघाडीने या

प्रश्नाला हात घातला आणि दोन वर्षांत साडेसहाशे गावांनी 'लक्ष्मीमुक्ती' साजरी केली, दोन लाखांवर स्त्रियांच्या नावे त्यांच्या घरधन्यांनी जमिनी लिहून दिल्या. हे असले काही जगावेगळे कर्तृत्व शेतकरी महिला आघाडीच दाखवू शकते.

या ताकदीमागे विचारांचे सामर्थ्य असणार हे उघडच आहे. पण, अनेक वेळा विचारांचे सामर्थ्य नसतानाही संघटनेच्या आधाराने सामर्थ्य तयार होते.

जातिवाद आणि धर्मवाद यांच्या घोषणांनी समाजात विद्वेषाचा विखार पसरविणाऱ्या संघटनांनाही जनमताचा उदंड पाठिंबा मिळतो हे आपण प्रत्यक्ष पाहतो आहोत. गर्दी काय, तमाशालाही जमते आणि कोणा शास्त्री, बाबा महाराज यांच्या प्रवचनांनाही. आज या क्षणी कोणी सामर्थ्यवान दिसतो म्हणजे त्याची बाजू खरी, त्याचा विचारही योग्य अशी मांडणी फक्त पुरूष करतात. कंसाचे भले साम्राज्य होते म्हणजे काही कंसप्रवृत्तीचे समर्थन होत नाही. रावणाचे तर वैभव काय विचारावे? आजही अनेक रावण आपल्या सामर्थ्याचा डांगोरा पिटीत दिमाखाने फिरत आहेत.

**..... आणि विचारांचे**

शेतकरी महिला आघाडीकडे सामर्थ्य आहे ते कोणत्याही साधनसंपत्तीतून आलेले नाही. साधनांची, पैशांची, वाहनांची सारी रडारडच आहे. गावगन्ना महाराजांच्या प्रवचनांना जसे शानदार मांडव बांधले जातात, कमानी उभारल्या जातात तसा राजेशाही थाट शेतकरी महिला आघाडीच्या राज्यभरच्या अधिवेशनाच्या वेळीही असत नाही. माणसे गोळा करायला कोठे ट्रक फिरत नाही. एवढ्या मोठ्या संख्येने कडेवर पोरे घेऊन बाया येतात, त्यांच्यासाठी कोणतीच सोय नसते - ना राहण्याची, ना खाण्याची. सभेच्या वेळीदेखील पाणी नाही, सावली नाही अशा परिस्थितीत घरून बांधून आणलेल्या शिदोरीवर निर्वाह करीत बाया तेथे राहतात. शेतकरी महिला आघाडीच्या ताकदीमागे विचारांचे सामर्थ्य असल्याचा हा पुरावा आहे की, विचाराखेरीज दुसऱ्या कोणत्याही साधनसंपत्तीचा आधार या आघाडीस नाही.

शेतकरी महिला आघाडीचा विचार म्हणजे थोडक्यात काय आहे?

- समाजात स्त्रीला दुय्यम स्थान आहे; 'अस्तुरी जल्मा नको घालू श्रीहरि' अशी स्थिती आहे.
- निसर्गतः, शारीरिकदृष्ट्या स्त्री पुरुषापेक्षा सामर्थ्याने, बुद्धीने कमी नाही; डावे उजवे करायचे झाले तर प्रतिभा आणि बाळाला जन्म देणे व संगोपन यांसाठी आवश्यक प्रेरणांत सरसच आहे. पुरुषांच्या तुलनेने



लहान असलेले आकारमान कोणत्याही प्रकारे दुय्यमत्व लादत नाही.
- स्त्रीचे दुय्यमत्व सदासर्वकाळ साऱ्या कालखंडात राहिले आहे असे नाही. तिचे समाजातील स्थान तत्कालीन आर्थिक-सामाजिक परिस्थितीनुरूप ठरते.
- वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या काळांत स्त्रियांनी सत्ता, तलवार सामर्थ्याने वागविल्या आहेत.
- स्त्रियांच्या आजच्या दुय्यम अवस्थेचे मूळ शेतीमालाच्या वरकड उत्पादनाच्या संपादनासाठी सुरू झालेल्या आणि चाललेल्या क्रूर लुटीच्या व्यवस्थेत आहे. लुटालुटीच्या काळात पुरुषांनी स्वसंरक्षणासाठी हाती तलवार घेतली आणि स्त्रियांकडे 'चूलमूल' कामे आली.
- लिंगभेदावर आधारलेल्या या श्रमविभागणीमुळे स्त्रियांवर अन्याय झाला, तसाच पुरुषांवरही.
- ही श्रमविभागणी बदलायची म्हणजे पुरुषांनी काही चूलमूल कामे स्वीकारायची आणि स्त्रियांनी पारंपरिक पुरुषक्षेत्रातील कामे घ्यायची असा नाही.
- पुरुषांना काय किंवा स्त्रियांना काय, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. प्रत्येक व्यक्ती अनन्यसाधारण असते; त्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे ज्याला त्याला आयुष्याची दिशा ठरविता आली पाहिजे.
- हे बदल सामाजिक सुधारणांचे तकलुपी कायदे करून होणार नाहीत. लुटीची व्यवस्था संपविणे ही स्त्रियांच्या आणि पुरुषांच्याही मुक्तीची पूर्वअट आहे.
- शोषणव्यवस्था न संपविता काही क्षेत्रांत काही काळ विकास होतोसा वाटले तरी असल्या विकासाचा स्त्रियांना काहीही फायदा होत नाही; उलट, तोटाच होतो.
- शासनाचा मूळ उगम लुटालुटीत असल्यामुळे शासन आणि नोकरशाही यांची खच्ची करणे हा स्त्री-पुरुषमुक्तीचा प्राथमिक कार्यक्रम आहे.
- स्त्रीसंघटनांनी आपली सारी ताकद लुटीची व्यवस्था संपविणे आणि त्याबरोबर, स्त्रीला माणूस म्हणून उभे राहण्याचा आत्मविश्वास तयार होईल अशा कामांसाठी लावावी.
- शोषणाची व्यवस्था संपत आहे. शारीरिक ताकदीचे महत्त्व संपविणारे तंत्रज्ञान पुढे येत आहे. स्वतंत्रतेच्या नव्या युगात स्त्री-पुरुषमुक्तीचा झेंडा लावण्यासाठी आजचा मुहूर्त चांगला आहे.

■ स्त्री आणि पुरुष यांत संघर्ष नाही. वर्गविग्रहाचा सिद्धांत मुळात चुकीचा; स्त्री-पुरुष प्रश्नात तर तो सर्वस्वी गैरलागू आहे.

हा तर्कशुद्ध विचार मांडताना शेतकरी महिला आघाडीने जागतिक मान्यता असलेल्या अनेक विचारप्रवाहांना आव्हान दिले आहे.

**पूर्वापारच्या समजुती उधळल्या**

स्त्री ही निसर्गातील दुय्यम निर्मिती आहे, पुरुषार्थाच्या मार्गातील अडचण आहे, पापाचे साधन आहे, तिला मुक्तीचा अधिकार नाही, पती हाच तिचा परमेश्वर, तिला स्वातंत्र्याचा अधिकार नाही असली बाष्कळ विधाने सर्व धर्मांत आणि पारंपरिक विचारपद्धतींत सापडतात. स्त्री ही माणूस आहे, संसारातील चारही अर्थ केवळ 'पुरुषार्थ' नसून 'मानवार्थ' आहेत आणि स्त्रियांचाही त्यांवर अधिकार आहे हे शेतकरी महिला आघाडीने स्पष्ट केले.

मार्क्सवादी, समाजवादी, साम्यवादी आणि इतर फुटकळ डावे पंथ यांनीही स्त्रियांकडे आलेल्या चुलमूल जबाबदाऱ्या जीवशास्त्रीय कारणांनी आल्या असे मानले. स्त्री ही खासगी मालमत्ता झाली आहे; खासगी मालमत्ता संपविली, नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने चूलमूल कामांचे सार्वजनिकीकरण झाले म्हणजे स्त्रियांचा प्रश्न संपेल असे त्यांनी मांडले. या साऱ्या मांडणीस आणि शिवाय, वर्गसंघर्षाच्या कल्पनेस शेतकरी महिला आघाडीने आह्वान दिले.

स्त्रीचळवळीच्या काही मुखंडींनी स्त्रीप्रश्नाचे विश्लेषण करताना बलात्काराच्या वा अन्य धाकाने पुरुषशाहीने सर्व स्त्रीसमाजाला गुलाम बनविले, एका बाजूस सर्व पुरुष आणि एका बाजूस सर्व स्त्रिया असा हा सनातन संघर्ष आहे अशी मांडणी केली. या उलट, शेतकरी महिला आघाडीने स्त्री व पुरुष यांना निसर्गाने परस्परपूरक बनविले आहे, त्यांच्यातील संघर्ष सामाजिक-आर्थिक परिस्थितीमुळे काही काळापुरता तयार झाला आहे, असे मांडले.

**स्त्रियांचे स्वतंत्रतावादी आंदोलन**

बाकी, इतर महिला संघटना आणि शेतकरी महिला आघाडी यांच्यातील फरक एका वाक्यात सांगायचा झाला तर तो असा मांडता येईल:

शेतकरी महिला आघाडी व्यक्तिस्वातंत्र्याला जपते, शासन ही दुष्ट संस्था मानते, स्त्री व पुरुष यांनी व्यक्ती व्यक्ती म्हणून आपापल्या स्वातंत्र्याच्या कक्षा जोपासाव्यात हीच त्यांची इतिहाससिद्ध आणि निसर्गदत्त प्रवृत्ती आहे असे मानते. या उलट, धार्मिक, डावे आणि स्त्रीवादी साऱ्या स्त्रियांना एक कळप मानतात आणि त्यांच्या नियमनासाठी काही नीतिनियम, कायदेकानू आणि



त्यांच्या अंमलबजावणीसाठी शासनव्यवस्था मजबूत करू पाहतात.

गेली शंभरदीडशे वर्षे मनुष्यजातीला समाजवादाच्या भानामतीने ग्रासले होते. कळपशाहीचा बोलबाला होता. कोणी वर्गाचे महत्त्व सांगत होता, कोणी धर्माचे; कोणी जातीचे, कोणी टोळीचे. व्यक्ती क:पदार्थ आहे, राष्ट्र मोठे आहे, वर्ग मोठा आहे; समूहासाठी व्यक्तीने आनंदाने स्वत:चे बलिदान करावे, समर्पण करावे यातच व्यक्तीचा परमार्थ आहे असे मांडले जात होते. या फेऱ्यात, दुर्दैवाने, शेतकरी महिला आघाडीव्यतिरिक्त सारी महिला चळवळ सापडली, ती समूहवादी झाली, शासनसंस्था आणि कायदेकानूंच्या आधाराने स्त्रियांच्या दु:खाचे भांडवल करून काही मुखंडींची करिअर जोपासण्याकडे ती वळली. बहुतेक स्त्रीसंस्थांचे कामकाज आणि साहित्य पाहिले तर स्त्री-चळवळीला लागलेले कळपवादाचे ग्रहण स्पष्ट होते. बेजिंग येथे भरलेल्या जागतिक महिला परिषदेच्या जाहीरनाम्यात करिअरवादी महिला मुखंडींनी महिला चळवळीचे केलेले अपहरण उघड दिसून येते.

समूहवादाचा आता जागतिक ऐतिहासिक पराभव होत आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचे, उद्योजकतेचे नवे युग येत आहे. स्वतंत्रतावादाची मांडणी सतराव्या शतकापासून अनेक विचारवंतांनी केली. स्त्रीप्रश्नाची मांडणी स्वतंत्रतावादाच्या आधाराने करण्याची कामगिरी शेतकरी महिला आघाडीने पार पाडली.

सर्वत्र समूहवादाचा गलबला चालू असताना शेतकरी महिला आघाडीने ही हिम्मत दाखविली. स्वतंत्रतावादाच्या विचाराची आता पहाट येत आहे, शेतकरी महिला आघाडीने मांडलेल्या विचारांचा आता विजय होतो आहे. आपल्या देशातील अर्थव्यवस्था लुटालुटीची राहाणार नाही आणि नव्या व्यवस्थेत सर्वोच्च प्राधान्य व्यक्तीला राहील, शासनसंस्थेला नाही यासंबंधी विचार करणे, स्वत:ची खात्री करून घेणे, इतरांना पटविणे आणि आवश्यक तर या कामासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवणे हे शेतकरी महिला आघाडीस आणि आघाडीतील प्रत्येक बाईस करावे लागणार आहे.

*(शेतकरी संघटक १९९७)*

■■

आठ

# चांदवड – जाहीरनामा व शपथ

**आम्ही,**

दिनांक १० नोव्हेंबर १९८६ रोजी, अहिल्याबाई होळकरांचे चांदवड येथे एकत्र आलेल्या लाखावर स्त्रिया, काही शहरी, पण बहुसंख्य खेड्यांपाड्यांतून आलेल्या, थोड्या शिकलेल्या पण बहुतेक पाटीसुद्धा न पाहिलेल्या, जवळजवळ सगळ्या शेतात किंवा इतरत्र राबणाऱ्या कष्टकरी बाया, लहानथोर, भिन्नभिन्न जातींच्या, वेगवेगळ्या धर्मांच्या. थोडक्यात भारतीय स्त्रीजीवनाच्या यथार्थ प्रतिनिधी.

**जाहीर करतो की,**

आम्ही माणसे आहोत, इतर कोणाच्याही बरोबरीने माणसे आहोत आणि आम्हाला माणूस म्हणूनच वागविले गेले पाहिजे,

आमची गुणवत्ता लक्षात घेतली जावी; जन्माच्या अपघाताने ठरणारे विशेष– जात, वर्ण, धर्म, भाषा, संपत्ती नाही आणि लिंगभेद तर नाहीच नाही

**आणि शपथ घेतो की,**

आमचे माणूसपण हिरावणारी हजारो वर्षांची बंधने झुगारून देत आहोत,

युगायुगांची दु:खे, अत्याचार, परवशता, अपमान आणि शोषण यातून आम्ही मुक्त होत आहोत आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे, आमची वैरिणी – आमच्याच मनातली भीती आम्ही गाडून टाकीत आहोत; त्याचबरोबर, पुरुषांचीही त्यांना मिरवाव्या लागणाऱ्या खोट्या पुरुषीपणाच्या मुखवट्याच्या जाचातून सुटका करण्याचा आमचा निश्चय आहे.

पुरुषांना याची जाणीव असो वा नसो स्त्रियांच्या बेड्या या त्यांचेही दुर्दैव आहे.

स्त्रीला तिच्या निसर्गसिद्ध भूमिकेतून ढळविले की पुरुषही स्व–भावाला पारखा होतो.

स्त्रीची मूर्ती हीन–दीनतेची झाली की पुरुष रुपात विक्राळ विदुषकीपणा



येणारच.

स्त्री–मुक्ती आणि पुरुष–मुक्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

माणसासारखं जगण्यासाठी स्त्रिया हजारो वर्षे वाट पाहत आहेत. स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. हुकमी पिकंमुळे सुबत्ता आणि शांती यांचा मार्ग खुला होईल आणि अन्नाच्या शोधाची वणवण आणि दु:खे संपतील ही आशा फोल ठरली.

पहिल्या पिकांबरोबर लुटारूंच्या झुंडी आल्या आणि लुटालूट, कत्तली, बलात्कार, विद्ध्वंसाचे 'नवे जंगली युग'–लोक भले त्याला संस्कृती–युग म्हणोत चालू झाले.

आपल्या कष्टांना आलेले हे फळ पाहून स्त्री हतबुद्धच झाली आणि वेगळी भूमिका तिला स्वीकारावी लागली. सर्व समाजाची बांधणीच आक्रमणांपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने होऊ लागली. आक्रमणे कधी जवळपासच्या प्रदेशातून येत तर कधी दूरच्या अज्ञात प्रदेशातून. लढाईत पुरुषांची सर्रास कत्तल होई त्यामुळे प्रत्यक्ष लढाईत पुरुषांचीच भूमिका प्रमुख राहिली. मातृत्वाच्या जबाबदारीमुळे येणाऱ्या अडचणींमुळे प्रत्यक्ष लढाईत भाग घेणे स्त्रीला दुरापास्त होई आणि त्यामुळे तिच्याकडे पिछाडी सांभाळायचे काम आले. धुमश्चक्री चालू असताना धनसंपत्तीबरोबर तिलाही बंदोबस्तात राहवे लागले. हरणाऱ्या आणि जिंकणाऱ्या दोन्ही समाजात पुरुषांचे प्रमाण खालावतच राहिले.

सर्व समाजात लढाऊ पुरुषांची सद्दी सुरू झाली. अधिकाधिक मुले व्हावीत, त्यात मुलगे अधिक जन्मावेत, त्यांनी बलशौर्याची जोपासना करावी हे नवे मानदंड ठरले, स्त्रियांनी अधिकाधिक संतती निर्माण करावी आणि आपल्या पुरुषांचे पौरुष वाढावे यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करावा. थोडक्यात, स्त्रीचा आदर्श वीरप्रसवा, वीरभगिनी, वीरमाता.

परिणामत:, हरो कोणी, जिंको कोणी खऱ्या हरल्या दोन्ही बाजूच्या स्त्रिया. जेत्यांच्या स्त्रियांना लुटीची आभूषणे पेहरण्याचा सोहळा सोडल्यास स्त्री म्हणून त्यांची स्थिती पराजितांच्या स्त्रियांपेक्षा काहीच वेगळी नव्हती.

सुरुवातीला आक्रमणाचे संकट टळले की, ही तात्पुरती व्यवस्थाही जाईल असे वाटले. पण लूटमारीइतके फायद्याचे काहीच नाही; त्यामुळे लूटमारच व्यवस्था बनली. कुटुंबातील नव्या भूमिका इतक्या रुजल्या की त्या नैसर्गिक आणि अनादि वाटू लागल्या. लूटमारीच्या पद्धतीतही सुधारणा झाली. लुटारूंच्या हाती राजसत्ता आली आणि नंतर प्रजासत्ताही.

खुलेआम लुटीच्या जागी वेगवेगळ्या पद्धती आल्या. महसूल, गुलामगिरी,

वेठबिगारी, सावकारी, जमीनदारी, जातिव्यवस्था, धर्मव्यवस्था, साम्राज्यवाद आणि शेवटी स्वातंत्र्यानंतरचा काळा वसाहतवाद.

पण ही सुधारणा वरवरची. या सर्व पद्धती मूलतः क्रूर लुटीच्याच पद्धती. त्यामुळे समाज आजही संरक्षक तटबंदीतच आहे आणि स्त्रिया गुलामीत आणि जुलमात. नव्या जंगली युगातील या श्रमविभागणीमुळे स्त्री-पुरुषांच्या संतुलित व्यक्तिमत्वाचे विभाजन आणि ध्रुवीकरण होत गेले.

स्त्रीचा आदर्श हा सर्व सौम्य आणि परवश गुणांनी बनलेला तर पुरुषार्थाच्या सर्व कल्पना कठोर आणि विक्राळतेवर आधारलेल्या. स्त्रीत्व विकृत झाले, बरोबरीने पुरुषार्थाचेही विडंबन झाले.

आमच्या या देशातली स्थिति तर सर्वात भयानक. क्वचितच एखाद्या देशाला इतक्या लढायांना आणि आक्रमाणांना तोंड द्यावे लागले असेल.

१९ व्या शतकातली भारतीय नारीइतकी हीन-दीन स्त्री दुसऱ्या कोणत्याही देशात कधीही झाली नसेल. सतीची चाल, केशवपन, शिक्षणबंदी यावरून स्त्रियांवरील अमानुष अन्यायांची काहीशी कल्पना येते.

इंग्रजांबरोबर राजकीय स्थैर्य आले आणि त्यामुळे स्त्रियांच्या स्थितीत अनेक सुधारणाही झाल्या. कायद्यांची कागदी घोडदौड स्वातंत्र्यानंतरही चालू राहिली. आज कागदावरतरी स्त्रियांना संरक्षण देणारे कायदे भारताइतके इतर कोणत्याही देशात नसतील.

मोठ्या खानदानातील काही भाग्यवतींची स्थिति त्यांच्याच समाजातील पुरुषांपेक्षाही उजवी आहे. हा किरकोळ अपवाद सोडल्यास देशातील सर्वसाधारण स्त्रीइतका त्रास, जुलूम, शोषण आणि मारपीट कोणालाही सहन करावी लागत नसेल. स्त्रियांना जाळून वा बुडवून मारण्याचे प्रकार हरहमेशा होत असतात. याचे कारण एकच, स्वातंत्र्यानंतरच्या काळात युगानुयुगे चाललेली लूटमारीची पद्धत कायम झाली. 'भारता'ची लूट 'इंडिया'कडून होऊ लागली आणि ग्रामीण भागात सहकारी संस्था फस्त करणाऱ्या गुंडांनी, तर शहरात वाढणाऱ्या झोपडपट्ट्यांच्या आधाराने गुन्हेगारीची साम्राज्ये चालविणारे दादा यांनी जुन्या लुटारूंची जागा घेतली. एवढाच काय तो फरक. अर्थव्यवस्था लूटमारीची राहिली आणि म्हणून स्त्रीची स्थिती गुलामगिरीची.

**नवी पहाट**

इतिहासात माहीत असलेल्या कोणत्याही पद्धतीने स्त्रियांच्या प्रश्नाचे आदिकारण-शेतीच्या बचतीची क्रूर लूट-दूर केली नाही. या पद्धतीला आज पहिल्यांदा आव्हान देऊन यशस्वीरीत्या विरोध होत आहे.



नव्या शेतकरी आंदोलनाचा खरा अर्थच हा आहे. त्याशिवाय गेल्या चाळीस वर्षांत निदान जागतिक महायुद्ध तरी घडलेले नाही आणि शेवटी शक्तीबळाला महत्त्व न देणारे नवे तंत्रज्ञान उदयाला येत आहे. स्त्रियांच्या पुनरुत्थानांचा काळ आल्याची ही सर्व शुभचिन्हे आहेत.

परंतु स्त्रियांनी जागृत होऊन आणि संघटितपणे या अनुकूल परिस्थितीच्या संगमाचा फायदा घेऊन प्रचलित व्यवस्थेला निर्णायक धक्का दिला नाही तर ही अनुकूल संधीही वाया दवडल्यासारखे होईल. स्त्रियांना संघटितपणे कष्टकऱ्यांचे हक्क मिळवावे लागतील. तसेच स्त्रीपणाच्या हक्कासाठी झुंझावे लागेल. त्याहीपेक्षा महत्त्वाची आणखी गोष्ट, पीछेहाट होणारे लुटारू जाती, धर्म, भाषा आदी क्षुद्रवादांचे झेंडे उभारून पुन्हा एकदा हिंसाचाराचा डोंब भडकवण्याचा प्रयत्न करतील. याबद्दल स्त्रियांनी विशेष जागरूक राहणे आवश्यक आहे.

स्त्रियांची सध्याची दुरवस्था ही फार जुनी आहे, या स्थितीला पर्याय नाही असे स्त्रिया आणि पुरुष दोघांनाही शिक्षणाने, उदाहरणाने, संस्कृतीने आणि राजकारणाने पटवून देण्यात आले आहे.

आपण माणसे आहोत आणि माणसाप्रमाणेच सन्मानाने व स्वतंत्रपणे जगू शकतो हे स्त्रियांना सांगावे लागेल आणि पटवून द्यावे लागेल. या दिशेने पहिले पाऊल म्हणून –

**आम्ही प्रतिज्ञा घेतो की,**

आम्ही यापुढे स्त्रियांना कधीही कनिष्ठ समजणार नाही. विशेषत: गर्भ स्त्री-बालकाचा आहे यास्तव त्याला जन्माचा हक्क नाकारणार नाही;

मुलगी आहे म्हणून लालनपालन, वात्सल्य, शुश्रूषा आणि शिक्षण यात कमी करणार नाही;

स्त्रियांना मालमत्तेमधील त्यांची वाटणी, गुणविकासाला वाव आणि स्वातंत्र्य मिळण्याआड येणार नाही;

तसेच मुलींचे शिक्षण आणि विवाह यांबद्दलच्या कायद्यांचे पूर्णपणे परिपालन करू;

सासुरवाशिणींना घरच्या लेकींप्रमाणे वागवू आणि माहेरवाशिणींना आमचा आधार कायम वाटेल अशा वागू. विधवा, घटस्फोटिता व परित्यक्ता आणि विशेषत: अत्याचारांना बळी पडलेल्या स्त्रियांना कमी लेखणार नाही;

स्त्रियांचे शृंगार-ललित रूपच प्रकाशात आणून त्यांची नटवी, उपभोग्य वस्तूची हिडीस प्रतिमा मांडणार नाही आणि मांडू देणार नाही.

■■

नऊ

# स्त्रियांच्या प्रश्नांची फूटपट्टी

गेल्या पन्नास वर्षांच्या, म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात, स्त्रियांच्या दृष्टीने काय काय बदल घडून आले याचे मोजमाप काही निश्चित फूटपट्टीने व्हायला पाहिजे. ही फूटपट्टी चांदवड अधिवेशनाच्या शिदोरीनेच दिलेली आहे.

यासंबंधी मोजमाप करणारे अभ्यासक आणि स्त्री-चळवळीचे नेते एकाच प्रश्नावर भर देतात. समाजातील किंवा कुटुंबाची संपन्नता वाढली तर या संपन्नतेचा यथायोग्य वाटा स्त्रियांपर्यंत पोहोचतो काय? का, केवळ स्त्री म्हणून तिचा हक्क डावलला जातो काय? पण या खेरीज, इतरही अनेक व्यवस्थांचा फायदा स्त्रियांपर्यंत पोहोचतो किंवा नाही याचेही मोजमाप करणे आवश्यक आहे. स्त्रिया शिक्षण, आरोग्य, प्रवास, संचार इत्यादी व्यवस्थांचा पुरुषांच्या तुलनने किती प्रमाणात उपयोग करतात याचे मोजमापही खूप बोलके होईल.

पण, स्त्रीमुक्तीचे सर्वांत महत्त्वाचे मोजमाप लिंगभेदावर आधारलेली सामाजिक आणि कौटुंबिक श्रमविभागणी ही बेडी कितपत सुटली आहे हे आहे. मुलींची गर्भहत्या व स्त्रीबालक जन्मल्यानंतर त्याची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मार्गाने हत्या या बाबतीत काही लक्षणीय फरक पडला आहे का? मुलगी आहे व लग्न करून चूलमूलच सांभाळणार आहे अश्या कल्पनेने तिच्यावर किती संस्कार केले जातात? आणि 'चूलमूल'च्या बाहेरील जगात उतरण्यासाठी तिची किती तयारी केली जाते? स्त्री आहे म्हणून ती पुरुषांच्या तुलनेने अधिक असुरक्षित बनते काय? गर्भधारणा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे स्वातंत्र्य आणि शक्यता तिला किती प्रमाणात उपलब्ध होतात? आणि संसार नासल्यास तिला पूर्वीप्रमाणेच जगता यावे यासाठी मालमत्ता, मिळकत, पोटगी आणि संरक्षण यांची व्यवस्था आहे काय? याही फूटपट्ट्या अशा मोजमापासाठी वापरणे आवश्यक आहे.

या फूटपट्ट्या वापरायच्या म्हणजे त्यासाठी प्रचंड आणि व्यापक संख्याशास्त्रीय अभ्यास सुरू करावे लागतील आणि सातत्याने चालू ठेवावे लागतील. आजपासून



जरी असे अभ्यास चालू झाले तरी त्यांचे निष्कर्ष, कदाचित वीसपंचवीस वर्षांनंतर उपयोगी पडू लागतील. आज, गेल्या पन्नास वर्षांचे अवलोकन करताना उपयोगी पडतील असे विश्वसनीय अभ्यास जवळजवळ नाहीत; स्त्रियांनी एकत्र येऊन परस्परांशी चर्चा करून आकडेवारीच्या जागी अनुभवांच्या आधाराने काही निष्कर्ष काढणे एवढी एकच शक्यता दिसते.

स्वातंत्र्यपूर्व काळातही मुलगी जन्मल्याचा आनंदोत्सव कधीच होत नव्हता, आजही परिस्थिती तशीच आहे, किंबहुना अधिकच वाईट झालेली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रत्यक्ष जन्माआधी बाळ मुलगा आहे की मुलगी आहे हे समजत असल्याने बालिकेचे गर्भच पाडून टाकण्याची प्रवृत्ती बळावली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात कायदा आणि सुरक्षाव्यवस्था आजच्या इतकी वाईट नव्हती. कोण्या स्त्रीस गुंडपुंड सतावू लागले तर तिला पोलिसांचा आधार मिळू शके. आता, एकट्यादुकट्या स्त्रीने पोलिसचौकीत जाण्याचे धाडस करूच नये असा सल्ला स्त्री-चळवळीच्या नेत्याच देतात.

वारसाहक्काने मिळालेल्या मालमत्तेचा एक छोटा हिस्सा मुलींना मिळण्याची तरतूद कायद्याने झाली आहे. पण, प्रत्यक्षात वेगवेगळ्या मार्गांनी संमतीपत्रके घेऊन हा हक्क नाकारला जातो.

हुंडाबंदीचा कायदा झाला तरी हुंडापद्धती थांबलेली नाही. याउलट, स्त्रीधन किंवा लग्नाच्या वेळीच दिलेले उपहार ही मुलींना मालमत्ता देण्याची मुख्य पद्धत म्हणून मानली जात आहे.

शिक्षण आणि आरोग्य यांच्या व्यवस्था स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात वाढल्या. पूर्वीच्या मानाने मुलींचे शाळेत जाणे खूपच वाढले. त्या खेरीज रेडिओ, दूरदर्शन यांच्याद्वारे अनौपचारिक शिक्षण सर्वदूर पसरले आहे. सातवी किंवा दहावीपर्यंत शिक्षण घेऊनही खेडेगावांतील मुली संसारालाच लागतात आणि शेतात निंदणीखुरपणीच्या कामालाच येतात.

पूर्वी, इस्पितळात किंवा डॉक्टरकडे जाण्यास स्त्रिया तयार नसत, त्या आता जाऊ लागल्या आहेत. बाळाला टोचणे, कुटुंबनियोजन याबाबतीत स्त्रियांना त्यांच्या जबाबदारीची अधिक जाणीव आली आहे. साथीचे रोग आटोक्यात आले. बाळंतिणी व बालके यांच्या मृत्यूचे प्रमाण घटले.

गरीब घरात स्त्रीपुरुषातील श्रमविभागणी अस्पष्ट असते. संसार, घरातील सामान, भांडीकुंडी, एकूण गृहव्यवस्था यासाठी निम्मी माणसे म्हणजे सर्व स्त्रिया अडकवून ठेवणे बेहिशेबी ठरते. संपन्नता वाढू लागली की जुन्या पिढीतील

स्त्रिया घरकामात अधिक कोंडल्या जातात. वाढत्या संपन्नतेमुळे स्त्रियांच्या एका पिढीवर अधिक बंधने येतात; स्वातंत्र्याच्या कक्षा वाढल्या तर त्या पुढच्या पिढीत वाढतात.

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे घरकामात काहीशी सुकरता आली आहे. दिवाबत्ती, पाणी, दळण, शिवण इत्यादी कामे अधिक सुकर झाली आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकरीसमाजात स्त्रियांची स्वत:ची अशी मिळकत असण्याच्या अनेक व्यवस्था होत्या. दूध, शेळ्या, कोंबड्या, अंडी, माळवे इत्यादींची मिळकत बायकाच करीत आणि ठेवीत. या साऱ्या पद्धती जवळजवळ नष्ट झाल्या आहेत.

शेतकरी समाजातील स्त्रियांजवळील दागिन्यांचा डबा जवळजवळ नाहीसा झाला आहे. बहुसंख्य स्त्रियांकडील कपडेलत्ते आणि भांडीकुंडी, घड्याळ, प्रसाधने यांचे प्रमाण वाढले आहे.

घरधन्यास दारू किंवा तत्सम व्यसन नसेल तर घरसामान, कपडालत्ता, खाणेपिणे, मुलांचे शिक्षण, करमणूक, प्रवास यांवर मिळकतीचा अधिक भाग खर्च होतो.

लग्नाचे वय वाढत आहे पण, अठरा वर्षांपूर्वीची लग्नं सरसहा होतातच. ग्रामीण समाजाततरी कायदेशीर घटस्फोट, पुनर्विवाह यांचे प्रमाण वाढलेले नाही.

विवाहबाह्य अपत्यांची सामाजिक मान्यता अजिबात सुधारलेली नाही.

**२. इतिहासातील वेगवेगळ्या कालखंडातील स्त्री**

स्वातंत्र्यानंतर घडून आलेल्या बदलांची तपासणी इतिहासाच्या संदर्भात केली पाहिजे. शिवाजीने तोरणा किल्ला १६४६ साली घेतला; त्यानंतर पन्नास वर्षांनी स्वराज्याची पुरी वाताहत झाली. म्हणून काही शिवाजीचे स्वराज्य अल्पजीवी आणि साडेतीन जिल्ह्यांपुरते मर्यादित होते असा उपहास करणे योग्य होणार नाही.

या अभ्यासासाठी इतिहासाचे

१) मुसलमानपूर्व (इ.स. १२०० पूर्वी),

२) मुसलमानी साम्राज्य (१३वे ते १७वे शतक),

३) पेशवाई (१८वे शतक),

४) इंग्रजी अंमल (१९वे व २०वे शतक) आणि

५) स्वातंत्र्योत्तर काळ

असे पाच विभाग पाडता येतील.



या कालखंडांची तुलना करण्यासाठी चार घटकांचा विचार करता येईल : राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि तंत्रज्ञानसंबंधी. स्थूलमानाने या कालखंडाचे विवरण पुढीलप्रमाणे असेल.

- मुसलमानपूर्व समाजात स्वकीय सवर्णांचे राज्य असले तरी अर्थव्यवस्था शोषणाची असल्यामुळे आणि एकूण जगच बंदिस्त असल्याने स्त्रियांचा मानसन्मान व्यवहारापेक्षा पुस्तकातील वचनांत अधिक होता. काही विदुषी, वेदवादिनी, संन्यासिनी इत्यादींचे अपवाद सोडल्यास स्त्रीला स्वातंत्र्य आणि मोक्ष, दोन्ही उपलब्ध नव्हते. पुरुषांच्या स्वर्ग आणि मोक्ष यांच्या मार्गातील ती धोंडच मानली जाई. स्वयंवर यांबाबत मात्र तिला व्यापक स्वातंत्र्य असावे असे मानण्यास आधार आहे.
- मुसलमानी अमलात परकीय शोषकांचे असुरक्षित राज्य प्रस्थापित झाल्याने स्त्रियांची पीछेहाट झाली, त्या घरात कोंडल्या गेल्या, गोशापद्धती मोठ्या खानदानांतही स्वीकारली गेली.
- पेशवाईच्या काळात राज्य स्वकीयांचे आले, पण असुरक्षितता वाढली. शोषण चालूच राहिले. मुलूखगिरीचे वार्षिक पंचांग सुरू झाले. त्यामुळे कलावंत समाज व त्यांतील स्त्रिया यांच्या स्वातंत्र्यात फरक पडला. एरवी गरती स्त्रियांची अवस्था अधिकच बिघडली. बालविवाह, सती, केशवपन यांचे प्रमाण वाढले. जिजाबाई, ताराबाई, येसूबाई, आनंदीबाई, अहल्याबाई अशा काही, राजघराण्यांतील स्त्रियांची सामाजिक-राजकीय प्रतिष्ठा होती.
- इंग्रजांचे राज्य पुन्हा परकीयांचे राज्य. त्यांच्या राज्यात शोषणाचे प्रमाण वाढले. पण त्याची पद्धती लुटालुटीची राहिली नाही. तंत्रज्ञान विस्तारले; रस्ते, आगगाड्या, तारयंत्रे, टपाल, वर्तमानपत्रे, पुस्तके यांचा प्रसार झाला. स्त्रिया शिकू लागल्या, वाचू लागल्या, लिहू लागल्या. पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे यांच्यासारख्या स्त्रिया सामाजिक प्रश्नांवरही हिमतीने भूमिका घेऊ लागल्या. सतीबंदी, संमतिवय यासंबंधी कायदे झाले. कायद्याचे संरक्षण सासरघरच्या सुनांनाही मिळू लागले. स्वातंत्र्याच्या चळवळीतही, विशेषत: गांधीकाळात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर उतरल्या. स्त्रियांच्या दृष्टीने हा मोठा मुक्तीचा कालखंड मानावा लागेल.
- स्वातंत्र्यानंतर स्वकीय सवर्णांचे शोषक राज्य आले. पण समाजवादी व्यवस्थेच्या बडेजावाने समाज अधिक बंदिस्त बनला.

परदेशी तंत्रज्ञानामुळे अन्नधान्य मुबलक झाले, बाळंतपण अधिक सुरक्षित झाले, लहान बाळांच्या मृत्यूचे प्रमाण घटले, घरकामात थोडी सुकरता आली;

यामुळेच प्रमुखतः, काही सुधारणा झाली. स्वातंत्र्यकाळात कायदे पुष्कळ झाले, पण अंमलबजावणीची यंत्रणा ढासळली. कोणत्याही क्षेत्रात स्त्रियांची पीछेहाट झाली असे नाही. इतर देशांतील परिस्थितीशी तुलना करता आपल्या येथील प्रगती अगदीच नगण्य वाटते.

स्वातंत्र्यानंतर पारंपरिक कुटुंबव्यवस्था शहरीकरणामुळे मोडकळीस आली आणि विभक्त चौरस कुटुंबपद्धतीचा प्रसार झाला. या प्रगतिशील बदलाचा परिणाम चांगला किती आणि वाईट किती हा प्रश्न विवाद्य आहे.

■■



(चांदवड अधिवेशनात मायबहिणींना संबोधित करताना शरद जोशी)

स्त्रियांच्या आजच्या दुय्यम अवस्थेचे मूळ शेतीमालाच्या वरकड उत्पादनाच्या संपादनासाठी सुरू झालेल्या आणि चाललेल्या क्रूर लुटीच्या व्यवस्थेत आहे. लुटालुटीच्या काळात पुरुषांनी स्वसंरक्षणासाठी हाती तलवार घेतली आणि स्त्रियांकडे 'चूलमूल' कामे आली.

●

शासनाचा मूळ उगम लुटालुटीत असल्यामुळे शासन आणि नोकरशाही यांची खच्ची करणे हा स्त्री-पुरुषमुक्तीचा प्राथमिक कार्यक्रम आहे.

●

स्त्री आणि पुरुष यांत संघर्ष नाही. वर्गविग्रहाचा सिद्धांत मुळात चुकीचा; स्त्री-पुरुष प्रश्नात तर तो सर्वस्वी गैरलागू आहे.

जनशक्ती वाचक चळवळ
₹ १५०